# माणूस

## चित्र वार्ता पुस्तक

१५ सप्टेंबर ७३ । एक रुपया

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

बाबूराव बागूल




# माणूस चित्र वार्ता पुस्तक


संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| दिनांक | किंमत | अंक |
|---|---|---|
| १५ सप्टेंबर १९७३ | एक रुपया | पाचवा |

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

भारताच्या आर्थिक
राजधानीची
ही महापालिका.
नगर शासन संस्थेची
पहिली बैठक
४ सप्टेंबर १८७३ रोजी
या इमारतीत
भरली होती.

# मुक्काम मुंबई

छाया : मोहन नावेलकर

## शताब्दी सोहळा महापालिकेचा

गेल्या शंभर वर्षांत ज्या उत्तम प्रथा
या संस्थेत पडल्या आहेत त्या
नागरिकांपुढे ठेवण्याचा तुम्ही प्रयत्न
करावा. महापालिकेच्या या
अमोल ठेव्यामुळे नागरिकांना जो आनंद होईल
त्यातच आपला आनंद मानावा...



महापौर सुधीर जोशी
भारताच्या सर्वांत जुन्या महापालिकेची सूत्रे
या वर्षी सर्वांत तरुण महापौरांच्या
हाती आहेत हा केवळ योगायोग.



आज ठराव नाहीत फक्त संकल्प.
म्हणूनच तर सभागृहात आज ही शांतता.
महापालिकेच्या इतिहासातील 'शांततेचा' हा
कदाचित् पहिलाच दिवस असावा.





ही झुंबरं, पंखे वगैरे गोष्टी पुढील वर्षी बहुधा दिसणार नाहीत. समारंभ उघड्या जागेवर व्हावा आणि त्या प्रसंगी क्रीडाप्रात्यक्षिकेही आयोजित करावीत अशी राज्यपालांनी सूचना केली.

# शिवछत्रपती पुरस्कार

मुकुंद मणूरकर

' घोळ घालणे ' हा महाराष्ट्र शासनाचा ट्रेडमार्कच आहे की काय कोण जाणे ! नाहीतर मंत्रीमंडळात तीन-तीन क्रीडा-मंत्री असणाऱ्या शासनातर्फे होणाऱ्या ' शिवछत्रपती पुरस्कार ' सोहळयाला इतकं भोंगळ स्वरूप आलं नसतं. यंदाचे हे चौथे वर्ष, पण अजून पुरस्कार पद्धतीत सुसूत्रता आली नाही.


यंदा हा कार्यक्रम एक मे रोजी होणार होता. पण पुरस्कार-प्राप्तांची नावे तोपर्यंत नक्की न झाल्याने तो पंधरा ऑगस्ट-पर्यंत पुढे ढकलण्यात आला. पण पंधरा ऑगस्टला राज्यपालांना कार्यबाहुल्यामुळे सवड मिळणे एकंदरीत मुष्कीलच ! म्हणून मग तो आणखी पुढे ढकलला. आणि अखेर आठ सप्टेंबरला पार पाडला.

पुरस्कार विजेत्यांची नावे जाहीर झाल्यावर नेहमीप्रमाणे यंदाही नाराजीची लाट उसळलीच. नाहीतरी एकावेळी सर्वांचे समाधान कसे होणार? (असे म्हणून गप्प बसायचे! ) पण चीड येते ती हा पुरस्कार पेश करण्यासाठी अवलंबीलेल्या पद्धतीबाबत ! दरवर्षी नियमात सोयीस्करपणे बदल करणे हे या पद्धतीतील एक वैशिष्ट्य ! सुरुवातीला तर क्रीडा-पटूंच्या पराक्रमाची नोंद करण्यासाठी वर्ष कसे धरावे याबाबत घोळ झाला. यंदा क्रीडामंत्र्यांनी एक मे ते तीस एप्रिल हा कालखंड नक्की केल्याचे जाहीर केले. तसेच यंदा-पासून पुरस्कार विजेते ठरविण्यासाठी स्वच्छ नियम केले असल्याचाही दावा त्यांनी केला. पण अन्याय आणि वशिले-बाजी या दोन आवश्यक गोष्टींचा सर्रास वापर केलाच पाहिजे असा जोपर्यंत अलिखित नियम आहे तोपर्यंत क्रीडा-मंत्र्यांचा दावा फोलच ठरणार !




प्रसंगी भाषणांनाही कात्री लावावी
राज्यपालांचीच सूचना !

कबड्डीत पुरस्कार देण्यास
नाबर भगिनी उरल्याच नाहीत...
म्हणून शैला रायकरचा
आता गौरव होऊ शकतो !






अमि बिया




पद्माकर शिवलकर व वसंतराव देसाई
वसंतराव म्हणतात की शिवलकरच्या फिरकीने
हजारो मुंबईकरांना खूष केले
पण कोल्हापूरला पन्नास हजारांना
त्याच्या आवाजाने धुंद केले



सदूभाऊ गोडबोले
एका तपस्वी जीवनाला मुजरा



या बाबतीत मात्र
पद्माकर शिवलकरपेक्षा
डेव्हीडची फिरकी
जास्त श्रेष्ठ !



डेव्हीडची
आणखी एक फिरकी
शीला धनवटेबरोबर.

मामासाहेब मोहोळ
पारितोषिकाचे अवमूल्यन
(वि. वि. करमरकरांच्या मते ! )





चुंबन
एक
देणे-घेणे
तुमची राजकीय चुंबाचुंबी कुठवर आली आहे?
दीर्घ चुंबनाने लांबी वाढेल त्याचे काय?
हवी तेवढी चुंबने द्या. पण आम्हाला तेवढी द्यायला लावू नका, म्हणजे झाल.

# युद्धनौकेवरला एक दिवस

रवीन्द्र पिंगे

वरून हुकूम आला, "नौदलाच्या गेटापाशी उदईक हजर असा." बोलून चालून आम्ही हुकूमाचे बंदे. आकाशवाणीच्या चाकरमान्यांना घडीचा टेपरेकॉर्डर हाच बडबिस्तारा. तो पाठुंगळीस मारून पच पच उषःकालीच आरमारी गोदीचा चेकनाका गाठला. रस्त्यात चिटपाखरू नव्हतं. फार एकटं वाटायला लागलं. रावानी कशासाठी बोलावलं आहे, कुठे नेणार आहेत, काय दाखवणार आहेत, कुणाच ध्वनीमुद्रण करायचं आहे, काहीही कल्पना येईना. मनाची पाटी कोरी होती. नव्या अनुभवासाठी ओंजळ पसरली होती.

घरातला सर्वांत जुना डगला जसा बोचक्यात कोंबून कपाटात ठवलेला असतो, तसा मुंबईतला सर्वात जुना भाग म्यूझियमच्या पिछाडीला असलेल्या आरमारी गोदीच्या आसमंतात जपून ठेवलेला आहे. कोवळ्या शेंदरी किरणांची जाळी त्या बाळबोध टापूवर पडली होती. जुन्या ईस्ट इंडिया कपनीच्या काळात बांधलेल्या, पण अलीकडे सफेद रंगरोटीचा कळाहीन मुलामा चढवलेल्या उभट दाराखिडक्यांच्या लांबोटक्या वखारी चेकनाक्याच्या आतल्या अंगाला खड्या होत्या. इमारतींचं हे साफ निगर्वी रूप आपल्याच कुटुंबातल्या दिमाखहीन म्हाताऱ्या माणसांसारख, जितकं अधिक काळ टिकेल तितकं टिको, असं वाटलं. बेगडी बनावटीच्या नव्या तकलादू जगात त्याचा निरुपद्रवी घरगुतीपणा केवळ शोभादायकच नव्हे, तर दिलासादायकही वाटतो. इतिहास सांगतो, लालबुंद टोपीकरांची पहिलीवहिली तारवं इथेच मुंबई बंदराला लागली. टोपीकराने आपले चंबुगबाळे इथेच सोडले. साहेबाची पहिली व्यापारी वस्ती ह्या गोदीविभागातच झाली. इथेच कुठे तरी त्याच निशाण फडकलं असणार. इथेच कुठे तरी नेटिवानी त्याच्याकडे आशेने पाहील असणार. भाकरीतुकड्याच्या नव्हे; हेलमजुरी मिळण्याच्या.

इतिहास सांगणाऱ्या त्या वखारीमध्ये सामसूम आहे.

चेकनाक्याच्या लाकडी फाटकाचं जुनं बाळबोध रूप मुद्दामच शाबूत ठेवलेलं आहे. गेटापाशी एक प्रचंड पितळी घंटा लठ्ठ ओंडक्यांना टांगून ठेवलेली आहे. आकाराने नाशिकच्या नारोशंकराच्या घंटेपेक्षा मोठी आणि डेरेदार. दोनचारशे वर्षांपूर्वीच्या गोऱ्या सारंगांनी मिळवलेली ही दर्यावरची लूट असणार. ती वाहून नेण्यात दहा रेड्याची दमछाक झाली असणार. गोदीत पाऊल टाकणाऱ्यावर प्रथम दर्शनी छाप पडावी म्हणून ती अशी दिमाखात अधांतरी विराजमान झाली असावी. ही वाजवता येण शक्यच नाही, कारण हीचा टोला उचलणार कोण, नि किती वेळा? तिच्या चकाकत्या घेरावर काही मूळाक्षरं पुसटशी खोदलेली दिसत होती. त्यांचा अन्वय नीट लागेना, कारण तिच्यावर सूर्यकिरणाचा तिरपा तळपता कवडसा पडला होता. गेटाच्या आतल्या अंगाला एक मुद्दाम जतन करून ठेवलेलं जीर्ण निवडुंगाच आटोपशीर बन होत. दोन माडया उंच गेलेल्या त्या निवडुंगाच्या टोकाच्या फडावर लालेलाल फुल लुकलुकत होती. निवडुंगाचे बुंधे हत्तीच्या पायासारखे भासले. हा निवडुंग किती जुना असेल? कदाचित ह्याचे काटे पहिल्या टोपीकरांच्या पायात मोडले असतील! नि पलिकडले गोदीतले ते प्रचंड वटवृक्ष? साहेब तर आल्या आल्या नक्कीच त्यांच्या सावलीत चिरुट शिलगवून विसावला असणार!

ह्या गोदीशी तसा माझा थोडासा पूर्वपरीचय आहेच. पद्माकर नागपूरकर हा माझा मित्र वीस वर्षांपूर्वी ह्याच गोदीत मुनीमकी करायचा. हजारो गोदीकामगारांच्या पगाराचे पैसे वाटून वाटून त्याची बोटं काळी पडलेली असायची! एकदा ह्याच हद्दीत तो त्याकाळी मला म्हणाला होता, 'गोदीकामगाराची स्थिती विलक्षण हलाखीची असते. व्यसनापायी ते सतत कर्ज काढीत असतात. त्यांचे हप्ते त्यांच्या मजूरीतून कापले जातात. त्यामुळे काही काही कामगारांना तर अल्ल्या महिन्याचा पगार म्हणून हातावर जेमतेम रुपया-दोनरुपये सुटतात!' ह्यात अतिशयोक्ती नसेल. मी स्वत: शाही आरमाराच्या हिशोब खात्यात काम करीत होतो. तेव्हा मी सतत पाहात होतो की आरमाराचे बडे अंमलदार ट्रक्स करून ईर्षेने हसत खेळत महालक्ष्मीला शर्यतीना जात. तिथे चढाओढीपायी त्यांचे खिसे फोकस होत. हात हलवीत ते विमनस्कपणे गुपचूप परतत. नतर उदंड उसनवारी करत. महिन्याच्या लठ्ठ पगारातली फार मामुली रक्कम त्यांच्या खात्यावर पडे. ते हवालदील होत. कपड्यालत्यातला भपका मात्र टवटवीत असे. वागवागणूक गुलहौशी असे.

ही बाब पचवीस वर्षांपूर्वीची आहे, की जेव्हा शाही आरमारी दलावर गोऱ्यांचा युनियनजॅक फडफडत होता आणि त्याच्या सावलीत मेजापाशी बसलेल्या माझ्या कानाला बोरू होता.

पंचवीस वर्षांच्या घडघडत्या काळाची थंड वाळू पायाखालून निसटून गेलेला मी त्याच नौदलाच्या गोदीत भारतीय तिरंग्याच्या छायेत आज काखोटीला टेपरेकॉर्डर मारून सेवेसी सादर उभा आहे

गेटावर नोंदानोंदी झाली.

गोदीकामगारांच्या तारांबळीकडे आणि ठोकाठोकीकडे कानाडोळा करीत आम्ही तरीवर आलो आहोत. गावाकडे आपल्या घरासमोर जेवढ्या आकाराची अंगणं असतात, तेवढ्याच आकाराच्या एका तरंगणाऱ्या पोकळ लोखंडी चौरंगावर आम्ही उभे आहोत. बोटीत चढाउतरायला सोईस्कर जाव म्हणून हे तरंगते चौरंग तराफ्यासारखे वापरतात.

तराफ्याच्या कडेला एक सुशोभित लाँच उभी आहे. तिच्या आतल्या सीटा झकपक आहेत. छोटस केबीन आहे. प्रवेशद्वारावर चांदीचा मुलामा दिलेले दोन उसळते मासे शोभेसाठी लावलेले आहेत. लाँचचा रग मोगऱ्याच्या फुलासारखा धवल आहे. कुणीही न सांगता मी ओळखलं आहे की ही लाँच आमच्यासारख्या सटरफटरासाठी नाही; ज्याची जय्यत बडदास्त ठेवावी लागते अशा अक्कडबाज हुद्देदारासाठी आहे.

'आम्हाला तुम्ही कुठे नेणार आहा?'

'ते तुम्हाला तिथे प्रत्यक्ष गेल्यावर कळेल.'

बावचळलेला मी एका ऐसपैस खपाटयात बसलो. पाच पन्नास टिपटॉप अमलदार बसले. सगळया सीटा नीट बसल्याच इंजिनवाल्याने पाहिल आणि जोरदार हँडल मारल. खपाटा फुरफुरला. त्याला एकदम रेसच्या घोडया-सारखा चेव चढला. हिरव्या निळया लाटा चिरत आम्ही धुमधडाक्याने समुद्रात घुसलो. दूर धुक्यात 'मैसोर' ही भारतीय आरमाराची अजस्त्र नौका नांगरून ठेवलेली दिसली. खपाटा तिच्या रोखाने वळला. तोंडावर उडालेलं लाटांचं पाणी पुसतो न पुसतो तोपर्यंत खपाटा 'मैसोर'ला खेटून डुचमळू लागला. एका लोंबत्या शिडीवरून आम्ही प्रशस्त, उघडया डेकवर आलो. डेकवर दुतर्फा तोफा डागून ठेवल्या आहेत. बोटीला दोन अजस्त्र धडधडणारे बब आहेत. गुंतागुंतीची यत्र चहूबाजूना आहेत. पुढे एक उंच मनोरा आहे. डोळयाना दुर्बिणी लावून बडे अंमलदार तिथून आम्हाला न्याहाळीत आहेत.

'फ्लॅगशिप म्हणजे नौदलाच्या ह्या विभागातल्या काफील्याची मुख्य युद्धनौका. युद्धनौका एकटया दुकटया सचार क्वचित काही खास कामगिरी असली तरच करतात. नाहीतर एरव्ही युद्धनौकाचा काफीला बदका-सारखा टोळी करून किनाऱ्यावर गस्त घालीत असतो. कुठेही मोहिमेवर जाताना फ्लॅगशिप – म्हणजेच ध्वजनौका – मधोमध राहाते, आणि तिच्या सभोवताली इतर युद्धनौका कोंडाळं करतात. त्याला protective screen म्हणतात. हेतू हा की शत्रुच्या पाणसुरुगानी किंवा पाणतीरानी ध्वजनौकेच नुकसान होऊ नये. संरक्षक पडद्यातल्या आजूबाजूच्या ज्या इतर युद्धनौका असतात त्या पाणसुरुंग शोधून काढणं, पाणबुडयाचा शोध करणं, वगैरे कामं करतात. प्रत्येक युद्धनौकेवर एक एक बडा कप्तान असतो. खुद्द ध्वजनौकेवरसुद्धा बडा कप्तान असतोच, पण शिवाय त्याच्यावर एक ॲडमिरलही असतो. ध्वजनौकेवरला ॲडमिरल ह्या काफिल्यातल्या सर्व युद्धनौकावर बिनतारी संदेशाने नियंत्रण ठेवतो. म्हणजे बोटी कप्तान चालवतात. ॲडमिरल त्यांना मार्गदर्शन करतो.' आम्हाला माहिती पुरवली जाते.

डेकवर उबदार उन्हात उभ राहण्यात वेगळाच आनंद आहे. हवेत गारवा आहे. धुवट आभाळात ढग स्थिर झाले आहेत. बोटीच्या धुराचं दाट वेटोळं थेट ढगाना भिडल आहे. सभोवार धुक्याचं पटल आहे. नारींगी चोचीचे सफेत बगळे पख विस्फारून जागच्या जागीच तरंगत आहेत. त्यांचे टोकाकडे खाली वळलेले पख लटकणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या हातासारखे वाटत आहेत. कोकणाची डोंगरमाळ धुक्यात अस्पष्टशी दिसत आहे. तिच्यावर धुकट सूर्योदय झालेला आहे. हवेतली ऊब वाढत आहे. स्वत च्या तोऱ्याचं भान सतत जागरूक असणाऱ्या झकपक अंमलदारांच्या घोळक्यात आमच्यातलं अपरिहार्य अंतर मापीत मी डेकवर उतरलेल्या किरणाची ऊब लुटतो आहे.

'तुम्ही आता आमच्यावरोबर रांगेत उभे राहा, कारण आता ॲडमिरल येतील. त्यांना सलामी आहे.'

ह्या रुबाबदार मडळीच्या रांगेत उभ राहताना कुठेतरी आपण कमालीचे तोकडे पडतो ह्या sense of inadequacy ने मी दुभंगत असतानाच अमलदारानी डेकवर लायनी केल्या. शिटया वाजल्या. सू सू करीत मोगऱ्यासारखी शुभ्र लाँच उसळत 'मैसोर' जवळ आली. डोळयाचं पात लवतं न लवत तोच ॲडमिरल खाड खाड बूट वाजवीत हजर झाले. बिगुल वाजले. सलाम झाले. सन्मानार्थ बंदुकीची फैर सुटली.

हा धष्टपुष्ट सावळा अमलदार, अंमलदाराचा अमलदार आहे. कुणी वेगळं सांगण्याची गरज नाही. इतरांनी त्याच्यापासून जे अदवशीर अतर ठेवलेलं आहे, ते बोलक आहे. त्याची गर्दन घट्ट आहे. पण आवाज फार सौम्य आहे. मग्रूर नाही. वय पन्नाशीच्या आसपासचं. नजर स्थीर. केंद्रित. मर्माचे तेवढे दोन शब्द बोलतो. जितक्यास तितका आहे. फाफटपसारा नाही. देवाचा प्रसाद स्विकारावा, तसे त्याचे छोटे छोटे हुकूम शिरोधार्य मानले जात आहेत. ह्या ध्वजनौकेचा तो राणा आहे हे त्याच्या तडफदार चालीतही दिसून आलं आहे. त्याच्या तगडेपणाचा हेवा वाटतो.

ह्या वरिष्ठ अंमलदाराच नाव रिअर ॲडमिरल कुरुविला. केरळीय ख्रिश्चन, ही जातच दर्यासारगाची. ह्या त्यांच्यातला प्रभु.

ताठ मानेने तो उच मनोऱ्याच्या शिडया सटसट चढून गेला. पुन्हा एकदा उंचावरला तो आणि खालचे इतर ह्याच्यातलं अतर मी मापून घेतलं. तो डोळयाना दुर्बिण लावून वदर उचावरून न्याहाळू लागला.

'थोडी कॉफी घेऊ या.'

खालच्या मजल्यावरल्या भोजनालयात गेलो. पेटीवद भोजनालय अद्यावत पण दाटीवाटीच आहे. ह्याच युद्धनौकेने परदेशांना वेळोवेळी दिलेल्या भेटीच्या वेळी मिळविलेल्या चादीच्या स्मृतीचिन्हांची शोभिवत आरास कडेच्या कपाटात मांडून ठेवली आहे. चामडयाने मढवलेले मऊमऊ प्रशस्त कोच जुन्या धाटणीचे आहेत. पायाखालचा गालीचा उत्तम बनावटीचा आहे. वैभवात काडीचीही कमतरता नाही. दालनातच कोपऱ्यात मद्यपानाचा कठडा आहे. तिथे पण कठडयावर देणारा वा घेणारा कुणीच नव्हता. कदाचित रामप्रहर असल्यामुळेही असेल.

कॉफी पिताना बाजूच्या पोर्टहोलमधून समुद्राचं पाणी उलटं उलटं वाहाताना दिसल. म्हटल, ही काय भुताटकी आहे? शेजारच्या अमलदाराने सागितलं, 'आपली बोट केव्हाच सुरू झाल्याय मिस्टर! तुमच्या लक्षात आलेल दिसत नाही.' विश्वास बसेना म्हणून डेकवर गेलो. पहातो तर आमची अजस्त्र बोट खरच भर वेगात पाणी कापीत अलिबागेच्या किल्ल्याच्या दिशेने निघाली होती. धुक्याच्या टोपऱ्याखाली लपलेल मुबई शहर भराभर मागे पडत होत. लाबवर दिसणारे मचवे सरसर जवळ येत नि पाहाता पाहाता मागे जात. बोट तुफान वेगाने निघाली आहे पण आमच्या पोटातलं पाणीसुद्धा हलत नाही.

'ॲडमिरलसाहेबानी सर्वांना त्याच्या

मनोऱ्यावर बोलावलं आहे.'

ॲडमिरलचा मनोरा.

साधारणपणे उंच इमारतीचा दहावा मजला भरेल इतक्या उचावर आम्ही सारे जमलो आहोत. वीस चौरसफुटांची सर्व बाजूनी मोकळी जागा आहे. मध्ये एक उचावर कोच ठेवला आहे त्यात रिअर ॲडमिरल कुरूविला डोळयाला दुर्बिण लावून ऐटीत बसला आहे. आजूबाजूला एकही खुर्ची नाही. त्यामुळे सर्वांना उभ रहाणं प्राप्त आहे. ॲडमिरलच्या बाजूला एक कडक इस्त्रीतला तरुण तडफदार अधिकारी आहे. सेकंदा सेकदाला, मिनिटा मिनिटाला तो अत्यत आदबीने ॲडमिरलला काही तरी सांगतो, विचारतो. अत्यंत थड स्वरात शातपणे ॲडमिरल मोजकेच एक दोन शब्दाचे उत्तर देतो. मग तो अधिकारी ते उत्तर समोरच बसलेल्या तारायत्रावरल्या लेखनिकाला सांगतो. लेखनिक तारायत्रावरून ते उत्तर खालच्या डेकवर बोटीचा कप्तान आहे त्याला सागतो आणि आमच्या बोटीच्या बाजूने सहा बोटींचा जो काफिला चालला आहे, त्याच्या कप्तानांनाही तारायत्रावरून सांगतो. सर्व हुकूम दोन-तीन शब्दांचे navigation बद्दलचे आहेत.ॲडमिरल प्रवासाची दिशा आणि वेग सागतो. इतर सारेजण ते हुकूम तंतोतत पाळतात. काफिल्यातल्या सर्व बोटीच्या नियत्रणावर ॲडमिरलची नजर आहे. तो एकसारखा त्या कप्तानांकडे दुर्बिणीनी पहात आहे. 'मैसोर'च्या समोर तीनशे फुटावर 'दीपक' नावाचं नौदलाच मालवाहू जहाज़ मार्गदर्शक म्हणून चालत आहे. एका अगाला शंभर फुटावर 'कडमठ' नावाची पाणतीरफेकी प्रचंड चिलखती किल्ल्यासारखी दिसणारी युद्धनौका आहे. दुसऱ्या अंगाला शंभर फुटावर 'कुठार' नावाची प्रचड विनाशिका आहे. त्याच्या पलीकडे समान अतरावर इतर युद्ध नौका आहेत. आम्ही टोळी करून भर वेगात निघालो आहोत. एकाद्या नौकेचा वेग जरा कमी जास्ती झाला किंवा किंचित जरी दिशा बदलली तर एका मिनिटात बोटीची भयकर टक्कर होईल. पण टक्कर तर सोडाच, एक इंचसुद्धा अंतर कमी जास्त होऊ न देण्याची ॲडमिरल डोळयात तेल घालून दक्षता घेतो आहे.

'Ask KUTHAR to turn thirty six degrees South West.'

'Ask DEEPAK to reduce speed by one Knot.'

'Ask KHUKRI to move hundred feet towards left.'

'Ask KUNJAR what is the depth of water.'

तारायत्र सतत क्षणभरही न विसावता खडखडत आहे. ॲडमिरलचे हुकूम मिळाल्याचे आणि ते पाळल्याचे सदेश क्षणाक्षणाला त्या नौकावरून येत आहेत. ॲडमिरलच्या मनोऱ्यावर पधरा वीस अधिकारी दुर्बिणी लावून उभे आहेत. मलाही एक दुर्बिण दिली आहे. ॲडमिरलचे हुकूम सर्वांना ऐकू येत आहेत. पण शिस्तीचा म्हणून काही भाग दिसतो आहे. ॲडमिरल आपले हुकूम फक्त एकाच नेमून दिलेल्या अधिकाऱ्याला सागतो. तो अधिकारी मग तो हुकूम कागदावर लिहून इतरत्र पोहोचवितो. ही शिस्त वाखाणण्यासारखी आहे. त्यामुळे काफिल्याच्या वेगवान सचलनात एकसूत्रीपणा अखंड राहिला आहे. इतर सरकारी कचेऱ्यात जसे चार साहेब चार परस्परविरोधी हुकूम सोडतात, तसे इथे सोडले तर अनर्थ होईल आणि बोटीच्या टकरी होऊन दारुगोळयाचा भयकर स्फोट होईल. तो धोका एकमुखी कारभार सोपवून साफ टाळला आहे.

ॲडमिरलने एक हुकूम सोडला. ताबडतोब सगळा काफिला दक्षिणेचा रोख बदलून पश्चिमेला अरबी सागरात घुसला. म्हणजे, 'मैसोर'ची नाळ जी अलिबागेच्या रोखाने होती, ती आता एडनच्या रोखाने झाली असावी. आता आजूबाजूला, समोर, मागे अथांग पाण्याशिवाय काहीच दिसत नाही.

सिंधुसागर! निळा निळा भोर, तळघातल्या पाण्यासारखा शांत, पारदर्शक सिंधुसागर! आंघोळ घालून तीट लावलेलं बाळ पाळण्यात शांतपणे झोपी जाव, तसा हा निळा निळा कोवळा सिंधुसागर अगदी शातपणे झोपी गेलेला दिसतो. पाण्यावर लाटा अजिबात नाहीत. केवळ अस्फुट तरग आहेत. झोपी गेलेल्या बाळाने गालातल्या गालात क्षणभर हसावं तसे हे कोवळे तरंग भासतात. आईचा त्याच्या अंगावर हात पडावा तसं धुकट ऊन ह्या पारदर्शक जलाशयावर पडलेल आहे. ही अलौकिक मोत्याळ निळाई पाहून नीलकृष्णाची नाही तर कुणाची आठवण होणार? आपलं हिंदू मन आकाश पाहून, पाणी पाहून, श्रीकृष्णाला भिडतं. कृष्णकांतीची भूल ह्या पारदर्शक निलांगी जळासारखीच होती. असणार. किनाऱ्यावरून क्षितिजाकडे पसरलेला नेहेमी दिसणारा समुद्र हिरवा, राखी, नीळासावळा, कवरा, असा कबुतराच्या मानेच्या रगासारखा सरमिसळ छटाचा दिसतो. किनारा मागे टाकून पन्नास मैल सागराच्या ऐन गाभ्यात आल्यावर दर्याचा रूपपालट झालेला दिसतो. वर आभाळाचा नीळा घुमट, मध्ये नीळसर छटेच्या पाढुरक्या किरणाच उबदार पटल आणि व्योमाला उचलून धरणारा सभोवतालचा गोलाकार कृष्णवर्णी अथाग जलाशय चराचराचं फक्त एवढच, एकच एक रूप तुमच्यासमोर तासतास पालवत राहातं. एका बाजूने ही किमया पाहात राहाता, नि सागराच हे मोहिनीपर्व पुन्हा दिसणार नाही ह्या कठोर विचाराने भेगाळतही असता.

ॲडमिरलच्या मनोऱ्यावर एक सागरपृष्ठाचा नकाशा आहे. त्यात सागरतळावर कुठे खडक आहेत, प्रवाह कसे आहेत, किनारा कुठल्या दिशेला किती अतरावर आहे, ते दाखवल आहे. कपासपेटीतली उपकरणं घेऊन एक अधिकारी आला. त्याने मापं घेऊन काहीतरी गणित केल आणि नकाशावर लाल पेन्सीलीने खूण केली. विचारल्यावर त्याने सागितलं, 'आपलं जहाज ह्या क्षणी नेमक्या ह्या ठिकाणी आलं आहे.' माझ्या तर्काप्रमाणे आम्ही रेवदडयाच्या किल्ल्याच्या बरोबर समोर पचावन्न मैलांवर असू.

'आता युद्धात तोफांचा भडीमार कसा करतात ते तुम्हाला पहायला मिळेल. आम्ही लहान तोफगोळे समुद्रात उडवू. तुम्ही बोटीचे कठडे घट्ट धरून ठेवा.'

इशारे झाले. 'मैसोर'च्या डाव्या अगाच्या काफिल्यातल्या युद्धनौका वेग वाढवून आमच्या फार पुढे पळाल्या. डाव्या बाजूचा समुद्रपट्टा पूर्णपणे मोकळा झाला. ॲडमिरलच्या मनोऱ्याच्या पायथ्याशी तोफांचं झाड आहे. तिथे गोलदाज हजर झाले. त्यांनी कान झाकणारी शिरस्त्राणं घातली आहेत. अंगात मळकट बॉयलर्स सूट आहेत. हातात चामड्याचे मोजे आहेत. तोफेत भरायला त्यांनी

पृष्ठ ५३ वर

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

**बाबूराव बागूल**

## ओळख



भिवा आज पहिल्यांदाच टांग्यांत बसत होता. आणि केळुस्कर सरासारखा वरच्या जातीचा माणूसही आज पहिल्यांदाच एवढया जवळ आला होता. बसला होता. इतक्या आपलेपणाने बोलत होता. हायस्कूलमधील चार एक वर्षात एवढया जवळीकीने कोणी त्याच्या जवळ आले नव्हते. बोलले नव्हते. तो एकाकीच राहिला होता. आणि आता एवढया मोठ्या वयाचा, दर्जाचा आणि जातीचा माणूस जवळ आल्यामुळे त्याला अवघडल्यासारखे झाले होते. टांग्यात बसल्यामुळेही त्याचे मन अस्थिर झाले होते. टांगा जेव्हा गर्दीतून जाई, वरिष्ठ जातीची मंडळी रस्त्याने चालताना दिसे, तेव्हा त्याच्या मनांत भीतीसारखे काहीतरी उत्पन्न होई. कोणी रोखून पाहिले तर त्याची नजर खाली होई.

आता टांगा वरिष्ठ लोकांच्या वस्तीतून चालला होता. जिकडे तिकडे पगडया, फेटे, कपाळावर टिळे लावलेले लोक दिसू लागले तसे त्याचे मन अस्वस्थ झाले. कधी ही वस्ती संपते असे त्याला होऊन गेले होते. टांगा त्या वस्तीतून बाहेर पडला आणि त्याला हायसे वाटले.

आता रस्ता समुद्राच्या जवळून जात होता. समुद्राचे उत्साही वारे अंगावर खेळत होते. समुद्राचा ऊचंबळून येणारा जलविस्तार पाहून त्याचे मन शांत होऊ लागले. समुद्राचे ते रुद्राभीषण सौंदर्य पाहून त्याच्या डोळयातील बेचैनी नाहीशी झाली. तो समुद्राकडे, समुद्रावर वाकलेल्या निळयाभोर आकाशाकडे एक टक बघत होता.

समुद्र दिसताच त्याच्या चर्येवर झालेला बदल पाहून केळुस्करांना बरे वाटले. हा हुशार मुलगा काव्यात्मक प्रवृत्तीचा आहे असे केळुस्करांना वाटले. पण त्यांना प्रश्न पडला, अशा दुःख दैन्यांत दुष्काळाप्रमाणे रखरखीत नयिनांत काव्य येऊ शकते ? तग धरू शकते. आणि असे असूनही जर या मुलाठायी ती काव्यात्मकता असेल तर ती माती जरा वेगळधा जातीची आहे. आपली निवड योग्य आहे.

आणि भिवा समुद्राच्या दर्शनाने हलका फुलका झाला होता.

त्याच्या अंतरीची हुरहूर कमी होऊ लागली. चित्तवृत्ती समुद्राच्या संगीताने टवटवीत झाली. त्याला वाटू लागले, माणसापेक्षा निसर्ग खरा बरा. एवढा अफाट, इतका रहस्यमय असूनही आनंद देणारा. माणूस आपल्यासारखा. पण किती त्रास देणारा? किती दुःख देणारा... माणूस असा उपद्रव का देतो? त्याला डोळे आहेत म्हणून? बोलतो म्हणून? की, त्याला मन आहे म्हणून... वासना, भावना आहेत म्हणून...

*पण निसर्ग किती चांगला. माणसापेक्षा निसर्ग जवळचा का व्हावा?* माणूस माणसाचा शत्रू का व्हावा? तो का द्वेष करतो? तिरस्कार करतो? त्याला हे करायला कोण सांगतो? तो देव! पुणेकर रोकडे साहेब म्हणतात, तो नेटिव्ह गॉड.. समुद्रा ये... माणसात ये... माझ्यात ये... मला तुझ्यासारखे कर... मोठे. खूप मोठे... नाहीतर मला तुझ्यात घे इथून ने. ते डबके चाळीतले, ते शाळेतले सर्व सारखेच. दुःख देणारे. पण तू... सुख देणारा, शांती देणारा. सुंदर. मधूर. भरपूर. समुद्रा, समुद्रा ये... ये .. भिवाचे मन समुद्राला अशा हाका मारण्यात तल्लीन झाले होते. टांगे पळत होते. केळुस्कर बघत होते. आता रस्त्याने वळण घेतले. तसा समुद्र दूर झाला. फक्त त्याचा उत्साह घेऊन झालेला वारा मनमोकळेपणाने अंगाखांद्यावर खेळत होता. *त्याचा, सर्व शरीर नादमय करणारा* घोष ऐकू येत होता. टांगा जसजसा दूर जाऊ लागला तसा तोही ऐकू येईनासा झाला. टांगा पुढे गेला आणि समुद्र लुप्त झाला. त्याचे काहीही जवळ राहिले नाही तशी त्याच्या मनात खिन्नता आली. हुरहुर वाटू लागली. अस्वस्थता वाढू लागली. आजूबाजूच्या वैभवशाली हवेल्याकडे नजर जाताच अंतःकरणात समुद्राने घालवून लावलेली भीती पुन आली. एकदम परके, तुटून पडल्यासारखे, पोरके पोरके वाटू लागले. आपले इथे कोणीही नाही, आणि या हवेल्यानी ठरविले तर, या रस्त्यावरल्या लोकानी ठरविले तर ते टांगा रोखतील आणि विचारतील,

अरे तू कोण?

*मी... विद्यार्थी...*

चूप. विद्यार्थी ही काय जात आहे. अन् तू महार असून विद्यार्थी कसा? धर्माने काय सांगितले आहे... आणा शिरो, आणा तरवारी... महार असून विद्यार्थी. तोही टांग्यात आमच्या रस्त्यावरून? आमच्या वस्त्यातून .. कुठंय सरकार? ही काय राणीच्या जाहीरनाम्याची अम्मल बजावणी आहे? अशी? एक गरीब म्हाराचं पोर टांग्यात? आमच्या रस्त्यावर... आमच्या वस्तीत? कुठय सरकार? सरकारा, याला त्या तिकडे नरकात फेकून दे... जिथे दुःख आहे, दैन्य दारू आहे तिथे...

'सर...' भिवाने व्याकूळ होवून हाक मारली. केळुस्कर आपल्याच नादात होते. त्यामुळे भिवा मुका झाला. आणि तो जे केळुस्करांना विचारणार होता ते स्वतःलाच विचारू लागला,

'महार म्हणजे काय? महार म्हणजे जिथे दुःख, दैन्य, दुष्काळ आणि दारू असते तिथले जीवन... पण हे का मिळाले? कोणी दिले? गत जन्माच्या पापाने... गत जन्माच्या भल्याबुऱ्याचे फळ इथे का? तिथे, तेव्हा का नाही? जन्म कोण देतो? असा दुजाभाव, जन्म देणारा का करतो? हा, बाबा म्हणतात तो दयाघन आहे की पुणेकर रोकडे साहेब म्हणतात तो नेटिव्ह गॉड आहे?

बाबा म्हणतात देव प्रेमळ आहे. प्रार्थनेने तो प्रसन्न होतो. आणि पुणेकर रोकडे साहेब म्हणतात तो शत्रू आहे शत्रू असे सुंदर आकार निर्माण करील? एवढा भव्य सुंदर समुद्र तो उत्पन्न करील? पुणेकर साहेबांचा नेटिव्ह गॉड कोणता? या हवेल्यावाला... डबके चाळवाला? कोणता? बाबाचा प्रेमळ देव कोणता...?

'सर' भिवा डोक्यात उठलेल्या प्रश्नाने भांबावून गेला होता. *त्याला समाधान हवे होते. शांती हवी होती. आतली भीती,* हुरहूर निघून जायला पाहिजे होती. त्याला ती असह्य झाली होती पण केळुस्कर सरांना त्याची दुसरीही हाक एकू गेली नव्हती.

ते त्या इमारतीच्या रचनेकडे बघत होते. शिल्प शास्त्राचा, वास्तु शिल्पाचा त्यांना शौक होता. त्यावर त्यानी मिळेल तेवढे वाचले होते. ती वास्तु मोठी आकर्षक होती. पण ती नेमकी कोणत्या स्टाईलची आहे हे केळुस्कराच्या लक्षात येत नव्हते. कधी त्यांना ती हिंदु राजवाड्याच्या पद्धतीची वाटत होती, तर कधी ती मोगल शैलीतील वाटत होती. कधी दोन्ही शैलीचा रचनाकाराने मिलाफ केलेला आहे असे त्याना वाटत होते. अन् दुसऱ्या क्षणी पटतही नव्हते. ते असे संभ्रमात पडलेले होते. भिवाची काव्यात्मकता नष्ट करू नये म्हणून ते त्या इमारतीकडे बघता बघता दंग होऊन गेले होते आणि म्हणून भिवाने मारलेली अस्पष्टशी हाक त्यांच्या कानावर गेली नव्हती.

टांगा आता खूप हळू झाला होता. मलबार हिलचा उभा चढ, घोड्याला वेगाने चढणे अवघड वाटू लागले होते. तो मान पुढे करून, अंगाला बाक देऊन पाऊले टाकीत होता. भिवाच्या मनात आले, ही वस्ती अशी अवघड आहे ..दडपण आणणारी आहे. टांग्यातून खाली उतरावे म्हणजे त्या बापड्याचे ओझे तरी हलके होईल...

'सर...'

'काय आंबेडकर...मी त्या हवेलीच्या शैलीचा विचार करीत होतो. काय म्हणता?'

'काय म्हणता... '

'मी खाली उतरावं असं मला वाटतं.'

'का?'

'घोड्याला टांगा ओढणं जड-अवघड वाटतं.'

'टांगेवाला...हम उतरे?'

'कोय जरूरत नही साव...'

'नही, आंबेडकर म्हणतात—'

'मै देख रहा हू...छोटे बाबू कमीसे सोच रहे है...रहेमदिल दिखते है.' केळुस्कर सरांना टांगेवाल्याने दिलेला अभिप्राय आवडला. तो सयाजीराव महाराजाच्या कानावर घालण्याचे त्यांनी मनाशी ठरविले. ते खूष होऊन म्हणाले,

'भीमराव, तुम्ही काय ठरविले आहे.'

'कशाबद्दल सर ..'

'तुमच्या शिक्षणाबद्दल...'

'शिकू देतील तेवढं शिकायचं.'

'कोण शिकू देतील...वडील?...घर कुटुंबातले?'

'त्यांचा विरोध नाही,'

'मग कोणाचा? जातवाल्याचा.'

'त्यांचाही नाही. संस्काराच्या वेळी दिसलंय आपल्याला.'

'हो. मग कोणाचा?' काय उत्तर द्यावे? दिले तर केळुस्करांना आवडेल का? सयाजीराव महाराज त्यामुळे नाराज तर होणार नाहीत. स्कॉलरशिप आपल्या उत्तरामुळे मिळाली नाही तर बाबा नाराज होतील.

'उत्तर दिलं नाही भीमराव.'

'कसे देऊ?'

'का?'

'तुम्ही नाराज व्हाल.'

'नाही होणार. अन् झालो तर तुमचे नुकसान होईल एवढा नाराज होणार नाही. तुम्ही पुढे यावेत. म्हणजे आम्ही पुढे येतो. म्हणजे आपण स्वातंत्र्य मिळविण्यास योग्य होतो. जुनी पाप धुतली पाहिजेत. म्हणून मी, मंडळी सत्कारासाठी बोलावायला आली त्याच दिवशी महाराजाकडे आलो, गव्हर्नराकडे, दुसऱ्या सरकारी ऑफिसराकडे गेलो नाही. सयाजीराव महाराजांची भेट घेतली. त्यांना सांगितलं. ते पण एका सभेत बोलले होते की, अंत्यजातील लायक विद्यार्थी आढळला तर त्याच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी बडोदा सरकार घेण्यास तयार आहे. मी त्यांना त्यांच्या वचनाची आठवण करून दिली. ते लागलीच तयार झाले. पचवीस रुपये स्कॉलरशिप देण्याचे ठरले. फक्त तुम्ही ग्रॅज्युएट व्हायचे अन नोकरीला ब्रिटिश गव्हर्मेंटकडे जायचे नाही. तुम्हाला शिक्षण देणारे बडोदे सरकार. नोकरीपण देणारे तेच.'

'मला मंजूर आहे सर.'

'पण मघाशी काय बोलणार होता. त्यांनी शिकू दिलं—तर ते कोण?'

'ज्यांनी आम्हाला असं करून ठेवले ते...त्यांना मी उच्च शिक्षण घेतो आहे हे आवडेल का...?'

'आता राज्य कोणाचं आहे?'

'मग आम्ही शिकू. पुढे येऊ.'

'तुम्ही पुढे आला तर देश पुढे येतो. म्हणून शिका. पुढे या. देशाचा उद्धार करा...'

'हो. करू.'

'काल दिलेले पुस्तक वाचलं?'

'वाचलं'

'कस वाटल?'

'एक पटलं नाही.' हे ऐकताच केळुस्कर सर सावध झाले. मॅट्रिक पास झालेल्या एकाही मुलाने आपली नापसती अशी स्पष्टपणे बोलून दाखविली नव्हती.

'काय?'

'भगवान बुद्ध खरीखुरी व्यक्ती आहे की काल्पनिक पात्र आहे?'

'खरीखरी व्यक्ती आहे.'

'मग त्याला वृद्ध, आजारी आणि मृत्यू पावलेला माणूस न दिसणे कसे शक्य आहे? दिसणार. रस्त्यावर आले नाही तरी दिसणार.'

'कसे दिसेल.'

'ती नित्याचीच गोष्ट आहे.'

'वा: भीमराव तुम्ही खरोखरच बुद्धिमान आहात: मी अतिशय योग्य तरुणांचे नाव महाराजांना सुचविले आहे मी बुद्धाचा परम भक्त आहे. मिळेल तेवढे मी वाचले. पण माझ्या मनात ही शंका कधी आली नाही. कारण मी देखील पुष्कळसे पाहिलेले नाही... पाहणे शक्य होत नाही.'

'का होत नाही?'

'संबंध येत नाही म्हणून. अंत्यजातील जातींची नाव मी ऐकलीत. पण जीवन मात्र मी पाहिलेलं नाही. अनुभवलेलं नाही.

'का?'

'सामाजिक बंधने आहेत म्हणून भिंतीच. पारदर्शक पण अभेद्य. अरे आओ...तांगा ठय्रो...'

टांगा उभा राहिला. सरांनी पैसे दिले. कोटाची बटने सरळ केली. फेटा सरळ केला आणि ते मोठा गंभीर चेहरा करून पुढे झाले. काही पावले पुढे जाताच ते दबक्या आवाजात म्हणाले,

'महाराज जे विचारतील त्या प्रश्नांची उत्तरे द्या. घाबरू नका. मुके राहू नका...मी वर जाऊन येईन. तोपर्यंत खाली असलेल्या हॉलमध्ये बसून रहा. इकडे तिकडे फिरू नका...'

भिवा केळुस्करांच्या सूचनांचा विचार करीत होता आणि केळुस्कर सरांनीही महाराजाकडे येणाऱ्या अनेक लोकांचा विचार केला होता. इकडे तिकडे फिरताना कोणी नाव, गाव विचारता विचारता जात विचारली आणि भिवाने ती खरी सांगितली की, ऐकणारा संतापून जाणार, बोंबाबोंब करणार, भांडण काढणार आणि भिवा घाबरून बाहेर पडला तर त्याला घरी सरळ पोहोचणेही अवघड होईल आणि त्याहीपेक्षा त्याचे शैक्षणिक नुकसान होईल. कारण त्याचे आईवडीलच त्याला पुन्हा इकडे येऊ देणार नाहीत.

केळुस्करसर पुढे झाले. भिवा त्यांच्या पाठोपाठ चालू लागला. प्रशस्त सुंदर बागेतून ते दारापर्यंत आले. दारावरले पहारेकरी केळुस्करसरांना ओळखीत असावेत. त्यांनी त्यांना हटकले नाही. त्यांनी खुणेने सांगितले म्हणून भिवालाही न हटकता जाऊ दिले गेले. ते दोघे पायऱ्या चढून वर येऊ लागले. वर मोठा दरवाजा दिसत होता. मोठा हॉल दिसत होता. वर मोठमोठी झुंबरं टांगलेली दिसत होती आणि एका बाकावर काही माणसे दिसत होती. त्यांचे भरजरी पोषाख पाहून भिवाचे आत काहीतरी झाले. डोळे त्या लोकांवर रोखले गेले. केळुस्करसर अधिक गंभीर झाले. ते दोघे वर आले. वर हॉलच्या दारावर सशस्त्र पहारेकरी होते. त्यांना ओलांडून ते दोघे आत हॉलमध्ये आले.

हॉलभर जमिनीवर गालीचा टाकलेला होता ठिकठिकाणी भारी खुर्च्या, टेबले ठेवलेली होती. त्यावर वरिष्ठ समाजातील माणसे बसलेली होती. पगड्या, फेटे घातलेली. काहींच्या गळ्यात हिऱ्या, मोत्यांचे हार होते. भिवाचे डोळे आश्चर्याने भरून गेले होते. हॉलमध्ये दिसणारे लोक भिवाला कधी दिसत नव्हते. तो रहात होता त्या वस्तीत, तो जात होता त्या शाळेत असली माणसे कधीच दिसली नव्हती. वाचलेल्या ऐतिहासिक अथवा मनोरंजक पुस्तकात आढळणारी ती काल्पनिक पात्रे पाहून भिवाला धक्का बसल्यासारखे झाले होते. त्या लोकांचे चेहरे, कपडे आणि तो हॉल पाहून भिवा दिपून गेला होता.

'भीमराव, इथं थांबा...मी वर जाऊन येतो. महाराजांनी

सांगितले, की तुम्हाला घेऊन जातो...कोणाशी बोलू नका.'

भिवाच्या अगदी समोर–त्याच्या अंगावरून जाणाऱ्या वाऱ्याखालीच एक स्वामीजी बसले होते. त्यांचा गोरापान रंग, अंगावर भस्माचे पट्टे, गळ्यातले जानवे, कबरेचे रेशमी धोतर आणि त्यांच्या बाजूला असलेला भला मोठा शिष्यपरिवार पाहून केळुस्करांनी पुन्हा न बोलण्याची सूचना केली होती.

'जाऊ ?'

'हो.'

'समोर स्वामीजी दिसतात...'

'त्यांच्याकडे बघू नका...ते विचारतील त्याची उत्तरे खरी खरी देऊ नका. आपला धर्म खोटे बोलायला भाग पाडतो नाही ? जातो.'

'होय...' भिवा व्याकुळ होऊन गेला. तो हॉल भव्य होता. ऐश्वर्यसंपन्न होता. देखणे, श्रीमंत लोक तिथे वेगवेगळ्या कामासाठी जमले होते. भिवाचे डोळे सर्वांना न्याहाळीत होते आणि त्याचे मन वेदनेने अद्‌भुतात सरकत चालले होते. स्वामीजीकडे बघता बघता त्याला स्वामीजीबद्दल आदर वाटण्याऐवजी तिरस्कार वाटू लागला. द्वेष उत्पन्न होऊ लागला. क्षणभरात द्वेष, तिरस्काराने, संतापाने त्याचे मन व्यापून टाकले. तापवून टाकले. त्याचे तापलेले मन चटकन अद्‌भुतात शिरले. वाफेचा ढग व्हावा तसे झाले. शब्द आले. संवाद झाले.

'तू कोण ?'

'मी माणूस !'

'जात ?'

'विद्यार्थी.'

'काल काय वाचलेस ?'

'केळुस्करसरांनी भेट दिलेले बुद्धचरित्र.'

'तो नास्तिक ?'

'हो. ज्याला दुःख आणि दैन्य दिसले तो.'

'दुःख म्हणजे ?'

'जे दैन्याच्या पोटी जन्म घेते ते व जे तुम्ही मला दिले ते... नेपोलियन चरित्रात व्हाल्टेअर आला होता. तो म्हणतो–

'तो म्लेच्छ त्याचे ज्ञान मला सांगतोस. संस्कृत वाच.'

'मला शिकविलं नाही.'

'तू ब्राह्मण नाहीस ?'

'नाही. ब्राह्मण म्हणजे काय ?'

'मग कोण आहेस ?'

'सुभेदार रामजीचा मुलगा. महार पलटणीत ते सुभेदार होते. त्यांचे निशाण कधी चुकत नसे. घोड्यावर बसण्यात तर फार पटाईत होते. ब्रिटीश सरकारने लवकर रिटायर्ड केले म्हणून त्यांना वाईट वाटते.'

'महार ?'

'हो. पलटन होती.'

'कोणाची ?'

'लढणाऱ्या लोकांची ?'

'जातीनं ?'

'महार...'

'तूं कोण ?'

'त्यांचा मुलगा.'

'तू महार असून इथे कसा ?'

'ब्रिटिशांचं राज्य आहे म्हणून व त्यांनी तुमचा पराभव केला म्हणून. तुम्ही हरलेत. हरणार होतेच. इतिहासच असे म्हणतो.'

'माझा पराभव कोण करील ?'

'का करणार नाही ?'

'मी ब्राह्मण आहे म्हणून. ब्राह्मण म्हणजे साक्षात ज्ञान.'

'व्हाल्टेअर कोण ?'

'मला विचारतोस. महार अन् पोर असून.'

'हा अभिमान.'

'असणार.'

'म्हणजे ज्ञान नाही. कबिराने काय म्हटलेय सांगू. माझे बाबा कबिराचे दोहे वाचतात. मला सर्व आठवतात. एक दोहा असा आहे...'

'बोलू नको.'

'का ?'

'तुझा तो अधिकार नाही.'

'म्हणून तर देशाचे वाटोळे झाले. सर आताच सांगत होते, म्हणून अनाडी मोगलांनी भरपूर पराभव केले...'

'ही माया आहे. अज्ञान आहे. सत्य आहे धर्म. धर्म म्हणतो तू बोलायचे नाही...'

भिवाला वडिलांच्याकडे येणाऱ्या भक्तीपंथीयांची चर्चा आठवू लागली होती. आणि ती आपोआप मनाशी चाललेल्या संवादासाठी उपयोगी होऊन येत होती. संवादात बसणार होती. इतक्यात सरांनी हाक मारली–'भिवा...'

केळुस्कर सर आनंदीत, उत्साहीत दिसत होते. जवळ येऊन त्यांनी त्याच्या दंडाला धरले. त्याला गदगदा हालवून ते म्हणाले,

'भाग्यवान आहेस...तिकडे बघतोस काय...तुला महाराजांनी बोलावलेय. चल. तो गोरक्षक आहे...नुसता गो...रक्षक'

ते दोघे चालू लागले. केळुस्करसर काम फत्ते झाले म्हणून आनंदात होते. म्हणून त्यांचे शरीर उत्साहात होते. पाय चटचट उचलत होते. भिवा गंभीर होता.

'कसला विचार करतोस ?'

'तुम्ही टांग्यात बोलल्याचा.'

'काय ?'

'आम्ही सुधारलो तर देश सुधारेल...'

'खरं आहे ते...'

'खरं होईल ? पण कसे ?'

केळुस्करांना आश्चर्य वाटले. बोलावे म्हणून ते म्हणाले,

'चल...'

तो मुकाट्याने त्यांच्या पाठोपाठ जिना चढू लागला. एक एक पायरी चढू लागला. एक एक पायरीने वर जाऊ लागला. जिना असल्यावर असेच जावे लागते. पायरी पायरीने.

# प्रभात



आज कशातच मन लागत नव्हते. लोक तिसरा अंक मागत होते. देतो असे सांगितलेही होते. पण लिहायला मन लागत नव्हते. खरे म्हणजे तिसऱ्या अंकाच्या पहिल्या दृश्याला आज सुरुवात केली होती—पण लिहून होईना. जे लिहिले होते ते आवडत नव्हते. म्हणून कागद फाडून टाकले.

रमा बघत होती. तिला कळत नव्हते की, कागदाचे पुस्तक एवढे पक्के कसे ओढून धरते. अगदी भूक लागू देत नाही, मारलेली हाक ऐकू येऊ देत नाही आणि आजूबाजूला कोणीही माणूस कितीही वेळा आले गेले तरी मान वरून पाहू देत नाही. त्या माणसाला त्याचे किती दुःख होते, केवढा हिरमोड होतो हेही कळू देत नाही. असले कसले द्वाड पुस्तक असते मेले. रमाला रागच आला होता. दोघांचाही—पुस्तकाचा आणि पुस्तकात गुंगून गढून गेलेल्यांचाही—रागावून ती स्वयंपाकाच्या कामाला बसली. उठायचेच नाही असे तिने ठरविले होते.

स्वयंपाक झाला. प्रार्थनेला सर्व बाहेरच्या खोलीत जमले. साहेब खुशाल बसून राहिले आहेत. आपल्याच तंद्रीत आहेत. तिला हे आवडले नाही. मामंजी, भाऊजी आणि ती स्वतःही प्रार्थनेसाठी प्रार्थनामय होऊन उभे होते. कसे शांत, सुंदर वातावरण होते. तिथे यायला नको? प्रार्थनेत प्रार्थनामय होऊन उभे राहायला नको? की खुशाल पुस्तकात गढून जायचे. अन् आत्याला त्याचेही हसू येतेय, कौतुक वाटतेय.

'बाई, सायबाला बोलावा...त्यांना समाधीतून उठवा. सारखे वाचत आहेत...' आत्याला हसू आले. ती मोठ्या कौतुकाने, वात्सल्याने हाक मारून म्हणाली,

'सायबा, पूजेला ये बाळा...दादा वाट बघतोय. थोडी पुजापत्री झाली की मग अभ्यास करावा...'

'आलो...' उठण्याची इच्छा नव्हती तरी त्याला उठावे लागले. तो येत असल्याचे पाहून आत्याला हसू आले. रमाला समाधान वाटले. त्याच्याकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकून तिने पदर कपाळावर ओढला. हात जोडले. डोळे झाकले. अन् ती अंतःकरणपूर्वक देवाला विनवू लागली, देवा, भगवाना, माझ्या पतीदेवाला सांभाळ... त्यांना मोठं होऊ दे...माझ्या सासऱ्याची इच्छा पुरी होऊ दे... त्यांना बुद्धी दे, यश दे, सुख दे.

सुभेदारांनी प्रार्थना सुरू केली होती. त्यांचा सुरेल आवाज खोलीत प्रकाश भरावा तसा खोलीत भरत होता. खोली मधुर करीत होता. त्या निर्मळ, मधुर, मऊ आवाजाने रमाचे आधीच कोमल झालेले मन अधिक कोमल झाले. सुगंधाने घर दरवळावे तसे तिच्या अंतःकरणातील श्रद्धा, भक्तिभाव फुलू लागले. देवा...परमीस्वरा, माझ्या पतीदेवाला मोठा कर...थोर कर...गीत चालले होते. तिला सूर ऐकू येत होते आणि तिचे अंतःकरणात उद्‌गार उठत, देवा, त्यांना...

प्रार्थना चालली होती. घरातील सर्वांचे डोळे मिटलेले होते. आत्या आनंदीत झाली होती आणि भिवाची विचारमालिका सुरू झाली होती...सृष्टी देवाने निर्माण केलीय काय? कशी? अशी? सुखाची, दुःखाची, गरिबाची, श्रीमंतांची. म्हणजे देवाला भेदभाव मान्य आहे. खून, अत्याचार मान्य आहेत. तुच्छता, तिरस्कार मान्य आहेत? नसतील...लोभ कोणी निर्माण केला? देवानेच...राग कोणी निर्माण केला? लोभ आणि राग आहे म्हणून माणूस असा आहे? मला राग आहे...माझा राग मला जे नको आहे ते कुठे नष्ट करतो...माझा मोह मला जे हवं आहे ते कोठे आणून देतो... म्हणजे माणसाचे विकार समाज घडवीत नाहीत...मग कोण घडवितो...स्पेन्सर, मिल्ल म्हणतो...

प्रार्थना संपली होती. भिवाचे डोळे झाकलेले होते. हात जोडलेले होते. चेहऱ्यावर विचार उमटून उठले होते. सर्वांचे हात खाली आले, डोळे उघडले तरी त्याचे हात जोडलेले पाहून आत्याने भावाला खुणवले—'बघ, कसा माझा बाळ गुणी आहे...अन् रमाच्या डोक्यावर हात ठेवून तिचे तोंड फिरवून ती हळू आवाजात कुजबुजली,

'बघ, तुझा सायेब...' ती खूष झाली. तोंड फिरवून खाली मान करून हसली. खूप मोकळेपणे.

'अरे सायबा, ही तुझी बायको बघ...' आत्या तिच्या आनंदाने उत्साहित होऊन उद्‌गारली.

आत्याची हाक ऐकून त्याने डोळे उघडले. सर्वच लोक त्याच्याकडे

कौतुकाने, प्रेमाने बघत होते. सुभेदार तर अतिशय खूष झालेले होते, ते मोठ्या समाधानाने म्हणाले–

'आता जेवा...चला...' सुना पटापट उठल्या. अंगावरला, पाठीवरला पदर सरळ करीत आत गेल्या. आत्या उभी राहण्याऐवजी जमिनीवर हात टेकून पुढे सरकू लागली. तसे सुभेदार म्हणाले–

'सायबा, बयाला उचलून ठेव आत पाटावर.' बया हसली आणि भिवाकडे कौतुकाने बघत म्हणाली,

'नको रे बाळा...पोट दुखल. मी काय हालकी आहे...जा जेवून घ्या. सकाळीच कालीजाला जायाचं आहे. नाटक आहे. पोरं सारखी येतात. लिहून दे. तुझ्या मागं अक्क चाळीत पण पोरांची गर्दी अन् इथं परळात पण–'

सुभेदारांना बयाने चालविलेले भाच्याचे कौतुक चुकीचे वाटत होते. तिने अभ्यास करायचे सांगावे, मोठा होण्याची लक्षणे पटवावीत. हे काय बोलणे झाले. तरीपण ते बहिणीला आणि लेकालाही काही बोलले नाहीत. जवळ आलेल्या लेकाच्या पाठीवरून हात फिरवून म्हणाले–'चला...'

आनंदराव पहिल्या पाटावर बसले होते. दुसरा पाट भिवाचा होता. तिसऱ्या पाटावर सुभेदार बसले. जेवण वाढून झाले. सुभेदारांनी अन्न देणाऱ्या देवाचे स्मरण करून एक-दोन घास बाजूला काढून ठेवले. आणि मुलाकडे पाहून ते म्हणाले –'घ्या देवाचे नाव...'

भिवा जेवू लागला. आत्याने दिलेली आठवण त्याला गतीत आणीत होती. तो भराभर जेवत होता. घरातली जेवणे सपेपर्यंत तो होता होईल तेवढ तिसऱ्या अंकांतील पहिले दृश्य लिहून काढणार होता. सुभेदाराना त्याची घाईगर्दी, पसंत नव्हती. पण ते बोलले नाही. अलीकडे तो अबोल, स्वयंकेंद्रीत झालेला आहे. त्याला उपदेश खपत नाही. ते मुकाट्याने जेवू लागले.

भिवाने भराभर जेवण संपविले आणि तो पुन: न मागता उठला. केलेला आग्रहही त्याने मानला नाही. रमाला पती पोटभर न जेवता उठले हे आवडले नाही. सकाळी नुसता चहा, दुपारी चटणी भाकर आणि रात्रीचे जेवणही असे केल्यावर चालणार कसे? तिला वाईट वाटले. मनात आले, त्याना विचारावे. पण विचारायचे कसे? बाजूला येवढी माणसे? अन् तिने कधी विचारले होते. ते तरी कधी बोलत होते. ती तशी मनातल्यामनांत खूप बोलत होती. ते तर नुसते पुस्तकात, वह्या-कागदात आणि आपल्याच तंद्रीत. केला तर केव्हातरी हुकूम.

पण जेवले का नाहीत? आत्या, मामंजी का विचारीत नाहीत? आत्या विचारतील. आणि बोला फुलास गाठ पडावी तसे अगदी तिच्या मनातले, तेवढ्याच आपुलकीने आत्याने विचारलेच—

'बाळा, पोटभर का जेवला नाहीस...' येवढ्या प्रेमळ प्रश्नाला उत्तर नाही, रुकार नाही. सरळ जावून न्हाणीत हात धुतले. उभ्या उभ्या पाणी पिवून तांब्या कठड्यावर ठेवून दिला. तसा आत्याने रंगाला हवा होता तोच प्रश्न केला.

'काळीजात काई झालं?'

'कांही नाही. का?'

'मग जेवला का नाहीस?'

'सांपडलं. आता भरभर लिहून काढतो. तुमची जेवणं होईपर्यंत अंथरूनं टाकीपर्यंत पहिला सिन तयार.'

'भिवा.–' सुभेदाराना लेकाचा नाटकाबद्दलचा उत्साह आवडला नाही. नाटक काय, बरबाद होण्याचा खेळ. अन् त्याची त्याला काय गरज? नाटकं करून काय जातीचा उद्धार होणार आहे? की स्वत.चा उद्धार... दारू, बाई अशाच नादांत नाटकवाली मंडळी खलास होते. यासाठी येवढे कष्ट घेतोय? भिवाला झाले आहे काय?

भिवाला वडिलाचा राग आवडला नव्हता, त्याची रागीट मुद्रा अन् कठोर आवाजाने जुळून आलेले सूत्र तुटून गेले होते. अन् मन मन बेचैन झाले होते. त्याची अस्वस्थता, त्याला आलेला संताप त्याच्या चेहऱ्यावर उमटला. आता आपण रागाने एक शब्द बोललो तरी तो नाराज होईल. बिघडेल. म्हणून ते राग गिळीत म्हणाले,

'कोणतं नाटक बसवताय तुम्ही?'

'शेक्सपिअरचं. किंग लिअर.'

'हा साहेब लोकांचा आवडता नाटककार फार खून आणि रक्तपात, मृत्यू घडवून आणतो. वाईट. येवढी माणस वाईट नसतात.'

'असतात. म्हणून तर ती मला अस्पृश्य समजतात. तुच्छ लेखतात.' लेकाचा तीव्र आवाज ऐकून ते त्याला शांत करण्यासाठी म्हणाले,

'नाव काय ठेवलंय?'

'शहाणी मुलगी.'

'उत्तम.'

'मग. शहाण्या मुलीचा तो नवरा आहे ना...रमा तुझा साहेब, बघ कसा तापलाय...लिही बाळा...पण अभ्यास पण करावा.' आत्याने तोंडाचा चंबू करून गोड गोड शब्द उच्चारले. रमाला ते फार फार आवडले. तिचे आणि तिच्या साहेबाचे त्यात कौतुक होते ना.

सुभेदार पुढे काय बोलावे? त्याला कसे सुचवावे की, नाटकाचं वेड दारूसारखेच असते. दोन्ही वेडं नाश करतात. ज्ञान फक्त उद्धार करते. प्रकाश देते. कारण त्यांत माणसाच्या मर्तं वासना भावनांचे खेळ असतात. ज्ञान असे नसते. ते शुद्ध असते. आग्री सारखे. अमृतासारखे. ते मिळविले म्हणजे आंधार दूर करता येतो. मेलेल्याना जीवत करता येते. तेच कसेही करून, वाटेल ते अपमान, दुःख सहन करून मिळविले पाहिजे. आणि लोकांना दिले पाहिजे. तेच खरे गरजेचे आहे. वासना भावनांचे खेळ लोकाना माहित आहेत. कारण त्या त्याच्या शरिरांतच आहेत. त्यांना माहीत नाही ज्ञान. तेच त्यांना दिले पाहिजे. जे शरिरात मरेपर्यंत असतात, अनुभवाला येतात ते वासना भावनाचे खेळ दाखवून उपयोग काय? हे विचार मनात येताच लेकाला समजावून सांगावे म्हणून सुभेदारांनी हाक मारली,

'भिमराव,...'

नवऱ्याचा घनगभीर आवाज ऐकण्यासाठी रमा उत्सुक होवून गेली. मान वर करून त्यांच्या मुखाकडे बघावे असे तिला वाटू लागले. पण इच्छा असूनही मान वर होत नव्हती. आणि त्यांच्या चेहऱ्याकडे बघण्याची हिम्मत होत नव्हती. पण मन अधिर होऊ लागले होते. संध्याकाळी घरी यायला जरा उशीर झाला तर काळजीने जीव धाऱ्यावर राहत नाही. हुरहुर लागते. कधी पाऊले

कानावर पडतील असे होवून जाते. पण त्यांना हे कुठे कळतेय? येताना हातात उघडलेले पुस्तक. डोक्यात पण पुस्तक. डोळयातही पुस्तक, बघत असूनही काही बघत नाहीत. पुस्तकात येवढे काय असते?

'भिवराव...' दुसऱ्यांदा वडिलांची हाक आली तेव्हा त्याने ओळखले आता उपदेश सुरू होणार. अभ्यास करावा. ज्ञान वाढवावे. तुझ्यावर जबाबदाऱ्या आहेत... जुळून आलेले सूत्र परी सूत्र गेले. अन् आत बेचैनी आली. पोर विचारणार, पुढचा अंक कुठेय? ती पण अनाडीच. धड उच्चार करता येत नाहीत...

पण अभ्यास करून उपयोग काय? ज्ञान मिळवून उपयोग काय? उपेक्षा सपणार आहे, की हे लोक बदलणार आहेत. जातीभेद यांच्या हाडामासी खिळलेला आहे. इथे काही खरे नाही. इथे जन्म घेणे, जगणे, वाईट. ही काय गरीब दुबळयाना वर येऊ देणारी भूमी आहे. ती आहे युरोप अमेरिकेत... इथे कोण गरीब, कोण महारमाग पुढे आलाय. मोठा झालाय. वडिलांना हे माहित आहे तरी ते मला उपदेश करणार, अभ्यास कर. बी. ए. हो. पण बाबा त्याचा उपयोग काय? या लोकांत? त्यांच्या देशात?...

असे वाटू लागताच तो अस्वस्थ झाला. चिडू लागला. त्याच्या आत काही तरी खदखदू लागले. काहीतरी उसळून येऊ लागले. त्याला वाटू लागले, आपण आतून चिरले जात आहोत... दुभंगलेलेच आहोत. आपली उडवळ, उदात्त बाजू आपल्या वडिलांनी रचलेली आहे. आणि देशाने रचलेली बाजू ढासळते आहे. ह्या दोन्ही बाजू एकत्र कशा येणार. माझ्या वडिलांनी, माझ्या घरानी मला खच्ची केले पाहिजे. मला सांगितले पाहिजे. तू महार आहेस. तू एवढाच. पुढे जाऊ नको. शिकू नको. शिकून तुला काय फायदा... तुला कोण नोकरी देणार? कोण मान देणार...

वडिलांनी आपणाला हे काय दिलेय! एवढे चैतन्य घेवून जगणे शक्य आहे? ते या लोकांना सोसेल... हॅम्लेट म्हणतो तसे आपणाला म्हणता येईल, हा सुभेदार रामजीचा भिमराव पहा... आणि हा या देशाचा भिवा पहा... हे चित्र पहा... इथे नेपोलीयन, इथे वॉशिंग्टन, इथे अब्राहम लिंकन जन्माला येणार नाही! त्यांना हे भोगावे लागलेच नाही.

सुभेदार त्याच्या मुखावरील बदलते भाव बघत होते. त्याच्या चेहऱ्यावरील व्याकुळता पाहून ते विचार करू लागले. त्याला मोकळे करील, पूर्वीसारखे भडभडा बोलायला लावील असे शब्द मिळवित. पण एवढे उदार शब्दच जवळ आहेत. ती जे बोलते ते मधूर हळूवार होते. पण ती तर त्याच्याकडे त्याच्या पेक्षा ती अधिक व्याकूळ होवून बघतेय. तिला सूचना केली तर ती पटकन म्हणेल, पहा, नको अशी आपल्याला काळजी. माझ्या लेकराला त्रास देणारी... त्याचा खेळ हसू काढून घेणारी...

'भिवा,'

'काय म्हणता?'

'एवढा गंभीर का झालास? काही अडचण आहे? पैशाची. दुसरी...आहेत. तुला अभ्यासासाठी खोली घेण्यासाठी बाजूलाच ठेवलेत. पाहिजेत?'

'नको.'

'मग...?'

'मी विचार करतोय माझा. माझ्या कॉलेजाचा. मला काय मिळतय याचा. मला बी. ए. होऊन काय मिळेल याचा...'

'तुला काय पाहिज? मामलेदार की, सरकारी ऑफीसात मोठ्या पगाराची नोकरी? पास हो. लागली म्हणून समज...'

'लागेल.'

'मग?'

'मला जे कॉलेजात मिळतय ते तुमच्या पुढे जात नाही. तुम्ही दिलंय तेवढं तिथं नाही. टॉलस्टॉय, दोस्तोवस्की, शक्सपिअर, किटस बायरन, रोळी ही मंडळी तुमच्या जवळ येऊन उभी राहते. मझ्या म्हणजे माणसाबद्दल काही तरी भव्य थोर सागते. चार्क डिकन्सही बरा आहे...'

रमाला हे ऐकायला खूप आवडत होते. आत्याला मनःपूर्वक हासू आले होते. आनंदरावांना भावाने बापाबद्दल काढलेले उद्‌गार आवडले होते. शेळी आणि टॉलस्टॉयचे नाव केव्हा तरी त्याने ऐकले होते. कोठे ते आता आठवत नव्हते. आणि बापासमोर बोलण्याचे धाडसही होत नव्हते. आणि सुभेदार काय बोलावे याचा विचार करीत होते. काही तरी बोलावे म्हणून ते बोलले.

'तुझे प्रोफेसर?'

'चैतन्य देत नाहीत. प्रो. मुल्लर, प्रो. इराणी बरे आहेत. पण तुमच्या एवढे तेज ते देत नाही. बाकीचे वळणाचे पाणी वळणाकडे जावे तसे.

'म्हणून तू खूप ज्ञान मिळवलं पाहिजे. कर्णाप्रमाणं खूप हत्यारं जमवून ठेवली पाहिजे. युद्धात विजयी व्हायला तेवढी लागतातच...'

'हो. पण कर्ण हरला. हरणारच होता. कारण त्याचा विजय जसा कृष्ण अर्जूनाला नको होता. तसाच महाभारत लिहिणाऱ्या व्यासालाही नको होता. कारण त्यावेळच्या इस्टाब्लिशमेंटलाच कर्ण शूर म्हणून नको होता. तो सूर्यपूत्र होता. आणि त्याच्यात जे थोरपण दिसते ते सूर्यपूत्राचे नाहीतर क्षत्रियाचे आहे. हेही नतर पटवून दिले आहे, तो कुंतीचा पहिला मुलगा आहे हे स्पष्ट केलेले आहे. त्यांच्या थोरवीचे कारण जन्म आहे. आणि त्याच्या दुःखाचे कारण त्याचे नशीब आहे. असे महाभारताला म्हणायचे असे-अन् खरे नाही'

लेकाचे बिनतोड स्पष्टीकरण ऐकून सुभेदार थक्क झाले होते. त्याचे विचार त्याना बुद्धिमत्तापूर्ण आणि तर्कशुद्ध वाटले होते. ते ऐकून त्यांना आनद झाला तसाच त्याला आपला उपदेश का रुचत नाही हे ही त्यांना खेदपूर्वक कळून आले होते. आता त्याच्याशी जपून बोलले पाहिजे. त्याचे डोके आता प्रकाशित होत आहे. त्याचा बौद्धिक अपमान होईल असे आपण टाळले पाहिजे.

'हे असे आहे. इथे आहे. इथे जन्माला येऊ नये. इथे गुणाला किमत नाही. जन्माला आहे. जातीला आहे. माणूस म्हणून माणसाला इथे मोल नाही. इथे त्याला मारले. कर्णाला. मला तसे मारतील. ते पुणेकर रोकडेसाहेब म्हणत होते तसे, तो भयकर माणूस वाटतो. कमालीचा चिडलेला. इग्रजी धड येत नव्हते तरी इंग्रजीच बोलत होता का?... देवाला नेटिव्ह गॉड म्हणत होता का? माझ्या मनात सारखा विचार येतोय...त्याला मराठी का नको? एवढा तो तिरस्कार करतोय? म्हणून बोलतोय. म्हणून पितोय...' भिवाच्या

आवाजाला गर्जनांची लय आली होती. त्याचा आवाज खोली भरून काढीत होता. तरी व्याकूळ होता. म्हणून अंतःकरणात खेद, खळबळ निर्माण करीत होता. आणि आत्याच्या गालावरून आसवे ओघळत होती.

'कर्णाला कृष्ण-अर्जुनाने मारले असेल...व्यासालाही तसे वाटत असेल...पण तुला महार म्हणून कोणी मारू शकत नाही. अन् तू मरूही शकत नाहीस. मला हे सारे माहीत आहे. मी ते सारे पाहिलेले आहे. तुझ्या मागे सन्याशाचे शुभाशीर्वाद आहेत...आणि तुझे...'

सुभेदाराना पुढे बोलवेना. कर्णाला जेवढे पाठबळ होते, दैवी, वास्तवातले, दुर्योधनाच्या सत्तेचे, तेवढेही पाठबळ आपल्या लेकाला मिळणे शक्य नाही असे, त्यांना वाटले. तसे ते मुके झाले. ब्रिटीशसत्ता आपल्या लेकाला दुर्योधनाएवढाही पाठिंबा देऊ शकत नाही. आणि लोक आणि देश तर असा...सुभेदाराचे अन्नावरून मन उठले. त्याचेही मन लेकाप्रमाणे उदास, निराश होवू लागले. तसे त्यानी स्वतःला विचारले, 'मग करायचे काय...स्तब्ध राहायचे...मातीचे होवून जायचे? नाही!

'जाऊ...' तो अस्वस्थ झालेला दिसत होता. म्हणून सुभेदार म्हणाले–'निराश होऊ नको भिवा...'

'होवून उपयोग काय? वाचतो. पास होतो. पण कॉलेजाने मला जसे फुलासारखे फुलवायला पाहिजे असे वाटते तसे होणार नाही. होत नाही. ते मला चैतन्य, उत्साह, आशा देणारे ठरत नाही.'

'आराम कर...'

'सूत्र गेलेच...बघतो झोप येण्यापूर्वी जमले तर...' तो वळला. आणि रमाला तो बाहेर पडताच एकदम पोरके पोरकेसे, सुनेसुनेसे वाटू लागले. त्याचेबद्दल घरात जे जे बोलले जाई ते ती कानात प्राण आणून ऐकत असे. ऐकताना तिचे काळीज सुपाएवढे होत असे. मन प्रसन्न होत असे. ते बोलणे ती आत प्राणापलीकडे जपून ठेवीत असे. त्याभोवती आदर भक्तीचे आवरण चढले जात असे. आपला पती इतराप्रमाणे सर्वसामान्य नाही, वेगळा आहे, मोठा आहे, मोठा होणार आहे, त्याच्या अंगावर, त्याच्या भाग्यावर तसे लिहिलेले आहे, असा देवगुणी पुरुष आपला पती आहे. त्याच्या देहावरील ती भाग्यलक्षणे आपणाला बघायला मिळणार आहेत...अन ही जाणीव होताच ती थरारून गेली. पण त्याचे 'जातो' हे म्हणणे ऐकताच ती तिची नजर वर होवू लागली. पण मनावर लज्जा सकोचाचे एवढे मोठे


दर आठवड्याला पाच हजार प्रतींच्या विक्रीवरून,
दर दिवसाला साठ हजार प्रतीच्या विक्री आकड्यावर
ज्या पुस्तकाने पहाता पहाता उड्डाण केले

दहा लाख डॉलर्स अधिक नफ्यातील पन्नास टक्के वाटा या करारावर
नुकतेच ज्या पुस्तकाचे चित्रपट-हक्क विकले गेले

अशा

सध्या त्रिखंडात गाजत असलेल्या
एका छोट्या पुस्तकाचा
व त्याच्या लेखकाचा प्रदीर्घ परिचय....

# माणूस

## चित्र वार्ता पुस्तक

पुढील अंकी

## सादरकर्ते : रंगा मराठे

ओझे होते की तिला मान वर करवेना. पण खाली मान घालून बसवेना. तिने महाप्रयासाने मान वर केली. पण तो दिसला नाही. तो बाहेर होता. तिचे डोळे दारावर तिच्या हाताच्या गेरूने उमट-विलेल्या लहानसर पजावर गेले. आणि भर्रकन तिचे डोळे खाली झाले. हातातील हिरव्या चुड्यावर स्थिर झाले. आणि ती पुन: अननभूत आनंदाने शहारून गेली.

आत्या बघत होती. मनातल्या मनात खुषीने हासत होती. एखादे नयन मनोहर, रगारगाचे रसात्मक दृश्य पहावे तसे तिला वाटून गेले, तिचे मन आनंदून आले.

तो आपली वळकटी घेऊन बाहेर आला. जिन्याकडे गेला. वरून किंग लिअर झालेल्या नटाचा आवाज ऐकू येत होता. तो भलतेच अशुद्ध बोलत होता. त्याच्या बोलण्यातून ती भावना जाणवत नव्हती. भिवाला आज ते सहन करण्याची कुवत राहिली नव्हती. इच्छाही नव्हती. आज त्याला एकटेपणा हवा होता. आपणाला तालमीतील कोणी पाहू नये, बोलावू नये असे त्याला वाटत होते म्हणून तो पाऊले वाजू न देता वर आला. किंग लिअरचे ओरडणे चालूच होते. त्याला शब्दातील रस कळत नव्हता. वळत नव्हता. अशुद्ध आणि ओरडून तो बोलत होता. ते ऐकून आधीच अस्वस्थ झालेले त्याचे मन आधिक अस्वस्थ झाले. तो भर्रकन वर झाला. पहिला, दुसरा माळा चढून वर गेला. किंग लिअरचा आवाज कानावर पडणे बंद झाले तेव्हा त्याला बरे वाटले.

वर गच्चीवर कोणी नव्हते. गच्चीवर झोपणारे सारे नट आणि प्रेक्षक खोलीत बसलेले होते. रिकामी गच्ची पाहून त्याला बरे वाटले. त्याने अथरूण टाकले. आणि तो टाकीच्या आड जावून उभा राहीला. बघू लागला.

शिवडी, वडाळाच्या परिसरात पाण्याने भरलेली खाचरे दिसत होती. हारबर ब्रँच रेल्वेच्या दूर पलीकडे खाडी दिसत होती. तिथे काही इमारतीचे अंधाराने काळे झालेले सांगाडे दिसत होते. तो बघत होता. पाणी, अंधार, डोगर, दूर पलीकडे समुद्र...बघता बघता त्याला वाटू लागले—

हा अधार म्हणजे काय? सूर्याचे नसणे म्हणजे अंधार, की, अंधार हे एक विश्वातील अनेक रहस्यापैकी असलेले एक रहस्य आहे. कुठेसे. गभीरसे...तो बघत होता. विचार करीत होता. अधाराचे ते अनत, गूढ आणि तरीही सुदर रहस्य पाहून त्याला एक वेगळाच आनंद होत होता. तो कितीतरी वेळ इकडे-तिकडे बघत उभा होता. कधी आकाशात, कधी दिशात, कधी एखाद्या ताऱ्याकडे तो टक लावून बघत होता. आणि असे बघता बघता त्याच्या मनात विचार येऊ लागले...

या एवढ्या रहस्यमय, गूढ सुंदर आणि अनत विश्वात माणूस कसा जन्माला आला? माणूस म्हणजे काय?...आणि मी म्हणजे तरी काय? मी कोण आहे...कोण असावा मी...

'मी. महार...इतक्या सुंदर, अपार जगात महार असतो? ज्याला हे लोक तुच्छ मानतात तो. कसा असणार? पाप कशाला म्हणावे? पाप केल्याने काय होते? जन्म. जन्म पाप कसा? फूल उमलते, हा जन्म नाही? मग फूल फुलणे म्हणजे पाप? गत जन्म आणि त्यावेळी केलेले पाप ह्या जन्मी शिक्षा कशी? हे चूक नाही का? पाप ज्याने केले त्याला शिक्षा व्हावी? शिक्षा कोणाला देतात? गुन्हा केला असेल त्याला...तो म्हणजे मी काय? फाशी काय दिले जाते? तुरुंगात काय टाकले जाते? आणि गत जन्माची, महार होऊन, गरीब होऊन शिक्षा कोण भोगते? शरीर? की आत्मा.. आत्मा म्हणजे काय? गेल्या जन्मी पाप करणारा आणि या जन्मी महार होऊन शिक्षा भोगणारा तो मी...दोघे एकच? तो आणि मी? आम्ही दोघे एक असल्याचा पुरावा काय? कुठेय तो पुरावा? आत्मा. आत्मा म्हणजे पुरावा...पण भगवान बुद्धाने तर तो मानला नाही. जर आत्मा नावाचे काही नाही तर पुरावा होणार कसा? केळुस्कर गुरुजी तर भगवान बुद्धाला फार मानतात...

भगवान बुद्ध म्हणतात त्याप्रमाणे जर आत्मा ना ी तर तो तरी खरा कसा? आणि गतजन्माच्या पापाची शिक्षा भोगणारा मी महार कसा?

मग मी कोण? कोण आहे मी? वडील म्हणतात तो? की इथले लोक ठरवितात तो?

तो त्या 'तो'चा शोध घेत होता. त्याला तो गत जन्माच्या पापाची शिक्षा भोगणारा गुन्हेगार आहे, हे पटत नव्हते. खोटे वाटत होते. या कल्पनेविरुद्ध त्याचे मन पेटत होते. आत तडफडाट चालला होता. दुःखाची एक सूक्ष्म धार अंत.करण व्यापीत होती आणि बाहेर आकाश अदिम होऊन गेले होते. काळोख गूढ गंभीर होत चालला होता. दूरचे पाणीदेखील अदिम काळाचा भास करून देत होते. निसर्ग किती अदिम आहे तरी सुदर आहे. चिर रुचिर आणि तरुण आहे.

आणि त्याचे मन असे तत्त्वचिंतनातून काव्यात्मक होत चालले होते. बरे वाटत होते. इतक्यात खालून शहाण्या मुलीचा रडवा घोगरा आवाज आला. त्याने रंगविलेल्या स्वभावचित्राशी तो आवाज आणि शब्द एकदम विसगत होता. एवढ्या सुदर, मधूर आणि रहस्यमय वातावरणात एवढा विसगत आवाज? इथे आवाज कसा मधूर, कसा कोमल पाहिजे...एकाएकी त्याला त्याने ऐकलेले बासरी आणि व्हायोलियनचे वादन आठवू लागले. किती सुदर ती रचना होती...जशी...तो उपमेसाठी अडकला. त्या स्वरमेळाशी अनुरूप होईल अशी उपमाच त्याला आठवेना. ती शोधीत असताना त्याला एकदम रमाची आठवण झाली. रमा आता जवळ येत चाललीय. धीट होत चाललीय. रोखून बघू लागलीय. पाहून हसू लागलीय. कापऱ्या आवाजात एखादा शब्द उच्चारू लागलीय...त्याला ते सारेच सुंदर, काव्यात्मक वाटू लागले. तसे हिरव्या साडीचोळीतील तिचे सलज्ज, विनम्र, सुदर रूप त्याला दिसू लागले. आत्याचा आनद आठवू लागला...घरातील सर्वांनाच झालेला आनंद...बाबांची खोली घेण्याची चाललेली धडपड..,का? कशासाठी?

'ऑ...त्यासाठी?' तो थरारून गेला. गरकन वळला. अंथरुणावर येऊन पडला. आकाशाकडे बघू लागला. वर चादण्या हसत होत्या आणि व्हायोलिनच्या तारांप्रमाणे आतल्याही तारा झंकारून उठत होत्या. एक मधूर सूर साकार करीत होत्या. आत एक नवी खळबळ होत होती. काव्यनाटकात वाचलेली, चिरजीव. जिला सुभेदार मर्त्य म्हणाले होते ती.



# युद्ध आणि आपण

चा. अ. दाभोळकर

युद्ध आणि आपण ! आपण म्हणजे तुमच्या-माझ्यासारखी सामान्य संसारी माणसे. आपापल्या संसारात गुरफटून गेलेली. आपल्याच वर्तुळात फिरणारी, चाकोरीचे जीवन जगणारी सामान्य माणसे ! राष्ट्राच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी लढाई म्हणजे युद्ध. चालू शतकात अशी दोन जागतिक युद्धे लढली गेली. त्या प्रत्येक युद्धात अनेक साम्राज्ये नष्ट झाली. अनेक राष्ट्रांच्या सीमा बदलल्या गेल्या. अनेक नवीन राष्ट्रे जन्माला आली. अनेक राष्ट्रांच्या राज्य घटना आमूलाग्र बदलल्या. तेथील तुम्हा आम्हा सारख्या सामान्य जनांचे जीवनात प्रचंड उलथा पालथी झाल्या. जगातील कोणत्याच राष्ट्राचा चेहरामोहरा पूर्वी सारखा राहिला नाही.

दुसरे महायुद्ध तसे ताजेच असताना मी विलायतेत गेलो होतो. तेथे एकदा माझेच वयाचे एका शेतमजुराबरोबर मी बोलत होतो. त्याचे नाव यूजेन ! तो जर्मन होता. इंग्रजी भाषा तो चांगली बोलत असे. शेती शास्त्राचे त्याचे तांत्रिक ज्ञान बघून मी चकीत झालो. त्याला मी तसे बोलून

दाखवले. तो म्हणाला, ' शेतकी कॉलेजात शेवटची पदवी परीक्षा चार महिन्यावर असता मला लष्करात दाखल व्हावे लागले. माझी पदवी थोडक्यासाठी राहून गेली. ' पण आता युद्ध संपून दहा-बारा वर्षे लोटली आहेत. तू परत आपले शिक्षण का पुरे करत नाहीस ? तुझी युनिव्हर्सिटी तुला मागील टर्मस् ग्रँट करीलच की ! ' मी माझी प्रामाणिक शंका विचारली.

' कसे शक्य आहे ते ! ती युनिव्हर्सिटी रशियन रणगाड्याखाली पार उध्वस्त झाली आहे. माझे घरदार, शेतवाडी, घरची जिवंत असलेली माणसे, सारी पूर्व जर्मनीत आहेत. युद्ध संपले तेव्हा युद्ध कैदी म्हणून मी इंग्रजांचे हातात सापडलो. आत्तापर्यंत युद्ध कैदी म्हणूनच इंग्लंडमधे शेतात, जंगलात, आम्हाला राबवून घेतले. आता नुकतेच स्वतंत्र नागरिक म्हणून आमची मुक्तता झाली आहे. मी येथून परत घरी गेलो तर इंग्लंडमधून परत आलेला म्हणून माझी तुरुंगात रवानगी होण्याचीच शक्यता. शिवाय माझे घरच्या सर्वांनाही त्रास होणार. त्या पेक्षा इंग्लंडमध्ये शेतमजूर, तर शेतमजूर म्हणून स्थाईक होणार आहे. मी माझ्या ज्ञानाचा वापर करून पुढे मागे येथेच शेतवाडी खरेदी करण्याचा विचार आहे माझा. ज्ञानाचा उवयोग पदवी शिवायही करता येतोच की. ' यूजेन म्हणाला.

यूजेन बिचारा पराभूत जर्मनीचा नागरिक. पण लेन बेस्ट हा अस्सल इंग्रज. आमचे बरोबर कॉलेजात शिकत असलेला हा पाठीला पोक आलेला इंग्रज वयाने किती तरी मोठा होता. इतकेच नव्हे तर चांगला दोन पोरांचा बाप होता. हवामानात थोडा बदल झाला तर त्याचे अंग दुखे, तरी सुट्टीचे दिवशी व कॉलेज सुटल्यावर तो सायकलवरून उपनगरात जाऊन लोकांचे बंगल्याचे कुंपणाची छाटणी वगैरे बागकाम करून तो थोड फार पैसे मिळवत असे. त्याच्या बायको मुलांना घेऊन तिचे नोकरीचे गावी रहात असे. एकदा तो मला त्याचा लग्नातला फोटो दाखवत होता. त्यात चांगला रुबाबात ताठ छाती काढून तो उभा होता. मला आश्चर्य वाटले.


मि. बस्ट या फोटोत तर तुम्ही चांगले ताठ उभे आहात. मग आताच हे तुमच्या पाठीला काय झालं ? तुम्ही आता आमचे बरोबर कॉलेजात शिकता. लग्न झालं तेव्हा तुम्ही काय शिकत होता मी विचारून गेलो.
' लग्न झाले तेव्हा मी माळी (गार्डनर) म्हणून नोकरी करत होतो. माझ्या पगारात आमचा संसार छान चालायचा. पण आमचं लग्न झालं आणि चार महिन्यात लढाई सुरू झाली. लष्करभरतीचा हुकूम निघाला आणि मला सैन्यात दाखल व्हायला लागलं. इटालियन आघाडीवर तोफगोळ्याचा एक कपचा माझे मणक्यात शिरला. अनेक दिवस मी बेशुद्धच होतो. हॉस्पिटलमध्ये चार-पाच वर्षे काढल्यावर मी हा असा बाहेर पडलो. आता शारिरीक श्रमाची कामे मला जमणार नाहीत म्हणून मी तुमच्याबरोबर शिकायला आलो आहे. ' मिस्टर बेस्ट म्हणाले.
' देशासाठी जान कुर्बान करताना तुम्ही जन्माचे जायबंदी झालात. मग तुम्हाला पुरेसे पेन्शन मिळत असेल ना ' सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्यात खेडोपाडी हिंडताना वारंवार भेटलेले दुसऱ्या महायुद्धातील मिलिटरी पेन्शनर मला भेटले म्हणून मी हा प्रश्न विचारला.

' पेन्शन ! ती कशाबद्दल ?' मिस्टर बेस्ट आश्चर्याने म्हणाले, ' हे पाहा त्यावेळी वयात आलेल्या प्रत्येकाला राष्ट्रसेवेसाठी सैन्यात भरती व्हावे लागले. माझ्या दुर्दैवाने मी जायबंदी झालो म्हणा वाटले तर. पण मला तर सुदैवाने मी जगलो असंच वाटतंय. मग माझ्याच संसाराचा भार देशाने का उचलावा. एक उपयुक्त नागरीक म्हणून मला पुन्हा जीवन जगता यावे यासाठी माझ्या शिक्षणाचा खर्च सरकार सोसतच आहे. माझ्या संसाराचा खर्च माझी बायको नोकरी करून भागवत आहे. मीही थोडेफार काम फावल्या वेळात करून तिला हातभार लावतोच. ' मि. बेस्ट पुढे म्हणाला, मी चांगलाच अंतर्मुख झालो.

दुसरे महायुद्ध अशा प्रकारच्या उलथा-पालथी अनेक देशातील अनेक सामान्य जनांच्या संसारात करून गेले आहे. चोरापोरांपासून थोरामोठ्यांपर्यंत साऱ्यांनाच त्या काळात आपल्या सामान्य जीवनाचे चाकोरी बाहेर पडून असामान्य कर्तव्ये पार पाडावी लागली आहेत. अशा अनेक सामान्यांनी आपले हे अनुभव लिहून प्रसिद्ध केले आहेत.

पेट्रोलपंपावरील वेडा ही अशाच एका सामान्याची कथा....

# पेट्रोल पंपावरील वेडा



# पेट्रोल पंपावरील वेडा

इंग्रजी साम्राज्याच्या ऐन वैभव कालात टचूपेटी म्हणून एक तोफखान्याचा अधिकारी होता. कर्नलचे हुद्यापर्यंत चढून तो निवृत्त झाला. नोकरीचे काळात भारत, माल्टा, जिब्राल्टर वगैरे साम्राज्यातील अनेक देशात त्याने नोकरी केली. जॉर्ज त्याचा मुलगा. बापाबरोबर साम्राज्यातील देशोदेशी त्याचे बालपणं मजेत गेले. शिक्षण केंब्रीज विश्वविद्यालयात झाले. तेथून पदवी सपादन केल्यावर बापाप्रमाणे साम्राज्य सरकारचे मुलकी अगर लष्करी सेवेत न शिरता जॉर्जने तडक कॅनडा गाठला. तेथेही हिमवृत्तात व्यापार करणाऱ्या हडसन वे कपनीत त्याने नोकरी पत्करली. जगापासून इतके दूर राहणेही गर्दीचे वाटल्याने की काय दर हिवाळयात फासे पारधी बनून तो सिल्व्हर फॉक्स (शुभ्र कोल्हा) ची कातडी गोळा करत असे. त्यासाठी बर्फाच्छादीत ध्रुव प्रदेश मैलोनमैल, महिनेन महिने, एकटाच तुडवीत तो फिरे. अशी तेरा वर्षे गेल्यावर तो प्रेमात पडला. त्याचे लग्न झाले. त्यानतर या एकातवासाचे जिण्याला रामराम ठोकून दहाजणांसारखा खासगी कपनीत चाकरमान्या बनून कॅनडातील विनिपेग गावी तो स्थाईक झाला.

यानतर थोडयाच काळात हिटलरने पोलंडवर स्वारी केली. इग्लंडने जर्मनी बरोबर युद्ध पुकारले. पाठोपाठ कॅनडानेही जर्मनीबरोबर युद्ध पुकारले. ३६ वर्षे वयाच्या जॉर्जला लष्कर भरतीचे आमंत्रण आले. बायकोला विनिपेग येथेच ठेऊन जॉर्ज कॅनेडियन हवाईदलात दाखल झाला. जॉर्जची विमानदलाचे माहिती विभागात नेमणूक झाली. त्याच्या पथकाला शिक्षणासाठी प्रथम कॅनडातच राहावे लागले. ते इग्लडला पोचले तेव्हा डकर्क होऊन गेले होते. इग्लंडमध्ये गेल्यावर काही दिवसानी जॉर्जला त्याच्या अधिकाऱ्याने लंडन येथे मि. जॉन नावाच्या एका अधिकाऱ्याला भेटण्याचा आदेश दिला.

जॉर्ज लडनला जाऊन दिलेल्या पत्त्यावर जॉनला भेटला. जॉनने जॉर्जला सागितले की तुझी नेमणूक फ्रान्समधील भूमिगत चळवळीत केलेली आहे. तेथे जाऊन स्थानिक देशभक्त भूमिगतांबरोबर राहावयाचे होते. त्याचे मदतीने युरोपवरील हवाईहल्ल्यात जर्मनानी पाडलेल्या दोस्ताचे वैमानिकाना सुखरूप परत पाठविण्याची सोय पाहावयाची होती. शिवाय लडनच्या आदेशाप्रमाणे इतर घातपाती कामे करावयाची होती. त्यासाठी जॉर्जला अर्थातच फ्रान्समध्ये फ्रेंच बनून राहायचे होते. फ्रान्स तेव्हा जर्मनानी जिंकला होता. तेथे गेस्टॅपोचे राज्य होते. गेस्टॅपो हे जर्मन हेर खाते त्याकाळी अत्यत प्रबळ होते. त्याचा दरारा जर्मनीतच काय पण जर्मनी बाहेरही पसरला होता. गेस्टॅपोला दया मायाच काय पण साधी माणुसकी सुद्धा नव्हती. अशी त्याच्याबद्दल साऱ्या जगाला माहिती होती. या गेस्टॅपोचे जबडयात जावयाचे होते. लढायचे होते. तेथे दोस्ताचे सेनासामर्थ्य त्याला उपयोगी पडणार नव्हते साधा सैनिकी हुद्दा तो वापरू शकत नव्हता. पकडल तर तो एक फ्रेंच नागरिक असणार होता. युद्धकैदी म्हणून सुद्धा तो समजला जाणारा नव्हता. फ्रान्समध्ये तो एक अर्धवट माणूस म्हणून जाणार होता. रहाणार होता. मिळालेले आदेश पार पाडणार होता. त्या अर्धवटाचे नाव होते पेरी. जॉर्ज फ्रान्समधील एका खेडयात पेरी म्हणूनच वावरणार होता. तो पेरी म्हणून त्या गावात जन्माला आला होता. बालपणी वाढला होता. त्याच्या आईवडलाचे मित्र त्या गावात होते. पण पेरी लहान असतानाच त्याचे आईवडिलानी पोटासाठी ते गाव सोडून प्रयाण केले होते. त्या जोडप्याचा एक अर्धवट मुलगा एवढीच पेरीबद्दल त्या गावच्या नागरिकांना आठवण होती. जर्मन चढाईचे सुरुवातीलाच पेरी मारला गेला होता. पण ही गोष्ट जर्मनाना माहीत नव्हती. गावात माहित होते ते इतकेच की पेरीचे आईवडील मारले गेले आहेत. वेडपट पेरीचे काय झाले, तो कुठे आहे याची गावकऱ्याना काहीच कल्पना नव्हती. तो पुनः गावात दिसला तर कुणाला आश्चर्य वाटणार नव्हते. ब्रिटीश हेरखाते याचाच फायदा घेणार होते. जॉर्जचा चेहरा मोहरा, शरीरयष्टी पेरीशी मिळती जुळती होती. वयानेही तो पेरीएवढाच होता. त्यामुळे ब्रिटिश हेरखात्याला पेरीचे जागी पाठवायला जॉर्जच योग्य वाटला होता.

शहाण्या सुरत्या जॉर्जचे अर्धवट पेरीत रूपातर करण्यासाठी त्याला तावडतोब हेरखात्याच्या शाळेत दाखल करण्यात आले. त्या शाळेचे नावच होते 'वेडयाचे इस्पितळ'. जॉर्ज तेथे दाखल झाला त्यावेळी त्याच्या सारखेच सत्तावीस लोक तेथे हेरगिरीचे शिक्षण घेत होते. त्या वेडयाचे शाळेबद्दल आसपासच्या गावात अफवा मुद्दाम पसरविल्या होत्या. महाभयंकर वेडे तेथे ठेवले जातात. वेडाचे लहरीत ते खून देखील सहज करतात असे तेथील पहारेकरीच सर्वत्र सागत. त्यामुळे त्या इस्पितळाच्या जवळपास देखील कुणाला फिरकू देत नाहीत. "एखादा बेभान वेडा सुटला तर काय करायचे?" या धास्तीने शक्यतो कोणी त्या बाजूला फिरकत नसे. या सागण्यात अगदीच तथ्य नसे असेही नाही. या कानाचे त्या कानाला न कळता गुपचूप




तुझे नाव काय ? तू काय काम करतोस ?

जाऊन माणसे कशी ठार मारावीत याचे पद्धतशीर शिक्षण तेथे खरोखरच प्रत्येकाला दिले जात असे. शिवाय वेगवेगळी स्फोटक द्रव्ये हाताळणे, त्यांचा वापर करून गाड्या उडवणे, पूल उडवणे वगैरेचेही पद्धतशीर शिक्षण तेथे दिले जात होते. वायरलेस ऑपरेटरचे कामतर प्रत्येकाला शिकावेच लागे. या सर्वच शिक्षणाचे वैशिष्ट्य हे की केवळ ते शिकून भागत नसे तर या प्रत्येक गोष्टी झोपेत सुद्धा व्यवस्थित करता येतील इतक्या आत्मसात करून घेतल्या जात. जॉर्जला या सर्वाशिवाय नॉर्मंडीतील फ्रेंच किसान बोलत ती बोली आत्मसात करावी लागली. साऱ्या बारीकसारीक लकबीसह. तेथील सामान्य लोकांना त्याकाळात वापरता येत असलेले सर्व कपडेही त्याला रोज वापरावे लागत. त्या बाबतच्याही स्थानिक लकबी त्याने पूर्ण आत्मसात केल्या. त्या काळात नार्मंडीतील गरीब लोकांना रोजच्या जेवणात ज्या वस्तू ज्या प्रमाणात मिळत, त्याच वस्तू जॉर्जला त्याच प्रमाणात रोज मिळू लागल्या. याचबरोबर फ्रान्समधील इमारती, पूल, कालवे, आगगाड्या, फ्रेंच व जर्मन बनावटीच्या गाड्या साऱ्यांचा बारीकसारीक तपशीलही जॉर्जने आत्मसात केला. जॉर्ज आता अगदी अंतर्बाह्य नॉर्मंडीतील फ्रेंच खेडूत बनला. पण केवळ फ्रेंच खेडूत बनून जॉर्जचा पेरी होऊ शकत नव्हता. पेरी एक अर्धवट माणूस होता. गेस्टॅपोचे नावाखाली, गेस्टॅपोचे डोळ्यात धूळ फेकून जॉर्जला किती काळपर्यंत वेडपट पेरीची भूमिका पार पाडावयाची होती. ते कोणीच सांगू शकत नव्हते. गेस्टॅपोला जरा जरी शंका आली तर हालहाल सोसून मरण अटळ होते. त्यासाठी जॉर्जला वेडपट बनण्यासाठी खास शिक्षण देण्यात आले. त्यासाठी त्याला एका खऱ्या खुऱ्या अर्धवट माणसाचे सहवासात रात्रंदिवस ठेवण्यात आले. त्याचे निरीक्षण करून जॉर्जने वेडपट माणसाच्या सर्व लकबी आत्मसात करण्यास सुरुवात केली. अद्याप त्याचे बोलणे स्वच्छ होते. ते स्वाभाविकपणे तोतरे करणे आवश्यक होते. त्यासाठी जेवणाची वेळ सोडून सकाळी जागा झाल्यापासून रात्री झोपायला जाईपर्यंत त्याला तोंडात एक गोटी धरावयास लावणेत आली. जिभेवर गोटी असलेले त्याचे उच्चार आपोआप तोतरे होऊ लागले. असे चार एक महिने गेले. जॉर्जचे जिभेने तोतरे बोलायचे वळण घेतले. मग तोंडातून गोटी काढूनही तो सफाईदारपणे तोतऱ्या फ्रेंच बोलीत बोलू लागला. हळू हळू जॉर्जचे हात लचकत लचकत, तोंड अर्धवट उघडे ठेवणाऱ्या व नॉर्मंडीतील बोली तोतरेपणे बोलणाऱ्या पेरीत रूपांतर होवू लागले. मग ज्या भागात त्याला काम करावयाचे होते तेथील गाड्यांना वापरत असलेल्या इंजिन ऑईलची बाटली जॉर्जला देण्यात आली. बरोबरच एक थैली भरून मातीही जॉर्जला देण्यात आली. ही माती नॉर्मंडीतील त्याच भागातील शेतातून मुद्दाम आणली होती. जॉर्जच्या हातापायाच्य नखांत, केसात ती माती जिरविण्यास सांगितले. मातीत ते तेल मिसळून मिश्रण त्याला अंगावरचे सर्व कपड्यात व बुटात जिरवावे लागले. आता त्याच्या अंगावरील कपड्यातील, नखांतील कुठल्याही नमुन्याची सूक्ष्मदर्शकाखाली पाहणी केली तरी त्यावर इंग्लंडची नाव निशाणीही आढळेनाशी झाली.

मग त्याचे अन्न तोडण्यात येऊ लागले. त्याचबरोबर त्याला अतिश्रमाच्या कामाला जुंपण्यात येऊ लागले. त्या श्रमाने कोसळून तो जमिनीवर पडला की त्याला उठवून पुन्हा कामाला जुंपत. शेवटी तो श्रमाने अगदी ग्लानी येऊन बेशुद्ध होऊ लागला की त्याच्या डोळ्यावर झगझगीत प्रकाश टाकत व त्याला फ्रेंचमध्ये विचारत 'तुझे नाव काय?' तू काय काम करतोस? तुझे आईबाप कोण? तुझे आईबाप काय काम करतात?' अशा प्रश्नांची सरबत्ती त्याच्यावर करण्यात येई. दिवसभराचे श्रमाने तो गाढ झोपला की त्याचे डोळ्यावर झगझगीत प्रकाश टाकून त्याला जागे करीत; व त्याच्यावर याच प्रश्नांची पुन्हा सरबत्ती केली जाई. हळू हळू या सर्व सरबत्तीला अर्धवट पेरीचे लकबीत, नॉर्मंडीचे बोलीत, तोतरेपणे, पेरी जी व अशी उत्तरे देई ती व तशी उत्तरे जॉर्ज देऊ लागला. जॉर्जचे आता पेरीत रूपांतर पूर्ण झाले, असा विश्वास हेरखात्याला आला. त्याला फ्रान्समध्ये पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. तत्पूर्वी त्याच्याकडून कॅनडात त्याच्या बायकोला पाठवण्यासाठी पुढील तीनचार वर्षातील तारखांची वेगवेगळ्या गावाचे पत्त्यावरील पत्रे लिहून घेण्यात आली. ब्रिटीश हेरखाते त्याच्या बायकोला सुद्धा या कामगिरीबद्दल कुठलीही शंका येऊ नये याची काळजी घेत होते. या नंतर जॉर्जला फ्रान्समध्ये उतरण्याचे ठिकाणाबद्दल माहिती देण्यात आली. विमानातून उडी टाकल्यापासून भूमिगतीचा संपर्क साधेपर्यंत कसे वागावयाचे, कुठल्या दिशेने किती पावले जावयाचे, पॅरॅशूट कुठे पुरावयाचे, परवल काय? वगैरे सर्व सूचना तपशीलवार देण्यात आल्या. तो येणार असल्याबद्दल त्या ठिकाणच्या भूमिगतांना वायरलेसवरून सांकेतिक संदेश देण्यात आला. संदेशाची पोच मिळताच एका रात्री अंतर्बाह्य पेरी बनलेला जॉर्ज विमानात चढला. ठरल्या ठिकाणी त्याला पॅरॅशूटमधून उतरवून विमान परत आले. फ्रान्सच्या भूमीवर पाय टेकताच जॉर्जचे जॉर्जपण संपले. तो आता पेरी झाला होता. फ्रान्समध्ये असेपर्यंत तो पेरी म्हणूनच पेरीचेच जीणे जगणार होता. प्रसंग पडला तर हाल हाल सोसून मरणार होता. तेथे कोणीही त्याला जॉर्ज म्हणून ओळखणार नव्हते, त्याने स्वतःही स्वतःची जॉर्जशी ओळख विसरावयाची होती.

पृष्ठ ४१ वर



Prof. Bali

# NOW IT CAN BE TOLD

**पंचवीस वर्षांपूर्वी गाजलेल्या एका दुर्मिळ पुस्तकाचा अनुवाद ( हप्ता पाचवा व शेवटचा )**

## १० : निर्वासितांचे हाल

निर्वासित या शब्दाचा कोशातील अर्थ निवाऱ्याची जागा अथवा आश्रय शोधणारा असा दिला आहे. पहिल्या प्रथम पश्चिम पंजाबातील लाखो हिंदुशिखांना या नावाने संबोधण्यात आले. मार्च १९४७ मध्ये जेव्हा प्रथम पश्चिम पंजाबमध्ये जातीय दंगलीने डोके वर काढले तेव्हा हे लोक हिंदुस्थानच्या कोणत्याही कोपऱ्यात आपल्याला तात्पुरताच आश्रय घ्यावा लागेल या समजुतीने इकडे आले. काही काळ लोटल्यावर आपल्याला आपल्या घरी परत जावयास मिळेल असे त्यांना निश्चितपणे वाटत होते. वायव्य सरहद्द प्रांत व रावळपिंडी या भागातून निर्वासितांचा जो पहिला लोंढा आला त्यातील लोकांना आपल्या बरोबर थोडीबहुत जंगम मालमत्ता आणता आली. त्यावेळी सोने चांदी, रोकड, दागदागिने बरोबर घेण्यास मज्जाव नव्हता. त्यामुळे पहिले काही महिने त्या लोकांच्या नेहमीच्या सवईप्रमाणे, त्यांचे रहाणीचे मान उच्च होते. एरवी उत्तर प्रदेश अथवा दिल्ली येथील चांगल्या सुखवस्तु असलेल्या माणसाच्या रहाणीपेक्षा पंजाबातील साध्या नागरी माणसाच्या रहाणीचे मान नेहमीच उच्च असे. वायव्य सरहद्द प्रांतातील पंजाबी व सिंधी माणसांबद्दल म्हणतातच मुळी, की ते लोक सिंहासारखे कमावतात व सिंहासारखे खातात. याउलट असे म्हणतात की, हिंदुस्थानातील बनिये व ब्राह्मण सिंहासारखे कमावतात, पण कोल्ह्यांसारखे खातात. उत्तर प्रदेशातीर शहरे व

मुंबईचे लोक यांनी एका सुरात या निर्वासितांच्या उधळ्या सवयीवर टीकास्त्र सुरू केले. या लोकानी जर थोडा विचार केला असता तर त्यांना सहज कळले असते, की मुळात हाताचे सढळ असलेल्या या बिचाऱ्याची पिढ्यान् पिढ्या साठवलेली संपत्ती बळजबरीने हिरावून घेतली गेली होती. त्यामुळे निराश होऊन बरोबर आणलेला तुटपुंजा पैसा त्यानी थोड्या अविचाराने खर्च केला. शिवाय आजवर सुखसोयींनी समृद्ध असलेल्या माणसास लागलेल्या सवयी एकाएकी जाणे शक्य नसते. पण एवढा विचार न करता स्थानिक लोकाकडून या निर्वासिताविषयी कोरडी सहानुभुती राहोच पण त्याची कुचेष्टा व हेटाळणीच होई. त्यातूनच 'शरणार्थी' हा शब्द तयार झाला. तो वस्तुस्थिती निदर्शक असण्यापेक्षा आधिक अपमानास्पद असाच असल्यामुळे त्यानी तो या नव्या आलेल्या लोकांना लावला.

निर्वासितांच्या दुसऱ्या लाटेत रावळपिंडी व लाहोर विभागातील लोक होते. हे शूर हिंदुशीख काहीतरी अनुकूल घडून येईल या आशेवर आजवर तेथे थाबून राहिले होते. २ जूनच्या घोषणेनंतर त्यांनी इकडे यावयास प्रारंभ केला. २१ जुलै नतर लाहोर शहरवासियाचा एक मोठा ताडा भारतात यावयास निघाला. या सुमारास लाहोर विभागातील सर्व जिल्ह्यातून मुस्लिम पोलीस व बलुची लष्कर यांच्या साहाय्याने अल्प संख्याकांचे सर्रास खून करणे, त्याची लूटमार करणे हीच कामे मुस्लिम लीग कार्यकर्ते करीत होते. यावेळी हेच त्याचे मुख्य काम होते. यामुळे ११ ऑगस्ट नंतर निर्वासितांचे ताडे सैरावैरा धावू लागले. लौकरच लाहोर शहरात हिंदु व शीख शिल्लक राहिले नाहीत. ते भारतात जाण्यासाठी दयानद अँग्लोवैदिक कॉलेजच्या निर्वासित छावणीत हजारोंच्या संख्येने गोळा झाले. यावेळी लष्करास अशा आज्ञा होत्या की, शक्य तितक्या थोड्या वेळात जास्तीत जास्त लोक भारतात आणावेत. या लष्करी गाड्यांतून निर्वासित माणसाबरोबर त्याच्या मालमत्तेपैकी फक्त एखादी ट्रंक अथवा एखादी वळकटी घेण्याचीच परवानगी असे. त्यामुळे या वहातुकीत शिस्तशीर काळाबाजार सुरू झाला. काही नीच व निर्घृण लोकांनी आपले दैव या प्रकाराने उघडून घेतले. मोटार हाके, तांड्याच्या सरक्षणास असलेले पोलीस व लष्कर, निर्वासित छावण्याचे व्यवस्थापक, त्यांची मालमत्ता संभाळणारे अधिकारी, या सर्व लोकांची काळाबाजार करण्यासाठी एक साखळीच तयार झाली होती. काही दिवसानतर निर्वासितांचे सामानसुमान परत देण्यात आले तेव्हा असे आढळून आले की पेटयाना कुलपे जशीच्या तशी असूनही त्यातून सोन्याचांदीचे दागिने नाहीसे झालेले आहेत. अशा प्रकारे ज्यांचा किंमती माल गेला असे अनेक स्नेही मला नंतर भेटले. सशयीतांची नावेही ते उघडपणे घेत होते. पण याचा काय उपयोग होता ? निर्वासितांच्या तांड्याबरोबर असलेले मुसलमान पोलीस व लष्करी शिपाई हिंदु-शिखांना सरळ मार्गाने लुबाडीत. त्यांची एकंदर रीत अशी होती. निर्वासितांच्या ताड्यास शानमार बागेजवळ अथवा पाकिस्तान सीमेवर थाबवून तेथे त्यांची एक मिनिटभर तपासणी होई, बलुची लष्कर सडकेच्या दोन्ही बाजूस उभे राहून जाणाऱ्या माणसापासून सोने, चादी व दागिने काढून घेत. या वस्तू बाहेर नेण्यास परवान्याची अवश्यकता आहे, असे भासविण्यात येई. त्यामुळे बलुची लष्कराचे अनायासेच साधले होते. वस्तुतः अशा परवान्यांची आवश्यकता सरकारीरीत्या प्रगट करण्यात आली नव्हती. परंतु भरलेल्या बंदुकीपुढे कोणत्याही गोष्टीचा विधि निषेध असत नाही. सर्व दाग दागिने हिसकावून घेतल्यानंतर आपसात वाटून घेण्याकरिता ते एकत्र जमविले जात. नंतर इतर सामानाची झडती सुरू होई. बिछाने व मोठाल्या ट्रंकातील सामान बाहेर काढून अस्ताव्यस्तपणे सडकेवर पसरण्यात येई. या सर्व दिव्यातून सुरक्षित पार पडण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे एक तर सामानातील जी वस्तू तपासणी करणाऱ्यास पसत पडेल ती त्यास बहाल करणे अथवा आपल्याजवळ लपवून आणलेला रोख पैसा स्वखुशीने त्यास देणे. पाकिस्तानी लष्कर इतके धीट होते, की ते वायदाही मान्य करीत व वायदा केलेला पैसा अमृतसरला येऊन वसूल करून घेत. त्या काळात अशा रीतीने उघड उघड लूट चालू होती. माझ्या स्वतःच्या माणसास खालसा कॉलेज छावणीत लष्कराच्या ताब्यात असलेले सामान परत मिळविण्यासाठी लाच द्यावी लागली. या निर्वासित वहातुकीशी संबंधित असलेल्या व्यक्तीना या भीषण परिस्थितीत एरवी आपल्या देशबाधवाची उत्कृष्ट सेवा करता आली असती. पण त्यांचा विलक्षण अधःपात झालेला होता. व त्यानी निर्वासिताची लूट केली, ही गोष्ट अवश्य नमूद केली पाहिजे. येथेही काही सन्माननीय अपवाद होते. एरवी जो तो आपला स्वार्थ पहात होता. ज्यास जसे जुळेल तसे त्याने लुटावे, हीच जणू काय एकमताने सर्वांच्या कार्याची दिशा ठरली होती. आणि या भेसूर विनाशास पश्चिम पाकिस्तानातील अल्पसंख्यांकांना तोड द्यावे लागत होते.

¤

एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेले निर्वासिताचे स्थलातर लष्कराच्या साहाय्यावाचून केवळ अशक्य होते. १ सप्टेंबर १९४७ पासून लष्कराने ही कामगिरी अंगावर घेतली व त्यांनी आपली कामगिरी खरोखर अत्यत चोख रीतीने पार पाडली. यावेळी अगदी पहिल्यानेच लष्कर आपले आहे अशी बहुजनसमाजास जाणीव झाली. एकीकडे मुलकी अधिकाऱ्यांची दीर्घसूत्री व्यवस्था, लाचखोरी व गोंधळ व दुसरीकडे लष्करी अधिकाऱ्यांची शिस्त, कार्यतत्परता व झटपट कार्य पार पाडण्याचे कौशल्य या दोन्हीतील विरोध यावेळी ठळकपणे कोणाच्याही नजरेत भरण्यासारखा होता. विशेषत. डोगरा व गुरखा लष्कराने प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळविले होते. पाकिस्तानात आडवळणी असलेल्या खेड्यातून अडकून पडलेल्या हिंदुशिखाना आणण्याचे कामी शीख शिपायाचा फार उपयोग झाला. बहोमली विभागात हिंदुशीख तरुण मुलीच्या एका मोठ्या संख्येला मुस्लिम गुडानी कसे लपवून ठेवले होते व त्यांची सुटका कशा शौर्याने करण्यात आली याची हकीगत पूर्व पजाबात सर्वांना माहीतच आहे. त्यांच्या सुटकेसाठी पहिल्याने एका अधिकाऱ्याने फारसा विचार न करता हिंदु लष्कर पाठविले. हे लष्कर तेथे रस्त्यारस्त्यातून फिरू लागले व दारे ठोठावून आतील स्त्रियांस सुटकेसाठी बाहेर येण्यास सांगू लागले. स्त्रियाना कोंडून ठेवणारे मुस्लिम गुड त्या स्त्रियाना सागू लागले, की हे शिपाई हिंदु-नसून मुसलमान आहेत व येथे पाकिस्तानद्रोही कोणी आहेत की काय हे पहाण्यासाठी ते आले आहेत. यापूर्वी बलुची लष्कर आणवून त्यांनी या स्त्रियांना भेडसावण्याकरिता अशी एक रंगीत तालीम घेतलीही होती. त्यामुळे गुंडाचे म्हणणे खरे समजून या स्त्रिया स्वस्थ बसल्या

व गेलेल्या तुकडीस हात हालवीत परत यावे लागले. अजनाला व अमृतसर येथे असलेले त्या स्त्रियांचे आप्त नदीपलीकडील त्याच खेड्यात आमची बायकामाणसे आहेत असे अट्टाहासाने सांगत होते. म्हणून दुसऱ्यावेळी शीख लष्कर पाठविण्यात आले. शीख शिपाई तेथे दिसण्याचाच अवकाश होता, मुस्लिम गुंडांच्या तावडीत असलेल्या अनेक स्त्रियांनी कानाकोपऱ्यातून आपली डोकी बाहेर काढली व त्या ओरडू लागल्या. थोड्याच वेळात पाचपन्नास स्त्रियांची सुटका करून या शीख लष्कराने त्यांना त्यांच्या आप्तेष्टात आणून सोडले.

हाफीजाबाद खेड्याची अशीच गोष्ट आहे. या खेड्यातील सर्व हिंदु रहिवाशांनी भीतीमुळे मुस्लिम धर्म स्वीकारला. त्यामुळे त्यांची मालमत्ता सुरक्षित राहिली व बायकामुलांपासून ताटातूट झाली नव्हती. या लोकांचा प्रामाणिकपणा पारखून पहाण्यासाठी मुस्लिम लीग कार्यकर्ते तेथे आले व त्यांनी त्या खेड्यात बलूची लष्कर आणविले. या लष्कराने आपण डोगरा आहोत व जे कोणी हिंदुशीख येथे राहिले आहेत त्यांना सोडविण्यासाठी आलो आहोत, असे ओरडून सांगितले. फाळणीपूर्वी बलूची व फ्रंटिअर फोर्स पलटणीत डोगरा लोकांच्या तुकड्या असत व साऱ्यांचा गणवेश सारखाच असे. लाल फितीची निशाणी हिंदु-मुसलमान शिपायास सारखीच लावण्यात येई. त्याचा परिणाम ही तुकडी खरोखरच हिंदु असावी असे वाटून या खेड्यातील बाटलेली सर्व हिंदुशीख जनता बाहेर पडून स्वतःच्या सुटकेसाठी या तुकडीची प्रार्थना करू लागली. या तुकडीने या सर्व लोकास खेड्याबाहेर रांगेने उभे करून ' इस्लामचे द्रोही ' म्हणून ठार करून टाकले.

या प्रांतातील कित्येक हिंदुशिखांच्या अमानुष कत्तलीस डोगरा व बलुची यांच्या गणवेषातील सारखेपणा कारण झाला आहे. माझे मित्र झांग येथील अॅडव्होकेट श्री रामदयाळ सैहगल यांच्या दुर्भागी अंताची हकीगत अशीच शोचनीय आहे. ते एक अत्यंत श्रीमान गृहस्थ असून शारकोटचे जमीनदार होते. दंगलीच्या वेळी ते शारकोटलाच निर्वासित छावणीत आपल्या कुटुंबासह रहात होते. एके दिवशी सकाळी स्वतःस डोगरा म्हणविणाऱ्या शिपायांची एक तुकडी मोटार ट्रक घेऊन तेथे आली व छावणीच्या पुढाऱ्यांनी येथील निर्वासितांना हालविण्याकरिता अधिक संरक्षण मिळविण्यासाठी आमच्या बरोबर ल्यालपूरला चलावे असे सांगून श्री रामदयाल सैहगल व आणखी दोघा श्रीमंत गृहस्थांना त्यांनी आपल्या ट्रकमध्ये घेतले. रामदयाल यांनी आपला मुलगा व रोकड, दागदागिने व जडजवाहिरही आपल्या बरोबर घेतले होते. ल्यालपूरच्या रस्त्यावर एका निर्जन ठिकाणी त्या सर्वांचे खून पाडण्यात आले. इतर वस्तूंबरोबर श्री रामदयाल यांचेजवळ एक दोन वेगवेगळ्या बँकांवर घेतलेले ड्राफ्ट होते. एक एका युरोपियन बँकेवर व दुसरा एका हिंदी बँकेवर. युरोपियन बँकेवरील ड्राफ्ट बिनबोभाट वटविला गेला. पण हिंदी बँकेवरील ड्राफ्ट वटविण्यासाठी एक मुसलमान आला असता बँकेच्या अधिकाऱ्यास त्याचा संशय आला. त्याने तो प्रगट करताच आलेला मुसलमान इसम नाहीसा झाला. पण या प्रकारामुळे राम दयाल यांच्या नाहीसे होण्याचे गूढ जे गेले कित्येक महिने उलगडत नव्हते ते मात्र उलगडले.

शेखपुऱ्याच्या निर्घृण कत्तलीनंतर तेथेही अशीच एक घटना घडली. बलुची लष्कराची एक तुकडी मोटारीतून सडकेने जात असता काही



शीख लष्करावरचा विश्वास

हिंदु स्त्री पुरुष दोन दिवस उपाशीतापाशी लपून बसले होते. त्यांना ही तुकडी डोगरा लोकांची वाटल्यावरून ते पुढे आले. त्या शिपायांनीही आपण हिंदुच असल्याचे शपथेवर सांगून तुकडीच्या प्रमुखाने त्या स्त्री पुरुषांना त्यांच्या जवळील दागदागिने व रोकड एकत्र करून मोटारीत ठेवण्यास सांगितले. न जाणो सरहद्दीवरील पाकिस्तानी पोलीस ते लुबाडतील म्हणून ही व्यवस्था सांगण्यात आली होती. सर्व दागदागिने मोटारीत जमा होताच मोटार भरवेगाने निघून गेली. या तुकडीने कोणाची कत्तल न करता फक्त सोने नाणेच नेले हे उपकारच समजावयाचे. यानंतर हिंदु लष्कर जेव्हा या दुर्दैवी लोकांस न्यावयास आले तेव्हा त्यांनी ही सर्व हकीगत त्या लष्कराच्या अधिकाऱ्याला सांगितली. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी झालेल्या प्रकाराकडे मुळीच लक्ष दिले नाही.

अशा तऱ्हेने ओळख न पटल्याने, गैरसमज झाल्यामुळे घडलेल्या अशा दुर्दैवी घटना सोडल्या तर हिंदी लष्कराचे धैर्य आणि मानवता विविध स्वरूपात प्रगट झाली. पाकिस्तानातून निर्वासितांना सोडविण्याचे कामी शीख शिपायांचा उत्कृष्ट उपयोग होतो हे सिद्ध झाले असूनही दयेच्या या थोर कामास त्यांना न पाठविण्याविषयी पाकिस्तानने केलेल्या मागणीस हिंदुस्थान सरकारने का मान्यता द्यावी हे येथील जनतेला कळेना.

१९४१ च्या शिरगणनेप्रमाणे पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, भावलपूर, सिंध व बलुचिस्तान, येथील हिंदुशिखांची लोकसंख्या ५९ लाख होती. १९४१ ची शिरगणना बनवाबनवीची असल्यामुळे हा आकडा वस्तुस्थितीपेक्षा कमीच आहे. तथापी ती खरी धरली व लोकसंख्या वाढण्याचे सर्वसाधारण जे प्रमाण आहे त्यास अनुसरून १९३१ ते १९४१ पर्यंतच्या वाढीचे प्रमाण गृहीत धरले तर १९४७ त येथील लोकसंख्या ६८ लाख व्हावयास पाहिजे. यापैकी सुमारे पंचावन्न लाख हिंदुशिखांनी पश्चिम पंजाबातून स्थलांतर केले. सिंधमधून चार लाख अठ्याहत्तर हजार लोकांनी स्थलांतर केल्यावर १५ जून १९४८ ला तेथे चार लाख हिंदुशीख शिल्लक होते. या हिशोबाने पाहिले तर

बाकीच्या लोकांचे काय झाले? पाकिस्तान सरकारला जी यादी देण्यात आली आहे तीप्रमाणे अद्याप २८ हजार हिंदुशीख स्त्रिया व मुले तिकडे असून ती सोडवायची आहेत. परंतू तरीही शिलकी चार लाख माणसाचा हिशोब देता येत नाही. यावरून ती पाकिस्तानात मारली गेली असावीत असेच मानावे लागते. जगाच्या इतिहासात पहिल्याने झालेल्या या फाळणीच्या लढाईत अतुलनीय अशी भयकर अमानुषता प्रगट झाली. घरन् घर टिपले गेले. लौकिकी लढाईत निदान शत्रु सैनिक कैद केले जातात. या लढाईत ते काही नाही. सर्रास निकालच. कोणी धर्मांतराच्या नावाखाली, विशेषत: मालमत्ता असलेला स्वत:स वाचवू म्हणेल पण तोही सुटला नाही त्यामुळे या दंगलीत पश्चिम पाकिस्तानात निदान चार लाख हिंदुशीख मारले गेले असावेत हे निश्चित.

सिंध सरकारने परमीट पद्धत सुरू केल्यामुळे सिंधमधून हिंदुलोकाचे स्थलांतर हळू हळू होत होते. सिंधी निर्वासिताना इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून असे प्रमाणपत्र मिळवावे लागे, की त्याचेकड खासगी अथवा सरकारी पैशाची बाकी नाही. तसेच कुठल्या बँकेचे अथवा एखाद्या व्यक्तीचे कर्ज नसून कोणा मुसलमानाचे दागदागिने गेहाण रूपाने त्याचे जवळ नाहीत याचीहि खातरजमा करून द्यावी लागे या सर्व दिव्यातून पार पडल्यावर त्याना स्थलांतराचा परवाना मिळावयाचा. पाकिस्तानात रहाणे न रहाणे बिगर मुस्लिमांच्या इच्छेवर अवलबून नव्हते ही गोष्ट पजाबी हिंदूना अगोदरच माहित होती. पण हिंदुस्थानातील इतर प्रातातील लोकाना व खुद्द हिंदुस्थान सरकारला फार उशीराने ती कळली. हिंदूशिखाचे खून करून, त्याच्या मालमत्तेची लूट करून अथवा अन्य प्रकारे छळ करून त्याना निघून जाण्यास भाग पाडण्यात येत होते. मुस्लिम गुंडांच्या या अत्याचाराकडे पाकिस्तान सरकार जाणून बुजून दुर्लक्ष करीत होते व कित्येक वेळा पोलीस व लष्करानेही या अत्याचारात भागीदारी केली. या सर्व गोष्टी हिंदुस्थान सरकारला फार उशीराने कळल्या. व त्याहीपेक्षा जास्त उशिराने, हिंदुशीख निर्वासित पाकिस्तानातील आपापल्या घरी आता परत जाऊ शकत नाहीत या गोष्टीची सरकारला जाणीव झाली.

१९४१ साली भावलपूरची २·४लाख असलेली हिंदुशिखाची संख्या लोकसख्येच्या वाढीचे प्रमाण लक्षात घेता १९४७ साली २·७ लाखावर गेली असली पाहिजे. यापैकी सत्तर ऐंशी हजार हिंदुशिखाना दग्याधोप्यामुळे ते सस्थान सोडावे लागले. मागे राहिलेल्या लोकाची सख्या सत्तर हजार असावी असा हिंदुस्थान सरकारचे अधिकारी भावलपूरला जाऊन आले त्याचा अदमास आहे. या हिशोबाने सुमारे एक लाख लोकाचा पत्ता लागत नाही. स्टेटमिनिस्ट्रीजवळ असलेल्या माहितीप्रमाणे यापैकी बहुसंख्य लोकांनी धर्मांतर तरी केले असावे अथवा झालेल्या दंगलीत त्याचा बळी पडला असावा. कसेही असो साऱ्या पाकिस्तानात भावलपूर हे एकच ठिकाण असे आहे की तेथे हिंदुशिखाचा अगदी 'करवला' झाला.

ही गोष्ट नीट लक्षात ठेवण्यासारखी आहे की, पाकिस्तानच्या पुढाऱ्यांनी अल्पसख्यांकाच्या सुरक्षिततेची व सरक्षणाची दिलेली सर्व आश्वासने पूर्णपणे पोकळ होती. ती आश्वासने केवळ जगातील इतर राष्ट्राची व हिंदुस्थानची दिशाभूल करण्यासाठीच दिली होती. हिंदुस्थान व पाकिस्तान सरकार यांचेमध्ये स्थलांतरितांच्या बाबतीत ठरविलेली व्यवस्था पाकिस्तान सरकारने केव्हांही कार्यवाहीत आणली नाही. निर्वासिताच्या झडत्या घेण्यात येत असत. त्यात त्यांची स्वत:ची असलेली मालमत्ता (शिवण्याचे यंत्र, चिनी मातीची भांडी, दागदागिने इतकेच नव्हे कपडे-लत्ते सुद्धा) हिसकाऊन घेतले जात. हिंदुशिखांचा अपमान करण्याचा अमूक एक प्रकार त्यांनी बाकी ठेवला नाही. पूर्वपजाब सरकारला मिळालेल्या माहितीप्रमाणे जेहेलम येथे प्रथम स्त्रियांची व पुरुषाची ताटातूट करण्यात आली. सर्व पुरुषाना एकत्र करून त्यांना कुऱ्हाडीने तोडण्यात आले व त्यांच्यावर करवती चालविण्यात आल्या. कारण काफीराना ठार करण्यासाठी बदुकीच्या गोळचा खर्च करू नयेत अशी आज्ञा होती. राहिल्या बायका. त्यांची पठाणी टोळ्यांनी आपसात वाटणी करून घेतली. गुजराथ विभागात पळविल्या गेलेल्या मुलींची संख्या चार हजार धरण्यात आली होती. काही ठिकाणी हिंदू-शीख स्त्रियांचा व्यापार होत असे. आणि पळविलेल्या बायका खुल्या बाजारात विकल्या जात. क्वचित प्रसंगी त्यांचा लिलावही केला जाई. प्राय: प्रत्येक दिवशी निर्वासितांच्या आगगाड्यावर हल्ले होत होते. त्यात पुरुषांना ठार करून बायका व मालमत्ता पळविली व लुटली जाई. कु. मृदुलाबेन साराभाई पळविलेल्या मुली सोडविण्यासाठी स्वत: पजाबमध्ये आल्या होत्या. त्यानी आगगाड्यातून अनेक मुली पठाणांनी पळविल्याचे स्वत: पाहिले आहे. अशा तऱ्हेने ज्यावेळी पश्चिम पंजाबात अगदी सरकारी प्रकाशनाप्रमाणे वरील प्रकारच्या घटना घडत होत्या त्यावेळी इकडे हिंदुस्थानात येथील अल्पसख्याकांना मिळणारी सर्वोत्कृष्ट वागणूक तशीच पुढे चालू रहावी म्हणून महात्मा गांधीच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पुढारी आपल्या सर्वंकष कृपाछत्राची त्यांच्यावर पाखर घालीत होते. पूर्वपंजाबातील हिंदुशीखांना स्वत: कोणत्याही प्रकारचा सूड न घेता सर्व गोष्टी सरकारवर सोपविण्याविषयी आपले सरकार त्यांना परोपरीने सांगत होते. पं. नेहरूंनी १७ ऑगस्ट १९४७ ला पूर्वपंजाबला भेट दिली. २४ ऑगस्टच्या दुसऱ्या दौऱ्यात त्यांनी ठिकठिकाणी सभा घेतल्या. सडकेच्या बाजूनी जमलेल्या लहान लहान जमावापुढे भाषणे केली. या सर्व भाषणांतून, तेथील लोक सूडबुद्धीपासून अलिप्त राहिले तरच त्यांना पश्चिम पजाबातील अल्पसख्याकाच्या संरक्षणाची हमी देता येईल अशी ते लोकाची आळवणी करीत होते मी अमृतसर येथे असताना पिंडीदादनखान आगगाडीवर झालेल्या क्रूर हल्ल्याची व अमानुष कत्तलीची व लुटीची भयकर वार्ता तेथे आली. पिंडीदादखान, मियानी व बेहेरा येथील सन्माननीय व सुखवस्तू लोक आपल्या सर्व मालमत्तेसह पाकिस्तानी लष्कराच्या सरक्षणाखाली या गाडीने अमृतसरला यावयास निघाले होते वाटेत कामोक रेल्वेस्टेशनापलिकडे गाडी एकाएकी थांबविण्यात आली. बरोबरचे लष्कर काही काळ अदृश्य झाले. आणि त्या अवकाशात गाडीतील बहुतेक हिंदुशीख पुरुष, बायका व मुले यांना ठार करण्यात आले व काहीना भयकर जखमी करून त्याच्या बरोबरच्या मालमत्तेची लूट करण्यात आली. काही जखमी लोकांना गुजराणवाला रुग्णालयात पोहोचविण्यात आले. ही गाडी जेव्हा अमृतसरला पोहोचली तेव्हा ती वाटेत लाहोरला चढलेल्या काही प्रवाशाव्यतिरिक्त अगदी रिकामी होती. सर्व डब्यातून रक्ताची थारोळी

साचली होती. एका डब्यात तर गोठलेल्या रक्ताचा अर्धा इंच जाडीचा थरच बसला होता. एक पोलीस सुपरिंटेंडेंट आपल्या वृद्ध मातापित्यास व इतर नातेवाईकास उतरून घेण्यासाठी स्टेशनवर आले होते. हे दृश्य पाहून त्याना भयकर रडू कोसळले. बऱ्याच महिन्यानतर गुजराणवाला रुग्णालयातून, एक हात तुटलेला व भयंकर जखमी अशा स्थितीत त्याच्या आईला सोडविण्यात आले. याच वेळी पूर्वपजावमधून मुसलमान निर्वासित आगगाडीने पश्चिम पंजावात जात होते. कामोक येथील या भयकर कत्तलीची बातमी ऐकली तेव्हा येथील काँग्रेसी राज्यकर्त्यांना या जाणाऱ्या निर्वासिताच्या सुरक्षिततेची फार काळजी पडली. सरदार पटेल लगेच विमानाने अमृतसरला आले व एका प्रचड जमावापुढे भाषण करून मुसलमान निर्वासितांना सुरक्षितपणे जाऊ देण्याविषयी त्यांनी लोकाना उपदेश केला व असेही आश्वासन दिले, की पाकिस्तानात हिंदु-शिखांवर अत्याचार करणाऱ्या गुडांना योग्य ते शासन करण्याचा प्रश्न सरकार आपल्या हाती घेईल. काही आठवडे लोटत नाहीत तोच १९४८ च्या जानेवारीत, सरदार पटेलांनी आश्वासन दिले असूनही गुजराथ येथे दुसरी अशीच एक शोकजनक घटना घडली. *यावेळचे बळी माझी जन्मभूमी वायव्य सरहद्द प्रांतातील बन्नु येथील* हिंदुशीख होते. या लोकांची गाडी हिंदी लष्कराच्या पुरेशा संरक्षणाखाली दाऊदखेल, दर्याखान, मुलतान, माँट गोमरी या मार्गाने यावयाची होती. तादृशे कोणतेही कारण नसता या गाडीने आपला मार्ग बदलून मालिकवाल व लालामुसा हा मार्ग धरला. या गाडीने लष्करी मक्तेदार, गावचे चौधरी, अलोट सपत्तीचे मालक आपल्या मालमत्तेसह यावयास निघाले होते. गाडी गुजराथ येथे थांबली व पठाणाच्या एका टोळीने तिच्यावर गोळचा चालविण्यास प्रारभ केला. गाडीबरोबर असलेले हिंदी शिपाई अननुभवी असले तरी शूर होते. त्यापैकी प्रत्येकजण जखमी झाला. पहिला हल्ला होताच त्यांनीही गोळचांची सरबत्ती केली. पण थोडचा तासातच त्यांचे जवळील दारुगोळा संपला; पठाणाच्या हालचालीमागे एखाद्या धूर्त लष्करी अधिकाऱ्याचे डोके असले पाहिजे. ते काहीकाळ स्वत:ला बचावीत दूर अतरावर उभे राहिले. जेव्हा त्यांची निश्चिती झाली की, हिंदु शिपायांजवळील दारूगोळा सपला आहे; तेव्हा ते पुढे सरसावले. आता ही गाडी मुस्लिम गुडाच्या व रक्तपिपासू पठाणांच्या भक्ष्यस्थानी पडणे अगदी सहज व सोपे होते. गाडीतील बायकामुलाच्या दु स्थितीचे वर्णन करण्यापेक्षा ते कल्पनेनेच जाणणे बरे. या प्रसगातून बचावून आलेल्या एका माणसाच्या आदमासाप्रमाणे केवळ मालमत्तेच्या लुटीपुरतेच बोलावयाचे झाले तर ती एक कोट रुपयाची झाली. गुजराथ येथे झालेल्याच प्रकाराने प्रत्येक पंजावी हिंदुशीखाला जबरदस्त धक्का बसला. यावर हिंदुस्थान सरकारी उत्तर एवढेच होते, की 'या प्रकरणी सरकार योग्य कारवाई करील.' आणि या म्हणण्याप्रमाणे 'सरकारी पातळीवरून' त्यानी पाकिस्तान सरकारशी वाटाघाटी सुरू केल्या. आणि त्या सरकारचा जोरदार तोडी निषेधही करण्यात आला. याचवेळी महात्मा गांधी उपवास करीत होते. अशावेळी अमृतसरच्या खवळलेल्या हिंदु-शिखानी *यावेळी* वाघा सरहद्दीकडे निघालेल्या मुस्लिम निर्वासिताच्या गाड्यावर गुजराथचा सूड उगवणे म्हणजे महात्माजींचा अतच ओढवणे होय. कारण मग ते आपला उपवास सोडणार नाहीत, *या कल्पनेने त्यांचे अनुयायी* घाबरले. ते पजाबच्या कानाकोपऱ्यातून अमृतसरला धावले. निरनिराळ्या सर्व लोकांकडे जाऊन सूड न घेण्याबद्दल ते त्यांच्या विनवण्या करू लागले. पोलीस व मुलकी अधिकाऱ्यांना जागरूक रहाण्याबद्दल बजावण्यात आले. सर्वत्र कर्फ्यूचा अंमल बसविण्यात आला. आणि जे कोणी सूड घेण्याचा प्रयत्न करतील त्याचेविरुद्ध कडक उपाय योजण्यात येतील असे दवडचा पिटवून प्रगट करण्यात आले. हे करीत असता अर्थात 'गाधीजीचा जीव वाचवा' ही त्याची मुख्य घोषणा होती. 'वापूचा जीव धोक्यात आहे' हे ऐकून, सूडाच्या भावनेने उसळणारे पजाबी रक्त आपोआपच थड पडले. प. नेहरूच्या सरकारने गुजराथच्या भीषण प्रकाराबद्दल काय उपाययोजना केली हे फक्त त्याच्या सरकारलाच माहीत. एवढे खरे की याबाबतीला अद्यापपावेतो कोणतेही प्रगट निवेदन करण्यात आलेले नाही. अथवा बळी पडलेल्या लोकाच्या नातेवाईकाना काहीही मोबदला मिळालेला नाही.

## निर्वासितांची स्वयंस्फूर्त घोषणा

जेव्हा मुस्लिम निर्वासिताचे हिंदुस्थानातून स्थलातर चालू होते तेव्हा गुरगाव जिल्ह्यातील सुमारे एक लाख पंचवीस हजार मेयो स्थलांतराची वाट पहात निर्वासित छावण्यातून पडून होते. हिंदुस्थानकडून येणाऱ्या या निर्वासितांच्या प्रवाहाबद्दल पाकिस्तान सरकारने हिंदुस्थानविरुद्ध जोराने ओरड सुरू केली. स्वकीयांच्या मतापेक्षा नेहमीच जगाच्या मतास भिणाऱ्या हिंदुस्थान सरकारने याही वेळी पाकिस्तानपुढे मान तुकविली. महात्मा गाधींच्या वैयक्तिक हस्तक्षेपामुळे मेयो लोकांना हिंदुस्थानातच ठेऊन घेण्याचे ठरले. इतकेच नव्हे तर याच्या भरतीला पजाबमध्ये स्थलातरीत झालेल्या अलवर व भरतपूर संस्थानातील आणखी पंधरा हजार मेयोना ठेवून घेण्याची सूचना पुढे आली. तीही स्वीकारली गेली. नुह व फिरोझपूर झिरगा तहसील मधील भाग 'बिगर निर्वासित' भाग म्हणून घोषित करण्यात आला. या भागात यापूर्वीच पश्चिम पजाबातून आलेल्या दहा हजार हिंदुशीख निर्वासिताना स्थाईक होण्यासाठी जागा देण्यात आली होती. त्यांना ती तात्काळ सोडून देण्याविषयी सागण्यात आले. आणि हेही प्रगट करण्यात आले की त्या भागातील मुलकी व पोलीस अधिकारी तेथील मेयो पुढाऱ्यांच्या सल्ल्यानुसारच नेमले जातील. त्यांच्या संरक्षणार्थ एक लष्करी तुकडीही ठेवण्यात आली. अशा रितीने हिंदुशीख निर्वासिताना गुरगाव जिल्ह्यात वसविण्याची पूर्व पजाब सरकारची मूळ योजना मध्यवर्ती सरकारने हाणून पाडली.
□

हिंदुस्थानच्या सीमेत पाय ठेवताच निर्वासिताकडून जी पहिली स्वयस्फूर्त प्रतिक्रिया होई ती म्हणजे 'हिंदुस्थान झिंदाबाद'च्या घोषणा. त्यात, या भूमीवर त्याना पाय ठेवता आल्यानेच निश्चितपणे येणाऱ्या मृत्यूच्या दाढेतून मुक्त झाल्याचा आनंद व समाधान व्यक्त होई. या निर्वासिताचे स्वागत पहिल्याने फार जिव्हाळ्याने केले जाई. *त्यांना ऊन ऊन अन्न वाढले जाई, कपडेही विनामूल्य दिले* जात व सहानुभूती व सद्भावांचा त्याच्यावर अगदी मोकळेपणी वर्षाव केला जाई. हिंदुस्थानात आल्यावर त्यांना पहिल्या प्रथम

पंजाबीच भेटत. स्वप्रांतीय म्हणून ते त्यांना स्वाभाविक आप्तजनाप्रमाणे वागवीत. शिवाय एका पजाब्याचे अंत:करण दुसऱ्या पंजाब्यासाठी, मग तो पूर्व पजाबचा असो अथवा पश्चिम पंजाबचा असो एकमेकांसाठी नेहमीच तिळ तिळ तुटत असते. आलेल्या सर्व निर्वासितांचा समावेश पूर्व पंजाबात होणे अशक्य असल्यामुळे त्याना देशात इतरत्र केंद्रे उघडून तेथे पाठविण्यात आले. अशी केंद्रे दिल्ली मुबई, उत्तर प्रदेश, पूर्व पंजाबातील सस्थाने, जोधपूर, बिकानेर, आणि राजपुतान्यात उघडण्यात आली होती. ज्या निर्वासिताना आपल्या पायावर उभे रहाता येत नव्हते अथवा ज्यांना आश्रय द्यावयास कोणी आप्तइष्टही नव्हते असे लोक निर्वासित छावण्यात रहात होते. त्यांची एकूण सख्या पूर्व पंजाबातील पाच लाख निर्वासितांसह नोव्हेंबर १९४७ च्या शेवटास बारा लाख पन्नास हजार होती: कुरुक्षेत्रात अडीच लाख, दिल्लीला दीड लाख व बाकीचे इतरत्र होते. डिसेंबर १९४७ च्या शेवटी पूर्व पजाबातील ८५ निर्वासित छावण्यात ही सख्या ७॥ लाख पर्यंत फुगली होती. त्यामुळे त्या सर्वांना वर आच्छादन असलेले निवासस्थान मिळणे अशक्यच होते. सरकारकडून देण्यात आलेल्या तंबू राहुटयातून कसाबसा सात लाख लोकाचा समावेश झाला. बाकीचे बरेच निर्वासित रेल्वे फलाटावरच वस्ती करून राहिले. अमृतसर ते करमाळ या मुख्य रेल्वे रस्त्यावर निर्वासितांना उतरून घेण्याची व्यवस्था चांगली झाली नव्हती. शिवाय अनेकवेळा स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांना निर्वासित येण्याची पूर्व सूचना मिळालेली नसे. त्यामुळे खूप गोंधळ व त्रास होई. निर्वासित नुसते आणले जात होते व देशात सर्वत्र, काही इकडे काही तिकडे असे ठेऊन देण्यात येत होते. मध्यवर्ती सरकारची कल्पना अशी की, निरनिराळया प्रातिक व संस्थानी निर्वासित केंद्रावर निर्वासितांना पोहोचवून दिले की पुढची सर्व व्यवस्था प्रातिक व सस्थानी सरकारे करतील. परतु प्रांतिक सरकारच्या अधिकाऱ्यांचा निर्वासिताविषयीच्या सहानुभुतीचा पहिला आवेग ओसरल्यावर ते बेपर्वाई करू लागले व नंतर पायरीपायरीने ते त्याचा तिरस्कारही करू लागले.

¤

दिल्लीच्या राज्यव्यवस्थेत बदल होताच निर्वासिताच्या बाबतीतील धोरणातही बदल झाला. राज्यव्यवस्थेतील हा बदल निर्वासितांना सूचनात्मक होता. दिल्लीचे डि. मॅजिस्ट्रेट श्री. रांधवा हे एक निष्णात व कर्तव्यनिष्ठ अधिकारी असल्याचे सिद्ध झाले होते राजधानीच्या शहरी विशेषत. निर्वासिताच्या सबधात, शातता व सुव्यवस्था राखण्याचे सर्व श्रेय त्याच्या स्वत:च्या प्रयत्नासच द्यावे लागेल. ते एक कडक पण सौजन्यशील असे अधिकारी होते. निर्वासिताच्या अडीअडचणी ऐकण्यास ते कोणत्याही क्षणी सिद्ध असत. त्याना निर्वासितांबद्दल कळवळा होता व म्हणून निर्वासितही त्याच्याशी सपूर्ण सहकार्य करीत होते. ते त्यांच्या सूचना निमूटपणे पाळीत. क्वचित कडक असलेल्या आज्ञाचेही ते उल्लघन करीत नसत. प्रारभी दिल्ली शहरातील सर्व मशिदी निर्वासितानी व्यापल्या होत्या. श्री. रांधवा यांनी सागताच त्या त्यांनी आपण होऊन रिकाम्या करून दिल्या. ज्यावेळी राजधानीत सतप्त झालेल्या निर्वासितांच्या टोळचा मागून टोळचा येत होत्या त्यावेळी तेथे श्री. राधवासारखा कळकळीचा व सौजन्यशील अधिकारी नसता तर तेथे स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असती व ती लौकर आटोक्यात आणणेही कठीण झाले असते. राधवा हे आणखी काही काल राजधानीत राहिले असते तर निर्वासिताच्या पुर्नवस्तीकरणाच्या दुसऱ्या अवस्थेत त्याचा फार उपयोग झाला असता. पण दिल्लीचे काळाबाजारवाले व बडे शेटिये यांना मोठचा संख्येने येणाऱ्या या पजाब्याचे हे आगमन खपण्यासारखे नव्हते. ते या वेळीही प्रांतियता विसरावयास तयार नव्हते. दिल्लीबाहेरील लोक आपल्या अस्तित्वास धोका आणीत आहेत असे त्यास वाटू लागले. दिल्लीच्या या स्थानिक लोकाचे हिंदुस्थान सरकारात चागले वजन होते. डे. कमिशनर राधवा व त्यांचे मुसलमान चीफ कमिशनर याचे सबंध फारसे सलोख्याचे नव्हते. या गोष्टीचा फायदा घेऊन या दिल्लीवाल्यांनी चीफ कमिशनरची स्तुती व डे. क. रांधवा याची निंदा आरंभली. हिंदुस्थान टाईम्सच्या खास बातमीदाराने म्हटल्याप्रमाणे, दिल्लीच्या राजकीय वर्तुळात त्यावेळी दोन पक्ष पडले होते. एक पक्ष चीफ कमिशनरला उचलून धरीत होता व दुसरा डे. कमिशनरला उचलून धरीत होता. याचा परिणाम दोघाही अधिकाऱ्यांना बदलून तडजोड करण्यात आली.

¤

१६ ऑगस्ट १९४६ रोजी पहिल्या प्रथम कलकत्ता, नंतर नौखाली, टिपेरा व पजाबमध्ये रावळपिंडी विभाग या ठिकाणी लीग गुंडांनी हिंदु व शीख स्त्रियावर जे रानटी अत्याचार केले त्याचा निर्देश करण्याची ही जागा नाही. त्या कथा इतक्या लाजिरवाण्या व हिडीस आहेत की त्या देऊन आम्ही आमची लेखणी विटाळू इच्छित नाही. मात्र या अत्याचारातून एक गोष्ट उघड झाली. ती आपण नीट ध्यानात ठेवली पाहिजे. सर्व देशातील अशाततेमुळे व विशेषत: पंजाबच्या फाळणीमुळे व त्यानंतर पाकिस्तानने काश्मिरवर केलेल्या हल्ल्यामुळे लीग गुडांना हिंदुशीख स्त्रियांना फार मोठ्या सख्येने पळविण्याची सधी मिळाली.

या दुर्दैवी स्त्रियाना सोडविण्याचे काम कु. मृदुलाबेन साराभाई यांनी हिंदुस्थान सरकारच्या पूर्ण पाठबळाने आपल्या हाती घेतले. पाकिस्तानच्या उच्च अधिकाऱ्यानी अशा प्रकारच्या जोड प्रयत्नास मान्यता दिली पण त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांनी सहकार्य देण्याचे नाकारले. श्री. गोपाळ स्वामी अय्यगार यानी पार्लमेंटमध्ये जे निवेदन केले त्यावरून ६ डिसेबर १९४७ पासून ३१ जुलै १९४८ पर्यंत पश्चिम पाकिस्तानातून ५५१० स्त्रिया सोडविल्या गेल्या. या उलट त्याच काळात हिंदुस्थानातून ९६५९ स्त्रिया सोडवून पाकिस्तानात पाठविण्यात आल्या. मूळ यादीप्रमाणे पाकिस्तानातून सोडविण्याच्या स्त्रियाची सख्या ३३ हजार होती. तर पाकिस्तानच्या सरकारी यादीप्रमाणे हिंदुस्थानातून २१००० मुसलमान स्त्रिया सोडवावयाच्या होत्या. हिंदुस्थान सरकारने मुस्लिम स्त्रियांच्या सुटकेसबधी एक वट हुकूमही जारी केला. उशीरा का होईना पण पाकिस्तान सरकारनेही अशाच प्रकारची योजना केली. पण मुस्लिम कार्यकर्ते व पाकिस्तानी अधिकारी याचा या माणुसकीच्या कामी असलेला निरुत्साह आणि सर्वसाधारण पाकिस्तानी जनतेची असहकारीत्वाची भूमिका यामुळे हिंदु स्त्रिया सोडविण्याचे काम अत्यत असमाधानकारक झाले. काही काळ लोटल्यानतर ही गोष्ट

केवळ एकतर्फी म्हणजे हिंदुस्थानकडूनच चालू राहिली. या कामासाठी श्री. मृदुलाबेन साराभाई यांनी जी संस्था काढली होती, तिचे काम फक्त हिंदुस्थानातील मुसलमान स्त्रियांना पाकिस्तानात पोहचविणे एवढेच राहिले होते. श्री. मृदुला बेन या पं. नेहरूंच्या प्रतिनिधी म्हणून पूर्व पंजाबात वावरत होत्या. त्यांचा नेहरू घराण्याशी गाढ स्नेह होता त्यामुळे त्यांचा एवढा वरचष्मा होता की पूर्व पंजाबात त्यांची अवज्ञा करणे तर दूरच पण त्यांच्या नुसत्या भ्रुसकेताकडेही दुर्लक्ष करण्याचे धाडस कोणी करीत नसे. त्या एक अविश्रांत काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. त्या स्वत. विश्रांती घेत नाहीत व सहकाऱ्यांनाही घेऊन देत नाहीत. त्या प्रथम जेव्हा अमृतसरला आल्या तेव्हा त्यांच्या चमत्कृतीपूर्ण रीतीभाती व पेहेराव यामुळे पंजाबी लोकांच्या मनात त्यांच्याविषयी एक प्रकारचे प्रेमळ कुतुहल उत्पन्न झाले होते. लवकरच जिल्हाधिकाऱ्याच्या लक्षात आले की त्यांना एखाद्या नाजूक स्त्रीबरोबर काम करावयाचे नसून एका मर्दानी स्त्रीबरोबर काम करावयाचे आहे. त्यांनी सांगितलेले काम ज्या अधिकाऱ्याकडून पार पाडले गेले नाही ते दुःखात पडले. त्यानी एका वड्या जिल्हाधिकाऱ्याची बदली पूर्व पंजाबात दुसरीकडे केली व तेथे त्यास विश्राती मिळू दिली नाही. हे अधिकारी बडतर्फच व्हावयाचे पण डॉ. गोपीचद त्यांच्या पाठीशी उभे राहिल्यामुळे ते बचावले. आतापर्यंत त्यांनी आपल्या हिंदुशीख स्त्री सहकाऱ्याशी भांडणे केली आहेत. पण त्यांचे हे उदात्त काम मात्र अविरतपणे चालू आहे. पाकिस्तानने सहकार्य दिले नाही तर त्यात काय मोठेसे ! ते या उदात्त कामाची तोडभर स्तुती करतात. आणि त्याना कु. मृदुलाबेन बद्दल फार आदर आहे. त्या प्रथम अमृतसरला आल्या तेव्हा त्यांचे चार शब्दाचे नाव उच्चारण्यास पंजाबी माणसास कठीण जाऊ लागले म्हणू ते प्रेमळपणे मृदुला बेनना 'आधीबहेन आधाभाई' या टोपण नावाने संबोधू लागले. आणि खरोखरच त्यानी आपल्या अविरत व समर्थ कृतीने त्या पळविलेल्या स्त्रियाची 'दुवळी बहिण' असण्यापेक्षा 'साराभाई' म्हणणे पूर्ण भाऊच होत्या ही गोष्ट त्यानी सिद्ध केली.

¤

हिंदुस्थानात आल्यावर निर्वासितांना पहिला अनुभव हा आला की येथील लोकाकडून शाब्दिक कळवळा भरपूर दाखविला गेला असला तरी कोणताही प्रात त्याना कायमचे सामावून घेण्यास तयार नव्हता. अधिक राहोत पण निदान येथून गेलेल्या मुसलमानांइतक्या लोकांना तरी आश्रय मिळावा, पण एवढेही त्यास मान्य नव्हते. ते निर्वासितांसाठी कोणताही त्रास अथवा गैरसोय सोसावयास तयार नव्हते. ते मग त्याना राहावयास घरे देण्याचा प्रश्न असो अथवा व्यापाराची संधी मिळवून देण्याचा प्रश्न असो. आम्ही जेव्हा पंजाबमध्ये होतो तेव्हा उत्तर प्रदेश, बिहार, मुंबई, मध्य प्रदेश, आणि मद्रास येथील पुढाऱ्यांची जोरदार भाषणे ऐकत असू. त्यावेळी आम्हास असे वाटे, की आम्ही हिंदुस्थानचा एक भाग असून पूर्णपणे हिंदुस्थानी आहोत. परतु फाळणीनतर सिंधी व पंजाबी लोकांनी या देशात पाय ठेवला तेव्हा वस्तुस्थिती अशी आढळून आली की येथे हिंदुस्थानी म्हणून कोणीही व्यक्ति नसून कोणी मद्रासी, कोणी युरोपियन, कोणी मुंबईवाले, कोणी गुजराथी, कोणी दिल्लीवाले तर कोणी बिहारी इत्यादी इत्यादी होते. प्रांतियतेची पाळेमुळे या देशात अगदी खोलवर रुजली आहेत. आणि हिंदुस्थान सरकारात फक्त एका प्रांताचाच वरचष्मा आहे. सुदैवाने तो प्रांत असा आहे की जगाच्या प्रारंभापासून तेथे कधीही राजकीय अस्वास्थ्यामुळे तेथील जनतेचे जीवन उध्वस्त झाले नाही. तेथील रहिवाशाचे जीवन स्वास्थ्यात गेले असल्यामुळे व दुर्दैवी व कष्टमय जीवनाचा अनुभव या लोकाना कधीच मिळालेला नसल्यामुळे, स्वाभाविकपणेच इतरांच्या हालाविषयी योग्य अनुकंपा याना वाटावी अशी याच्या मनाची ठेवण नाही. दुसऱ्याचे हाल ते जर यथायोग्यपणे समजूच शकत नाहीत तर त्याचेपासून सहानुभूतीची अपेक्षा करणेच चूक ठरेल. एका खात्याचे अडर सेक्रेटरी 'क्ष' आपल्या हाताखालच्या एका पेशावरहून आलेल्या निर्वासित सुपरिंटेंडटला खोचकपणे म्हणाले 'पेशावर शहरास दिल्लीपेक्षा अफगाणिस्थान जवळ होते. मग आपण अफगाणिस्थानात का गेला नाही ?'

हिंदुस्थानचे खरे राज्यकर्ते मत्री नसून सचिवालयातील त्यांच्या हाताखालील अधिकारीच आहेत. कारण मत्री येतात व जातात. दक्षिणेतून आलेले हे अधिकारी मात्र अकार्यक्षम ठरेपर्यंत आपल्या जागेवरच असतात. अकार्यक्षम ठरल्यानतरही ते आपल्या वर्ण्या कोठेतरी शिष्टमडळात अथवा इतरत्र मोठ्या पगारावर लावून घेतात. मी दिल्लीत आल्यावर सचिवालयासबधी पहिल्याने 'हिंदुस्थान सरकारच्या सचिवालयास मॅनिनजायटीस झाला आहे' असा विनोद ऐकला. सचिवालयात पंजाबी पूर्ण अभावाने तळपत होते. असे दिसते की, इग्रज व मुसलमान गेल्यावर जी पोकळी निर्माण झाली ती दक्षिणेकडील लोकाकडून भरण्यात आली. मानसूनचे वारेही दक्षिणेकडून, नैऋत्येकडून येत असतात त्यामुळे दक्षिणेकडील स्वामी, मेनन, आय्यंगार यांचा येथे भरणा व्हावा यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही.

मागे इतिहासात अनेकवार घडल्याप्रमाणे एकवेळ अशीही येईल की, हिंदुस्थानवर झालेल्या परकीय आक्रमणाविरुद्ध याच उत्तरेतील लोकाना देशाच्या सरक्षणार्थ उभे राहावे लागून आपले बलीदान करावे लागेल. आणि अशा गंभीर प्रसगी ही दक्षिणेकडील नोकरपेशा मडळी कचेरीतील प्रकरणे काखेत घेऊन उभी राहील, किंवा त्यावेळी वादळात सापडलेल्या त्या नौकेचा पहिल्या तडाख्यात त्याग करून सैरावैरा पळ काढतील. अर्थात ही गोष्ट भविष्यकाल सागणार आहे. याबाबत एवढे मात्र सागता येईल की, जोपर्यंत हिंदुस्थान सरकार राज्य कारभारात प्रत्येक प्रातास त्याच्या योग्यतेप्रमाणे जागा राखून ठेवीत नाही, तोपर्यंत याबाबत दिवसेंदिवस वाढत जाणारा असतोष हिंदुस्थानची सरक्षण योजना दुर्बल करील. हल्ली चालू असलेली 'गाय उत्तरेने राखावी व दूध दक्षिणेने काढावे' ही व्यवस्था फार काळ टिकणार नाही. मोठ्या जागेवर, ज्या ठिकाणी देशाची धोरणे ठरविली जातात, तेथे जर निर्वासितापैकी त्याचेच कोणी लोक असते तर त्याना हल्ली मिळत असलेल्या वागणुकीत निःसंशय फार फरक पडला असता.

**[ प्रकरण ११ वे निर्वासितांची मालमत्ता व याबाबतचे सरकारी धोरण यासंबंधी आहे. ते संक्षेपात पूर्ण गाळले आहे. ]**

# १२ : विपत्काली साहाय्य करतो तोच खरा मित्र

पंजाबात हिंदुशिखांकडून महिनाभर चालविलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत मुसलमान पूर्णपणे अलिप्त राहिले. मुसलमानांनी आपले सर्व बळ त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या सर खिजर हयातखान व त्यांची युनिअनिस्ट पार्टी यांच्या विरुद्ध एकवटले होते. ही चळवळ दडपून टाकण्यास त्यावेळचे पजाब सरकार समर्थ होते. पण तसे केले असते तर ते शांतता व सुव्यवस्थेसाठी नसून केवळ एक मुसलमान आपल्या व्यक्तिस्वार्थासाठी दडपशाही करीत आहे असे त्याला स्वाभाविकपणेच स्वरूप दिले गेले असते. मिरवणूकी काढणे, सभा घेणे, प्रक्षोभक घोषणा करणे या बाबतीत तरी लीगने कायदा व सुव्यवस्था यांचा भंग केला होता. असे असले तरी अद्याप पावेतो कोणास काही दुखापत अथवा प्राणघात करण्यात आला नव्हता. असे असल्यामुळे कायद्याच्या व्यापक अर्थाखाली लीगची ही वास्तविक कायदेभंगाची असलेली चळवळ दडपली गेली नाही. या एका महिन्याच्या काळात मागे महात्मा गांधी व इतर काँग्रेस नेते यांनी ज्याप्रमाणे खिलाफत चळवळीच्यावेळी मौलवी व मौलाना या मंडळीचे भरपूर साहाय्य घेतले होते, त्याप्रमाणे लीगने यावेळी या मुल्ला मौलवीच्या साहाय्याने अल्प सख्याकांविरुद्ध चढाईचे धोरण आखून ते पूर्णत्वास नेले होते. यावेळी जर हिंदुशिखांना लीगचा चाललेला हा खेळ दुसरे तिसरे काही नसून आपलेविरुद्ध निर्णायक लढाई देण्याची रंगीत तालीम आहे असे कळले असते तर त्यानी निराळ्या पद्धतीने आपल्या योजना आखल्या असत्या. सर खिजर हयातखान यानी त्यागपत्र दिल्याबरोबर युनिअनिस्ट मत्रीमडळ कोसळले. सर खिजर याच्याविरुद्ध असलेला कडवा विरोध एका रात्रीत पालटून त्याने बेसुमार प्रशंसेचे रूप घेतले. मला आठवते त्यादिवशी नवानकोट येथून एक मिरवणूक जात होती. तीत आता घोषणा होत होत्या 'ताजा खबर आई हैं, खिजर साधा भाई हैं.' मोझाग येथील मुसलमान आनंदाने बेहोष झाले होते. याचे प्रत्युत्तर म्हणून त्या भागात 'यापुढे रुपयास शेरभर तूप मिळेल' 'खिजर आपल्या वडिलाप्रमाणे आहेत.' अशा घोषणा होत होत्या. या घोषणा हवेत विरतात न विरतात तोच रावळपिंडी विभागातून त्याचा प्रतिध्वनी निराळ्या प्रकारे ऐकू येऊ लागला. त्या भागातील मुसलमानानी लष्करी पद्धतीची शिस्तशीर अद्यावत प्राणघातक सशस्त्र संघटना करून हिंदुशिखांच्या सामुदाईक कत्तली करावयास प्रारंभ केला होता. नंतर असे आढळून आले, की काही जिल्ह्यांत या मुस्लिम गुंडाच्या संघटनांचे नेतृत्व आय. एन. ए.च्या मुस्लिम सदस्याकडे होते. या सदस्यांना एकवेळ हिंदुशिखांनी काँग्रेसच्या प्रेरणेने पाण्यासारखा पैसा दिला होता.

या नरमेधात पहिला बळी शिखाचा पडला. रावळपिंडी जिल्ह्यातील बहुतेक शीख वस्ती तीन चार पिढ्यांपूर्वी शीख धर्म स्वीकारलेल्या ब्राह्मण, क्षत्रिय, अरोरबान इत्यादिकांचीच होती. हे लोक काही अपवाद सोडून उद्योगधदे करीत व गेल्या दोन महायुद्धाचा लाभ घेऊन यानी बराच पैसा कमावला होता व ते शाततेने राहत होते. पजाबातील जाठशीख प्रामुख्याने लाहोर विभागात व मुलतान विभाग, मॉंटगोमरी, ल्यालपूर व इतर मध्यवर्ती जिल्ह्यात पसरले होते. मुस्लिम लीगला भीती वाटत होती, की 'माझा' येथील जाठशीख जर चवताळले तर त्या भागातील मुसलमानावर सूड उगवल्यावाचून राहणार नाहीत. एवढेच नव्हे तर गुजराथ, जेहेलम व रावळपिंडी जिल्ह्यातील आपल्या धर्मबाधवांच्या साहाय्यासाठीही धावून जातील. ही गोष्ट लक्षात घेऊन लीगने शेतकरी शीख व इतर शीख याच्यात फूट पाडण्याच्या उद्देशाने त्याचे गुप्तपणे कान फुकण्याची जोरदार मोहीम आरंभली. प्रत्युत्तराच्या अभावी मुस्लिम गुंडाना तेथून पळणाऱ्या हिंदुशिखाना चिडविण्याचे व डिवचण्याचे धैर्य आले. 'सत् श्री अकाल' या ऐवजी 'नाथ श्री अकाल' म्हणजे 'अकाल आता पळा' असे ते शिखाना ऐकवू लागले. त्यांनी हिंदुना शिखातून फोडण्याचाही प्रयत्न केला. ते म्हणत 'आमचे भाडण मास्टर तारासिंग व त्याचे शीख अनुयायी यांच्याशी आहे. हिंदूशी नाही.' बऱ्याच काँग्रेस छाप हिंदूनी या म्हणण्यावर विश्वास ठेवला. परंतु मारेकऱ्याच्या सुऱ्याने शिखासही सोडले नाही व हिंदुसही सोडले नाही. गुजराणवाला येथील प्रसिद्ध काँग्रेस पुढारी श्री. निरंजनदास बग्गा याचे हिंदुत्व अथवा काँग्रेसचे पुढारीपण त्याचा जीव वाचविण्यास उपयोगी पडले नाही आणि अशाच प्रकारे मुस्लिम गुडगिरीला पजाबातील नागरी व ग्रामीण भागातील अनेक हिंदूबाधव बळी पडले.

या प्रांतात लष्करी कायदा पुकारण्याची हिंदूशिखानी एकसारखी केलेली मागणी बुद्धिपुरःस्सर दुर्लक्षिण्यात आली. पोलिसदल व ज्याचा सबंध जनतेशी येतो असे विशेषतः पोलिसदलातील खालच्या श्रेणीचे लोक हे सर्व मुस्लिम लीग मनोवृत्तीचे होते. श्री. सुचेता कृपलानी, महात्मा गांधी व डॉ. राजेंद्र प्रसाद यानी 'तुम्ही जेथे असाल तेथेच ईश्वरावर विश्वास ठेऊन राहा, अत्याचार करू नका.' या प्रकारचा केलेला उपदेश आपल्या सुरक्षित जागी बसूनच करता येण्याजोगा आहे असे तेथे प्रत्यक्ष बळी पडणाऱ्या लोकांना वाटत होते. अशा बिकट प्रसगी तेथील लोकांना सोडविण्यास कोण येणार होते ? पण याप्रसगी तरुण व त्यागी हिंदूची एक सघटना, जी आर. एस. एस. अथवा 'राष्ट्रीय स्वयंसेवक सघ' या नावाने प्रसिद्ध आहे, पुढे सरसावली. या लोकांनी प्रत्येक गावातून, आळीआळीतून असुरक्षित ठिकाणी असलेली बायकामुले तेथून काढून सुरक्षित ठिकाणी नेऊन पोहचविण्याची व्यवस्था केली व त्याच्या खाण्यापिण्याची, कपडचालत्त्याची व औषध पाण्याचीही व्यवस्था केली. संस्थांच्या संरक्षणासाठी मडळे संघटित करण्यात आली होती. इतकेच नव्हे तर काही शहरातून आगी विझविणाऱ्या बबांचीही व्यवस्था करण्यात आली होती. लॉऱ्या व बसेसच्या साहाय्याने प्रवासाचीही सोय करण्यात आली होती. तसेच आगगाडयानी पळणाऱ्या हिंदूशिखाना संरक्षण देण्यासाठी हे लोक आगगाडयातून फिरत होते. यानी हिंदुशीख वस्तीवर रात्रदिवस कडक पहारे ठेवले व हल्ला झालाच तर तेथील लोकांनी आत्मसरक्षण कसे करावे हेही त्यांच्याकडून शिकविण्यात येत होते. फाळणीच्या दिवशी सध्याकाळी परिस्थिती अत्यंत बिकट झाली. शातता व व्यवस्था कोलमडून पडली होती असे म्हणण्यापेक्षा हिंदुशिखांना दडपून टाकण्यातच शातता व सुव्यवस्था आहे असेच त्यावेळी मानले जात होते हे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. अशा भयकर प्रसंगी रा. स्व. सघाच्या सदस्यांनी बदुकीसारखी शस्त्रास्त्रे वापरण्याचे कौशल्य दाखविले. त्यांनी जशास तसा ठोसा

दिला. हे तरुण लोक प्रथम हिंदुशिखाच्या साहाय्यासाठी सरसावत व सर्वांचे शेवटी स्वत:च्या संरक्षणासाठी पूर्व पंजाबात निघून येत. मी अनेक कॉंग्रेस पुढाऱ्यांची नावे दाखवू शकेन, की ज्यानी निरनिराळ्या जिल्ह्यातील आपल्या स्वत:च्या व आपल्या नातेवाईकांच्या संरक्षणासाठी या लोकाच्या साहाय्याची विनवणी केली होती. या तरुण लोकानी कोणाहीकडून आलेली साहाय्याची आर्त आरोळी दुर्लक्षिली नाही. आमच्या नजरेस असेही काही प्रसंग आले आहेत की, या लोकानी हिंदुशीख वस्तीतून मुसलमान बायका मुलानाही सुरक्षितपणे काढून लाहोरच्या लीग छावणीत नेऊन पोहोचविले.

मी लाहोरला होतो तोवर फाळणीनंतर पूर्व पंजाबात काय चालले होते हे कळण्यास मला काही मार्ग नव्हता. मला एवढे आठवते की मी अमृतसरहून मोटारने दिल्लीला येत असताना वाटेत 'वाघा'च्या सरहद्दीकडे शांतपणे चाललेले मैलोगणती निर्वासितांचे तांडे मी पाहिले. त्यांचेजवळ असलेल्या तलवारीसंबंधी पोलिसानी काहीही आक्षेप घेतले नाहीत. कर्नाल येथील मुसलमान आपल्या वस्तीत राहत असून आपला दैनंदिन कारभार नीट करीत आहेत असे मला आढळले. पूर्व पजाबातील मुस्लिम लोकसंख्या हाकलून लावण्यात रा. स्व. सघास जबाबदार धरणे निश्चितपणे बरोबर नाही. पण हे मात्र निश्चितपणे म्हणता येईल, की ज्या निर्वासितांच्या बायका मुलाची व मालमत्तेची त्यांच्या डोळ्यादेखत राखरांगोळी झाली त्या निर्वासितानी कायदा हातात घेऊन परतफेडीचा प्रयत्न केला. मला पूर्व पजाबच्या दौऱ्यात असे आढळून आले, की बहुजन समाजास शिखाबद्दल व सघीयाबद्दल कृतज्ञता व आदर वाटत होता. त्याना लोकांचे रक्षणकर्ते समजण्यात येत होते. याच लोकांनी येणाऱ्या हिंदुशीख निर्वासिताच्या शक्य त्या मोठ्या संख्येचे पूर्व पंजाबात पुर्नवसतीकरण केले असा सर्वांचा विश्वास होता. त्यांच्या प्रयत्नामुळे कित्येक लाख लोकांना रिकाम्या पडलेल्या घरातून व इतर जागेतून तात्पुरता का होईना आश्रय मिळाला. निर्वासिताच्या पुर्नवस्तीकरणाचा नतरचा इतिहास पाहिला तर या निर्वासिताना सघाचे साहाय्य मिळाले नसते तर इतर दुर्दैवी निर्वासिताप्रमाणे त्यानाही निर्सासित छावण्यात अथवा सडकेच्या कडेवर आजूबाजूला आश्रय घ्यावा लागला असता. नेहरूचे सरकार काही लाख निर्वासिताच्या पुनर्वसनाचे बाबतीतच पूर्णपर्ण अयशस्वी झाले. मग त्याच्यावर आणखी काही लाख लोकाचे ओझे पडले असते तर काय झाले असते हे कल्पनेनेच ओळखणे बरे. पं. नेहरूनी कानपूर येथील एका भाषणात संघियांवर असा आरोप केला आहे की, पजाबात संघियांनीच अशांतता माजविली. पण यास पुरावा मात्र दिला नाही. त्यांच्या मते कुत्रा म्हटल्यावर त्यास मारण्यास कोणतीही काठी पुरेशी आहे. पण त्यांच्यासारख्या जबाबदार माणसाने कोणतेही शब्द काळजीपूर्वक व तोलून मोजून उच्चारावयास हवे होते. याचे हेच शब्द जाफरुल्ला खानांनी जर आतराष्ट्रीय परिषदेत उधृत केले तर याना कोणत्या शब्दांनी आपला बचाव करता येईल ? हिंदुस्थानने पाकिस्तानवर केलेल्या आरोपातून मुक्त होण्यासाठी पाकिस्तानने महात्माजीच्या वक्तव्याचा आधार घेतला नाही काय ?

पजाबमध्ये सर्व लोक संघाकडे आदराने पाहत होते. कारण ही संस्था हिंदु तरुणात निरनिराळ्या शहरी क्षात्र तेजाची जोपासना करीत होती. हिंदू लोकांची शारिरीक दुर्बलता हा एकच विषय सिंध सभा, सनातन धर्म सभा व आर्य समाज यांच्यात चर्चिला जात असे. या सर्व सभानी शारिरीक दुर्बलतेविरुद्ध प्रचार करून ती दूर करण्याचा प्रयत्न केला. आणि लोकात व्यायामाचे ध्येय निर्माण केले. या सर्व गोष्टी ते शाळा-कॉलेजातून खेळ इत्यादी मार्गांनी करीत. पण यात फार थोडे तरुण लोक सहभागी होऊ शकत. या उलट रा. स्व. सघाने आठवड्यातल्या प्रत्येक दिवशी, महिन्यातल्या प्रत्येक आठवड्यात व वर्षातल्या प्रत्येक महिन्यात हा शारिरीक शिक्षणाचा कार्यक्रम काही खेळ व गाण्यासह अव्याहत चालू ठेवला होता. सामान्यपणे प्रत्येक पजाब्याला शारिरीक शिक्षणाची मुळातच गोडी असल्यामुळे संघाच्या कार्यक्रमाकडे ते साहजिकपणेच आकर्षिले गेले. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा सघाबद्दल त्याना आदर व प्रेम वाटू लागले. जेव्हा कॉंग्रेस श्रेष्ठी नवी दिल्ली येथे असहाय्यपणे फिडल वाजवीत बसले होते व सर्व पजाबभर वणवा पेटला होता, तेव्हा हे त्यागी, शिस्तबद्ध सुदृढ लोक सकटाना तोंड देऊन आपल्या देशबाधवांना त्यातून सोडविण्यासाठी पुढे झाले. कॉंग्रेसश्रेष्ठी पजाबात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी कडक उपाय योजावे म्हणून, लीगचा विरोध हाणून पाडून हेकेखोर असलेल्या गव्हर्नर जनरलचे मन वळवू शकले नाहीत आता पजाबबाहेरून आलेला एखादा माणूस, ज्या संघ आणि शीख वीरांनी पंजाबच्या हिंदूशिखाचे मोठ्या शौर्याने रक्षण केले त्याच्याबद्दल 'त्यानी तुमच्यासाठी काही केले नाही' असे सागू लागला तर पजाबचे हिंदु-शीख ते मुळीच ऐकून घेणार नाहीत.

सघात जातिभेदास स्थान नाही. शिखांसही मज्जाव नाही. शीख धर्माविषयी व त्याच्या गुरुविषयी, त्यांनी परकीय राजसत्तेविरुद्ध लढे दिले म्हणून सघाला फार आदर आहे. शीख व हिंदुतील जाती उपजाती एकाच हिंदु समाजाच्या अविभाज्य घटक आहेत असा त्यांचा दृढ विश्वास आहे. त्याचप्रमाणे या संघटनेत प्रातियतेलाही थारा नाही. सघाचा मुख्य उद्देश हिंदु सस्कृतीच्या सर्व घटकांना


पुरंदरच्या
बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

कोणतेही प्रातिक अनवा जातीय वैशिष्टय आड येऊ न देता एकत्र आणणे हा आहे. मद्रासचा स्वयसेवक ज्या भावनेने उत्फुर्त होतो त्याच भावनेने पेशावरचा स्वयसेवक उत्फूर्त होतो. या सघियावर पूर्व व पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांच्या पुर्नवस्तीकरणाचे काम सोपविले असते तर हे काम फार पूर्वीच पूर्ण झाले असते. सघाचा उद्देश फाळणीनतही देशात दुफळी निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीना नष्ट करण्याचाच आहे. सघाची घटना प्रसिद्ध झालेली नसली तरी सघ ही एक गुप्तपणे काम करणारी सस्था आहे असा आरोप करता यावयाचा नाही. सघाचे उद्देश, त्याचे हेतू, त्याची काम करण्याची पद्धती, सर्व विश्रुत आहे. हिंदु व शिखातील सर्व पंथाना सघाबद्दल अबोल सहानूभुती होती. या चळवळीविरुद्ध कांग्रेसतर्फे केला गेलेला सर्वव्यापी प्रचाराचा काहीही उपयोग झाला नाही. ही गोष्ट सरसघचालकाचा ते बदीवासातून सुटल्यावर उत्तर हिंदुस्थानात जो दौरा झाला त्यावेळी ठिकठिकाणी प्रचड सख्येने लोक उपस्थित होते यावरून सिद्ध झाली. महात्मा गाधी व प. नेहरू यानाही त्यानी ब्रिटिश सरकारविरुद्ध केलेल्या उठावणीच्या आपल्या चालत्या काळातही एवढा श्रोतृवर्ग लाभला नव्हता. सघाने आपल्या स्वयंसेवकास व सबधी लोकास शिस्तीचे बाळकडू कसे पाजले आहे याचे प्रत्यतर ठिकठिकाणी शिस्तीत झालेल्या लाखोच्या सभा निर्वेधपणे पार पडल्या यावरून दिसून येते.

हिंदु सस्कृती व कम्युनिझम यांच्यातील लढा अटळ आहे हे सर्वांनाच विदित आहे. परतु हिंदुस्थान सरकारच्या काही सदस्यानी कम्युनिझमची प्रशसा करून हिंदुसस्कृतीवर ताशेरे झाडल्याचे पाहून देशभर आश्चर्य व्यक्त झाले. कम्युनिस्ट व सोशॅलिस्टासह इतर डावे गट यानी पहिल्या पहिल्याने सोशालिस्ट नेहरू आणि त्याचे उपपतप्रधान सरदार पटेल याच्यात विरोध असल्याच्या कडचा पिकवून स्वत चे पक्षहित साधण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते सरदार पटेल हे प्रतिगामी वृत्तीचे असून त्याचा कल शिखाकडे व संघाकडे होता. कम्युनिस्ट मासिकातूनच पहिल्याने पतियाळा नरेशाच्या नेतृत्वाखालील सर्व शीख राजेरजवाड्यावर, तसेच सघाने उत्तरेत दगली माजवल्या असा आरोप करून सघावर टीकेची झोड उठली. त्यानतर प. नेहरूनी कानपूर येथे केलेल्या भाषणात सघावर कम्युनिस्टांच्या वरील आरोपाचाच पुनरुच्चार केला. उलट सरदार पटेलानी प्रारंभी प्रारभीच्या भाषणात सघाची स्तुती करून त्याच्या कार्याचा गौरव केला होता. पण प्रारभी अल्प अनुयायीत्व असलेल्या प नेहरूना महात्मा गाधीच्या मृत्युनतर राष्ट्रीय विभूतीमत्व प्राप्त होऊन सरदार पटेलाच्या व्यक्तिमत्वास ग्रहण लागले. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानतर पहिल्या पहिल्याने मत्रीमंडळाच्या ज्या बैठकी होत त्यात सहसा एकमत होत नसे. तेथे दोन पक्ष पडले होते. व प नेहरूना नेहमीच बहुमत मिळत असे असे नाही. त्यामुळे पं. नेहरूना त्यांना पाठिंबा देणाऱ्या डाव्या गटाच्या मागणीप्रमाणे संघावर बडगा उगारता आला नाही. त्यांनी तशी एखादी सूचना केली असती तर तेथे आलेल्या दोन पक्षात उघड तडा पडला असता. वस्तुत: या दोन पक्षात पजाब व काश्मिरच्या प्रश्नावर पहिल्यापासूनच मतभेद होता. आणि दिल्लीत अशी वदंता होती, की या दोन पक्षातील वैमनस्य नाहीसे करण्यास महात्मा गांधी असमर्थ ठरले होते. महात्मा गांधीच्या खुनापूर्वी त्यांची व सरदार पटेल यांची भेट झाली होती ती काही मोठीशी खेळीमेळीची व सुखावह नव्हती.

## पंडित नेहरू हे चंद्र असून....

या परिस्थितीचा लाभ घेण्याचे सोशालिस्टांनी ठरविले. आणि त्यानी आपल्या प्रचाराच्या तोफा सरदार पटेल व शामाप्रसाद मुखर्जी याचेवर डागण्यास सुरुवात केली. त्याचा हेतु सरदार पटेलाना त्याच्या जागेवरून पदच्युत करण्याचा होता. कांग्रेसने गेली कित्येक वर्षे जो लढा दिला त्यावेळी पक्ष संघटनेची सर्व सूत्रे सरदार पटेलाच्या हाती होती. व अजूनही कांग्रेस यंत्रणा व प्रातिक सरकारे याचेवर त्यांचेच नियंत्रण होते. असे असताही आता सरदारांनी पं. नेहरूंच्यापुढे मान तुकविली ही गोष्ट घडलेल्या घटनावरून दिसून आली. त्याच्या एका प्रसिद्ध भाषणात त्यानी अत्यानंदाने असे उद्गार काढले आहेत की, हिंदुस्थानच्या आकाशात पं. नेहरू हे चद्र असून बाकीचे सर्व तारे आहेत.

हिंदुस्थान सरकारने महात्मा गांधीच्या हत्येनतर सघ व हिंदुमहासभेवर कठोरपणे हत्यार धरले. नवी दिल्ली येथे 'हिंदुस्थान टाईम्स' मध्ये जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्यावरून महात्माजीच्या हत्येनतर देशात दहा हजार लोक पकडले गेले. अशा प्रकारच्या राजकीय खुनाबाबत आजवर अन्यत्र झालेल्या धरपकडीत हा उच्चाक होता. अनत्याचारी कांग्रेस कार्यकर्त्यांना व सहाय्यकांना यावेळी वेडाचा सामुदायिक झटका आला होता, व त्या प्रलयात सरकारने लोकसभेत कबूल केल्याप्रमाणे एक हजार घरे जळून भस्मसात झाली, शेकडो लोकावर हल्ले झाले व कित्येक लोक घायाळ झाले व कित्येक मेले. हा प्रकार सर्व देशभर व विशेषत: महाराष्ट्रात घडून आला.

सघावर बदी घालण्यात आली व त्याचे पुढारी तुरुंगात डावण्यात आले. सघ सस्थापकाची नागपूर येथील समाधी देखील कांग्रेसी जमावाने शिल्लक ठेवली नाही. सरसघचालकावरील निर्वंध आक्टोबर १९४८ साली काढण्यात आले. पण सघावरील बंदी मात्र चालूच राहिली. श्री. गोळवलकर याना भेटण्यास पं. नेहरूनी नकार दिला. आपल्याला आता कोठेही न्याय मिळण्याची आशा नाही हे जेव्हा सघाच्या प्रत्ययास आले, तेव्हा कांग्रेसने आजवर आपल्या प्रतिपक्षाविरुद्ध ज्या मार्गाचा अवलब केला होता त्याच मार्गाचा अवलब करण्याचे त्याने ठरविले. मिरवणूकी काढणे, सभा घेणे, वगैरेसारख्या सौम्य मार्गाने सघाने सत्याग्रह केला. हा सत्याग्रह कांग्रेसच्या सत्याग्रहासारखा अतिरेकी व अचाटपणाचा नव्हता. तो अत्यत शिस्तीने, सभ्यपणे व सपूर्ण अहिंसक रीतीने करण्यात येत होता. तात्रिकदृष्टचा त्यानी कायदेभग केला व ते जेलमध्ये गेले. कांग्रेस, सोशालिस्ट व कम्युनिस्ट यांचा वरचष्मा असलेली देशातील वृत्तपत्रे सघाशी शत्रुत्वाने वागत होती. उदार धोरण असलेले स्वतत्र पुढारी देखील संघियावर होत असलेला हा अन्याय थाववा असे म्हणण्यास असमर्थ होते. हिंदुस्थान सरकारने तर काय, सघ स्वयसेवकच नव्हे तर त्यांना सहानुभूती दाखविणाऱ्यांनाही तुरुंग दाखविण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष कायदेभग न करताही काही संघ स्वयसेवकास अगाऊ सावधगिरी म्हणून डांबण्यात आले. सघ सत्याग्रहाबद्दल आपुलकी आहे असा सरकारला ज्याचा संशय आला त्या सरकारी नोकराच्या याद्या

तयार करण्यात आल्या व ते सर्व लोक कामावरून दूर करण्यात आले. या दिवसात 'खऱ्या' काँग्रेसजनांनी सरकारला बातम्या पुरविण्याचे काम केले. सर्व नैतिक कल्पनांना व शेजारधर्माला रामराम ठोकून या काँग्रेसजनांनी आपापल्या आळीतील, सघ सत्याग्रहाबद्दल सहानुभूती असणाऱ्या लोकांबद्दल, पोलिस अधिकाऱ्याना गुप्तपणे बातम्या पुरविल्या. अश्रुधूर व लाठ्यांचा उपयोग जागोजाग होऊ लागला. अनेक शहरात व तुरुगात लाठीहल्ले झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या. ब्रिटिश सरकारकडून काँग्रेसविरुद्ध ज्या मार्गाचा अवलब केला जात असे, त्याच मार्गाचा अवलंब काँग्रेस सरकारने यावेळी संघाविरुद्ध केला. पकडून नेऊन तुरुगात डांबलेल्या संघियाची सख्या कधीच प्रसिद्ध झाली नाही. परंतु स्वयस्फूर्तीने तुरुंगात गेलेल्या सघस्वयसेवकाची सख्या सर्व प्राताची मिळून साठ हजारांच्या वर होती. यद्यपी प्रचाराच्या साधनाचा त्यांनी उपयोग केला नाही, वृत्तपत्रेही त्यांची नव्हती. शिवाय परकी सरकारविरुद्ध आपला लढा आहे ही भावनाही त्याचेजवळ नव्हती. असे असताही या पहिल्याच प्रसगी, काँग्रेसने आपल्या सर्व इतिहासात ब्रिटिशाविरुद्ध केलेल्या सत्याग्रहात तिला घालता आले नाहीत एवढे स्वयसेवक सघाला तुरुगात पाठविता आले. कट्टर काँग्रेसी वगळले तर या घटनेने सर्वांचे डोळे उघडावयास हवे होते. पण सरकारने या घटनेचा अन्वयार्थ निराळा लावला.

प. नेहरूनी अत्यत तुच्छतापूर्वक हा पोरासोराचा सत्याग्रह आहे असे म्हणून या प्रश्नाचा निकाल लावला.

दि. ७ डिसेंबर १९४८ रोजी श्री. गोविंद सहाय यांनी एक वक्तव्य प्रसिद्ध केले. ते म्हणतात 'सघाच्या बारिक सारिक कार्यक्रमाविषयी जी माहिती माझ्या हाती आली आहे ती उजेडात आली तर लोकांना आश्चर्याचा धक्का बसेल. सघ स्वयंसेवकांना रोजच्या रोज रावण राज्याविरुद्ध रामराज्य स्थापनेसाठी युद्ध करण्यास सिद्ध रहाण्याची चेतावणी देण्यात येत असते. पण सरकार या गोष्टीचा कडकपणे समाचार घेण्यास सिद्ध आहे. त्यानतर दोनच दिवसानी सघ सत्याग्रह सुरू झाला. हिंदुस्थानातील एकमेव इग्लिशपत्र, ज्याचा धनी व सपादक इग्रज आहे त्या 'स्टेटस्मन' पत्राने १० डिसेंबर १९४८ च्या अग्रलेखात सघावर बदी घातल्याबद्दल काँग्रेस सरकारचे अभिनदन केले आहे. त्याने या अग्रलेखात नेहरू सरकारला त्याच्या नि:पक्षपाती व कुशल धोरणाबद्दल प्रमाणपत्र बहाल करून या वर्तणुकीने त्यानी आपला उदार व उत्कृष्ट राज्य कर्तृत्वाचा लौकिक कायम ठेवला आहे असा निर्वाळा दिला आहे. पाकिस्तान व हिंदुस्थान यांच्यात महत्त्वाच्या वाटाघाटी चालू असतेवेळी दूरदर्शिपणे नेमकी त्याचवेळी त्यानी सघावर बदी घालून अप्रत्यक्षरित्या वाटाघाटी सफल होण्यास हातभार लागला आहे, असे म्हणून त्याने पुन्हा एकवार नेहरू सरकारला धन्यवाद दिले आहेत. इतर वेळी काँग्रेस सरकार या प्रमाणपत्राबद्दल साशक झाले असते. पण यावेळी आपल्या कृतीने पाकिस्तान व इग्रज दोघेही सतुष्ट झालेले पाहून त्या सरकारला फार आनद झाला. आता काँग्रेसचे रूपांतर जेलच्या कोठडीतून जेलर होण्यात पूर्ण झाले होते.

जे दिल्ली राज्य सरकार निर्वासितांच्या पुर्नवस्तीकरणाचा प्रश्न विधायक रितीने सोडविण्यास अपेशी ठरले होते, त्याच सरकारने सघ सत्याग्रह दडपून टाकण्यात अतिशय उत्साह दाखविला. प्रशासकानी व्याख्यात्यांची भूमिका घेतली. पं. रामेश्वर दयाल आता सभा घेऊ लागले. ते सघाविरुद्ध बातमी देणारास मोठमोठी आश्वासने देत व अगामी सत्याग्रहीना धमक्या देत. महासभा व संघाविरुद्ध त्यांनी ही आघाडी उघडली होती. मागून असे निदर्शनास आले की अशी आघाडी उघडण्यास त्याना हिंदुस्थान सरकारकडून मुद्दाम सूचना देण्यात आली होती.

हिंदुमहासभेचे अध्यक्ष श्री. एल. बी. भोपटकर, डॉ. गोकूळचद नारंग, कॅ. केशवचद्रसेन आणि श्री. इंद्रप्रकाश यांनी 'सरकारने खोट्या अभिमानास बळी न पडता सघावरील बदी ताबडतोब उठवावी व त्या संस्थेस आपले सामाजिक व सांस्कृतिक काम करण्यास मोकळीक द्यावी' अशा दिलेल्या सूचनेकडे कोणी लक्ष दिले नाही.

ज्या स्टेट्समन पत्राला संघबदी घातल्याबद्दल फार आनद झाला होता त्याच स्टेट्समन पत्राला अनिच्छेने का होईना हे मान्य करावे लागले, की संघ स्वयसेवकात सद्गुणांची वाण नाही. सघातर्फे हिंदु समाजाला शिस्त व त्यागाचे शिक्षण दिले जाते व शारिरीक उन्नतीकडेही लक्ष दिले जाते व त्याचे शौर्यही वाखाणण्यासारखे आहे.

मास्टर तारासिंग या एकमेव पुढाऱ्याने मोठ्या धैर्याने सघाला धन्यवाद दिले व हिंदूची व हिंदु शिखाची एकी मरण्यास संघ जो हातभार लावीत आहे त्याची आज फार आवश्यकता आहे, म्हणून सरकारने सघावरील बदी उठवून या गोष्टीस प्रोत्साहन द्यावे असा हिंदुस्थान सरकारला त्यानी हितोपदेश केला. अमृतसर येथे १३-१२-४८ रोजी भाषण करताना ते म्हणाले 'स्वातत्र्य मिळविण्याची पायरी आपण आता चढलो आहोत. खरेखुरे स्वातत्र्य मिळविण्यासाठी आपल्याला आणखी दोन पायऱ्या चढावयाच्या आहेत. पहिली पायरी पाकिस्तान जिंकणे व दुसरी पायरी देशात शातता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे. त्यासाठी सघ पुरस्कृत हिंदूची आपसातील व हिंदु शिखाची एकी वाढीस लावणे अत्यत आवश्यक आहे.' त्यानी हेही दर्शित केले की सघ व अकालीदल हे खाजगी लष्करच आहे व ते सरकारला सहाय्यभूतच होणार आहे. त्याबद्दल सरकारने घाबरण्याचे कारण नाही. त्यानी सघ व सरकार यांच्यात तडजोड घडवून आणण्याची कामगिरी आपण होऊन आपले शिरावर घेतली व हे करताना सरकारच्या प्रतिष्ठेला यत्किंचित धक्का लागू लागू नये, तसेच घरातील या क्षुल्लक भाडणात सरकारची शक्ती खर्च होऊ नये असे त्याना ठामपणे वाटत होते.

सघ सत्याग्रहात भाग घेतल्याबद्दल अथवा या सत्याग्रहास सहानुभूती दाखविल्याबद्दल उत्तर प्रदेश सरकारने सरकारी नोकराविरुद्ध शिस्तीचा बडगा उचलला. एवढेच नव्हे तर प्रेक्षक या नात्याने असा सत्याग्रह पहाणे हेही त्यांनी आक्षेपार्ह ठरवून अशा लोकाविरुद्ध उपाय योजले जातील असे प्रगट केले. (लखनौ १६ डिसेंबर १९४८). या कृतीने इग्रजी शब्दकोशातील WATCHING या शब्दाचा अर्थ या सरकारने बदलून टाकला. सघावरील बदी उठण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत श्री. गोविंद सहाय व त्याच्यासारखे इतर सघावर

निरर्गळ व बेजबाबदार आरोप करीत होते. त्यापैकी एकही आरोप त्यांना अथवा हिंदुस्थान सरकारला कधीच सिद्ध करता आला नाही हे ध्यानात ठेवण्यासारखे आहे. दिल्लीचे डे. कमिशनर पं रामेश्वर दयाल यानी जुन्या दिल्लीच्या टाऊन हॉलमध्ये व्यापारी प्रतिनिधी व म्युनिसिपल कमिशनर्स यांच्यापुढे एक वक्तव्य केले. त्याचा सारांश २२-१२-४८ च्या वृत्तपत्रात आला होता. संघाबद्दल कॉंग्रेस मंत्र्याचा काय दृष्टिकोन होता हे समजून घेण्यास मी हे वक्तव्य फार महत्त्वाचे मानतो. कारण प. रामेश्वर दयाल हिंदुस्थान सरकारच्या आदेशानुसार बोलत होते ते आपल्या भाषणात म्हणाले ' महात्मा गांधीची हत्या अथवा देशातील यावेळची आणिबाणीची परिस्थिती यामुळे सघावर बंदी घातलेली नसून आमच्या व सघाच्या तत्त्व प्रणालीत विरोध असल्यामुळे त्याच्यावर बदी घालण्यात आली आहे. ते पुढे म्हणाले 'सरकार हुकुमशाही मनोवृत्तीस नेहमीच विरोध करीत राहील. कारण लोकशाही व हुकुमशाही या कधीच जवळ जवळ नादू शकणार नाहीत.'

हिंदुस्थान सरकारास महात्मा गांधीच्या हत्त्येमुळे सघावर आपला पोलादी हात टाकण्यास सधी उपलब्ध झाली. या हत्त्येशी सघाचाही सबंध आहे अशी सोशालिस्ट व कॉंग्रेसवाले यांच्याकडून कानगोष्टी व कुजबुजीच्या रूपाने जोरात मोहीम चालू होती. संघाचा गांधी हत्त्येशी सबध लावण्याची ही मोहीम कशी चालली होती याचे प्रत्यंतर सरदार पटेल यांनी श्री. गोळवलकर गुरुजीस पकडण्याची आज्ञा दिल्यावर जे वक्तव्य केले त्यावरून येण्यासारखे आहे. हे वक्तव्य १७-१२-४८ च्या ' इंडियन न्यूज क्रॉनिकल 'मध्ये प्रगट झाले आहे. ते म्हणतात 'श्री. गोळवलकरांना पं. नेहरुनी मुलाखत देण्याचे नाकारले व शांतता व सुव्यवस्था खाते मजकडे असल्यामुळे त्यानी मला भेटावे अशी त्यांना सूचना केली. मध्यतरीच्या काळात निश्चितपणे मला असे कळले की, सरसघचालकांच्या आदेशावरून ग्वाल्हेरहून पाचशे सघ स्वयसेवक मला भेटण्यासाठी येत आहेत. ज्या ग्वाल्हेरच्या पिस्तुलाने महात्माजीची हत्त्या केली त्याच ग्वाल्हेरहून स्वयसेवक येत असल्याची बातमी ऐकून मी श्री. गोळवलकरांना नागपूरला परत जाण्यास सांगितले. पण त्यानी परत जाण्याचे नाकारले. त्यामुळे निरुपायाने पोलिसाकडून त्यांना नागपूरला पोहोचविण्याची मी आज्ञा केली.' ग्वाल्हेरहून येणारे पिस्तूल व त्याच ठिकाणाहून येणारे स्वयंसेवक यांचा अन्वयार्थ कसा काय लागतो हे कळणे कठीण आहे. पण त्यामुळे गोळवलकरांना नागपूरला परत जाण्याची आज्ञा मिळाली व ती त्यानी ऐकण्याचे नाकारले म्हणून त्यांना तसे करण्यास पोलिसाकरवी भाग पाडण्यात आले. या घटनेचा ठसा सर्वसामान्य जनतेच्या मनावर हाच उमटण्यासारखा होता, की गांधीहत्त्येशी संघाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष काहीतरी संबध असला पाहिजे.

सघ स्वयसेवकांस तुरुंगात मिळणाऱ्या वागणुकीच्या बातम्या दडपून टाकण्यात येत होत्या. असे असले तरी काही इग्रजी वृत्तपत्राचे धाडसी बातमीदार अधून मधून बातम्या देतच होते. २२-१२-४८ च्या स्टेट्समनमध्ये असे प्रसिद्ध झाले की, ' दिल्लीच्या तुरुंगात एक हजार आठशे सात कैदी ठेवण्यात आले होते. वस्तुतः या तुरुंगात फक्त ६७७ कैदीच ठेवण्याची जागा होती. राजकीय कैदी व सघ सत्याग्रहीना मिळणाऱ्या वागणुकीसंबंधाने स्टेट्समनच्या बातमीदाराने असे म्हटले होते की, या कैद्यास वाईट अन्न देण्यात येते. निजण्याची जागा संकुचित आहे व त्याच्याकडून दहा ते बारा तास काम घेण्यात येते. त्यांना शारिरीक शिक्षाही सर्वत्र देण्यात येतात. कित्येक कोवळ्या मुलांना छड्यानी चोपण्यात येई ' त्यांना वैद्यकीय साहाय्यही पुरेसे नव्हते असेही आरोप करण्यात येत होते. तसेच बरेच वेडे कैदीही याच तुरुगात ठेवण्यात आले होते. थडीचा भर असूनही पुरेसे अथरुण पाघरुण देण्यात आले नव्हते व घरून आणावयासही परवानगी नव्हती. त्यामुळे एका ब्लँकेटात दोघाना आपला समावेश करून घ्यावा लागत असे.

## वैद्य महाराज !

सरकारी अदमासाप्रमाणे सत्याग्रह सुरू झाल्यावर सघाने आपले सारे बळ पंधरा दिवसात खर्ची घातले. मध्य सरकारने आपले अधिकारी व प्रांतिक सरकारे यांनी आपण घालून दिलेले धोरण प्रामाणिकपणे पाळले म्हणून त्यांना धन्यवाद दिले. असे असले तरी मध्य सरकारातील व प्रातिक सरकारातील कित्येक लोक सघ सत्याग्रहाकडे सहानुभूतीने पाहात होते. कॉंग्रेस चळवळीच्या वेळी इग्रज म्हणत त्याप्रमाणे कॉंग्रेस सरकारही सघाची चळवळ फक्त शहरी लोकांची व त्यातही फक्त ब्राह्मणांचीच आहे असे म्हणू लागले. बाकी सर्व देश व हिंदु समाजातील इतर लोक या चळवळीपासून अलिप्त आहेत, त्यामुळे संघाला अत्यंत अल्प अनुयायित्व आहे असा त्यांचा निष्कर्ष होता. उलट संघ बंदी उठल्यावर संघ कार्यकर्त्यांचे शहरोशहरी व खेडोपाडी ज्या उत्साहाने स्वागत झाले त्यावरून हे सहज सिद्ध झाले की, संघाची मुळे खेड्यापर्यंत पोहोचली असून सघाच्या ध्येयाबद्दल सर्व हिंदु जातीला आदर आहे. कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी व विशेषतः सरदार पटेलासारख्यावर वरच्या दर्जाच्या कॉंग्रेस पुढाऱ्याने संघाचे सूत्र चालकत्व फक्त ब्राह्मणांच्या हाती आहे असे म्हणावे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. यावर सघाचा स्वयंसेवक उलट उत्तर सहज देऊ शकेल की, 'वैद्य महाराज पहिल्याने स्वतःची प्रकृती साभाळा ' हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानतर असे दिसून आले की, मध्यवर्ती व प्रांतिक सरकारातील सर्व अधिकाराच्या जागा ब्राह्मणांनी आपल्या ताब्यात घेतल्या होत्या. प्रांतिक सरकारच्या मुख्य प्रधानाच्या शेकडा नव्वद जागा ब्राह्मणांनी घेतल्या होत्या. पूर्व पजाब, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, मुंबई, आसाम व मद्रास या ठिकाणी मुख्य प्रधान ब्राह्मणच होते. आठ गव्हर्नरांपैकी सात गव्हर्नर्स ब्राह्मण होते. पूर्व पंजाब, उत्तर प्रदेश, प. बंगाल, बिहार, ओरिसा व मध्य प्रदेशचे गव्हर्नर ब्राह्मण असून मध्य सरकारचे पंतप्रधान व भारताचे गव्हर्नर जनरल हे देखील ब्राह्मणच होते. अशी वस्तुस्थिती असता सघास ब्राह्मणांकडूनच चालना मिळते हे म्हणणे म्हणजे एकाच चुलीवरच्या दोन भांड्यानी एक दुसऱ्यास काळे म्हणण्यासारखे आहे. ब्राह्मण हा प्राणी जर एवढा भयानक वाटत होता तर सरदार पटेलानी कॉंग्रेसमधून या प्राण्यास एक जात हुसकाऊन का दिले नाही ? त्यांनी जर असे केले असते तर हिंदुस्थानातील बहुजन समाजाचा त्याना पाठिबा मिळाला असता. आणि खरेच बोलावयाचे म्हणजे स्वातत्र्यानंतर आलेल्या या ब्राह्मणी

राज्यास येथील बहुजन समाज कंटाळला होता. क्षत्रिय, जाट, अथवा रजपूत यापैकी एखादी व्यक्ती या देशाचा पुढारी म्हणून पं. नेहरूंपेक्षा खचित अधिक शोभली असती. कारण इतिहासाच्या आरंभकालापासून याच वंशातील लोकांनी या देशावर राज्य केले होते. त्यामुळे अशा व्यक्तीची मनोवृत्ती खऱ्या राज्यकर्त्याला शोभेल अशी असणे जास्त सभवनीय होते. दि. १६-१२-४८ ला इंडियन न्यूज क्रॉनिकल मध्ये पं. नेहरूंचे एक भाषण प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यानी संघावर जोराचा हल्ला चढविला असून देशातील या अंतर्गत शत्रूला नाहीसे करण्याचा सर्व लोकांना त्यांनी सल्ला दिला होता. कांग्रेसच्या लोक प्रियतेसबंधी बोलताना पं. नेहरू गर्वाने म्हणाले 'कांग्रेस सदस्यांची सख्या पाच लाख असेल पण कांग्रेस जे काही करू शकली त्याचे कारण या देशातील चाळीस कोट लोकांचा तिच्यावर असलेला विश्वास हेच होय.' वस्तुत: कांग्रेसला चाळीस कोट लोकाचे पाठबळ कधीच नव्हते. त्यापैकी नऊ कोट मुसलमान पाकिस्तानसाठी भांडत होते. त्याच्या भाषणातील मुख्य हेतू हा होता की, पाच लाख सदस्य असलेली कांग्रेस सस्था आज पस्तीस कोट लोकांवर राज्य करीत आहे. पण ही गोष्ट काही मोठीशी गर्व करण्यासारखी नाही. एक अल्पसंख्य पण सुसंवद्ध पक्ष हुकूमशाही पद्धतीचा अवलंब करून नेहमीच बहुसंख्य जनतेवर राज्य करीत असतो. लष्करासह दीड लाख असलेल्या ब्रिटिशांनी लष्कराच्या बळावर सबंध हिंदुस्थानवर दीडशे वर्षे राज्य केलेच की नाही?

डिसेंबर १९४८ च्या एका भाषणात पं. नेहरूंनी संघाला एक सक्त इशारा दिला. ते म्हणाले 'मी संघास पुन्हा डोके वर करण्यास वाव देणार नाही.' पण बंदी उठल्यावर संघाने पुन्हा आपले डोके उंच करावयास प्रारंभ केला. ती गोष्ट पं. नेहरूंना सलत राहिली. १३ जुलै १९४९ रोजी श्री. गोळवलकर यांची सुटका झाल्यावर ते म्हणाले 'मी हिंदुस्थान सरकारला कोणतेही आश्वासन दिलेले नाही. १२ जुलै १९४९ च्या सरकारी पत्रकात संघावरील बंदी उठविल्याबद्दल जो मजकूर प्रसिद्ध झाला आहे तो सरकारीदृष्ट्या बरोबर असेल. परंतु मी आश्वासनपूर्वक सांगतो, की मी तोंडी अथवा लेखी अशी कोणतीही गोष्ट केली नाही, की ज्यामुळे संघ या सस्थेच्या इभ्रतीस बाधा येईल.' पश्चिम पाकिस्तानातील साऱ्या निर्वासितानी —देशात कोठेही असोत—संघबंदी उठल्याबद्दल समाधानाचा विश्वास टाकला. ज्यावेळी त्यांना कोणाचेही साहाय्य नव्हते, त्यावेळी त्या आणीबाणीच्या वेळी संघानेच त्याना आधार दिला. त्याबद्दल सारे निर्वासित संघाबद्दल सदैव कृतज्ञच राहतील. ❦

## १३ : हिंदुस्थानवर स्वारी

जम्मूचा इतिहास सुमारे पाच हजार वर्षांपासूनचा ज्ञात आहे. याचे प्राचीन नाव जम्मूलोचन. जम्मूच्या इतिहासात अनेक चढउतार झाले. अठराव्या शतकाच्या मध्यास येथील राजा रणजितदेव याने या राज्यास भरभराटीस आणून कीर्तीच्या शिखरावर नेऊन बसविले. रणजितदेवाचा धाकटा भाऊ सुरतसिंग याचे पणतू गुलाबसिंग, ध्यानसिंग आणि सुचेतसिंग हे तिघे बंधू होत. या तिघा भावांनी महाराजा रणजितसिंगाच्या दरबारी चागला लौकिक मिळविला होता. महाराजा रणजितसिंगाने गुलाबसिंग यास जम्मूचे राजपद दिले. ध्यानसिंगास पुछ विभागाचे प्रमुख केले आणि सुचेतसिंग यास रामनगर इलाख्याचे आधिपत्य दिले. राजा गुलाबसिंगाने लौकरच राज्यास बळकटी आणण्याचे व राज्यविस्तार करण्याचे धोरण स्वीकारले. त्याने एकामागून एक बासहोली, भादरवा, किष्टवाल आणि राजोरी हे प्रदेश जिंकून आपल्या राज्यास जोडले. अशा रीतीने डोगरा सत्तेचा विस्तार ईशान्य दिशेकडील टेकड्यावर पसरत जाऊन तो १८४० पर्यंत लडाखपर्यंत पोहोचला. लडाखला जगाचे छत म्हणण्याचा प्रघात आहे. वझीर जोरावर याच्या नेतृत्वाखाली जम्मूच्या फौजेने लडाखच्या राजाचा पराभव केला. बाल्टिस्तान प्रदेशातील खरमांग स्कार्ड, खाप्ल, शिगार येथील राजांचाही एकामागून एक पराभव करून जम्मू-काश्मीरचे विस्तृत राज्य स्थापन झाले. हे काश्मीर राज्य ब्रिटिशांनी काबीज केले तेव्हा तेथे हा डोगरा वंशच राज्य करीत होता. म्हणून जम्मू-काश्मीर ही महाराजा गुलाबसिंगला ब्रिटिशाकडून देणगी आहे ही समजूत ऐतिहासिकदृष्ट्या चुकीची आहे. १६ मार्च १८४६ च्या अमृतसरच्या तहान्वये ब्रिटिशांनी गुलाबसिंगला जम्मू व काश्मीरचा महाराजा म्हणून मान्यता दिली. १८१९ मध्ये महाराजा रणजितसिंगने काश्मीर पादाक्रांत केले. त्यावेळी त्यांना गुलाबसिंगचा उपयोग उजव्या हातासारखा झाला. शीख राज्य असता येथे शांतता व सुबत्ता वृद्धिगत होत राहिली. डोगरा राज्याच्या स्थापनेनंतरही या दरीत राज्याच्या भरभराटीस कोठेही अडथळा आला नाही. महाराजा गुलाबसिंग १८५७ मध्ये ६६ वर्षांचे होऊन वारले. त्याना मृत्युपूर्वी ह्या नव्या निर्माण केलेल्या राज्याची पुनर्घटना करता आली नाही. १८५७मध्ये ब्रिटिशाविरुद्ध झालेल्या स्वातंत्र्ययुद्धाचाही अद्याप पूर्णपणे निकाल लागला नव्हता. यांच्यानंतर महाराजा रणवीरसिंगानी २८ वर्षे (१८५७ ते १८८५) राज्य केले. यानी राज्यात बऱ्याच सुधारणा केल्या, निरनिराळी खाती उघडली, शाळा काढल्या, पोस्ट व तार खाते सुरू करून अनेक कर कमी केले. शैक्षणिक कार्याच्या विशेष आसक्तीमुळे म. रणवीरसिंगांनी एक भाषांतर केंद्र स्थापन केले. १८६७ साली सर डी. मॅक्लंड पंजाबचे ले. गव्हर्नर यांच्या प्रेरणेने लाहोरला विश्वविद्यालय स्थापन करण्याची कल्पना निघाली व त्यासाठी एक लाख रुपये जमा झाले, त्यापैकी ६२,५०० रुपये महाराजा रणवीरसिंगनी दिले होते. १८८२ मध्ये जेव्हा ही कल्पना मूर्त स्वरूपात आली तेव्हा हिज हायनेस दि महाराजा रणवीरसिंग याचे नाव युनिव्हर्सिटीचे पहिले फेलो म्हणून दाखल करण्यात आले. याचे मागून याचे पुत्र महाराजा प्रतापसिंग गादीवर आले. काश्मीर राज्यात माल गुजारीच्या पद्धतीत अनेक दोष होते. जमिनीची शास्त्रीय नोंदणी नव्हती व आकडेही उपलब्ध नव्हते. म्हणून महाराणा प्रतापसिंगनी १८८७ साली श्री. विनगेट आय. सी. एस. सी. आय. ई. यांची सेटलमेंट कमिशनर म्हणून नेमणूक केली. विनगेट यांनी प्राथमिक चौकशी केली व बाकीचे काम श्री. वॉल्टर आर. लॉरेन्स, आय. सी. एस. यांनी पुरे केले. उत्पन्नाच्या मानाने सर्व जमिनीची

आकारणी केली गेली. त्याचप्रमाणे पाटबंधाऱ्यांच्या योजनांचीही पाहणी केली केली गेली. म. प्रतापसिंगने ज्या अनेक सुधारणा केल्या त्यापैकी खालील गोष्टी अवश्य नमूद कराव्या लागतील. कोहाला ते श्रीनगर तसेच जम्मू ते श्रीनगर नव्या पक्क्या सडका बांधण्यात आल्या. जम्मू सियालकोट रस्ता उघडण्यात आला. दोन अद्यावत कॉलेजे स्थापन करण्यात आली. पन्नास माध्यमिक शाळा व सहाशे प्राथमिक शाळा संस्थानात उघडण्यात आल्या. त्याचप्रमाणे मुलकी व लष्करी यत्रणेतही भरपूर सुधारणा करण्यात आल्या. १८२५साली म. प्रतापसिंगाच्या मागून म. हरिसिंग गादीवर आले. हेच हरिसिंग आजच्या सुधारलेल्या नव्या जम्मू-काश्मीर संस्थानचे निर्माते होत. यांच्या प्रयत्नामुळेच काश्मीर संस्थान इतर पुढारलेल्या संस्थानाइतके किंवहुना ब्रिटिश प्रांताइतके सुनियन्त्रित झाले. त्यांचा प्रदेश विस्तृत असून त्या मानाने लोकवस्ती तुरळक होती. त्यामुळे त्यांनी आपला दृष्टिकोन दूरदर्शीपणे विशाल ठेवावयास पाहिजे होता तो त्यानी ठेवला नाही. डोगरा राज्यकर्त्यांना पंजाबी लोकानी राज्यव्यवस्थेत बरीच मदत केली होती. या प्रांतास स्थैर्य आणण्याकरिता पंजाबी हिंदु शिखानी आपले रक्त सांडले होते. परंतु महाराजा हरिसिंग आपल्या सल्लागाराच्या आहारी जाऊन पंजाबद्वेष्टे बनले होते. शेत-जमिनीची विक्री, स्थावर मालमत्ता इत्यादी बाबतीत त्यानी केलेले कायदे मुद्दाम असे घडविले होते की, पजाबी हिंदु शिखांना दूर ठेवता यावे. अशा रीतीने त्याना आपत्कालीं उपयोगी पडणारे एक मोठे आश्रयस्थान त्यांनी दुबळे केले होते. लष्करभरतीच्यावेळी देखील पंजाबी हिंदु शिखांपेक्षा पुंछ व डोगरा मुसलमानांना लष्करात घेण्यात आले. याचा परिणाम १९४७ साली फार भयानक झाला. दहा हजाराच्या या छोटया लष्करात ½ लोक पुछ व डोगरा मुसलमान होते. हे शिपाई मुस्लिम लीगच्या एका हाकेसरशी पाकिस्तानात गेले.व हिंदुस्थानी लष्कराच्या सामन्यासाठी उभे राहिले. या मुस्लिम शिपायानी ऐनवेळी दगा दिल्यामुळेच आझाद काश्मीरी म्हणविणाऱ्या लष्करास झेलम आणि गुजराथ यालगत असलेला जम्मूचा प्रांत सहजासहजी हस्तगत करता आला. लष्कराचे प्रमुख स्वत: महाराजच होते. परतु प्रत्यक्षत: सर्व लष्कराची जबाबदारी मे. जनरल स्कॉट यांच्यावर होती. मे. ज. स्कॉट जनरल या दृष्टीने अदूरदृष्टी व दुबळे ठरले. किंवा असेही असू शकेल, की त्यांनी जाणूनबुजून लष्कराच्या लहान लहान तुकडयाची हालचाल अशा रीतीने केली की ज्यायोगे शत्रूचा प्रवेश थोपविला जाऊ नये.

## काश्मीर वाचले

ते कसेही असो. १९४७ साली हिंदुस्थानात झालेले क्रांतीकारक बदल त्यापूर्वी कोणासही शक्य वाटले नव्हते. सहाजिकच इतरांप्रमाणे महाराजा हरिसिंग यांनाही याबद्दल अगाऊ कल्पना नव्हती. पूर्वेकडील आपल्या मालकीचा हा सोन्याचा तुकडा ब्रिटिश सरकार आपणहून सोडून देईल अशी कोणाचीच कल्पना नव्हती. मुस्लिम लीगने १९४५ मध्ये हिंदुस्थानात ज्याप्रमाणे दुहीचे विष पेरले त्याचप्रमाणे काश्मीरमध्येही त्यांनी पोखरून ठेवलेले होते. १९४६ साल हे अत्यंत आणीबाणीचे व क्रांतिकारक गेले. काश्मीरपुरते बोलावयाचे झाले तर मुस्लिम लीगची तत्त्वप्रणाली आणि काश्मिरच्या नॅशनल कॉन्फरन्सची तत्वप्रणाली यांच्यातील भेद दाखविणे फार कठीण आहे. शेवटी जेव्हा असे आढळून आले की, इंग्रज हिंदुस्थान सोडणार आहेत व येथील संस्थानिकाना कोणत्याही राज्यात विलीन होण्याचे स्वातंत्र्य मिळणार आहे, तेव्हा लीगने या गोष्टी आगाऊच हेरून झपाट्याने पावले टाकण्यास प्रारंभ केला. महाराजा हरिसिंग याना स्वतंत्र रहाण्याची इच्छा होती. हजारो मैल लांबरुंद असलेल्या काश्मिरच्या सरहद्दीचे आपल्याला रक्षण करता येणार नाही ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली नाही. त्यानी पं. नेहरूना स्वत:च्या राज्यात पाय ठेवण्याची परवानगी नाकारली होती. त्याचबरोबर हेही खरे की जिना यांनाही त्यांनी आपल्या राज्यात येऊ दिले नाही. असे असले तरी शत्रू कोण मित्र कोण हे त्यानी ओळखावयास हवे होते. यावेळी इंग्रज पत्नी असलेले काश्मीरचे मुख्यमंत्री पं. रामचद्र काक यांनी काश्मिरच्या भावी राज्य व्यवस्थेसबधी काही चमत्कारिक सूचना मांडल्या होत्या. एकवेळ अशीही सूचना होती की, पाकिस्तानशी लगत असलेली काश्मीर संस्थानची वायव्य सरहद्द हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या दृष्टीने हिंदुस्थानने घ्यावी व त्या मोबदल्यात हिंदुस्थानने कांग्रा खोरे काश्मिरला द्यावे. या सूचनेचा खलिता प. काक यानी ग. ज. माऊंट बॅटन याना पाठविला, त्याबद्दल महाराजानी त्याना धन्यवाद दिले. नतर मुस्लिमलीगकडून असे बाहेर आले की, १-७-४७ रोजी मुस्लिम परिषदेच्या मागणीप्रमाणे जिनानी पाकिस्तान लगतचा काश्मीर सरहद्दीचा पट्टा काश्मिरने पाकिस्तानला द्यावा व त्या मोबदल्यात गुरुदासपूर व सियालकोट हे जिल्हे काश्मिरने घ्यावे अशी काश्मीर दरबारला विनती केली होती. या व अशाच प्रकारच्या इतर सूचनानी मूर्त स्वरूप मात्र धारण केले नाही.

ज्या गोष्टी वाटाघाटीनी होऊ शकल्या नाहीत त्या गोष्टी परिस्थितीचे दडपण येताच आपोआप घडून आल्या. संस्थानात इतस्तत: पसरलेले छोटे डोगरा लष्कर—त्यातही अनेक फितूर, त्यामुळे आझाद काश्मिरच्या बुरख्याआडून आलेल्या पाकिस्तानी लष्कराच्या पहिल्या हल्ल्यासच ते तोंड देऊ शकले नाही. त्यामुळे या पाकिस्तानी लष्कराला भराभर पुढे सरकून प्रांत ताब्यात घेण्याचेच फक्त काम होते. यावेळी काश्मिरचे नवे मुख्यमत्री मेहेरचद महाजन याच्या सूचनेनुसार आपले संस्थान हिंदुस्थानात सामील करण्यास महाराजांनी मान्यता दिली. हिंदुस्थान सरकारास सामिलीकरणाच्या अटी व इतर तांत्रिक बाबी पूर्ण करण्यास दोन दिवस लागले. एवढ्या अवधीत पाकिस्तानी लष्कराने दुबळ्या प्रतिकारामुळे श्रीनगरच्या परिसरापर्यंत धडक मारली होती. या धडकेच्या प्रतिकारार्थ हिंदुस्थान सरकारला विमानाने सैन्य पाठवावे लागले. पुढील इतिहास सर्वांना विदित आहेच. हिंदुस्थान लष्कराने अनेक संकटांना तोंड देऊन व शौर्याची शर्थ करून अल्पावधीत या रानटी टोळ्यांना पिटाळून लावले व अनेक शहरे मुक्त केली. या लष्कराचा दळणवळणाचा मार्ग फार लांबचा व अडचणीनी भरलेला होता. अनेक ठिकाणी सडका नव्हत्या, पूल नव्हते, असे असतानाही त्यांनी शत्रूला ज्या निकराने तोंड देऊन उधळून लावले ते खरोखर सर्वांनाच फार कौतुकास्पद वाटले. हिंदुस्थान लष्कराच्या पराक्रमाने जरी काश्मीर खोरे वाचले व जम्मूला शत्रूचे पाय लागू शकले नाहीत तरी संस्थानच्या इतर भागात पाकिस्तानला मोकळा हात मिळाला. त्या भागात

न सांगता येण्यासारखी अघोर कृत्य घडली. एका मागून एक प्रांत बळकावण्यात आले व तेथे भयंकर लूट करून ते उध्वस्त करण्यात आले. आक्रमकास संस्थानातून हाकून लावण्यासाठी लागणाऱ्या पुरेशा लष्कराची जुळवणी व योजना करण्यास हिंदुस्थान सरकारास थोडा कालावधी लागला. त्याचा पाकिस्तानने पूर्ण लाभ घेतला. प्रारंभी पाकिस्तान सरकारला अशी निश्चिती नव्हती की, काश्मिरवरील हल्ला आपल्यावरील हल्ला समजून हिंदुस्थान सरकारकडून प्रतिकार होईल. या अनिश्चिततेमुळे लोकांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या क्लृप्त्या योजिल्या. त्यांनी असे भासविले की, काश्मिरवरील हल्ला सिंधू नदीपलीकडील रानटी टोळ्यांनी केला असून पाकिस्तानलाही त्याचा प्रतिकार करणे अशक्य आहे. त्यांच्याकडून असेही सांगण्यात येऊ लागले की जुलमी डोगरा राजवटीच्या जोखडाखालून आपल्या मुसलमान बंधूंना सोडविण्यासाठी टोळीवाल्या मुसलमानांनी केलेला हा सहज स्फूर्त उठाव आहे. पुढे हे प्रकरण यु. नो. त गेल्यावर तेथेही पाकिस्तानने निर्लज्जपणे सांगितले की, या प्रकरणी आमचा हात बिलकुल नाही. पण हे कृत्य पाकिस्तानचेच आहे याबद्दलचा भरभक्कम पुरावा हिंदुस्थान सरकारजवळ होता. वास्तविक हिंदुस्थान सरकारास योग्य मार्ग असा होता की, पाकिस्तान सरकारास निर्वाणीचा खलिता पाठवून पठाणकोट, काटुहा, जम्मू, आणि श्रीनगर हा डोंगराळ व त्यामुळे दळणवळणास अयोग्य असलेला मार्ग सोडून देऊन सरळ लाहोर सियालकोट मार्गे अक्रमकावर चालून जाणे.

फाळणी संबंधीच्या कराराचा पाकिस्तानने तो कार्यवाहीत आणताना अनेक प्रकारे भंग केला. त्यांनी पाकिस्तानातील हिंदुशिख अल्पसंख्यांकांना जबरीने बाहेर घालविले व घालवीत होते. त्यांच्या स्थावर व जंगमाचा त्यांनी अपहार केला. सर्व प्रश्न न्यायाने व सामोपचारानेच सोडविले जातील या अटीवरच नेहरू सरकारने फाळणीस मान्यता दिली होती. पण न्याय अन्यायाची चाड न ठेवता पाकिस्तानने फाळणीच्या करारास हरताळ फासला व भारतात रीतसर सामील झालेल्या काश्मीर संस्थानावर आक्रमण करून करारभंगाचा कळस केला. त्यामुळे या मोहिमेसाठी पश्चिम पाकिस्तानात गोळा झालेल्या शत्रुसैन्यावर हिंदुस्थान सरकारने स्वतःच्या हितासाठी सरळ चालून जाणे ह्याच एका उघड असलेल्या मार्गाचा अवलंब न करण्याचे हिंदुस्थान सरकारास आता काहीही कारण नव्हते. वैयक्तिकरीत्या आपल्या देशबांधवांशी वागताना अनत्याचारित्व आवश्यकच आहे. आपसात कितीही तीव्र मतभेद असले तरी आपसातील तंटे सामोपचारानेच सोडवावेत हेही अत्यंत श्रेयस्कर आहे. पण परराष्ट्रीय धोरण आखताना व परकीय आक्रमण झाले असता अहिंसेचे धोरण स्वीकारणे कसे काय योग्य ठरते हे समजणे कठीण आहे. पण नेमके हेच धोरण नेहरू सरकारने स्वीकारले. त्यांनी पाकिस्तानला स्पर्शही केला नाही. गडगडाटाची मोठाली भाषणे करून, पाकिस्ताननेच आक्रमण केले आहे असे उच्चरवाने सांगून, शेवटी नेहरू सरकारने केले काय, तर यु. नो. कडे एक नम्र अर्ज करून न्याय देण्याविषयी तिला विनविले. या त्यांच्या कृतीमुळे सर्व देशास आश्चर्याचा धक्का बसला. पंजाब, वायव्यप्रांत व सिंध येथील हिंदुशिखांना तर फारच मोठा धक्का बसला. हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांची वक्तव्ये व कृती यात नेहमीच




यु. नो. कडे फक्त तक्रार

दक्षिण उत्तर ध्रुवाइतके अंतर असते. या बाबतीत प्रत्येकाची अशी अपेक्षा होती की, लष्करी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार काहीतरी तडफेने उपाय योजना केली जाईल. परंतु असे काही एक न होता स्वतःच्या साहाय्यासाठी परक्यांपुढे केवळ एक विनंती अर्ज करण्यात आला. हिंदुस्थानच्या या कृतीमुळे हिंदुस्थान दुबळे आहे असा पाकिस्तानचा सहाजिकपणे समज झाला. आपण काश्मिरमध्ये काहीही केले तरी पाकिस्तानवर हल्ला होणार नाही अशी तेथील पुढाऱ्यांची खात्री झाली, असे नंतर घडलेल्या घटनांवरून सिद्ध झाले. प्रारंभी हिंदुस्थानने केलेले आरोप नाकारून पाकिस्तानने या प्रकरणाचा निर्णय टाकता येईल तेवढा लांबणीवर टाकला व शेवटी या हल्ल्यात आपणही एक भागीदार आहोत अशी कबूली दिली. हे प्रकरण जोवर यु. नो. पुढे आहे. तोवर हिंदुस्थान पाकिस्तानवर हल्ला करणार नाही याची पाकिस्तानवाल्यांना निश्चिती होती. येथील बऱ्याच लोकांचा असा समज आहे की, पाकिस्तानी पुढाऱ्यांनी या गोष्टीचा अदमास फार पूर्वीच घेतला होता व त्यांच्या अदमासाप्रमाणेच हिंदुस्थानकडून प्रतिक्रिया घडत होती. हिंदुस्थान सरकारने हे प्रकरण यु. नो. कडे नेले तेव्हा पाकिस्तानने खूप आकांडतांडव केले. तरीही खरे सांगावयाचे म्हणजे पाकिस्तानला हवे होते तेच नेमके नेहरू सरकारने केले. पाकिस्तानचे काम आता सोपे झाले. काश्मिरच्या निरनिराळ्या आघाड्यांवर त्यांनी आता युद्ध सुरू केले. हे सर्व करण्याचा त्यांचा एकच हेतू होता. मनुष्यबळ व लष्करी साहित्यामुळे सुसज्ज असलेल्या हिंदी लष्कराची हळूहळू हानी करून योग्य वेळ येताच सर्व आघाड्यांवर अचानकपणे पाकिस्तान लष्करास धडक मारता यावी. त्यांच्या लष्कराच्या इंग्रज सेनापतींनी ज्या योजना आखल्या होत्या त्यानुसार काश्मिरची लढाई जितकी लांबवता येईल तितकी लांबवणे व आपली कातडी बचावून हिंदी लष्कराला सतत सतावीत राहून कंटाळवाणे करणे, हेच धोरण अद्याप कार्यवाहीत आहे. पण आमच्या सरकारला अद्याप ते उमगलेले दिसत नाही

पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या हिंदु शिपायांना ते सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ दिसत आहे. काश्मिरचा प्रश्न पाकिस्तान विरुद्ध युद्ध केल्यावाचून सुटणार नाही. आणि अशा रीतीने सोडवायचा झाल्यास हैद्राबादचा प्रश्न जेवढ्या अवधीत सुटला तेवढ्याच अवधीत हाही प्रश्न सुटेल.

मुस्लिम लिगी मनोवृत्तीची, त्यांच्या तंत्राची पक्की जाणीव पंजाबच्या हिंदुशिखांवाचून या देशात कोणासही नाही आणि ते सर्व या नव्या घटनामुळे पूर्ण निराश झाले. काश्मिरचा प्रश्न शांततामय मार्गाने सुटणे अशक्य आहे हे त्यास पक्केपणी ठाऊक आहे. अमेरिका व ब्रिटन हे कदाचित पंजाब व बंगालप्रमाणे काश्मिरचीही फाळणी करावयास सांगतील व पाकिस्तान त्याला मान्यताही देईल. पण अशा करारास हिंदुस्थान सरकार जर मान्यता देईल तर ती दुसरी मोठी घोडचूक ठरेल, आमच्या पंतप्रधानांनी वेळोवेळी घोषणा करून पाकिस्तानशी इतर कोणत्याही प्रश्नाची वाटाघाट करताना काश्मिरचा प्रश्न मध्ये आणणार नाही अशा घोषणा केल्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानला हवे असलेले आश्वासन मिळालेच आहे. लोकसभेतील एका प्रश्नास उत्तर देताना पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, 'आम्ही काश्मिरातील आमच्या हालचाली चालूच ठेवू व शक्यतो पाकिस्तानच्या हद्दीत पाऊल घालणार नाही.' युद्धबंदी होऊन बारा महिने लोटले तरीही पाकिस्तानने आमच्या पंतप्रधानांच्या आश्वासनांवर अविश्वास व्यक्त करावा असे काहीही घडले नाही. या दरम्यानच्या काळात पाकिस्तान सरकारने लष्करी सडका, तसेच लष्करी साहित्याची कोठारे व ठिकठिकाणी शस्त्रास्त्रांचे साठे करून ठेवले आहेत. तसेच त्यांनी युरोपीय वैमानिकांना आपले नागरिकत्व देऊन आपले विमानदल वाढविले आहे. त्याचप्रमाणे लष्करातही भरपूर वाढ केली आहे. ते लष्करावर व शस्त्रास्त्रावर करीत असलेला खर्च त्यांच्या देशाच्या साऱ्या अंदाजपत्रकाहून अधिक आहे. यावेळी जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा पाकिस्तान शस्त्रास्त्रांचे फार मोठे गिऱ्हाईक आहे. त्यांचेजवळ डॉलर नाणे जास्त असून त्याचा उपयोग शस्त्र खरेदीसाठीच होत आहे. ज्यावेळी हिंदुस्थान सरकार परकीय चलनाचा उपयोग गहू, ज्वारी आणण्यात करीत आहे. त्याचवेळी पाकिस्तान सरकार त्याचा उपयोग शस्त्रास्त्रे, तोफा, बंदुका व टँक्स आणविण्याकडे करीत आहे. जर कदाचित पुढे काश्मिरमध्ये लढाई जुंपली—व पाकिस्तान ही गोष्ट त्यास अनुकूल असेल अशाचवेळी घडवून आणील—तर पाकिस्तान मागच्यापेक्षा बलाढ्य झाल्याचेच आढळून येईल. दुर्दैवाने पुढेमागे युद्ध सुरू झालेच तर ते फक्त काश्मिरच्याच क्षेत्रात मर्यादित राहिल असे पं. नेहरूंनी दिलेले सभ्य आश्वासन ते पाळतील अशाविषयी पाकिस्तान आपल्या प्रचाराचे व वाटाघाटीचे सारे बळ एकवटून प्रयत्न करील. अर्थात पाकिस्तानलाच जेव्हा लढाईची स्फूर्ती होईल तेव्हाच या गोष्टी व्हावयाच्या. नव्या चढाईसाठी तेच जागा व वेळ निवडतील आणि हिंदुस्थानकडे फक्त आत्मसंरक्षणाचे काम राहील.

**स मा प्त**




## वर्गणी

- 'चित्र, वार्ता पुस्तक' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.
- या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.
- साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.
- म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

# पेट्रोल पंपावरील वेडा

पृष्ठ २४ वरून

त्याने जिवंत राहाण्यासाठी, व त्याच्यावर सोपविलेल्या कार्यासाठी ते आवश्यक होते.

जमीनीला पाय टेकताच पेरीने सावधपणे कानोसा घेतला. सर्वत्र सामसूम होती. फक्त रातकिड्यांची किरकीर चालू होती. पेरी हळूच दबकत दबकत चालू लागला, उत्तरेकडे तोंड करून! तो उतरला होता. ते एक नुकतेच नांगरलेले शेत होते. त्यामुळे त्याला चालताना अडखळल्यासारखे होत होते. उत्तरेकडे थोडे गेल्यावर त्याला कुंपण लागले. पेरीला बराच धीर आला. त्याला दिलेल्या सूचनांप्रमाणे दोन गोष्टी तर बरोबर जमल्या होत्या. त्याने आपले पॅरॅशूट त्या कुंपणात पुरून ठेवले. त्याला पुढील सूचना आठवल्या. तसेच पुढे शंभर पावले उत्तरेकडेच चालत जा. तेथे उजव्या बाजूला दोन शेतघरे दिसतील. तो कुंपणापलिकडे तसाच शभर पावले गेला. उजव्या बाजूला दोन शेतघरे होती. सूचणे प्रमाणेच एक घर मोठे व दुसरे घर लहान होते. मोठ्या घराजवळच एक गवताची गंज पण होती. पेरीला खूण पटली. तो मोठ्या घराजवळ गेला. त्या घराच्या पायऱ्या मोजून तो चढला. जिन्याला बरोबर पधरा पायऱ्या असल्या पाहिजेत कमी अगर जास्त असल्या तर जागा चुकलास असे समज. या सूचनेचे मनातल्या मनात पारायण करत त्याने त्या पायऱ्या मोजल्या. त्या बरोबर पंधरा भरल्या. शेवटच्या पायरीवरूनच त्याने गवताचे गजीवर उडी मारली. त्या गजीवरच तो झोपी गेला. पण त्याला फार वेळ झोप मिळाली नाही. थोड्याच वेळात गंजीजवळचे खुराड्यातून कोंबड्याचा कलकलाट सुरू झाला. पहाट झाली होती. शेतकऱ्याची बायको उठून कोंबड्यांना दाणे टाकत होती. दाणे टाकता टाकता ती शीळ घालत होती. पेरीने कान टवकारले. शिळेवर 'ती मार्सेलीज' या फ्रेंच राष्ट्रगीताचे सूर ती वाजवत होती. पेरीची परवल जमली. गजीवरूनच तोतऱ्या फ्रेंचमधे पेरीने आपली परवल सांगतली. त्या बाईने मख्ख चेहऱ्याने त्याचेकडे रोखून पाहिले. थोडावेळ तसेच पाहत राहून तिने मानेनेच पेरीला खूण केली गजीवरून उतरून पेरी तिच्या मागोमाग घरात शिरला.

घरात एक प्रौढ शेतकरी बसला होता. त्याने दारातून आत येणाऱ्या पेरीच्या सोंगाकडे एक दृष्टिक्षेप टाकला. बसल्या जागेवरून उठून तो कोपऱ्यातल्या टेबलाजवळ गेला. टेबलाचा ड्रावर उघडून त्यातून त्याने काही कागदपत्र बाहेर काढले. पेरीजवळ येऊन तो म्हणाला, हे तुझे ओळखपत्र आणि हे तुझे रेशनकार्ड. याची केव्हाही तपासणीसाठी मागणी होते. नेहमी जवळ बाळगत जा. तुझी रहायची व नोकरीची सोय ग्रेगरीच्या पेट्रोल पपावर केली आहे. न्याहारी करून आपण तिकडेच जाऊ. ग्रेगरी तुझी वाटच पहातो आहे. थोडी न्याहारी आटोपून पेरी त्याच्याबरोबर गावच्या बाजारपेठेकडे निघाला. वाटेतच त्याला गावचे चर्च लागले. रोज सात वाजता चर्चमध्ये प्रार्थनेला यायचे असे पेरीला सांगण्यात आले. सुमारे पाच सहाशे फूट चालून गेल्यावर एक पेट्रोलपंपवजा गॅरेज लागले. तेथे ग्रेगरी उभा होता. पेरीला बघून तो म्हणाला, 'कोण पेरी? बरं केलस माझ्याकडे आलास ते. पोरा, तुझा 'बाऽ' माझा चांगला दोस्त होता. चल, तुला तुझी खोली दाखवतो.' त्याच्याबरोबर पेरी गॅरेजच्या मागील बाजूस गेला. तेथील मागच्या पाख्यात एक छप्पर-वजा खोली होती. तेथे एक कॉट, थोडे अथरुणपांघरुण, एक स्टोव्ह ठेवलेला होता. बरोबर आणलेले आपले कपडेलत्ते पेरीने तेथेच टाकले. 'पोरा, तुझ्या बालपणीचे सगळे सखेसोबती आता गाव सोडून गेले आहेत. कुणी लढाईत मारले गेले. सापडलेल्यांना जर्मनांनी धरून नेले. बाकीचे जर्मनाना चुकवायला पळून गेले. चल तुला आता तुझ्या कामाची माहिती देतो.' पेट्रोलपपाजवळ येता येता ग्रेगरी म्हणाला. ते पेट्रोलपपाजवळ आले इतक्यात एक मर्सिडीझ कार पंपावर आली. ड्रायव्हरजवळच एक गेस्टॅपोचा अधिकारी बसला होता. 'दहा लिटर पेट्रोल घाल!' त्याने हुकूम फर्मावला. ग्रेगरीने पेरीकडे बघितले व लपकतलपकत पेरीचे ध्यान गाडीकडे वळले. गाडीच्या पेट्रोल टँकची कॅप त्याने काढली. आत होज घातला. पपाचा दांडा हाताने हालवून दहा लिटर पेट्रोल त्याने गाडीत भरले. लकवा भरलेल्या हाताने होज गाडीबाहेर काढताना थोडे पेट्रोल बाहेर सांडले. गेस्टॅपो अधिकाऱ्याने रागाने पाहिले. 'यड्याकडे काय लक्ष देता साहेब?' खादे उडवत ग्रेगरी म्हणाला. त्या अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर अर्धवट स्मित फुटले. गाडी निघून गेली. दोघांनीही निश्वास सोडला. सलामी तर व्यवस्थित झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता पेरी चर्चमधे गेला. प्रार्थनेला धर्मोपदेशकाशिवाय फक्त सात माणसे हजर होती. धर्मोपदेशकाला पेरीने काल गावात पेट्रोलपपाकडे येताना पाहिले होते. कालचे शेतकऱ्याचे जोडपे व ग्रेगरी पण त्याच्या माहितीचा होता. त्याशिवाय गावचा हॉटेलवाला आणि गावचा लोहार तेथे होता. सातवी साठी गाठलेली एक विधवा बाई होती. धर्मोपदेशकासह या आठजणाचा मिळून भूमिगताचा गट त्या गावात क्रियाशील होता. त्यातही फक्त चौघानाच पेरी हा खरा पेरी नसून ब्रिटिश हेर आहे हे माहीत होते. प्रत्येक गावात असे छोटे छोटे भूमिगताचे गट होते. ते सर्व एक-मेकाच्या सहकार्याने काम करीत जर्मनांनी पाडलेल्या विमानांच्या दोस्तांच्या वैमानिकास आसरा देणे, त्याची जरूर तर सुश्रुशा करणे, त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविणे व शेवटी स्पेनला पोहोचवणे; किंवा जर हवा चांगली असेल व समुद्रकिनाऱ्यावरील पहारा ढिला असेल तर होड्यात बसवून दर्यावरील ब्रिटिश लाँचेस-मधे पोहोचवणे ही कामे हे सर्व गट करीत. सर्वांचे सूत्रचालन लडन-हून केले जाई लडनचे आदेश सर्व गट ततोतंत लष्करी शिस्तीने पाळीत. त्यासाठी वायरलेसने त्याचा लडनशी सपर्क असे. सकाळच्या प्रार्थनेच्या वेळी सर्वांना त्या दिवशीच्या कामाची कल्पना दिली जाई. भूमिगत कामासाठी पेरीबरोबर बहुधा ती विधवा म्हातारीच असे. म्हातारीच्या ऐमपँस झग्यात हँडग्रेनेड, डायनामाईट वगैरे लपवून नेता येत असे. रात्री बेरात्री हा वेडपट इकडे कुठे हिंडतोय ही शका बरोबर ती म्हातारी असली की कुणाच्या मनात येत नसे. पेरीचे वेडपटाचे सोंग त्या गावात चांगलेच वठले होते. जर्मन सैनिकासह सारे गाव पेट्रोलपपावरील वेडा म्हणूनच त्याला ओळखे. त्याची चेष्टामस्करी करून जिवाची करमणूक करून घेई. ग्रेगरीने अगावर

फेकलेली चिल्लर घेऊन तो पाव व चीझचे आपले रेशन आणताना बघून ग्रेगरीने स्वस्तात चांगला हरकाम्या मिळवला याचे अनेकांना वैषम्य वाटे. हा वेडपट रात्री बेरात्री जाऊन पूल उडवत असेल, रेल्वेस्टेशनवरील कंट्रोलटॉवर उडवत असेल, लष्करी वाहनांचे डेपो, पेट्रोल साठे, इतकेच काय दारुगोळ्यांचे साठेसुद्धा उडवत असेल अशी शंका अगदी गेस्टॅपोलासुद्धा आली नाही. पण लंडनहून मिळणाऱ्या आदेशाप्रमाणे असे लष्करीदृष्टया महत्त्वाचे घातपाती कृत्य पेरी वारंवार करीत होता. ही घातपाती कृत्ये इतकी वाढली की गेस्टॅपोने त्याच्या बंदोबस्तासाठी जाळे टाकले. त्या जाळ्यात ती विधवा सापडली. तिच्या झग्याच्या आतल्या बाजूला त्यावेळी हातबॉंब होता. त्यामुळे तिच्या अंगझडतीसाठी तिच्या झग्याला जर्मन सैनिकांनी हात लावताच ती कडाडली, 'मेल्यानो, तुम्हाला आईबहिणी आहेत का नाही ? माझ्या म्हातारीच्या झग्याला हात घालताय ते ! थांबा, तुमचा मोठा साहेब माझ्या चागल्या ओळखीचा आहे. त्याला तुमचे चामले काडात काढायला लावते. तुम्हाला माझी म्हातारीची अंग-झडती घ्यायचीय काय. चला तर मग मला तुमच्या मोठ्या साहेबा-कडे घेऊन. तोच सागेल काय ते तुम्हाला.' म्हातारीची ही दमबाजी ऐकून गेस्टॅपोचे ते सैनिक चांगलेच चपापले. आपण टाकलेल्या जाळ्यात ज्या अर्थी ही बया सापडली आहे त्या अर्थी नक्कीच काही तरी पाणी मुरतेय अशी त्याची खात्री होती. पण बड्या साहेबाशी तिची ओळख असणेही शक्य होते. तसे असले तर मग आपल्यावर नसती बला यायची. त्यापेक्षा त्या साहेबाच्या आज्ञेनेच झडती घेतली की प्रश्नच मिटला, असा विचार करून त्यांनी तिला आपल्या गाडीत घातले आणि जवळच्याच शहरातील गेस्टॅपोच्या मुख्य कचेरी-तील कर्नल व चार्जसमोर नेऊन त्यांनी तिला उभी केली. त्यावेळी तेथे गेस्टॅपोचे आणखी दोन बडे अधिकारी मिटींगसाठी आले होते. सैनिकांचा रिपोर्ट ऐकून घेतल्यावर तो अधिकारी ताबडतोब म्हणाला, 'या बयेला मी मुळीच ओळखत नाही. हिची ताबडतोब अंगझडती घ्या.' पण आपल्या झग्याला कुणी हात लावायच्या आधीच 'थांबा, मेल्यांनो, मीच माझा झगा काढते,' असे म्हणून काय होतेय हे कुणाच्याही लक्षात येण्याच्या आतच म्हातारीने आपला झगा वर उचलला व आत लपवलेला हातबॉंब त्या खोलीत भिरकावला. क्षणात त्या बॉम्बचा स्फोट झाला. त्यात तिच्या, त्या सैनिकांच्या व सर्व अधिकाऱ्यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या.

दुसरेच दिवशी त्या गावावर गेस्टॅपोची धाड आली. त्या बाई-बरोबर संबंध येणाऱ्या सोळा लोकांना संशयीत म्हणून पकडण्यात आले. त्यातला एकजण पेरी होता. त्या सोळा संशयितात भूमिगतां-पैकी एकटा पेरीच होता. बाकी सर्वांना भूमिगतांची काहीही माहिती नव्हती. पेरीची भूमिका कसोशीने वठली तर आपली कदाचित सुटका होईल ही गोष्ट लक्षात घेऊन आपल्या पेरी सोंगाला अखेरपर्यंत चिकटून राहाण्याची शर्थ करावयाचा निश्चय जार्जने गाडीत बसताच मनाशी केला. गेस्टॅपोचे हेडक्वार्टर्सला पोचताच पेरीची एका तीन बाय चार फुटाचे खोलीत रवानगी केली. त्या कोठडीत तो जाताच ती खोली खूप गरम करण्यात आली. दोन तासानी ती एकदम अगदी थंडगार करण्यात आली. हा प्रकार सतत चार दिवस चालू होता. या काळात दिवसातून दोनदा रोज त्याला थोडा पाव व पाणी दिले जाई.

चौथे दिवशी पेरीला कोठडीतून काढून वरचे मजल्यावर नेण्यात आले. तेथे एका खोलीत एका टेबलाजवळ गेस्टॅपोचे दोन अधिकारी बसले होते. समोर पेरीला उभे करण्यात आले. पेरीला एक सार्जंट व एक सैनिक यानी गच्च धरून ठेवले होते. 'हाच तो यडा' सार्जंटने वरिष्ठांना पेरीची माहिती दिली.

'कायरे यड्या तुझ्या गावात तू दोस्तांचे वैमानिक पाहिलेत का नाही ?' त्या दोघांपैकी वरिष्ठ असलेल्या अधिकाऱ्याने पेरीला विचारले.

यडपटाप्रमाणेच खांदे घुसळून पेरीने मानेनेच नकार दिला. त्या सार्जंटने ताबडतोब एक जबरदस्त ठोसा पेरीच्या नाकाडावर मारला त्या एकाच ठोशात पेरीच्या नाकातून रक्ताची धार वाहू लागली. विवळणाऱ्या यडपटाचे हुबेहूब सोंग पेरी वठवू लागला.'

'भडव्याऽ! खर काय ते सागून मोकळा हो' तो सार्जंट पेरीवर खेकसला.

'मला काही माहीत नाही हो' फ्रेंचमध्ये तोतरे बोलत पेरी पुटपुटला.

'गावात भूमिगतांचा मुख्य कोण आहे ? पूल कोण उडवत ?...? ...?' पेरीवर प्रश्नाची सरबत्ती सुरू झाली.

'मला खरच काही माहीत नाही हो.' पेरी पुटपुटत राहिला.

'साहेब, हे यडपट अशानी बधायच नाही. मला जरा परवानगी द्या' टेबलाजवळ बसलेल्या वरिष्ठाना उद्देशून तो सार्जंट म्हणाला.

'ठीक आहे' साहेबद्वय म्हणाले. लगेच त्या टेबलावर एक लोखंडी पक्कड (Vice) बसवण्यात आला. पेरीच्या उजव्या हाताची करंगळी त्या पकडीत घट्ट पकडण्यात आली. पेरीला पुन्हा विचारण्यात आले.

'बोऽल ! तुमचे गावात घातपाती कोण कोण आहेत ते.'

पेरीने नकारार्थी मान हलवली. तोच पेरीचे दोन्ही पायावर त्या सार्जंटने सणसणीत लाथ मारली. करंगळीचे हाड मोडल्याचा कटकन आवाज आला आणि पेरी धाडकन खाली कोसळला. हळूहळू उठत पेरी उभा राहिला. त्याची करंगळी पकडीमधून बाहेर काढण्यात आली. मोडलेले हाड कातडी फोडून बाहेर आले होते. वेदनेने सारा हात बधीर झाला होता.

'थांब बेटचा तुझ्या हाताची अजून पुष्कळ बोट शिल्लक आहेत. चल सांगतोस का नाही, माझ्या प्रश्नाची नीट उत्तरे.' पेरीवर खकसत तो सार्जंट म्हणाला.

'खरंच मला काही माहीत नाही हो' फ्रेंचमध्येच तोतरेपणे, कळवळून पेरी पुटपुटला.

'या यडपटाला काय माहीत असणार. न्या त्याला बाहेर' खुर्ची-वरचा अधिकारी म्हणाला.

पेरीला परत त्याच्या कोठडीत नेऊन टाकण्यात आले. त्याचे नाक आणि बोट ठणकत होते. अंगावरील कपड्याची चिंधी फाडून पेरीने करंगळीचे हाड साधण्याचा प्रयत्न केला. त्या चिंधीने त्याने ते जाम बांधून टाकले. त्या रात्रीपासून पेरीचे आहारात पावाबरोबर थोडे घोड्याचे मांस पण येऊ लागले.

असे दोन दिवस गेले. पेरीला पुन. वरचे मजल्यावर नेण्यात आले. तेथे गेस्टॅपोचा अधिकारी कुणीच नव्हता. तो सार्जंट हाच तेथील



'पूल उडवणाऱ्यांची नावे सांग...'

मुख्य अधिकारी होता. त्याने पेरीला एका खुर्चीवर बसवले. पेरीचे दोन्ही पाय व डावा हात कातडी पट्ट्याने खुर्चीला गच्च बांधण्यात आले. त्याचे उजवे हातात कागदाचे बंडल व पेन्सील देण्यात आली. त्या सार्जंटने पेरीला तोंड उघडण्याचा हुकूम दिला. पेरीने तोंड उघडताच, दंत वैद्य पेशंटचे तोंड उघडे रहावे म्हणून वापरतात तो चिमटा पेरीच्या तोंडात सरकवण्यात आला मग जवळच एका विजेच्या शेगडीवर एका किटलीत पाणी उकळत ठेवले. पाणी उकळू लागताच तो सार्जंट खेकसला, 'विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्या पॅडवर लिहायला लाग. भूमिगत गटात तुमचे गावात कोण कोण आहेत ?'

पेरीने मानेनेच नकार दिला. सार्जंटने किटली उचलली. तिच्यातील गरम पाणी पेरीच्या उघड्या तोंडात ओतले. परत प्रश्नांचा भडिमार सुरू केला. पेरीने मान हलवून शक्य तितके सारे पाणी तोंडाबाहेर टाकून दिले. पाणी न गिळण्याची त्याने कोशीस केली. थोडे पाणी तसेच तोंडात ठेवले. सार्जंटने परत किटली उचलली व पेलाभर पाणी पुन्हा पेरीच्या तोंडात ओतले हे पाणी जास्तच गरम होते. पेरीचा टाळा चांगलाच भाजून निघाला.

'आता तुला शेवटची संधी देत आहे. पूल उडवणाऱ्यांची नावे लिही. जरी एकच नाव लिहिलेस तरी तुला सोडून देतो.' सार्जंटने मधाचे बोट लावले. पेरीने परत मानेनेच नकार दिला. सार्जंटने तिसऱ्यांदा पुन्हा किटली उचलली. तिच्यातील पाणी चांगलेच उकळत होते. ते त्याने पेरीच्या तोंडात ओतले. पेरीचे सबंध तोंड, हिरड्या, जीभ, पडजीभ सारे काही पोळून निघाले. त्याला ब्रह्मांड आठवले. त्याने मानच टाकली.

'यड्याची शुद्ध गेलेली दिसतेय' सार्जंट म्हणाला.

'यडपटाला कुणी लिहा-वाचायं शिकवलं नसेल' एक शिपाई म्हणाला.

'खरंच की ! मला ही कल्पनाच शिवली नाही. न्या त्याला कोठडीत' सार्जंट म्हणाला.

कोठडीत आल्यावर तोंडातील वेदनांनी पेरी अगदी हैराण झाला. त्याला काही गिळता येईना. धड झोपसुद्धा आली नाही. असे आणखीन दोन दिवस जाऊ देण्यात आले. परत पेरीला कोठडीतून काढून वरच्या मजल्यावर नेण्यात आले. गेस्टॅपोचा अधिकारी यावेळी तेथे होता.

'तू महत्त्वाची माहिती दडवू पाहत आहेस. ही तुझी शवटची संधी. आम्हाला भूमिगतांची नावे सांग' तो अधिकारी हुकमी आवाजात म्हणाला.

'मला खरंच काऽही माहीत नाही' पेरीने परत आपल्या तोतऱ्या फ्रेंचमध्ये अडखळत सांगितले.

'तुझ्या सारख्याला ठारच मारले पाहिजे. जाऽरे याला गोळी घालून ठार मारा' त्याने आज्ञा दिली.

पेरीला घेऊन शिपाई बाहेर पडले. त्यानी पेरीला त्याच इमारतीत मागील बाजूस असलेल्या मोकळ्या अंगणात आणले. चारी बाजूनी बंदोबस्त असलेली ती मोकळी जागा होती. एका बाजूला बंदुका घेऊन फायरिंग स्क्वॉड तयार होते. त्यांच्यापासून समोर वीस फुटांवर भिंतीजवळ नेऊन पेरीला उभे केले. भिंतीवर गोळ्यांच्या खुणा दिसत होत्या. खाली जमिनीवर रक्तांचे डाग दिसत होते. सार्जंटने फायरिंग स्क्वॉडला जर्मनमध्ये हुकूम दिला. सर्वांनी आपल्या बंदुका पेरीवर रोखल्या. बंदुकीचे सेफ्टीक्लच दूर केले. पेरीने मान वर करून समोर पाहिले. सहा बंदुका त्याचेवर रोखलेल्या होत्या. सहा बोटे चापावर होती. चाप ओढण्याच्या आज्ञेची बारा कान प्रतिक्षा करीत होते. सार्जंट 'फायर' ही आज्ञा देणार इतक्यात तो अधिकारी तेथे आला 'सध्या राहू देत, न्या त्याला त्याच्या कोठीत' तो अधिकारी ओरडला. पेरीला परत त्याचे कोठीत नेण्यात आले. पेरीने ओळखले की आपले नष्टचर्य अजून संपले नाही. करंगळी व नाकाचे फ्रॅक्चरचे जोडीला त्याचे सारे तोंड फुलून आले होते. त्याला पाणीसुद्धा गिळता येत नव्हते. असेच आणखीन तीन दिवस गेले.

चौथे दिवशी पेरीला परत कोठीतून काढून वरच्या मजल्यावर नेण्यात आले. यावेळी त्याला ज्या खोलीत नेले तिचे स्वरूप हॉस्पिटलमधील ऑपरेशनरुमसारखे होते. खोलीचे मध्यभागी एक मोठे ऑपरेशन टेबल होते. त्या टेबलावर पेरीला पालथे निजवण्यात आले. मग कातडी पट्ट्यानी त्याला तेथेच जाम बांधण्यात आले. त्या नंतर शुभ्रवेशधारी एक नर्स त्या खोलीत आली. तिच्या एका हातात एक भरलेली पिचकारी व दुसऱ्या हातात एक कात्री होती. हातातल्या कात्रीने तिने पेरीचे चड्डीचा पार्श्वभाग कातरला व पिचकारी आत सरकवली.

'थोडा मासला दाखवा' सार्जंटने हुकूम सोडला. पिचकारीतील थोडे द्रव पेरीच्या पार्श्वभागावर सोडण्यात आले. गंधकाम्लाच्या दर्पाने (sulphuric acid) वातावरण दरवळवले. पेरीच्या पुठ्ठ्याचे कातडे भाजून निघाले. वेदना त्याच्या मस्तकात भिनल्या.

'हाऽ! आता मुकाट्याने पूल उडवणाऱ्यांची नावे सांग. नाही तर बघ !' सार्जंट कडाडला. इतक्या वेदनातही जॉर्जचे तोंडून एकही इंग्लिश शब्द उमटला नाही. यडपट पेरीची भूमिका बजावत नॉर्मंडीतील बोलीत तोतरेपणे तो म्हणाला, 'मला माहीत नाही.'

'असं काय ? दे त्याला पिचकारी' सार्जंट कडाडला.

नर्सने पिचकारी पेरीच्या गुदद्वारात सरकावली व त्याला

गंधकाम्लाची पिचकारी दिली व ती त्या खोलीतून निघून गेली. पेरीचे आतडे जाळून निघाले. दु:ख सहन न होऊन तो टेबलावर डोके आपटून घेऊ लागला.

'ह ऽ ! बोल आता.' सार्जंटने पुन्हा प्रश्नांची सरबत्ती सुरू केली. इतक्या वेदनातही जॉर्जने पेरीची चोख भूमिका वठवीत नॉर्मंडीतील बोलीत तोतरेपणे प्रत्येक प्रश्नाला उत्तर दिले,

'मला खरच माहीत नाही'

शेवटी कंटाळून सार्जंटने पेरीचे पट्टे सोडायचा हुकूम दिला. पट्टे सोडून पेरीला टेबलावरून उतरवण्यात आले. धड उभे राहण्याचेसुद्धा पेरीमध्ये त्राण उरले नव्हते. त्याला तसेच बुटाच्या लाथांनी ढकलीत नेऊन कोठडीत कोंबण्यात आले. कोठडीत आल्यावर पोटाखाली पाय घेऊन पोटातील वेदना हलक्या करण्याचा पेरीने प्रयत्न केला. दुसरा कोणताच उपाय तो तेथे करू शकत नव्हता पण हा उपाय का कामी येणार. वेदना सहन न होऊन थोडेच वेळात त्या कोठडीतच पेरी बेशुद्ध पडला.

पेरी शुद्धीवर आला तो एका गेस्टॅपो शिपायाने त्याला हालवून जागे केले तेव्हा. किती काळ आपण बेशुद्ध होतो याची पेरीला जाण नव्हती. मात्र आपण जॉर्ज नसून पेरीच आहोत हे त्याच्या चागले ध्यानात होते. पेरी शुद्धीवर येताच बखोटयाला धरून त्याला उभे करण्यात आले. त्याच्या गुदद्वारातून रक्ताचे पाट वाहत होते. धड उभेसुद्धा राहणे त्याला जड जात होते. मोठ्या मुष्कीलीने तो पायऱ्या चढत होता त्या जर्मन सैनिकाला मात्र घाई झाली होती. त्याने पेरीला इमारतीच्या बाहेरच्या दरवाजाजवळ नेले. 'चल यडपटा बाहेर हो' असे म्हणून त्याने पेरीला दरवाजातून बाहेर लोटून दिले. भेलकाडत इमारतीच्या पायऱ्या उतरत पेरी रस्त्याला लागला. मिट्ट काळोख पडला होता. रस्त्यावर रहदारी अजिबात नव्हती.

## तू आता मित्रांमधे आहेस

'माझे मागून ये' पेरीला कानामागे फ्रेंचमध्ये कुजबुज ऐकू आली भेलकांडत पेरी त्या अज्ञात वाटाड्यापासून योग्य अतर राखून जाऊ लागला. बऱ्याच गल्ल्या बोळातून पेरीला फिरवल्यावर तो वाटाड्या एका जुनाट इमारतीत शिरला. त्याच्या मागोमाग त्या इमारतीत पेरी शिरला. वाटाड्या इमारतीचे आत अनेक जिने चढून जाऊ लागला. असल्या वेदना सोसत हूं की चूं न करत पेरीने त्याच्या मागोमाग तितके जिने चढण्याचे दिव्य केले शेवटी एका दारावर त्या वाटाड्याने खुणेच्या टिचक्या वाजवल्या दार उघडले गेले. पेरी आत शिरताच लगेच दार बद करण्यात आले वाटाड्या निघून गेला.

'आता सर्व कपडे काढा. तुमचेसाठी गरम पाणी भरून टब तयार आहे.' आत असलेला माणूस म्हणाला, गरम पाण्याचे टबात पडून राहिल्यावर पेरीला खूपच बरे वाटले. टबातून बाहेर येताच अग कोरडे करायला टॉवेल व कपड्याचा दुसरा जोड पेटीला देत तो माणूस म्हणाला, 'आता तुम्ही मित्राच्यात आहात. रात्र बरीच झाली आहे. तुम्ही निवांत झोप काढा. आम्ही या शहरातील भूमिगत कार्यकर्ते आहोत. तुम्हाला अटक झाल्यापासून आम्ही रोज चोवीस तासाची जागती पाळत गेस्टॅपोचे हेडक्वार्टर्स बाहेर ठेवली होती. सुटका होणारे तुम्ही शेवटचे. तुम्हा सोळाजणापैकी तीन जण मरण पावले. बाकी तेराजणाची सुटका झाली आहे. पण त्या सोळात आपल्या कार्यकर्त्यांपैकी तुम्हीच एकटे आहात असे तुमचे गावचे भूमिगत गटाने आम्हाला कळवले होते. त्यामुळे खरी काळजी तुमचीच होती.' अनेक दिवसानतर त्या रात्री प्रथमच पेरीची पाठ बिछान्याला लागली. सहन न होणाऱ्या कळा शरिरातून येत असूनही पेरीला निवांत झोप लागली.

पेरी फार तर दोन-तीन तासच झोपला. पण पहाटे जागा झाल्यावर त्याला बरीच हुशारी वाटू लागली. तो जागा झाल्यावर तेथे बसलेल्या दोघापैकी एकजण उठून बाहेर गेला थोड्याच वेळात बरोबर एका डॉक्टरला घेऊन तो इसम परत आला. डॉक्टरने पेरीची नीट तपासणी केली. त्याचे मोडलेले नाकाचे हाड साधण्यासाठी पट्टी लावली. करगळीच्या मोडलेल्या हाडाला पण प्लॅस्टर लावले. पेरीला त्याने मिठाच्या गुळण्या करायला लावल्या त्यायोगे तोडातील व घशातील उकळत्या पाण्याच्या जखमाचे वेदनापासून पेरीला बराच आराम पडला. मग त्याने पेरीला भरपूर ऑलिव्ह ऑईल पाजले. त्यायोगे आतडी मऊ पडून तेथील वेदनाही कमी झाल्या. असे सर्व प्रथमोपचार केल्यावर त्याने पेरीला औषध दिले त्याच दिवशी दुपारी त्याच्या गावाकडे जाणारा एक शेतकरी बघून त्या शेतकऱ्याचे घोडागाडीतून पेरीची त्याचे पेट्रोल पपावर रवानगी करणेत आली. सुटका होताच यडपट जर परत लगेच पेट्रोल पपावर दिसला नाही तर गेस्टॅपोची नजर पुन्हा पेरीकडे वळण्याची शक्यता होती. ती गोष्ट पेरीला अगर त्याला शहरात आसरा देणाऱ्यांना परवडण्यासारखी नव्हती. पेट्रोल पपावरील त्याच्या खोपटात मात्र त्याचे आगमनाचे दृष्टीने शक्य ती सर्व सुविधा तयार ठेवली होती. डॉक्टर येऊन त्याला ट्रीटमेंट देऊन जात होते. त्याचे स्थानिक सहकारी त्याची सर्वतोपरीने काळजी घेत होते. तोड व घसा सुजल्यामुळे पेरीला काही गिळतासुद्धा येत नसे. त्यामुळे त्याला थोडे थोडे सूप दिवसातून बऱ्याच वेळा पाजण्यात येई. आठ दिवसानी डॉक्टरने पेरीला किंचित उकडलेली अडी देणेस सुरुवात केली. पंधरा दिवसात हिंडता फिरता होऊन पेरी आपले उद्योगाला लागला.

या काळात युरोपवर दोस्तानी तुफान विमान हल्ले सुरू केले होते. जर्मनानीही फ्रान्सचे किनाऱ्यावरच त्यातील बरीच विमाने पाडण्याचा सपाटा चालवला होता. त्या वैमानिकांना सुखरूप परत पाठवणेचा उद्योग बराच वाढला होता. इतक्यात लंडनहून पेरीला हुकूम आला. 'त्या भागातील सर्व पुलाची मोजमापे पाठवा.' पेरीलाच काय पण साऱ्यानाच हुरूप आला. पूल उडवण्याऐवजी त्याच्या मोजमापाचे काम आले याचा अर्थ लवकरच त्या पुलाचा वापर करण्याचा दोस्तांचा विचार आहे ही गोष्ट साऱ्याना आनंददायकच होती लवकरच दोस्त सेना फ्रान्समध्ये उतरणार या आशेनेच सारेजण एका अनामीक उत्साहाने झपाटले गेले. पूल उडवण्यापेक्षा पुलाचे मोजमाप घेण्याचे काम कमी धोक्याचे व जास्त सोपे होते. पेरी आपली खुळचाची बतावणी कायम ठेवून दिवसा-उजेडी ते काम करू शकत होता. पेट्रोल पपावरचे यडचाला गळ टाकून मासे मारायचे खूळ लागले. पंपावरच काम तसेच सोडून येडा आपला गळ घेऊन आसपासचे नदी-नाले धुंडाळू लागला. त्यासाठी नदी-नाल्यात फारसे पाणी असले नसले

तरी त्याची त्या यडपटाला काळजी नसे. बरे एका जागी बसून गळ टाकून सारखा बसेल तर 'छचाऽ! नाव नको!' 'इथं मासा गळाला लागत नाही काय?' असे पुटपुटत येडा दर दहा पंधरा मिनिटात पुलावरचे पुलावरच जागा बदले. क्वचित कधीतरी मासा गळाला लागे. नाही असे नाही. पण बहुधा यडचाला मासे धावतच नसत. मग कंटाळून स्वारी परत सायकलवर चढून दुसऱ्या पुलावर जाई. लहर लागली की परत पंपावर येऊन कामाला लागे. परत लहर फिरली की घेतला गळ, मारली सायकलला टांग. निघाला कुठला-तरी नदी-नाला धुंडायला. त्याच्या यडपटपणाला हे सारे साजून दिसे. कुणी अधूनमधून त्यावरून त्याची चेष्टाही करत. त्याला दूरवरचे अगदी कोरडचासुद्धा नदी-नाल्याकडे दौड करायला लावीत. पेरीनें दांड्याची व गळाचे दोरीची लांबी मोजलेली होती. त्यामुळे या वेडचा चाळचात प्रत्येक पुलाची लांबी-रूंदी व खोली पेरीला मिळून जाई. पंपावर परत आल्यावर ती माहिती पेरी ग्रेगरीकडे देई. आपल्या इतर सहकाऱ्याचे मदतीने वायरलेसचे सहाय्याने ती माहिती लंडनला पोचविणेचे काम ग्रेगरी पार पाडी. वायरलेस ऑपरेटरचे काम पेरीला हेर खात्यानें शिकवले होते. पण त्याला वायरलेस सेटचे जवळपास सुद्धा न फिरकण्याचे लंडनचे आदेश होते. त्या कामात पकडले जाण्याचा धोका जास्त होता व एक वायरलेस ऑपरेटर यापेक्षा जास्त महत्त्वाचे काम पेट्रोल पंपावरील खुळचाचे रूपाने पेरी करीत होता. त्या कामासाठी दुसरा मनुष्य उपयोगी पडण्यासारखा नव्हता.

असे बरेच दिवस गेले. मग एकदिवस अचानक दोस्तांच्या सेना नॉर्मंडीचे किनाऱ्यावर उतरल्या. पेरीचे गाव त्यांनी मुक्त केले. दोस्तांच्या गाडचा पेट्रोलपंपावर पेट्रोलसाठी येऊ लागल्या. त्या वाटेने पुढे आघाडीवर गेलेल्या ब्रिटिश, अमेरिकन, कॅनेडियन सैनिकांचे हिशेबी तो त्यांचे गाडचात पेट्रोल भरणारा, कुणीही चेष्टा केली की खांद्याला झटकारत लचकत लचकत, अर्धवट उघडचा तोंडाने हासणारा, तोतऱ्या गांवढळ फ्रेंचमधे बोलणारा येडपट नॉर्मन हरकाम्या होता. त्यानी इंग्लिशमधे आपआपसात याची कितीही टर उडवली तरी ती त्याला समजत असेल अशी शंका सुद्धा त्याना पेरी येऊ देत नव्हता. कारण जॉर्जला लंडनहून पेरीच्याच भूमिकेला चिकटून बसण्याचे आदेश देण्यात आले होते. असेच काही दिवस गेले. दोस्त सैनिक पॅरीसजवळ पोचले, आणि एके दिवशी पेरीला आदेश मिळाला गावापासून चार मैलावर असलेल्या एका गोठचात जाऊन पुढील आदेशाची वाट पहा. आपल्या मित्र मंडळीचा निरोपही न घेता पेरीने गुपचूप त्या गोठचाची वाट धरली. तीन दिवसपर्यंत पेरी त्या गोठचातच छपून राहिला. चौथे रात्री स्थानिक टोळीतील धर्मोपदेशक ट्रे तेथे आला. पेरीला तो म्हणाला, 'माझे बरोबरच चल!' मुकाटचाने त्याचे मागोमाग पेरी चालू लागला. ते दोघेही एका मोठचा शेताचे मध्यभागी येऊन थांबले. 'तू येथेच थांब' एवढेच पेरीला सांगून दोस्त अंधारात गडप झाला. थोडचाच वेळात त्या शेतावर एक विमान घिरटचा घालू लागले. काही वेळ घिरटचा घालून ते विमान त्याच शेतात उतरले. त्यातून एक वैमानिक बाहेर आला. त्याचे अंगावर ब्रिटिश विमानदलाचा गणवेश होता. पेरीला बघून 'विमानात चढ' एवढाच आदेश त्याने दिला. पेरी विमानात बसताच तो वैमानीकही विमानात चढला. विमानाचा दरवाजा त्याने लावून घेतला. विमानाने हवेत झेप घेतली. त्यानंतर पेट्रोल पंपावरील वेडा पेरी पुनः कुणाला दिसला नाही. पेरीचा अवतार समाप्त झाला होता. पुनः जॉर्ज या आपल्या मूळ रूपात तो प्रवेश करणार होता.



पेरी...जॉर्ज...पेरी...डॉक्टरांना काळजी वाटत होती

पण खरोखर पेरीचा अवतार इतक्या झपाटचाने संपणे शक्य होते का? गेली सतत चार वर्षे जॉर्जचे व्यक्तिमत्व पेरीचे व्यक्तिमत्वाखाली इतके दडपून ठेवणेत आले होते, की त्या रूपात इतक्या हालअपेष्टा आणि वेदना जॉर्जने सहन केल्या होत्या की पेरीचे आत दुसरी कोणी व्यक्ती दडली आहे याची पुसट देखील शंका कुणाला येऊ शकली नाही. इतका जॉर्ज पेरीमय झाला होता. मग केवळ विमानातून फ्रान्सची भूमी सोडून ब्रिटिश बेटात प्रवेश करताच पेरीचे भूत जॉर्जची मानगूट सोडील अशी समजूत कितपत योग्य होती. लंडनला पोहचताच जॉर्जने पेरीचे तडाख्यातून सुटल्याचा निश्वास टाकला होता. पण पेरीचे भूत जॉर्जला असे सहजासहजी सोडणार नाही याची ब्रिटिश हेर खात्याचे मानस शास्त्रज्ञाना पूर्ण कल्पना होती. त्यामुळे लंडनला उतरताच त्याचे वरिष्ठांनी त्याचे स्वागत करताच त्याला प्रमोशन दिल्याचे त्याचे कानावर घालून त्याचे घरून आलेले सर्व टपाल त्याला वाचायला दिले, त्याचप्रमाणे झोपेचे इंजेक्शनही दिले. जॉर्जने भरपूर झोप घेतल्यावर त्याचे बरोबर गप्पा मारून त्याचे पेरीचे अवताराबद्दलची सर्व माहिती काढण्याचे कामही लवकर आटोपते घेतले व त्याला संपूर्ण शारिरिक तपासणीसाठी डॉक्टरांचे स्वाधीन करण्यात आले. डॉक्टरनी कसोशीने त्याची संपूर्ण शारिरीक तपासणी केली. गेस्टॅपोचे अत्याचाराच्या साऱ्याच जखमा अद्याप बऱ्या व्हावयाच्या होत्या. नाकाचे व करंगळीचे हाड अद्याप नीट जोडले गेले नव्हते. तोंडातील, घशातील व आतडचातील जखमा चिघळण्याचा संभव होता. आणखीन काही कॉम्प्लीकेशन होण्या पूर्वी यावर उपाय योजना होणे आवश्यक होते. बोलता बोलता मध्येच पेरीचे भूत जॉर्जचा कब्जा घेई, त्याचा हात कापू लागे. तोंड अर्धवट उघडे राही. फ्रेंचमधे तोतरेपणाने तो बोलू लागे. हे भूत पण पार गाडणे आवश्यक होते. या

सर्वासाठी जॉर्जला हॉस्पिटलमधे दाखल करण्यात आले.

प्रथम शरिराचे डॉक्टरनी जॉर्जचा ताबा घेतला. जॉर्जवर ऑपरेशन मागून ऑपरेशन करण्यात येऊ लागली. एका ऑपरेशनमधून बरे होऊन दुसरे ऑपरेशन करण्याचे मधल्याकाळात मानसोपचार तज्ज्ञ जॉर्जबरोबर गप्पा मारायला येत. गप्पांचे ओघात जॉर्जचे मनातून पेरीचे भूत हळूहळू काढून टाकण्याचा ते प्रयत्न करीत. 'तू आता पेरी व पेरीचे गाव पूर्णपणे विसरण्याचा प्रयत्न कर' जॉर्जला ते वारवार सांगत. त्या कामी जॉर्जला मदत व्हावी म्हणून ते मुद्दाम जॉर्जचे बालपणाबद्दल, विनिपेगचे घराबद्दल, इष्टमित्राबद्दलच्या गप्पा जॉर्जबरोबर मारीत बसत. असे जवळ जवळ सहा महिने गेले. जॉर्जची करंगळी, नाक, जबडा, घसा, आतडी वगैरेवर शक्य होत्या त्या सर्व दुरुस्त्या पुन्या झाल्या. जॉर्जचे चालण्या बोलण्यात डोकावण्याचे पेरीने बंद केले होते. आपण आता पूर्ण बरे झालो असा जॉर्जला आत्मविश्वास वाटू लागला. एक दिवस जॉर्ज डॉक्टराना म्हणाला, 'डॉक्टर मी एकट्यानेच हॉस्पिटलमधील जागा आणखीन काळ अडवून ठेवणे मला प्रशस्त वाटत नाही. या जागेची इतरही अनेकांना गरज आहे.'

## डर्बीशायरमधील पाहुणचार

"खरं आहे तुमचं म्हणणं. उद्याच आपण तुम्हाला डिस्चार्ज देऊ, पण आता तुम्ही इतके हाल सोसले आहेत की तुम्हाला विश्रांतीची फार जरूर आहे. तेव्हा तुम्हाला सुट्टी मंजूर केली आहे. डर्बीशायर मधील एका माजी सेनाधिकाऱ्याने तुम्हाला पाहुणे म्हणून सुट्टीसाठी त्याच्या पिढीजात आलिशान वाड्यावर बोलावले आहे. तेथे तुम्ही मुलकी पोशाखात जाऊ शकता. मात्र लष्करातून तुम्हाला अद्याप डिस्चार्ज दिलेला नाही. रजा संपली की तुम्हाला कळविणेत येईल. तोपर्यंत तुम्ही रोज दहा वाजता न चुकता तुमचे हेडक्वार्टर्सला फोन केला पाहिजे. डॉक्टरनी जॉर्जला सांगितले.

दुसऱ्याच दिवशी सकाळी एका खास कारमधून मुक्तीमधील जॉर्जला त्या अलिशान वाड्यावर नेऊन सोडण्यात आले. घरधन्याने व त्याचे सर्वच कुटुंबियांनी जॉर्जचे फारच प्रेमाने व आपुलकीने स्वागत केले. त्याला अगदी घरचाच एक बनवून सोडला. जॉर्जचे तेथील दिवस मजेत जात होते. खावे प्यावे, मजा मारावी असा त्याचा तेथील जीवनक्रम चालू होता. नॉर्मंडीतील पेरी, सोसलेल्या हाल अपेष्टा सारे काही एका रात्री पडलेले दुःस्वप्नच वाटू लागले होते.

जॉर्जसाठी सुट्टीची अशी सुखकर सोय करून जणू काही, जॉर्जला सोसायला लागलेल्या साऱ्या हालअपेष्टांची पूर्ण भरपाई करायचाच हेरखाते प्रयत्न करीत होते. रोज सकाळी दहाचा फोन सोडून जॉर्जचा लष्कराशी कोणताही संबंध नव्हता. फोनवर, परत हजर कधी व्हायचं, असं जॉर्जने विचारले तर 'काय घाई आहे, मजा मारा' असा त्याला सल्ला मिळे. जॉर्जला एके दिवशी सकाळी लवकरच जाग आली. हवा मस्त होती. सूर्याची कोवळी किरणे बाहेर पडली होती. बागेतील फुलझाडांचे ताटवे ह्या कोवळया सूर्यकिरणात फारच छान दिसत होते. त्याचे खोली समोरचेच फुलझाडाचे वाफ्याचे कुंपण जरा अस्ताव्यस्त वाढले होते. जॉर्जच्या ते डोळयात खुपले. चला ब्रेकफास्ट झाल्यावर आपणच ते छाटून नीट नेटके करू. सारी तरुण माणसं लढाईवर गेलीत. मग एकटा म्हातारा माळी काय काय करणार. नाहीतरी आपण येथे आळशासारखा नुसताच रिकामटेकडेपणा करतोय. आपला पाहुणचार ही माणस किती आपुलकीन करताहेत. आपण पण घरच्यासारखेच बाग जरा नीटनेटके ठेवायला मदत करूया" जॉर्जने मनात विचार केला. ब्रेकफास्ट होताच जॉर्जने माळयाकडून कुपण छाटायची कात्री मागून घेतली. तो कुपण छाटू लागला. थोड्या वेळाने माळी जॉर्जच कस काय चाललय हे पहायला आला. "वाऽ! झाक झाल हं आता इथल कुंपण. तुमचा कामाचा झपाटा मात्र फारच आहे" माळी म्हणाला. पण तो काय म्हणतोय तेच जॉर्जला ऐकू आले नाही. किंबहुना तो माळी तेथे आहे हेच जॉर्जचे खिसगणतीत नव्हते. त्याला ते कुंपणही दिसत नव्हते. या कुपणातील झाडाझाडात जॉर्जला गेस्टॅपोचे अधिकारी दिसत होते. त्यांनी पकडण्या पूर्वीच त्यांना छाटून टाकण्यासाठी तो जोरजोरात कात्री चालवीत होता. माळयाचे डोळया देखत सारे कुपण भुईसपाट होत आले. माळयाने कपाळालाच हात लावला. जॉर्जला अडवण्याचा प्रयत्न तो करणार पण त्यापूर्वीच जॉर्ज ग्लानी येऊन बागेतच जमिनीवर कोसळला. माळयाने तावडतोब धावाधाव केली. फोन करताच लष्कराची ॲम्ब्युलन्स हजर झाली. जॉर्जला तावडतोब लष्कराचे इस्पितळात नेण्यात आले. डॉक्टर वाटच बघत होते. त्यांनी जॉर्जचे सगळे कपडे उतरले व त्याला एका गरम पाण्याने भरलेल्या टबात ठेवले. सतत पाच दिवस जॉर्ज बेशुद्धच होता. जॉर्जने डोळे उघडले तेव्हा तो गरम पाण्याचे टबातच होता. एक माणूस टक लावून त्याचेकडे पहात होता.

"मी कुठे आहे?" जॉर्जने त्या माणसाला विचारले. विचारले म्हणण्यापेक्षा तोडातल्या तोडात पुटपुटला असे म्हणणेच योग्य होईल. त्या माणसाला कळले इतकेच की जॉर्ज शुद्धीवर आला असून काही तरी बोलतो आहे. जॉर्ज काय बोलतो आहे हे ऐकायला त्या माणसाने वाकून जॉर्जचे तोडाजवळ कान नेण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात जॉर्जला पुन: ग्लानी आली होती. दोन शब्द बोलण्याचे श्रमसुद्धा जॉर्जला जास्त झाले होते. तो माणूस हॉस्पिटल मधील अटेंन्डन्ट होता. जॉर्ज हॉस्पिटलमध्ये आल्यापासून गेले पाच दिवस सतत दिवसाचे चोवीस तास त्याचे टबजवळ हॉस्पिटलचा अटेंन्डन्ट पाळी पाळीने हजर असे. जॉर्ज शुद्धीवर येताच डॉक्टरांना तावडतोब कळवण्याचे काम त्यांचेवर सोपविले होते. त्याप्रमाणे त्या अटेंन्डन्टने डॉक्टरना कळवले. डॉक्टरनी जॉर्जला टबातून काढून त्याचे अंग कोरडे करण्याचा हुकूम दिला. जॉर्जला कपडे चढवून बिछान्यावर निजवण्यात आले. तो शुद्धीवर केव्हा येतो याची वाट पहात डॉक्टर जॉर्जचे शेजारीच बसून राहिले. असे अनेक तास गेले. जॉर्जने परत डोळे उघडले. त्याने डॉक्टरना पण ओळखले.

'वाऽ! झकास. आता अगदी पूर्ण विश्रांती घ्या' डॉक्टर हसून म्हणाले. खरोखरच त्यानंतर अनेक दिवस जॉर्जला अगदी श्रांत वाटत होते. किती तरी दिवस तो बिछान्यावर पडून होता.

'मला काय झालय!' एकदा जॉर्जने डॉक्टरांना विचारले.

'काळजीचे कारण नाही. जी गोष्ट तुम्हाला कधी होते याची आम्ही वाट पहात होतो, तीच तुम्हाला झाली आहे. आता तुमची पेरीचे व्यक्तिमत्वापासून सुटका झाली आहे. या पूर्वी तुम्ही प्रयत्न-

पूर्वक पेरीला विस्मृतीत गाडून टाकले होते. परंतु तुमच्या मनाचे एका कप्यात पेरी दडून बसला होता. योग्य संधी मिळताच तो तुमचे मानगुटीला बसणार होता. त्यामुळे पेरीला तुमचे अंतर्मनातून बाहेर काढून टाकणे आवश्यक होते. गेली चार वर्षे फार मोठ्या मानसिक दडपणाखाली तुम्ही पेरीची भूमिका बजावीत होता. तो पूर्णपणे विसरणे शक्य नव्हते. तुमचे मनाला पूर्ण विश्रांती देऊनच पेरीचे भूत तुमचे अंतर्मनातून काढून टाकणे शक्य होते. तुम्हाला सुट्टीवर पाठवण्याचा उद्देश हाच होता. तुमच्या उपचाराचाच तो भाग होता. तो उपयोगी पडला म्हणून आम्हाला फार आनंद झाला आहे. आता तुम्हाला पेरीचे भुताचा त्रास होण्याची शक्यता नाही. काही महिने तुम्ही आता पूर्ण विश्रांती घ्या. शारिरीक व मानसीकही.'

हे ऐकल्यापासून जॉर्जने ती विश्रांती मजेत घालवण्यास सुरुवात केली. त्या काळात रोज त्याला गरम पाण्याचे टबमध्ये तीन तास ठेवण्यात येई, त्यायोगे त्याचे स्नायू व मज्जातंतू ढिले पडून त्यावरील ताण नाहीसा होण्यास मदत होई. त्या मुळे त्याला हळूहळू पुनः ताकद वाटू लागली. स्वप्नाशिवाय गाढ झोप येऊ लागली. आपले सर्व व्यवहार तो स्वतंत्रपणे करू लागला. सैन्यातून डिस्चार्ज देऊन त्याला कॅनडात परत त्याचे घरी जाण्यास परवानगी देण्यात आली. त्याच्या घरी जाण्याची सरकारी व्यवस्था करण्यात आली. गुप्ततेच्या कायद्याला खास अपवाद करून आपल्या या आगळ्या युद्धकार्याची माहिती आपल्या बायकोला सांगण्याची परवानगी देण्यात आली. बायकांचे तोंडात तीळ भिजत नाही ही गोष्ट माहीत असूनही हा अपवाद करण्यात आला. सुरळीत नागरी जीवन सुरू करण्यासाठी जॉर्जचे मनाविरुद्ध उरला सुरला भार नाहीसा होण्यासाठी याची आवश्यकता आहे असे मानसोपचार तज्ज्ञांचे मत होते.

१९४६ मध्ये जॉर्ज विनिपेग या आपल्या गावी परत आला. युद्धामुळे तुटलेला संसाराचा धागा पुनः जोडून त्याने आपला संसार सुरू केला. त्याचे नागरी जीवन पुनः सुरू झाले. एका रासायनिक कंपनीचा ब्रँच मॅनेजर म्हणून जास्त चांगली नोकरी मिळाल्याने जॉर्जने विनिपेग गाव सोडून कॅलग्रे या कॅनडातीलच दुसऱ्या गावी आपले बिऱ्हाड हलवले. तेथे त्याला दोन मुलगे झाले. एक सुखी व तृप्त कुटुंब म्हणून जॉर्जचे नागरीजीवनाची गाडी पुनः मार्गी लागली.

**स मा प्त**


## भविष्यकालीन खर्चाच्या अनेक बाबी आपल्याला काळजीत पाडत आहेत ना ?

आपली काळजी दूर करण्यास आमची 'आवर्तक ठेव' योजना समर्थ आहे. आपल्या मुलीचे लग्न असो, मुलाचे उच्च शिक्षण असो वा एखादी भारी खरेदी असो, आपल्याला त्या त्या कारणासाठी आवश्यक असलेला पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळे खात्रीने उपलब्ध होऊ शकतो.

दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढत जाईल आणि तुम्हास असे जाणवेल की आमच्या आवर्तक ठेव योजनेने तुमची चिंता दूर केली आहे. दरमहा तुम्ही रुपये पाच किंवा त्याच्या पटीत रक्कम आवर्तक ठेवीमध्ये ठेवा. आवर्तक ठेव योजनेखाली आपल्याला सहा ते सव्वासात टक्क्यांपर्यंत व्याज मिळेल.

अधिक तपशीलासाठी आमच्या नजिकच्या शाखेस आजच भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

**हेड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ पुणे २.**

# पाक्षिक भविष्य

कृष्ण माईणकर

**दि. १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर १९७३**

**भारत-पाक कराराला स्थैर्य कमीच !**

चौथ्या मंगळाचे, स्वास्थ्य व शांती बिघडवून टाकणारे परिणाम किती भीषण ठरले आहेत हे भारतीय जनता पाहात आहेच. महापुराने उत्तर भारतात मोठे संकट उभे केले आहे व ओल्या दुष्काळाने 'चिंब' झालेले भवितव्य काळ्या सावल्या दाखवीत आहे. पश्चिम व दक्षिण भारतात मात्र पावसाने सुगी आणली आहे. गेल्या पंधरवड्यात घडलेली महत्त्वाची घटना म्हणजे भारत-पाक नवा करार होय. चौथा मंगळ व आठवा रवी हे या कराराच्या वेळी भारताला अत्यंत प्रतिकूल आहेत. भारताचे परमेश्वर हक्सर व पाकिस्तानचे अझीझ यांच्या वाटाघाटीचा घोळ होऊन शेवटच्या क्षणी 'चमत्कार' होऊन घडलेला हा करार तात्पुरता फायद्याचा वाटत असला तरी तो टिकाऊ ठरण्याची शक्यता कमीच आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान श्री. भुट्टो भारताबरोबर डावपेच खेळतील. बांगलाच्या पंतप्रधानांचे मत भारताविरुद्ध कलुषीत करण्याचा प्रयत्न करतील. मुजीब थोडेफार भुट्टोच्या 'जवळ सरकतील.' श्रीमती इंदिरा गांधींना या कराराचाही कटू अनुभव येईल. भारताची आर्थिक परिस्थिती जास्त खालावेल. महाराष्ट्रातील शासनाला थोडीफार सुबुद्धी सुचण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक स्तुतीचे धनी बनतील. महाराष्ट्रात चालू असलेले दोन संप, एक रेल्वे (दक्षिण-मध्य) व दुसरा डॉक्टर सन्मान्य तडजोडीने मिटण्याची शक्यता आहे. मात्र महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात मतभेदाची लागण शक्य.

**मेष** : विरोधकांचे सहकार्य

कन्या राशीच्या लोकांना आठव्या मंगळाने व बाराव्या रवीने हैराण केले होते. शरीराला आरोग्य लाभत नव्हते तर मनाला स्वास्थ्य लाभत नव्हते. पण दि. १६ ला रवी पहिला झाला आहे. आता हळूहळू तव्येतीला असलेली प्रतिकूलता कमी होऊ लागली असून मंगळाची वक्रदृष्टी आहेच. त्यामुळे धाडस करून उपयोगी नाही. पण या पंधरवड्यात थोडेफार स्वास्थ्य गवसणार आहे हे निश्चित समजा. दि. १६ ते १९, दि. २२ ते २५ व दि. २८ ते ३० हा कालखंड लक्षात ठेवा. विशेष महत्त्वाचे उपक्रम यावेळी घडणार आहेत. आशा-आकांक्षा नवे रूप धारण करणार आहेत. औद्योगिक क्षेत्रात नव्या युगाची नांदी गायली जाणार आहे. प्रामुख्याने दि. २७ ची बुध हर्शल युती काही तरी उत्साहवर्धक असे घडवणार आहे यात शंका नाही. तुमची बेकारी संपून तुम्हाला नोकरी नुकतीच मिळाली आहे, त्यात बदल होऊन दुसरी चांगली यावेळी मिळणार आहे. चालू नोकरीतील अडचणी व पेचप्रसंग, प्रतिकूलता आणि दगदग कमी होईल. तुमच्या वरिष्ठांची बदली होणार असून येणारे नवीन वरिष्ठ तुमच्या कच्छपी लागतील. पगारवाढीचा अर्ज करायला इतका उत्तम काळ गेल्या कित्येक वर्षात नव्हता. दुसरी यावेळी घडणारी घटना म्हणजे तुमच्याविरुद्ध सतत कारस्थाने व तक्रारी करणारे लोक यावेळी अंतःकरणाने खरेखुरे बदलणार असून ते तुमच्याशी सहकार्य करणार आहेत. उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी काही प्रयत्न चालू असल्यास ते यशस्वी होतील. थोरांचे सहकार्य मिळेल. प्लॉट अगर घर विकत घेण्याची इच्छा पुरी होईल. लॉटरीत पैसे मिळणार आहेत. रेसमध्येही एखादा भाग्यवान ठरणार आहे. परदेशी जाण्याचे स्वप्न पंधरवड्याच्या शेवटी दृष्टिपथात येऊ लागण्याची चिन्हे दिसू लागतील. मुलांच्या तव्येतीला जपणे मात्र आवश्यक आहे. **महिलांस** : स्वतःच्या हिंमतीवर राजकारणात नाव मिळवाल. सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा मिळणार आहे. संसारसुखात प्रगती होईल. ◘

**वृषभ** : अनुकूल रवीचा लाभ

तुम्हाला एकटा मंगळ बारावा आहे. एरवी ह्या मंगळाचे सामर्थ्य एवढे मानण्याचे कारण नव्हते. पण हा मंगळ स्वगृही मेष राशीत आहे. त्यामुळेच त्याचे सामर्थ्य एवढे मोठे आहे की तो मनात आणील तसा धडा तुम्हाला शिकवू शकेल. पण तरीही काही प्रमाणात सावधगिरी बाळगली तर या मंगळाचा तुम्हाला त्रास होणार नाही. खरे म्हणजे यावेळी तुमच्या प्रगतीच्या साऱ्या किल्ल्या आहेत रवीच्या हातात. आजच तो पाचवा झाला आहे व तोही कन्या या बुद्धीप्रधान आणि ज्योतिषशास्त्रदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या राशीत. भाग्यस्थानी गुरु व पंचमस्थानी रवी असतांना तुमचे कर्तृत्व चमकून उठले नाही, तुमच्या महत्त्वाकांक्षेला बहर आला नाही तरच नवल ! प्रामुख्याने बुध हर्शल युतीच्या अलीकडे पलीकडे तुमच्या नोकरीत अशी काही एखादी महत्त्वपूर्ण घटना घडेल की त्यामुळे तुमचे वजन व प्रतिष्ठा एकदम वाढणार आहे. कुणालाही हेवा वाटावा असे यश तुमच्या पदरात पडणार आहे. दि. १७ ते २० या काळाची नोंद घ्यावी. नोकरीत अनुकूल बदल, वाणिज्य पदवीधर, डॉक्टर, यांना उत्तम नोकरी मिळेल. बँकेत नोकरी लागेल. किंवा बँकेत वरिष्ठ जागी असलेल्या लोकांना महत्त्वाची जागा मिळेल. दि. २२ ते २५ या मुदतीत एखादा छोटामोठा उद्योग सुरू होईल. लहानसे दुकान सुरू होईल. वायदे व शेअरमध्ये फायदा. दि. २७ ते ३० राजकीय नेत्यांना अनुकूल असे काही तरी घडेल. राजकारणात मोठे पद विभूषीत कराल. मोठेपणा चालून येईल. सरकारी प्रवासाचा योग येईल. ओळखी होतील. आर्थिक परिस्थिती मात्र

फारशी समाधानकारक राहणार नाही, हाती पैसा दिसणे कठीण आहे. **महिलांस :** धार्मिक कार्य व व्रतवैकल्ये साग्रसंगीत पार पडतील. त्यासाठी पैसाही मिळेल. नोकरीत मात्र थोडा त्रास होईल. ¤

### मिथून : मन शांत ठेवा

साध्यासुध्या कारणावरून मन अस्वस्थ होऊ देण आपल्यासारख्या बुद्धीवतांने टाळले पाहिजे. मनावर परिणाम करणारी जरी एखादी घटना घडली तरी ईश्वरी उपासना आपले सरक्षण करू शकते. म्हणून आजचा कन्या राशीत येणारा चौथा रवी आपल्या मानसिक स्वास्थ्याला धक्के देईल हे गृहीत धरून दत्त उपासना करा. रोज गुरु चरित्र वाचा. म्हणजे ही स्थितीदेखील दूर होईल. मेष राशीत स्वगृही मगळ आहे. तो आपले आर्थिक जीवन उमटवील. श्रमाचे चीज होईल. उद्योगधद्याचे उचित असे फळ आपल्या पदरात टाकील. लॉटरी व रेसच्या वा इतर अकल्पित धनाच्या योजनेतून आपली आर्थिक भरभराट होईल. आर्थिक समृद्धी हेच या वेळच्या रवि मगळाच्या योगाचे रहस्य आहे. चौथा रवी मानसिक स्वास्थ्य मिळू देणार नसला तरी संततीसुख छान पैकी देईल. दूर राहिलेली मुले येऊन भेटतील. त्याच्याबद्दल शुभदायक वार्ता कानी येईल. दि. १७ ते २१ या काळात राहत्या जागेचा प्रश्न सुटेल. जागेसबंधी तटा चालू असेल तर त्याचा अनुकूल निकाल होईल. बंगला अगर प्लॉट घेण्याचे स्वप्न दृष्टीपथात येईल. दि. २२ ते २५ नोकरी काही वेळा नकोशी वाटेल. वैताग निर्माण होईल. पण वरिष्ठाची सहानुभूती राहील. हाताखालच्या माणसावर बारीक लक्ष ठेवा. हिशोबी कामाकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवा. दि. २६ ते ३० कॅशियरची कामे करणाऱ्यानी काळजी घ्यावी. पैशावर लक्ष ठेवावे. हरवणे, चोरी होणे अशासारख्या घटना घडण्याची शक्यता. बेकाराना अजून काही काळ कळ सोसायला हवी. त्याच्या सबंधी विचार होत असल्याचे दिसेल. **महिलांस :** घरातील जाणत्या माणसाबरोबर भाडण टाळा. गोडी गुलाबीने वागून इच्छित साध्य करणे उचित ठरेल. ¤

### कर्क : परिस्थितीत सुधारणा


साडेसाती माणसांना शहाणे करण्यासाठी येत असते. शनीचा हेतू नाश करणे हा नाही तर तुम्हाला धक्के देऊन सावध करणे, सावधगिरीने वागावयास लावणे हा आहे. त्यामुळे तुम्हाला बरा वाईट असा अनुभव येत असेलच. तुम्ही एक लक्षात घेणे आवश्यक आहे ते हे की शनीबरोबर केतू देखील बारावा आहे. याची दखल न घेता जर तुम्ही कोणताही व्यवहार केला तर त्याचे परिणाम फारसे अनुकूल होणार नाहीत. कर्ज काढणे, उसने पैसे देणे, हाताखालच्या लोकावर विश्वास टाकण, पैशाच्या व्यवहारात बेमावध रहाणे, बोलण्यावरचा ताबा सोडणे इत्यादी अनेक गोष्टी तुम्ही जर टाळल्या तर, कौशल्याने व सावधगिरीने वागलात तर ही साडेसाती तुम्हाला तापदायक होणार नाही. या पधरवडचात रवी तिसरा होत आहे तर बुध चौथा होत आहे. ही मोठीच जमेची बाजू होय. नोकरीत आजवर तुमच्या कर्तृत्वाचा होत असलेला संकोच यावेळी दूर होईल. मित्राच्या अगर हितचिंतकाच्या मध्यस्तीने तुमची अनेक काम होतील. मित्राचे सहकार्य मिळेल. दि. १७ ते २० नोकरीतीतील महत्त्वाच्या कामानिमित्त परदेशी प्रयाण होईल. नोकरी नसणाऱ्याना नोकरी मिळेल. योजनेचे कौतुक होईल. दि. २१ ते २५ चालू उद्योगधद्यात प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. परिस्थितीप्रमाणे एखादा नवा उद्योग सुरू होईल. प्रकाशन व्यवसायाला उर्जितावस्था येईल. अडचणीवर मात करणे शक्य होईल. लेखनाची थाबवलेली गाडी रुळावर येऊन वेग घेईल. आर्थिक परिस्थितीतीत थोडीबहुत सुधारणा होईल. दि. २७ ते ३० प्रामुख्याने आर्थिक स्थितीला कलाटणी मिळण्याची शक्यता आहे उद्योगधद्यासाठी कर्ज मिळू शकेल. व्यापारातील मदी इतिहास जमा होऊन पडून राहिलेला माल तेजीने खपेल. यावेळी कुटुबातील भाऊबदकी संपून आपुलकीचे नवे पर्व सुरू होईल. जागेचा प्रश्नही यावेळी अनुकूल असा निकाली निघावा. **महिलांस :** प्रेमात पडण्याचा उतावळेपणा न करणे हिताचे होईल. फसवणूक होण्याचो शक्यता आहे. ससारात जुळवून घेणे भाग पडेल. ¤

### सिंह : प्रतिष्ठा उंचावेल

राशिस्वामी रवी आजच दुसरा होत आहे. ही तशी अनुकूल घटना नसली तरी धनस्थानातील त्याचे प्रस्थान परिणामतः तुमच्या फायद्याचेच ठरावे असा सकेत दिसतो कन्या या बौद्धिक राशीत रवीचे प्रस्थान तुमच्या बौद्धिक कर्तृत्वाला तेज चढवील. अनेक महत्त्वाकाक्षी योजना तुमच्या मनात आकार घेऊ लागतील, काही पुऱ्या होऊ लागतील. प्रामुख्याने बुध हर्शलच्या युतीच्या आसपास अनेक महत्त्वाच्या अनपेक्षित घटना तुमच्या जीवनात घडाव्यात. दि १७ ते २१ हा कालखड नोकरीच्या दृष्टीने अत्यत महत्त्वाचा आहे. अनपेक्षित स्थलातर व स्थित्यंतर घडावे. राजकारणात सतत चालू असलेली माघार थाबणार असून उच्चपदस्थ शासनकर्त्याकडून तुम्हाला मानाचे बोलवणे येणार आहे तुमची प्रतिष्ठा वाढणार आहे. यावेळी कोणतीही निवडणूक असो तुम्ही ती लढवा. हमखास यश पदरात पडणार आहे. आर्थिक बाजू एवढी बळकट राहणार नाही. पैसा हाती येताना त्रास होईल. पैशाच्या प्रयत्नात खिळ पडण्याची शक्यता. उसने पैसे न मागणे बरे. दि. २२ ते २६ उद्योगधंद्याच्या दृष्टीने हा काळ छान आहे. कोणताही नवा व्यवसाय यावेळी सुरू करा. बेकारांना, तंत्रज्ञ, इजिनियर, वकिल याना उद्योगासाठी या काळात सहाय्य मिळेल. अनुकूल वातावरण राहील. घरबांधणीचे कॉंट्रॅक्ट घेणारे ठेकेदार-इजिनियर याना यावेळी चागला स्कोप मिळेल दि. २७ ते ३० या काळात सुगधी व्यापाऱ्याचे उखळ अक्षरशः पांढरे होईल. तेले, अत्तरे, धूप, सौंदर्य प्रसाधने उंची कापड इत्यादीचा व्यापार तेजीत चालेल. वायद्यात, बँकिंगच्या व्यवहारात चार पैसे मिळून ओढाताण कमी होईल. लॉटरी वा रेसमध्ये भाग घ्यायला हरकत नाही. भागीदारीच्या व्यवहारात फायदा. **महिलांस :** सार्वजनिक कार्यात तुम्ही वावरत असाल तर या वेळेची ग्रहस्थिती तुम्हाला मान व प्रतिष्ठा मिळवून देणारी आहे. ¤

### कन्या : थोडी थोडी सुधारणा

रवी व मगळ यानी तुमची कोंडी केली होती. तब्येत व पैसा या दोन्ही आघाड्यावर तुम्हाला शरणागती पत्करावी लागत होती.




## आपण असे आहात

वरील आकृतीत दर्शविल्या प्रमाणे आपल्या कुडलीत गुरु असेल तर आपले जन्म साफल्य झाले असे समजावे.

या ठिकाणच्या गुरु इतका उत्तम गुरु, अन्य कोणत्याही ठिकाणचा नसतो.

या गुरुमुळे आपला शरीर बांधा मजबूत, उंच व भव्य असा राहील. आपले व्यक्तिमत्व दाडगे राहील. आपली दुसऱ्यांवर चटकन छाप पडेल व आपणास मोठा मान सन्मान प्राप्त होईल. आपण निर्भय बनाल. आपल्या ज्ञानावर व शरीर सामर्थ्यावर आपला पूर्ण विश्वास राहून आपण कोणतीही गोष्ट आत्मविश्वासाने तडीस न्याल. आपण अत्यंत सभ्य व सद्वर्तनी असाल. आपल्या चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज झळकत असलेले कुणाच्याही दृष्टोत्पत्तीस येईल.

आपला विद्याभ्यास पूर्ण होईल. विद्या हीच खरी सपत्ती अशी आपली विचारसरणी असेल. हा गुरु विद्वता व संपत्ती या दोन्ही गोष्टी आपणास प्राप्त करून देईल व त्यामुळे आपण पूर्ण समाधानी जीवन जगाल.

आपणास पत्नीसुख अथवा पतिसौख्य पूर्णांशाने लाभेल व आपले पुत्रही चांगले कर्तृत्ववान निपजतील. आपणास कमीत कमी पाच अपत्ये होतील व त्यापैकी पुत्र अधिक असतील.

आपण दीर्घायुषी व्हाल. वार्धक्यात आपला देह थोडासा स्थूल बनेल.

आपला व्यवसाय न्याय खाते. शिक्षणखाते (प्राध्यापक अथवा शिक्षक) प्रवचन करणारे, कीर्तनकार, पुरोहित यापैकी असेल किंवा आपण एखादे समाजसुधारक किंवा लोकशिक्षणाचे कार्य करणारे देशभक्त असाल. आपणास अनुयायांची उणीव कधीच पडणार नाही.

या जगात आपण येऊन अशा प्रकारचे कार्य करून जाल की भावी पिढ्या आपले ऋण विसरु शकणार नाहीत. जनतेकडून आपल्या जयंत्या साजऱ्या केल्या जातील.

मात्र हा गुरु कोणत्याही पापग्रहाने बिघडलेला असता कामा नये. हा गुरु जर कर्क राशीत असेल तर आपण एक लोकोत्तर पुरुष ठराल.

**एन्. आर. साळवी, पनवेल.**

---

आठवा मंगळ आणि बारावा रवी म्हणजे भीषणतेची परमावधीच होय. पण पाचव्या गुरूने तुम्हाला सोशिकपणा दिला, सहनशक्ती दिली व रवीच्या त्रासातून तुम्ही एकदाचे बाहेर पडत आहात. आजच रवी पहिला होत आहे. दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने बाराव्या रवीपेक्षा हा रवी बरा आहे. आठवा मंगळ अजून तुमच्या राशीला बसलाच आहे. तो अजून काही काळ तरी तुमची तब्येत धडधाकट होऊ देणार नाही. पण थोडी सावधगिरी व काळजी घेतली तर हाही काळ निभावून जाईल. रवी-गुरुचा त्रिकोण योग व दहावा शनी यांच्याच हाती तुमच्या प्रगतीच्या चाव्या आहेत व ते तुमचे कल्याण केल्याखेरीज राहणार नाहीत. दि. १७ ते २० नोकरीतील पेचप्रसंग, वरिष्ठांची नाराजी, कामाचा ताण कमी होईल. दुय्यम व्यवसायाचे थंडावलेले गाडे पुनश्च सुरू होईल. चार पैसे हळूहळू हाती येऊ लागतील. तुमच्या शब्दाला महत्त्व येऊ लागेल. सहकाऱ्यांवर, वरिष्ठांवर प्रभाव पडू लागेल. दि. २२ ते २६ हा काळदेखील नोकरीच्या दृष्टीने अनुकूल आहे अपेक्षेप्रमाणे बदली होईल. नव्या नोकरीचा शोध लागेल. बेकाराना काम मिळेल. थांबलेले लेखन पुन्हा चालू होईल. झालेले नुकसान पुन्हा भरून येईल. ज्या नियतकालिकाकडील तुमचे लेखन थाबले आहे ते पुन्हा सुरू होईल. दि. २७ ते ३० या वेळी विशेष कोणतेही धाडस करू नये. नवा उद्योग सुरू करू नये. चालू धंद्यात विशेष लक्ष घालावे. आर्थिक परिस्थिती साधारण बरी राहील. महिलांस : नोकरीच्या दृष्टीने पंधरवडा जास्त अनुकूल आहे. काम नसलेल्या मुलीना वा महिलाना नोकरी मिळेल. गरजेपुरता पैसा मिळेल. ◻

### तूळ : माघारीचा काळ

राशिस्वामी शुक्र अनुकूल झाला आहे. पण रवी बारावा होत आहे व मगळदेखील असावा तेवढा अनुकूल नाही. त्यामुळे समिश्र फळाचा हा पंधरवडा आहे. साधारण 'जैसे थे' असे धोरण ठेवून वागल्यास फायदा झाला नाही तरी निदान नुकसान तरी होणार नाही. प्रामुख्याने दि. २७ च्या बुध-हर्षल युतीचा काळ, अधीक काळजी घ्या. सर्वसाधारण पधरवडा फारसा त्रासाचा नाही. दि. १६ ते २० खर्चाच्या सर्व योजना स्थगित ठेवाव्या किंवा ठेवाव्या लागतील. लाबणीवर पडतील. कारण पैसा मिळण्यात तात्पुरत्या अडचणी येतील. ठरलेला पैसा हाती येणार नाही. उसने पैसे ठरलेल्या दिवशी मिळणार नाहीत. खर्चाची नवी प्रकरणे निर्माण होतील. नोकरीत वरिष्ठांच्या मनात अगदी अकारण सशय निर्माण होईल. ते रुसतील. कामाचा ताण वाढेल. हाताखालची माणसे त्रास देतील. कलावताला त्याच्या कामाचे पैसे 'नाईट' ठरल्यापेक्षा कमी मिळेल. प्रसिद्धीची उपेक्षा होईल. वरिष्ठ, सरकारी अधिकारी, मत्री, आमदार, खासदार व कोणत्याही पदावर असलेले नेते लोक-

क्षोभाचे धनी बनतील. लेखक व पत्रकार यांनी या वेळी कोणतेही लिखाण जपून करावे दि २२ ते २७ या मुदतीत थोडी सुधारणा होईल. बेकारांचा लाबणीवर पडलेला कॉल या वेळी येईल. औषधी कारखाने व शेती व्यवसाय बरे चालतील. या व्यवसायातील लोकाना जरा सुख मिळेल. अपेक्षित पैसे मिळतील. दि. २६ ते ३० या काळात परदेशी प्रवास होईल. तसा योग येईल. महत्त्वाकांक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होऊ शकतील. अनेकाचे सहकार्याचे हात पुढे येतील. ज्यांच्यावर तुम्ही उपकार केले ते त्याची जाणीव ठेवून उपयोगी पडतील. नोकरीत कामाचा ताण कमी होईल. सुधारणा होईल. **महिलांस :** चौथा गुरू जागेचा प्रश्न सोडवील. चणचण थाबेल. मात्र खर्च फार होईल. त्याला आळा घाला. ◻

**वृश्चिक :** प्रगतीकडे आगेकूच

या पधरवडचाच्या शेवटी शेवटी होणारी बुध-हर्शल युती व लाभस्थानी रवीसारख्या असामान्य ग्रहाचे होणारे आगमन हीच या पधरवडचातील तुमची जमेची बाजू होय. राशिस्वामी मंगळ मेष राशीत स्वगृही सहावा आहे. त्याचा एरवी तसा उपयोग नसला तरी विरोधक, मत्सरी वगैरे लोकांचे तो चांगलेच कांडात काढील. तुम्हाला त्रास देणे, तुमच्या कामात अडथळे आणणे, तुमच्याविरुद्ध कट कारस्थाने करणे, असले कोणतेही प्रकार हा मगळ चालू देणार नाही. त्याचे सारे डाव हा मंगळ हाणून पाडील. त्याचे सारे बेत उधळून लावील. मात्र तब्येत थोडीफार नाजूक राहील. पित्त, पोटाचा त्रास होईल. डोके देखील अधूनमधून दुखत राहील. पण मोठा त्रास नाही. एवढी प्रतिकूलता सोडली तर हा पंधरवडा प्रगतीकडे नेणारा आहे. दि. १६ ते २० व्यवसायात स्थित्यतर होईल. उद्योगधंद्यात वाढीसाठी भागिदार वा भाडवल मिळेल. चालू उद्योगात जाणवत असलेल्या अडचणी निवारण होतील. सरकारी सहाय्य मिळेल. तंत्रज्ञाची मदत मिळेल. तोटचातील व्यवहार फायद्याच्या मार्गावर येतील. संप चालू असले तर ते मिटतील.- नवा उद्योग शेतीस पूरक असा करा. शेतीशी सबधीत असाही होऊ शकेल. खते, बियाणे यांचा व्यापार फायद्याचा होईल. दि. २१ ते २५ नोकरीत सर्वोत्कृष्ट काळ होय. कामाचा ताण कमी होईल त्रासदायक कामावरून बदली होईल. वरिष्ठाची मर्जी सपादन होईल. शिक्षक, पोलीस, महसूल खात्यातील लोक, शेती पदवीधर याना काळ उत्तम आहे. त्याच्या मनातील स्वप्ने साकार होतील. विवाहिताना ससारसुख मनाजोगे मिळेल. पती-पत्नीतील मतभेद मिटतील दि. २६ ते ३० धार्मिक कार्यात पैसा खर्च होईल. व साक्षात्काराचे दर्शन घडवणारी स्वप्ने पडतील. थोरा मोठचाचा आशीर्वाद मिळेल. तीर्थयात्रेचा योग येईल. आर्थिक स्थिती अनपेक्षित अशी बदलेल अनूकूल होईल. लोकाकडे येणे असलेले पैसे वसूल होतील. प्रतिष्ठा वाढेल. मित्राचे सहकार्य मिळेल. **महिलांस :** गोडीगुलाबीने व कौशल्याने वागलात तर अनेक इच्छा सफल होतील. चार पैसे मिळतील. ◻

**धनू :** नोकरीत अनुकूलता

मिथून या द्विस्वभाव व काहीशा चचल राशीत केतू व शनी आहे तर राशीत राहू आहे. तब्येतीच्या दृष्टीने ही ग्रहस्थिती निश्चितच प्रतिकूल आहे. शारिरीक अस्वास्थ राहील. मनात कसली ना कसली धाकधूक राहील. एखादा जुना आजार असेल तर तो मात्र कमी होऊ लागेल. तब्येतीची ही तक्रार सोडली तर हा पधरवडा प्रगतीचे नवे उन्मेष दृष्टिपथात आणणारा आहे. पाचवा मंगळ व आजच कन्या राशीत दहावा होणारा रवी ही अत्यंत अनुकूल ग्रहस्थिती असल्याने तुमच्या प्रगतीची नवी दालने खुली होतील. महत्त्वाकांक्षेला प्रोत्साहन मिळेल. दि. २७ च्या बुधहर्शल युतीच्या आधी एकदोन दिवस नोकरीत महत्त्वाची घटना घडेल. ही घटना तुमच्या भावी उज्ज्वल भविष्याचा पाया पक्का करणारी ठरेल. दि. १७ ते २१ उद्योग व्यवसायात विक्रमी यश पदरी पडेल. छापखाने, खते, कागदाचा व्यापार, स्टेशनरी, वूलन कापड, सोने-चादी व भरड धान्ये याचा व्यापार भरमसाट फायदा करून देईल. या मुदतीत तुमचा एखादा दुय्यम व्यवसाय सुधारू लागेल. प्रवासाचा योग, उच्चपदस्थ सरकारी व्यक्तीबरोबर स्नेह जुळून येण्याचीदेखील शक्यता आहे. दि. २२ ते २७ नोकरी करणाऱ्याना शुभदायक काळ आहे. आकांक्षा सफल होतील. वरची जागा मिळू शकेल महत्त्वाच्या कामावर बढती मिळेल. प्रमोशनचे काम आजवर होत नव्हते ते होईल. त्या बाबतीत अनुकूल हालचाल वेगाने सुरू होईल. वरिष्ठाची गैरमर्जी दूर होऊन त्यांची सहानुभूती लाभेल. कारखानदार वा मालक त्याच्या नोकरांवर कृपा करील. दि. २८ ते ३० तब्येतीत उत्तम सुधारणा. अनेक दिवस चालू असलेला आजार कमी होईल. उत्साह वाटू लागेल. मनातील निराशा अधारासारखी वितळून जाईल. खेळ, करमणूक यात हिरिरीने भाग घेण्याची इच्छा होईल. दूर गेलेले लोक पुन्हा सहवासात येतील आजवर झालेले नुकसान भरून निघेल. **महिलांस :** मनाची उद्विग्नता आता कमी होऊ लागेल. कोणतेही काम करायला उत्साह वाटेल. ससारात मन आनदी राहील. गुरु चांगला आहे. ◻

**मकर :** प्रसन्न साक्षात्कार

मगळ हा तुमचा मित्र आहे. पण त्याने तुमची कोंडी केली आहे. त्यामुळे गेले बरेच दिवस तुमचे मन गोधळलेले आहे. काय करावे, कसे करावे ही नुसती प्रश्नचिन्हे समोर उभी आहेत उत्तर मात्र सापडत नाही. अगतिकतेच्या एका चमत्कारीक अवस्थेत तुम्ही वावरत आहात. गुरुची पूर्ण कृपा आहे. त्यामुळे तुमचा तोल जात नाही एवढेच. पण मला सांगायला आनद वाटतो की दि १६ पासूनच रवी भाग्यस्थानी येत आहे आणि तो तुमची उलटगतीने फिरणारी भाग्यचक्राची गती पुन्हा योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करणार आहे. अनेक ग्रह अजून अनुकूल नाहीत. सारे काही ठाकठीक आहे असे मुळीच नाही. अजून सावधगिरी व समजस वृती ठेवायला हवी. पधरवड्याचा पहिला आठवडा अनेक बाबतीत अनुकूल आहे. दि. १६ ते २० निराशा व अगतिकता दूर होऊ लागेल. हाती घेतलेल्या कामातील अडचणी दूर होऊन त्यांना गती मिळेल. उद्योगात तटे चालू असतील तर ते मिटतील. विरोधकाचे सहकार्य मिळेल. नव्या उद्योगाला मात्र सध्या हात घालू नये. आर्थिक परिस्थिती फारशी सुधारली नसली तरी कामापुरता पैसा मिळेल. प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. दि. २१ ते २६ नोकरीत अनुकूल.

सामान्य जीवन जगणारे नोकर जरा प्रफुल्लीत होतील. त्यांच्या राहाणीत अनुकूल फरक पडावा असा पगार त्याना मिळू लागेल. कायम नसलेले, रोजगारीवर असलेले नोकर कायम होतील. इंजिनियरिंग व बांधकामाशी संबंधीत असे वरिष्ठ अधिकारी खूष होतील. त्यांच्यावर मंत्र्याची खास मर्जी राहील. या राशीच्या रेल्वे नोकराना समाधानकारक पगारवाढ मिळेल. नोकरी नसणाऱ्याना ती मिळेल. दि. २७ ते ३० आर्थिक परिस्थितीत यशस्वी स्थित्यंतर घडणार आहे. लॉटरीत नशीब उजळून निघणार आहे. पैशासाठी करावी लागणारी वणवण समाप्त होईल. पैसा एकदम हाती येईल. **महिलांस** : विवाहेच्छू मुलीच्या बाबतीत वर संशोधन सुरू होई. साखरपुडादेखील घडण्याची शक्यता आहे. ¤

**कुंभ** : कर्तृत्वाला बहर

शनीच्या गुणधर्माचा जास्त प्रभाव कुंभ राशीवर असतो. शुद्ध चारित्र्य, धार्मिक वृत्ती, निग्रही स्वभाव आणि हाती घेतलेले काम परिस्थितीवर मात करून तडीस नेण्याची विलक्षण जिद्द ही तुमच्या स्वभावाची खाशी वैशिष्ठ्ये होत. राशिस्वामी शनी पाचवा व मंगळ तिसरा ही असामान्य ग्रहस्थिती वरील वैशिष्ट्याच्या आविष्काराला अत्यंत पोषक आहेच. आपण योग्य पावले टाकलीत तर यश सहज मिळून जाईल. रवी मात्र आठवा होत असून तो तब्येतीला विघडवल्याखेरीज राहाणार नाही. कोणत्याही प्रकारचा जुना आजार रक्तदाब, हृदयविकार, पित्त, दमा वगैरे असलेल्यानी योग्य काळजी घ्यावी. जेवणावर परिणाम होईल. तब्येतीला त्रास होईल असे कोणतेही धाडस यावेळी करू नये. वाहने हाकणारे ड्रायव्हर असोत की स्वतःची गाडी चालवणारे असोत त्यानी यावेळी वाहनापासून दूरच राहावे. एवढी प्रतिकूलता सोडली तर कर्तृत्वाच्या दृष्टीने इतका बहारदार काळ गेल्या कित्येक वर्षात तुमच्या वाटयाला आला नव्हता. प्रामुख्याने राजकीय रंगमंचावर दबकत दबकत वावरत आहेत त्याना एकदम प्रकाशात येण्याची संधी मिळणार आहे. या राशीचे जे लोक उपेक्षित झाले होते त्यांची गरज आता शासनाला भासणार आहे. दि. १७ ते २४ हा काळ मुद्दाम लक्षात ठेवावा. स्वभाव मात्र गर्विष्ठ बनू देऊ नका या काळात नोकरीत अनुकूल घटना घडणार आहे. वरिष्ठाची बदली होऊन ती जागा तुम्हाला मिळणार आहे. नवी जबाबदारी स्वीकारावी लागेल. रासायनिक उद्योगाला प्रगतीची दिशा मिळेल. दि. २५ ते ३० व्यवसायात नेत्रदीपक स्थित्यंतर, भरपूर लाभ. मालाचा उठाव उत्तम होईल. उत्पादनाची परदेशात निर्यात होईल. लोखंडी सामग्रीचे कारखाने व त्यात काम करणारे लोक, मालक यांच्या आर्थिक उन्नतीचा हा काळ आहे. **महिलांस** : बारावा गुरू आहे. त्यामुळे स्वभावावर व बोलण्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. भांडण टाळा. ¤

**मीन** : सामान्यतः ठीक

मनाचे स्वास्थ्य चांगले असले तर इतर सारे ठीक असते. अनेक दिवस तुमच्या आरोग्याच्या तक्रारी चालू आहेत. बारीक सारीक शारिरीक तक्रारीने तुम्ही त्रासला असलात तर नवल नाही. पण आणखी थोडे दिवस ही कळ सोसा. हेही दिवस जातील व तुमचे सारे बस्तान ठीक बसेल. ग्रहाबरोबर संघर्ष करून चालत नाही. आपणास गुरू अकरावा आहे गुरू तुमचा राशिस्वामी आहे. सध्या तुमच्या कल्याणाची सारी भिस्त त्याच्यावरच आहे आर्थिक दृष्टया सर्वोत्तम असा हा पंधरवडा आहे. अनेक मार्गानी पैसा मिळणार आहे दुय्यम व्यवसाय भरभराटीला येईल. दि. १६ ते २१ नोकरीत प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. हाताखालच्या माणसाकडून होत असलेली अडवणूक व वरिष्ठाची कटकट थांबणार आहे. मनातील हेतू सिद्धीस जातील. यावेळी लॉटरीचे तिकिट अवश्य घ्या. रेसमध्ये आजवर घालवलेले पैसे वसूल होतील. दि. २२ ते २६ छापखान्याचा धंदा तेजीत चालेल. स्टेनलेस स्टील, रेडिओ, साखर, गळितांची धान्ये, सोनेचांदी, लोखंडी फर्निचर इत्यादी धंदे त्रासापासून मुक्त होतील. रेशमी व हातमाग कापडाचा व्यापार सुधारेल. शेती व्यवसायाला जिवदान मिळेल. बँका, व्यापारी पतपेढ्या, खरेदी-विक्री संघ यांच्याशी संबंधीत लोकांना थोडा त्रास संभवेल. व्यवहारात भानगडी निर्माण होतील. या संस्थाचा पैसा प्रत्यक्ष ज्यांच्या हाती असेल त्या, या राशीच्या लोकांवर चमत्कारिक आरोप होतील. त्यांच्याविषयी संशय निर्माण होईल. दि. २६ ते ३० लेखकाना अनुकूल दिवस आहेत. गतवर्षी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांना पुरस्कार लाभेल. वाचकांकडून देखील कौतुक होईल. या राशीच्या नवोदित लेखकाना पहिली प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. नाटक रंगभूमीवर आणण्याच्या वाटाघाटी यशस्वी होतील. कलावंताना प्रोत्साहन मिळेल. रेडिओ कलावंताना नोकरीच्या दृष्टीने फायदा होईल. त्याना स्थैर्य मिळणारे निर्णय होतील. वृत्तपत्र व्यवसायिकाच्या अडचणी दूर होतील. **महिलांस** : मातृसुखाची इच्छा सफल होईल. सार्वजनिक कार्यात थोडाफार त्रास होईल. मानसिक स्थिती बिघडण्याची शक्यता आहे ❖


यंदाचे महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचे एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

**कोठे आणि कथीतरी**

किमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

## युद्धनौकेवरला एक दिवस

पृष्ठ ११ वरून

बॉम्ब्सची नळकांडी काढली आहेत. ती कोपरापासून मनगटापर्यंत आपल्या हाताचा भाग असतो तेवढ्याच लांबीरुंदीची आहेत. बॉम्ब्स् निमुळते असून टोकाला पितळेच टोपण आहे. आम्ही कठडे घट्ट पकडून आता काय चमत्कार दिसणार ते पहात आहोत. गोलंदाज हुश्श्यार झाले.

प्रथम एका बंदुकीने आकाशात उंच कसली तरी गोळी मारली गेली. गोळी कुठून कुणी सोडली कळलच नाही. फक्त आवाज तेवढा कानी पडला. नंतर आमच्या समोरच उंच आकाशात ती गोळी फुटून तिच लखलखीत चमकणाऱ्या तेजस्वी ताऱ्यात रूपांतर झालं आणि तो धगधगीत शुभ्र प्रकाशगोल आकाशातल्या उंचावरून अगदी कमालीच्या मंद गतीने खाली पाण्याच्या दिशेने घसरू लागला. आम्ही हे चमत्कारीक दृश्य पाहतो न पाहतो तोच बोटीवरून त्या प्रकाशगोलाला भेदून पलीकडे सट्सट् जाणारे बॉम्ब्स् धडाधड उडू लागले. आम्ही वरून श्वास रोखून पाहात होतो. खालच्या डेकवरल्या गडगडणाऱ्या तोफांकडे, तोफांचे खटके खेचणाऱ्या गोलंदाजांच्या हाताकडे, आणि त्या घसरणाऱ्या तेजःपुंज प्रकाशगोलाला नेमकं टिपणाऱ्या बॉम्ब्सच्या अविरत वर्षावाकडे. तो घसरणारा तेजगोल समुद्रात बुडायला चार पाच मिनीटं लागली असतील, नसतील. त्या तेवढ्या निसटत्या कालावधीत 'मैसोर'च्या तोफानी गडगडाट करून शेकडो बॉम्ब्सचा नुसता पाऊस पाडला !

'आता तुम्हाला भर समुद्रात प्रवास करीत असतानाच एका जहाजावरून दुसऱ्या जहाजावर मालाचा, तेलाचा, इतकेच नव्हे तर माणसाचाही पुरवठा कसा करतात ते पहायला मिळेल.'

ॲडमिरलने हुकूम सोडले. 'मैसोर'च्या दोन्ही बाजूना दोन युद्धनौका शभर फूटाच्या अंतरावरून तुफान वेगाने चालू लागल्या. डाव्या अंगाला 'कुडमठ' ही रशियन बनावटीची भारतीय टारपेडो शीप आली. लांबच लांब पण फार उंच नसलेली ही युद्धनौका सरपटणाऱ्या विंबट्या वाघासारखी वाटते. तिच्यावर अडगळही नाही. प्रचंड लांबीचे पाईपांसारखे दिसणारे टॉरपेडो मागच्या बाजूला रचून ठेवलेले आहेत. तिच्या डेकवर एक वाळूच पोतं आहे. आमच्या बोटीवरून त्या वाळूच्या पोत्यावर एक बंदूकीची गोळी मारण्यात आली. त्या गोळीला एका तारेने एक जाडजूड दोरखंड बांधला होता. त्यामुळे गोळीबरोबर त्या दोरखंडाचं एक टोकही आमच्या बोटीवरून 'कुडमठ'वर जाऊन पोहोचलं. ते पकडून तिथल्या नाविकांनी मग आमच्या दोन बोटीना जोडणारा एक दोरखंडाचा झुलता मार्गच तयार केला आणि त्याच्यावरून मालाच्या पोत्याची भराभर आदलाबदल करून दाखवली. एका नाविकाच्या पाठीला पट्टे बांधून त्याला दोरखंडला एकाने लटकावला आणि पुलीच्या सहाय्याने भर समुद्रात बोटी चालू असताना लोवकळत दुसऱ्या बोटीवर अलगद नेऊन पोचवला. दुसऱ्या अंगाला पाणी कापीत 'कुठार' येऊन समान वेगाने धावू लागली. पुन्हा तिच्यावरल्या वाळूच्या पोत्यावर गोळीच्या सहाय्याने तेलाचा जाडजूड अजस्त्र पाईप फेकण्यात आला. 'कुठार' मग त्या झुलत्या पाईपमधून आमच्या बोटीला तेलाचा पुरवठा करू लागली. एकमेकाना झुलत्या मार्गांनी जोडलेल्या तीन युद्धनौकांचा देवाणघेवाणीचा समांतर प्रवास तासभर चालू होता.

'आता आपल्या जहाजावरल्या एका माणसाला 'दीपक'वरच हेलीकॉप्टर उचलून उंचावर नेईल.'

आम्ही मागच्या मोकळ्या डेकवर जमलो. एकजण मधोमध सुटा उभा राहिला. ॲडमिरलने हुकूम सोडला. क्षणात एक हेलीकॉप्टर गरगरत डोक्यावर तरगू लागले. हेलीकॉप्टर प्रचंड आहे. सगळ्या बाजूनी मोकळं आहे. गिधाडासारखी त्याने डेकवर झडप मारली आणि आतल्या माणसाने डेकवरल्या माणसाला क्षणात कवेत धरून, भाजीची पिशवी उचलावी तसा उचलून आत घेतला. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोवर त्या माणसासकट तो घोंघावणारा पोलादी पक्षी काहीच्या काही उंच उडाला नि समोर चाललेल्या 'दीपक'वर पंख पसरून स्थिर झाला. काही क्षणाच्या अवधीत आमच्या घोळक्यातला माणूस पलीकडल्या जहाजावरून आमच्याकडे दुर्बीणीने पाहू लागला !

'तुम्हाला पाणबुडी पहायची आहे ? पहा.'

उन्हात तापू लागलेल्या सागराकडे आम्ही पाहात होतो. कुठे चिटपाखरू दिसत नव्हतं. वारा पडला होता.

'पाणबुडी आपल्या रोखाने येतं आहे.'

'अरे, पण कुठे दिसत नाही ती ?'

'पाणबुडी दिसणार कशी ? ती पाण्याच्या खालून भर वेगाने येत आहे.'

समुद्र अगदी शांत आहे. लख्ख ऊन पडलं आहे. धुकं साफ विरलं आहे. उन्हाचे चकाकते कवडसे पाण्यावर लखलखत आहेत. दुर्बीणीने मी आसमंत न्याहाळतो आहे. कुठेही काही वस्तू मात्र दिसत नाही.'

मग आगपेटीच्या काडीसारखी एक काडी क्षितिजरेषेपासून आमच्या जहाजाच्या रोखाने येताना दिसली.

'समुद्रात ती डोकं वर काढून आपल्याकडे येणारी काठी दिसत आहे, तो पाणबुडीचा पेरीस्कोप आहे, म्हणजेच तो पाणबुडीचा डोळा आहे.'

हळूहळू ती काठी जवळ, अगदी हाकेच्या अंतरावर आली. फक्त साधी काठी, मग तिच्या पाठोपाठ किल्ल्याच्या बुरुजासारखा काळा कुळकुळीत बंब आमच्या बाजूने पाण्यातून तरंगत तरंगत, पाण्यातून वर येऊ लागला. ती काठी, तो चिलखती बुरुज आणि आमची बोट ह्याचा समांतर प्रवास सुरू झाला. मग पाच सहा सफेत वेष धारण केलेले नाविक त्या बंबाच्या धुराड्यातून माना डोकावून दुर्बीणीने आमच्याकडे पाहू लागले ! इशारे झाले. आणि मग हळूहळू त्या पाणबुडीचा दुधीभोपळ्याच्या आकाराचा काळाकुट्ट पोलादी देहच आमच्या समोर तरंगू लागला.

पाणबुडी प्रचंड देवमाशासारखी सरपटत चालते. तिला खिडक्या दार नसतात. अवघ्या तीन मिनिटात ती पृष्ठभागावर येऊ शकते. अवघ्या तीन मिनिटात ती खोलवर बुडू शकते. तिच्यावर पन्नास पाऊणशे नाविक असतात. प्राणवायूचा, गोड्या पाण्याचा, खाद्यपदार्थांचा, अद्यावत यंत्राचा आणि दारूगोळ्याचा पुरवठा घेऊन होकायंत्राच्या सहाय्याने सागराच्या पोटामधून तिची विनबोभाट गस्त सतत चालू असते.

ॲडमिरल हुकूम देत होता. ती वर येत होती. पुन्हा बुडत होती. पुन्हा वर येत होती.

ती मगरीसारखी ताकदवान वाटते. मगरीसारखीच कर्दनकाळ वाटते. मगरीसारखीच काळीकुट्ट असते. पाणी कापणाऱ्या तिच्या नाळेला लखलखणारा पितळेचा भक्कम पट्टा असतो. सागरतळावर किरणांचा फवारा टाकून ती पाण्याची खोली अजमावते. पाण्यातल्या वस्तूचा ठावठिकाणा हेरण्याची तिच्या पोटात यत्रं असतात. पाण्यात बुडाली की परमेश्वरासारखीच ती दिसत नाही. पण असते !

तिचं नाव 'कुंजारे.'

दुपारच्या भोजनाची वेळ झाली. जाता जाता एक अमलदार सांगू लागला,

'भारतीय नौदलात अनेक जातीच्या युद्धनौका आहेत. त्याची वैशिष्टचवार विभागणी केलेली आहे. विशिष्ट विभागातल्या नौकांची नावं विशिष्ठ अद्याक्षरांनीच सुरू होतात. रंजपूत, राणा, रणजीत हा R गट; गोदावरी, गगा, गोमटी हा G गट; ब्रह्मपुत्रा, बिआस, वेतवा, वेसीन, विमलीपट्टम हा B गट; त्रिशूळ, तलवार वगैरे T गट; कुकरी, कुठार, कृपाण वगैरे K गट. विक्रात ही सर्वात मोठी विमानवाहू नौका. तिच्यावर चौदाशे अधिकाऱ्यांची व्यवस्था आहे. मैसोर आणि दिल्ली त्याच्या खालोखाल येतात. त्यांच्यावर आठशे अधिकाऱ्याची व्यवस्था आहे. ह्या आपल्या 'मैसोर'ने गोव्याच्या लढचात मोठी कामगिरी केली होती.'

'तुमच्या बदल्या निरनिराळचा नौकांवर होतात ?'

'अर्थात. सर्वसाधारणपणे एका अधिकाऱ्याची एका जहाजावर दीड वर्ष नेमणूक होते. आज मी इथे आहे. पुढल्या महिन्यात मी 'विक्रात'वर असण शक्य आहे. त्याच्या पुढल्या वर्षात 'दिल्ली'वर असणंही शक्य आहे. नौदलात बदल्यांचं चक्र सतत फिरत असतं.'

ॲडमिरलच्या मनोऱ्यावर ज्यांची व्यक्तिमत्त्वं परीटघडीची वाटली होती, ते सारेजण भोजनगृहात ऐसपैस विसावले होते. सर्वांनी आपल्या हॅटस् काढून ठेवल्या, सिगरेटी पेटवल्या आणि मद्यसेवकाच्या बारीसमोर खुर्च्या ओढल्या. ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणे जो तो आपापल्या आवडीच्या पेयाचे पेले भरू लागला. कुणीही कुणाला आग्रह करीत नव्हता.

मद्य न पिणारेही दोन चार अधिकारी दिसले.

जेवणाचा थाट पाहूनच पोट भरल.

गरमागरम मटणसूपाचे पेले, बकऱ्याच्या आणि डुकराच्या मटणाच्या थंडगार लुसलुशीत चकत्या, उकडलेली अंडी, पुलाव, मटार उसळ, सॅलड, साय, लोणी, मुरांबे, पुडींग, वारभर लाबीचा गोडा पाव. जेवणात मसाल्याचा वाससुद्धा नाही. सर्व पदार्थ उकडलेले, वाफवलेले, भाजलेले. तळलेलं काहीही नाही. वाटेल तिथे बसून किंवा उभ्याने जेवावं. कुणीही बकाबका जेवत नव्हतं. सर्वजण मांसाहारी आहेत. रुचीने, पण मर्यादित जेवतात. कष्टाची कामं करायला शरीर तरतरीत ठेवणं हा त्या मर्यादीत आहारामागचा उद्देश आहे.

जेवणानंतर मोजून पाच मिनिटं विश्रांती.

पुन्हा ॲडमिरलचा मनोरा. सकाळपासून पाहातो आहे, कुरुविला खुर्चीतून एकदाही इंचभरसुद्धा हललेला नाही. डोळयाना दुर्बीण लावून थड आवाजात मोजक्या चार-पाच शब्दात सर्व युद्धनौकांच्या सचलनाचे हुकूम देत आहे; तारायत्रावरून आलेले सदेश ऐकत आहे.

समुद्र तापला आहे. गरम वाफारे अंग भाजून काढताहेत. पाण्याची निळीभोर कांती अधिक गडद झाली आहे.

'आता बोटीची यत्र पाहूया.'

रडार. लाखदा हा शब्द वापरला, उच्चारला, ऐकला. पण चित्रातही रडार कसं असतं ते पाहिलेलं नव्हतं.

रडार म्हणजे सागराच्या पृष्ठभागावर आलेल्या वस्तूच नेमक ठिकाण दर्शविणारं घडयाळ. भिंतीवरल्या घडाळयाच्या तबकडीसारखी एक जांभळया रंगाची एक-दीड फूट व्यासाची तबकडी असते. तिच्यावर अक्षांश रेखांश दाखविणारा नकाशा असतो. बोटीच्या आजुबाजूच्या तीस मैलाच्या टापूत बोट, जहाज, खडक, वाहून येणारा पेटारा, दीपस्तभ, अशी काहीही वस्तू आली, तरी तिचं नेमकं ठिकाण दर्शविणारा मोहोरीच्या कणाएवढा बारीक पिवळचा प्रकाशाचा थेब त्या जांभळचा तबकडीवर उमटतो. समजा, बोटीच्या आजूबाजूला चार खडक, पाच मचवे, आणि एक वाहून येणारा खोका तरंगत आहे, तर त्या तबकडीवर चार खडकांचे चार, पाच मचव्यांचे पाच आणि एका खोक्याचा एक, असे पिवळचा प्रकाशाचे दहा थेब त्या तबकडीवर उमटलेले दिसतील. रडार हे अस चाहूल देणारं घडचाळासारखं यंत्र आहे. मात्र, वस्तू कुठल्या प्रकारची आहे ते रडारवरून अजिबात कळत नाही. कदाचित तो खडक असेल, कदाचित एखादी बोट असेल. रडार फक्त वस्तूचे अस्तित्व तेवढं प्रकाशाच्या ठिपक्याने अचूक दाखवतो; कप्तानाला सावध करतो. रडार अहोरात्र चालू असतं. अधिकाऱ्यांचं त्याच्यावर लक्ष असतं.

दहा-पंधरा चिंचोळचा शिडचा उतरून बोटीच्या पोटात गेलो. बोट चालविण्याची गुतागुतीची असख्य यंत्र इथे आहेत.

अजस्त्र इंजिनांची घडघड चालू आहे. एक तरतरीत तरुण इजिनियर कमालीच्या मळक्या बॉयलर सुटात आहे. हसतमुख. म्हणाला, 'महाशय, बोट ही खरी इथूनच चालवली जाते. मनोऱ्यावरून फक्त हुकूम सुटतात. ते नीट ऐकून त्याप्रमाणे यंत्राकडून कामं इथून करवून घेतली जातात. पहाण्यासारख अस जे काही आहे ते सार इथंच आहे. माझ्याबरोबर आणखी खाली या. तुम्हाला बॉयलर दाखवतो.'

बोटीच्या पोटात, पाण्याच्या पातळीच्या खाली एक पेटलेली गुहा आहे. प्रचड इंजिनं घडघडत आहेत. दोन नाविक हातात सळचा घेऊन आगीच्या झोतासमोर डोळे किलकिले करून इंधन पुरवीत आहेत. सर्व गुहा वाफांनी भरून गेलेली आहे. ही गुहा म्हणजे बोटीचं हृदय आहे. ते सतत घडधडत आहे. सभोवार असख्य तापलेल्या नळचा आणि तोटचा आहेत. त्या बोटीच्या छाताडाच्या फासळचा.

'चला. ते इजिनमेन कसं इधन भरतात ते तुम्हाला दाखवतो.'

मी गुहेत डोकावलो मात्र, माझं सारं अग वाफाऱ्याने क्षणात पोळून निघाल. गरम वाफा नाका-तोंडात घुसल्या. हातपाय थरथरायला लागले. माग वळून पळावं तर मागचा अजस्त्र पोलादी दरवाजा बंद झालेला ! मला ब्रह्मांड आठवलं. आपण बेशुद्ध पडणार असं वाटलं. लटपटत लोंबत्या शिडीच्या तीन पायऱ्या उतरलो. खाली शंभर पायऱ्या शिल्लक होत्या. ज्वाळांच्या शेकाने शरीराचं रंध्र नि रंध्र भाजून निघालं. बसकण

मारावी म्हटलं, तर पन्नास फूट खोल कोसळून कपाळमोक्ष होणार; सावकाश उतरावं तर अंग भाजून निघतं. शेवटी थेट वर पळून आलो. म्हटलं, ' impossible ! '

' तुम्ही impossible म्हणता, मग आम्ही चार चार तास कसं घुसमटत आगीच्या समोर काम करतो ? '

प्रश्नच आहे. केवळ दोन प्रहरीच्या भाजीभाकरीसाठी हे तगडे लोक आगीच्या लोळासमोर रक्त आटवणार नाहीत. दर्यावर्दी जीवनाची म्हणून काही अगम्य भूल असेल. तिच ह्यांच्यावर चेटूक होत असेल. म्हणून हे आगीच्या हौदात सराईतपणे पोहोतात. जन्मभर !

आणि त्या चेटूकाच्या कक्षेबाहेरचे आम्ही वाफानी आम्हाला हुगताक्षणीच तिसऱ्या पावटणीवरून माघार घेऊन मागच्या मागे पसार होतो !

पळालो तो तडक कप्तानाच्या निर्धास्त मनोऱ्यावर येऊन थडकलो. वाटेत अधिकाऱ्यांची छोटी छोटी केबिन्स पाहिली. स्वच्छ, पण चिंचोळी वाटली. केबिन्सच्या बाहेर रायफली उभ्या ठेवण्याचे स्टॅन्डस् होते. तिथे हारीने बदुका उभ्या ठेवलेल्या होत्या. त्यांची तोडं, चहाच्या किटलीवर टिपोझी ठेवतात, तशी टोपर घालून झाकलेली होती.

कॅप्टन गाधी ' मैसोर 'चे कप्तान आहेत. ताठ, तरतरीत, नाकेले, गोरे, शिडशिडीत. डोळे तेजस्वी. नजर धारदार. चर्चा विलक्षण प्रसन्न, रुबाबदार. गळयात दुर्बीण अडकवलेली. वरच्या मजल्यावरून कुरुविलाचे हुकूम ह्याना मिळतात. त्याप्रमाणे हे हाताखालच्या माणसांकडून बोट चालवून घेतात.

' आता तुम्हाला सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम बघायला मिळेल. '

' कोणता ? '

' आता आम्ही सर्वात मोठ्या तोफा डागणार. '

' मोठ्या म्हणजे किती मोठ्या ? '

' ते बार तुम्ही आता ऐकाच. मात्र एक सूचना : तुम्ही कान झाकण्याचे प्लग्स घट्ट लावा आणि कठडे घट्ट धरा. आमच्या तोफांचा पल्ला पंधरा मैलाचा आहे. तोफगोळा प्रकाशाच्या वेगाने उडतो. त्यामुळे तो दृष्टीला पडत नाही. आवाज प्रचंड होईल, पण घाबरू नका. तुमच्या कानठळ्या बसू नयेत म्हणून तोफाची जी शक्ती आहे, तिचा फक्त एक तृतियांश भागच आम्ही वापरू. तुम्ही वर अॅडमिरलच्या मनोऱ्यावर जा. तोफगोळे समुद्रात नेमके कुठे पडताहेत ते मी रडारवर पाहीन. '

लाल रंगाची सुबक कर्णाच्छेदनं सर्वांनी कानाना लावली. कुरुविलानीसुद्धा.

सावधानतेचा इशारा सर्व बोटभर गेला. सर्वांनी कठडे घट्ट पकडले. कुरुविलानीसुद्धा.

टेलिफोनच्या घटेसारखी एक घटी वाजली आणि पाठोपाठ आकाश फोडणारा प्रचड आवाज करून तोफ उडाली. त्या कचक्याने एवढी प्रचड बोटही आरपार हादरून गेली. हा एका तोफेच्या एक तृतियांश शक्तीचा प्रताप ! मग, एकाच वेळी सगळ्या तोफा सर्व शक्ती एकवटून एकदम डागल्या तर काय कल्लोळ होईल ? मला वाटत, डेकवरच्यांची बुबुळ बाहेर येतील.

मी शरण गेलो.

सागावसं वाटलं, ' महाराज, कल्पना आली. आता कृपा करून बार म्हणून कसा तो उडवू नका बुवा ! ' पण माझ कोण ऐकणार ?

बोबडी वळवणारे लागोपाठ पाच बार वाजले. माझी खातरजमा झाली. ' युद्ध नको ' ह्या निष्कर्षावर मी क्षणात आलो.

' Ask the ships to turn hundred and eighty degrees '

ह्याचा अर्थ उघड होता. आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. सारगाने चाक जोरात मारलं. वाघाने जीव घेऊन पळाव तसं आमचं जहाज सर्व बळ एकवटून दर्या फाडत घराकडे निघालं.

सायकाळचे थड वारे वाहू लागले. पाण्याची निळाई अधिक गडद झाली. पहावं तिकडे निळभोर बिल्लोरी पाणीच पाणी दिसू लागलं. कृष्णरग असाच असेल असं परत परत मनात डोकावू लागल. चैतन्य अस्तमान होऊ लागल. घसरता लालेलाल सूर्यगोल शात भासू लागला. सोनेरी उन्हं कणाकणाने नारिंगी होऊ लागली.

' आपला प्रवास सपत आला. तुम्हाला अॅडमिरलने त्यांच्या केबिनमध्ये सध्याकाळी चहाला बोलावलं आहे. '

अॅडमिरल संध्याकाळी कसला अमृततुल्य चहा देणार त्याची कल्पना आली. जीव मोहोरला.

अॅडमिरलच जहाजाच्या अगदी शेवटच्या टोकाला असलेलं केबीन ऐसपैस आणि अद्यावत आहे. एका कोपऱ्यात मद्यालयाची खिडकी आहे. तिथे रंगीबेरंगी बाटल्या आमच्यासाठी नीट रचून ठेवल्या आहेत.

आता अधिकार दर्शविणारी टोपी काढून ठेवलेले बोडके कुरुविला अगदी वेगळे वाटतात. खेळाडू दिसतात. हसण, खिदळणं सुरू आहे. सगळे अधिकारी आपापले हुद्द विसरून पेयपानासाठी एकत्र आले आहेत. अरे–तुरे चालू आहे.

Cheers !

इतक्यात बाहेर डेकवर गडबड झाली. बाहेर आलो. काय झाल ? ही धावाधाव कशासाठी ?

' सी–इन्–सी येणार आहेत. '

' इथें ? समुद्रातल्या जहाजावर ? '

' त्यात काय अवघड आहे ? हेलीकॉप्टरने उतरतील. '

क्षणभर सगळे सावध झाले. वर्दी आली. पाठोपाठ नौदलप्रमुख नदा ताठ चालत आले. हेलीकॉप्टरने आले असणार. फोटोत ते गुबगुबीत दिसतात. प्रत्यक्षात तसे नाहीत. गृहस्थ प्रौढ दिसतो. पोट किंचित सुटलेल आहे. डोक्यावर कॅप नाही. गणवेषाचा खास दिमाखही नाही. चेहेरा प्रेमळ आहे. नजरेत बेरकेपणाची छटा आहे. प्रत्येकाला त्यांनी ओळखलेल दिसल. कचेरीत साधा अॅक्टिंग मामलेदार आला तरी चार चाकरमाने आजुबाजूला कडमडतात. मानपान होतात. इथे हा एवढा मोठा नौदलप्रमुख आला आहे, पण कुणीही गागारलेल नाही. उत्तेजीत वातावरणात त्यानी पहिला आनंददायक घुटका घेतला.

' मित्रांनो, तुमचा दिवस कसा काय गेला ? '

' आनंदात. '

' मग लिहीणार असालच. '

' अर्थातच. '

' आगे वढो, आता मला ह्या अधिकाऱ्याशी थोडी चर्चा करायची आहे. तेव्हा तुमची ग्लास घेऊन जरा शेजारच्या दालनात जाल काय ? Please. '

तिथे आमचच राज्य होत. पण खरोखरीच जिथ आमचं राज्य आहे त्या आमच्या अगणांची आठवण मन पोखरू लागली. समुद्रावरचा काळोख फारच दाट झाला हे निमित्त झालं. मुंबई नामक प्रकाशाचं तरगत झुबर जवळ येता येता अगदी अंगाला खेटलं. माझे पाय धक्क्याला लागले.

# हृषिकेश मुखर्जी । एक प्रतिभासंपन्न दिग्दर्शक

सुभाष नाईक

आजकाल प्रेक्षक म्हणजे हिन्दी चित्रपट पाहणारे सुजाण चित्ररसिक चित्रपटातील नायक-नायिकाच्या भूमिका करणाऱ्या कलावताची नावे वाचूनच चित्रपटाला जातात असे नाही, तर आता ते चित्रपटाचे दिग्दर्शन कुणी केले आहे याचाही चित्रपटाला जाण्यापूर्वी विचार करतात आणि चित्रपट जर हृषिकेश मुखर्जी, बासू चटर्जी, गुलजार, असित सेन याचा असेल तर निश्चितपणे तिकिटे काढून ठेवतात. त्याना खात्री असते यांच्या चित्रपटात काहीतरी चागले, काहीतरी नवे पहायला मिळेल. असे अभिरुची संपन्न चित्रपट दिग्दर्शित करणारामध्ये हृषिदाचे नाव प्रथम घ्यावे लागते.

हृषिदा. टिपिकल बगाली व्यक्तित्वाचा हा माणूस मोठा खुबीदार आहे. स्व. बिमल रॉय याच्या तालमीत तयार झालेले हृषिदा त्याचीच परंपरा पुढे चालवताहेत. हृषिदा बिमल रॉय याचे सहाय्यक होते. त्याच्याच सहवासात ते पुढे आले. त्या संस्कारातूनच ते घडत गेले. विकसित झाले. पुढे खूप कामे मिळू लागली. पण हृषिदा बिमलदाची शिकवण विसरले नाहीत. नवतेच्या प्रवाहातही त्यानी सस्काराचे अपूर्व धन जपले. जपत राहिले.

नुकताच हृषिदाचा 'अभिमान' पाहिला. 'अभिमान' पाहात असताना प्रत्येक प्रसग पाहताना सतत जाणवत होते ते असे की, हृषिदाना पिक्चर बॉक्सहिट करायचे असते तर कितीतरी संधी होत्या इथे. पण हृषिदाना कलात्मक आनद द्यायचा होता. म्हणून कुठेही भडकपणा आणला नाही त्यानी. अतिशय हळुवारपणे, नाजूकपणे हाताळली त्यानी ही कथावस्तू सारखे वाटत होते की हृषिदाऐवजी दुसऱ्या कुणाच्या हाती ही कथा गेली असती तर त्याने तिचे निश्चितच वाटोळे केले असते या साध्याच पण सुंदर कथेचे. नायकनायिकाची सुहागरात या चित्रपटात किती संयमाने रगवलीय त्यांनी. किती सूचक.

हृषिदांच्या आजवरच्या सगळ्या चित्रपटात हाच गुण विशेषत्वाने आढळला मला. प्रकर्षाने जाणवला तो कमालीचा कलात्मक सयम आणि सूचकता. साध्या साध्या छोटया प्रसगातून ते नेहमी कितीतरी सुचवीत असतात. त्यासाठी कुठेही अतिरेकीपणाचा आसरा घ्यावा लागत नाही त्याना.

व्यवसायाच्या चौकटीत राहूनही चाकोरीबाहेरचे चांगले चित्रपट निर्माण करण्याची त्यांची हौस मोठी विलक्षण. ही परपरा त्यांनी यशस्वीपणे चालवली आहे नित्य नव्या चांगल्या कथेच्या शोधात असतात हृषिदा. ते स्वत: चागले कथालेखक. नवनव्या जाणिवा धुडाळण्यात नेहमीच गर्क. आशीर्वाद, आनद, अभिमान कितीतरी चित्रपटाच्या कथा त्याच्याच. प्रेक्षकांना काहीतरी नवे पण चागले देण्याचा त्याचा सतत प्रयत्न असतो. 'बावर्ची'मध्ये हिंदी चित्रपटातील नेहमीच्या नायक-नायिकेला त्यांनी फाटा दिला. एक सुदर परीकथाच जणू असा 'बावर्ची'. 'सबसे बडा सुख' मध्ये सेक्स हा विषय हाताळतानाही नायक-नायिकाचे नेहमीचे प्रेमचाळे न दाखविता शेवटी नायक-नायिकेत त्यानी बहीणभावाचे नाते निर्माण केले. खेड्यातील तरुणाना मुबईच्या जीवनाविषयी वाटणारे आकर्षण आणि तेथे आल्यानतर त्याचा उडणारा गोंधळ याचे मनोरम दर्शन त्यांनी यात घडवले. 'सेक्स'सारखा विषय हाताळतानाही ते कोठे 'चीप' झाले नाहीत. 'गुड्डी' मध्ये अजाण वयात वाटणारं चित्रपटाचं आकर्षण हा अगदी परिचित विषय. पण किती वेगळ्याप्रकारे मांडला त्यानी. 'आनंद' मध्ये तर त्यांनी भावनेलाच हात घातला. अत्यंत तरल, हृदयस्पर्शी कथा त्यांनी आपल्या प्रतिभेच्या स्पर्शानं अजरामर केली.

हृषिदाचे या आधीचे चित्रपटदेखील असेच प्रेक्षकांना आगळा कलात्मक आनंद देणारेच होते. 'अनाडी,' 'अनुराधा,' 'अनुपमा' यासारखे कितीतरी चित्रपट. प्रत्येक चित्रपटात त्यांनी कलेची उची गाठली आहे. देमार चित्रपटाच्या भाऊगर्दीत हृषिदाचे हे सगळेच चित्रपट आपल्या वैशिष्ट्याने उठून दिसले. यशस्वी झाले. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार हृषिदाही करतात पण तो इतर दिग्दर्शकांप्रमाणे नाही. म्हणूनच कला व तंत्र याबाबतीत श्रेष्ठ असलेले त्याचे चित्रपट अमाप लोकप्रियताही मिळवतात. अशा लोकप्रिय दिग्दर्शकामध्ये हृषिदाचा क्रमांक फार वरचा लागेल.


हृषिदाच्या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जुन्या नव्या कलावंताचा सुरेख मिलाफ. त्याना एकत्र आणून चागल्या कथेला ते न्याय देतात ज्या त्या भूमिकेसाठी अनुरूप अशा कलावताची अचूक निवड ते करतात. 'आशीर्वाद'मध्ये अशोक कुमार, हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय याच्याप्रमाणे संजीवकुमार, सुमिता सन्याल या नव्यानाही त्यानी एकत्र आणले. 'आनंद'मध्ये राजेश खन्ना बरोबरच अमिताभसारख्या नव्या पण ताकदीच्या कलावंताला त्यानी पुढे आणले. 'बावर्ची'मधील कुटुब आणि रघुनदनची भूमिका जगणारा राजेश खन्ना—उत्कृष्ट टीमवर्कचा असा वस्तुपाठ शोधूनही क्वचितच सापडेल. 'अभिमान'मध्ये देखील याचा प्रत्यय येतो. दुर्गाबाई खोटेंसारख्या जुन्या जाणत्या अभिनेत्रीला अमिताभ-जया-असरानी यासारख्या तरुण कलावताबरोबर एकत्र आणण्यात त्यांचे कौशल्य आहे.


हृषिदाचे सगळे चित्रपट असे नव्या-जुन्या कलावंतांच्या अभिनय कौशल्याने रंगलेले आहेत. प्रत्येक चित्रपटाचे टीमवर्कही चागले आहे. पण इतकेच नाही. यापैकी कुठलाही चित्रपट उथळ स्वरुपाचा नाही. प्रत्येक चित्रपटातून त्यानी समाजाला काही चागले देण्याचा प्रयत्न जसा केला तशीच आपली अशी फिलॉसफीही सागितली. 'आनद', 'बावर्ची', 'अभिमान' या चित्रपटातून छोटया छोटया प्रसगातून त्यानी आपली फिलॉसफी किती सहजपणे प्रेक्षकांपर्यंत नेऊन पोचवली आहे.


सध्या हृषिदा, स्व. बिमल रॉय यांचा अपुरा राहिलेला चित्रपट 'सहारा' पुरा करीत आहेत. एका बगाली कादंबरीवर आधारित या चित्रपटात धर्मेन्द्र आणि सायराबानू याच्या प्रमुख भूमिका आहेत.



# हृषिकेश मुखर्जी








# अवांतर अवांतर

**प्रतिनिधी**



रूप तेरा मस्ताना नावाचे एक फालतू पोशाखी चित्र, वर्षा दोन वर्षाखाली येऊन गेले. जितेंद्र, मुमताझ, प्राण यासारखे कलाकार असलेल्या त्या चित्रपटासंबंधी निर्मात्याला खूप अपेक्षा होत्या. स्वाभाविकपणे चित्रपट निर्मिती अवस्थेमध्ये असताना पत्रकारांना बोलावण्याची प्रथा त्याने काळजीपूर्वक जोपासली. एक भव्य सेट लावला होता. चित्रीत करण्यात येणाऱ्या दृश्यांची तयारी करण्यात दिग्दर्शक गुंतले होते. आणि बाजूला बसलेल्या कलाकारांशी बातचित करण्यासाठी आम्ही पत्रकार मंडळींनी आमचा मोर्चा तिकडे वळवला. कोणी भावूक पत्रकार राजेश खन्नाच्या निवृत्ती घोषणेसंबंधी भलत्याच गंभीरपणे बोलत होता. चार दोन मिनिटे त्याचे बोलणे ऐकल्यावर मुमताझने फटकावले, ‘अरे उसके रिटायर होने की फिकीर छोडो, साले का और एक पब्लिसिटी स्टंट है, और तुम लोग उसकी धूम मचाते हो ! मैं कहती हूँ, आप लोग रिटायर हो जाएँगे, उस वक्त भी ये ‘काका’–पर्दे पे दिखाई देगा, लेकिन हीरो के रोल मे नही चचा के रोल मे !’ केवळ इतके बोलून बाईचे समाधान झाले नाही,– मजकूर नावानिशी खुशाल छापा अशी मुभाही तिने देऊन टाकली. मुखवटयाच्या या जगामध्ये सहकलाकाराविषयी कोणी बोलत नाही, बोललेच तर अगदी गुडी गुडी थाटाचे. या पार्श्वभूमीवर या फटकळ पोरीचे बोलणे आपल्याला नेहमीच आवडते. एकसष्ट बासष्ट साली दारासिंगबरोबर देमार थाटाच्या चित्रपटामध्ये शरीर प्रदर्शन करीत नाचणारी मुमताझ, या शरीर संपदेच्या भांडवलावरच बघता बघता टॉपला जाऊन बसली. चार-दोन वर्षाखाली मुमताझची

# मुमताज ताज ते नाझ



जशी हवा होती, तशी ती आज नाही हे मान्य केले तरी आघाडीवरच्या पहिल्या पाच चित्रतारकांमध्ये आजही ती आपले स्थान टिकवून आहे. आघाडीवरील नायिका म्हणून सलग दहा वर्षापेक्षा जास्त काळ स्थान टिकवून राहणे हे आजच्या दिवसाला नवीन तारका उपलब्ध होत असलेल्या जमान्यात सोपे काम नाही. साधना, नंदा, वहिदा रेहमान, वैजयंतीमाला, शर्मिला टागोर, पद्मिनी, बबीता, माला सिन्हा या सर्व नामवंत कलाकारांच्या व्यावसायिक कर्तृत्वाचे आलेख पाहिले, म्हणजे मुमताझ अजूनही सतेज असल्याचे महात्म्य पटते. या टकरीमध्ये मुमताझच्या बरोबरीने टिकलेली दुसरी एकच नटी डोळ्यासमोर येते—आशा पारेख : आशा म्हणावी तशी सुंदर नाही. अभिनयाच्या दृष्टीनेही झेपावणारे यश तिने मिळवले नाही. तथापी शम्मीबरोबर सुरु झालेली तिची चित्रपट कारकीर्द यशस्वी चित्रपटांची मालिका लागल्याने, अगदी राजेश बरोबरच्या कटी पतंग पर्यंत बिनघोर चालू राहिली. आशाही आता फिकट झाली. मुमताझ मात्र आपली शान टिकवून आहे.

नटीचा पेशा पत्करल्यावर जे जे करणे आवश्यक असते ते सर्व करायची तयारी ठेवूनच मुमताझ लाईनमध्ये आली. हम दो डाकू, रात अंधेरी, आया तुफान, बहादूर लुटेरा या सारख्या चित्रपटांशी मुमताझचे नायिका म्हणून नाते होते, हे आज खरे वाटणार नाही. पण प्रारंभीच्या काळात दारासिंग सारख्या दांडगेश्वराबरोबर एक दोन नव्हे जवळ जवळ डझनभर चित्रपट तिने केले. दहा एक हजाराचा मोबदला आणि भरपूर आऊट डोअर वर्क असलेल्या या चित्रपटांच्या संदर्भात तिच्याकडून अभि-

नयाची वगैरे फारशी अपेक्षा नव्हतीच. स्थलकालाचे बंधन नसलेल्या या चित्रपटामध्ये कधी राणी, कधी गरिबांचा कैवार घेणाऱ्या जवानाची प्रेयसी, तर कधी स्वतःच गरिबांसाठी प्रस्थापित सत्तेविरूद्ध बंड करून उठलेली बंडखोर तरुणी, अशा ठराविक ढंगाच्या भूमिका तिने मन लावून केल्या. या भूमिकामध्ये तसे मन लावून करण्यासारखे काहीही नसले तरी. मग तिने मन लावून केले ते काय? तर दिग्दर्शकाला जे आणि जशा पद्धतीने अभिप्रेत असेल ते सर्व करणे. छिबऱ्या नाकाच्या, या नखरेल नटीची निवड–प्रामुख्याने तिच्या शरीरसौंदर्यावर लक्ष ठेऊन केलेली असल्याने हे शरीरसौंदर्य जास्तीत जास्त प्रदर्शनीय बनवण्याचा दिग्दर्शकाचा हेतू असे.

छाया लेखकाचा कॅमेरा आपल्या चेहऱ्यापेक्षा आपल्या देहाचा वेध घेतो आहे हे मुमताझ ओळखून होती. तथापी सध्या तरी शरीर हेच आपले भांडवल आहे हे मनोमन ओळखून असणाऱ्या मुमताझने 'सेक्स'चा वेध घेणाऱ्या या फिरत्या कॅमेऱ्याला कधीही हरकत घेतली नाही. मुमताझचे चित्रपट प्रदर्शित व्हायचे ते ताज, एडवर्ड, स्टार, मोती अशा चित्रपटगृहातून. या प्रेक्षकांना आपल्यापासून काय हवे आहे याची तिला पूर्ण जाणीव असल्याने जसा तिने निर्मात्या-दिग्दर्शकांना कधी विरोध केला नाही, तसाच भडक पोस्टर्स, अथवा कडक जाहिराती यांनाही विरोध केला नाही. स्वाभाविकपणे हिंदी फिलमवाले ज्याला 'सी' क्लास फिलमस् म्हणतात, त्या सी क्लास फिल्म वर्तुळामध्ये बघता बघता मुमताझ 'ए' क्लास आर्टिस्ट झाली. विश्राम बेडेकर यांनी दिग्दर्शित केलेल्या रुस्तुम-सोहराब या १९६३ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाचे वेळी मुमताझच्या देहयष्टीच्या मापांची जाहिरात केली गेली. रुस्तुम-सोहराब चित्र फारसे चालले नाही. पण मुमताझचा बोलबाला भरपूर झाला. ओ. पी. राल्हन यांच्या गहरा दाग या राजेंद्र-मालासिन्हा या जोडीची प्रमुख भूमिका असलेल्या चित्रामध्ये एक छोटी भूमिका तिच्या वाट्यास आली. चांगल्या सामाजिक चित्रपटातील दुय्यम भूमिका कोणतीही खळखळ न करता स्वीकारण्यास तिने सुरुवात केली.

१९६५-६६ पर्यंत मुमताझ हे नाव हिंदी चित्रपटांच्या चाहत्यांमध्ये बऱ्यापैकी लोकप्रिय झाले होते. याच सुमारास दोन मोठे चित्रपट मुमताझच्या हातास लागले. राम और शाम या चित्रपटामध्ये तिला चक्क दिलीपकुमारबरोबर भूमिका मिळाली. तर शांतारामबापूंनी बुन्द जो बन गया मोती साठी मुमताझला करारबद्ध केले. 'ताज'च्या परिसरामध्ये वावरणारी मुमताज 'नाझ'च्या परिसरामध्ये चर्चिली जाउ लागली. बुन्द जो बन गया मोतीची 'शोकांतिका' झाली तरी राम और शामने मुमताझचे तकदीर असे काही चक्रावले, की स्वतः मुमताझही स्वतःवर एकदम खुष होऊन गेली. एका रात्रीत सितारा होण्याचे भाग्य तिच्या वाट्याला आले नाही तरी प्रयत्न आणि किस्मत याची सांगड जमल्यावर तिने आपले स्थान जरूर निर्माण केले. बोलण्यातला फटकळपणा, प्रसिद्धीची हौस, आणि काहीतरी प्रकरणामध्ये स्वतःला बळेच गुंतवण्याची इच्छा यामुळे मुमताझची 'मुमु' झाली तरी ६७ ते ७३ पर्यंत ती सतत न्यूजमध्ये राहिलो. किंबहुना आपण न्यूजमध्ये राहू अशी सतत दक्षता तिने बाळगली.

## प्रत्येक नायक – प्रियकर

राजश्री-शम्मीच्या 'ब्रह्मचारीची' ही दुय्यम नायिका. पण शम्मीच्या आणि हिच्या

लव्ह – खास मुमताझ स्टाईल.



लफड्याची कोण धूम त्यावेळी मचून राहिली होती. आठवड्याभरामध्ये यांचे लग्न होते की काय असे वाटावे. बिनदिक्कतपणे हिने आपल्या प्रत्येक नायकाला प्रियकर बनवून टाकले आहे. आणि त्याची प्रांजल कबुली देऊन मजकूर छापण्यास प्रोत्साहन दिले आहे. सांगितलेला मजकूर छापला म्हणून खटले केल्याचे नाटक केले आहे. आणि कोणी धर्मेंद्र, राजेश सांगतो म्हणून तडजोडही केली आहे. जितेंद्रबरोबर हिची जोडी छान जमली. झाले 'रूप तेरा मस्ताना'च्या वेळी मंडळी अक्षदा घेऊन उभी राह्यचीच बाकी होती. देव आनंद तर कोणत्याही क्षणी आपल्या बरोबर लग्न करायला तयार होता असे तिने त्याच्या तोंडावर सांगितले, आणि या पठ्ठ्याने ते हसून साजरे केले. त्यापुढे जाऊन – आपल्यावरून देव आणि गोल्डी (विजय आनंद) मध्ये भांडणे नको म्हणून आपण नवकेतन कॅम्प सोडला असे तिने जितक्या चवीने सांगितले, तितक्याच चवीने परदेशस्थ असलेल्या कोणा अज्ञात प्रियकराविषयी सतत बडबड करीत राहिली. त्याच बरोबर धर्मेंद्रबरोबर गुलाबी प्रकरणामध्ये आपले नाव जोडले जाईल याचीही ती काळजी घेते. आणि इतके असूनही या फिल्मी जगतामध्ये आपण एकदम भोळीभाबडी, सीधी-साधी लडकी आहोत असा तिचा दावा आहे.

## रस्ता बदलला गती तीच !

दिलीप कुमार (राम और श्याम) राजेंद्र कुमार (गाव हमारा) देव आनंद (तेरे मेरे सपने, हरे राम) या डुढ्ढाचार्यांबरोबर प्रतिष्ठेचे दोन दोन चित्रपट काढल्यावर मुमताझने बघता बघता तरुण पिढीच्या लोकप्रिय नायकांबरोबर वाटचाल चालू ठेवली. बंधन, दो रास्ते, सच्चा झूटा, अपना देश, हे तिचे राजेश बरोबरचे सर्व चित्रपट यशस्वी ठरले. मेला, धडकन मध्ये तिने संजय बरोबर काम केले. जितेंद्र बरोबरचा हिम्मत गाजवला. बंधे हाथ मध्ये अमिताभच्या बरोबरीने ती उभी राहिली. फेरोजच्या अपराधला तिच्यामुळेच चार पैसे मिळाले. तिच्या चित्रपटांवरून नजर फिरवली तर प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे–'सी' क्लास चित्रपटांचा रस्ता बदलला तरी तिची



छिबऱ्या नाकाची ही मुलगी स्वतःवर बेहद्द खूश आहे.

गती, समज त्याच पातळीवर राहिली. अपवाद फक्त 'तेरे मेरे सपने'चा! काढलेच तर खिलौना, काही प्रमाणात बंधे हाथ, असे आणखी एक दोन चित्रपट निघतील. पण आव्हान मिळावे अशी एकच भूमिका तिच्या वाट्याला आली ती तेरे मेरे सपने मधील. आणि या भूमिकेचे तिने सोने केले. तिचे पन्नास चित्रपट कचऱ्यात टाकले तरी, तेरे मेरे सपने, नाही फेकता येणार.

आज त्र्याहात्तर सालामध्ये विलक्षण स्पर्धा भोवती असतानाही हिचा अहंकार, नखरा कायम आहे. या काल आलेल्या पोरींनी देहाचे कितीही प्रदर्शन केले, तरी तिच्या हिशेबी प्रदर्शनीय देह असलेल्या दोनच कलाकार. एक अर्थात ती स्वतः आणि दुसरी माला सिन्हा. त्यातली माला संपल्यात जमा आहे. आणि आजही सात चित्रपटांचे करार बाळगणारी मुमु–तुम्हा–आम्हाला संतोष देत काही काळ या चंदेरी दुनियेमध्ये चमकणार आहे. सी मधून ए मध्ये आलेल्या संजीवकुमारने दाखवली ती शान, मुमुच्या वाट्याला आली नाही, येणार नाही. आणि मौजेचा भाग म्हणजे या खुपऱ्या दुःखाची जाणीव या घनचक्कर पोरीला आहे.



मुहूर्ताचा पेढा
तोही जाऊबाईंच्या हातून.
सायरा बानू – दिलीप कुमार
आणि निर्माती बेगम पारा

# शानदार मुहूर्त जिद्द

बाँबे फिल्म स्टुडिओज मध्ये – नित्यनेमे घडणाऱ्या घटनांमध्ये मुहूर्त नावाची एक शानदार चीज असते. नकली मुखवटयांचे आणि नाटकी बोलण्यांचे हे मनोहरी प्रदर्शन फार मोठे प्रेक्षणीय असते. या सगळया प्रकारांची सर्व संबधितांना चांगली कल्पना असली तरी. तुम्ही कितीही रईस असलात तरी लग्न पत्रिका काय छापाल अशा ढंगामध्ये मुहूर्ताची आंमत्रणे छापली जातात. आता हा नेहमीचाच मामला असल्यामुळे नेमका कोणता मुहूर्त जास्तीत जास्त फायदेशीर ठरणार आहे, याचे तारतम्य आपले आपल्याला ठरवावे लागते. मुहूर्ताच्या या परंपरेप्रमाणे गेल्या महिन्यातही मुहूर्ताचा दणका होताच. सर्व मुहूर्तांना डावलून मी मात्र आर. के. मधल्या त्या मुहूर्तावर नजर ठेऊन होतो. अपेक्षेप्रमाणे मुहूर्ताला आवश्यक असणारी सर्व शान त्या समारंभामध्ये पहावयास मिळाली. मामलाच तसा जबरदस्त होता. दिलीपकुमारचे भाईजान नसीरखान, दिग्दर्शक बनणार आणि भाभी बेगम पारा निर्माता बनणार. (कर्ता करवता अर्थात...जाऊ द्या झालं.) डायरेक्ट दिलीपशी संबंध असलेल्या चित्रपटाचा मुहूर्त असल्यान, अपेक्षित असलेल्या सर्व मंडळींनी उपस्थिती लावली होती. आर. के. चा परिसर लांबलचक गाडयांनी फुलून गेला होता. सर्व तयारी झाल्यावर, स्वत: राज साहेबांनी युसुफच्या (दिलीपकुमार) नावाची आरोळी देत हजेरी लावली. युसुफ–राजनी एकमेकांना कडकडून अलिंगन दिले. पाच पन्नास फ्लॅश उडाले. मुहूर्त समारंभ साजरा झाला. बेगम बाईच्या या चित्राचे नाव आहे जिद्द. कलाकार आहेत–सायरा बानू व संजय. आणि संगीत संभाळणार आहेत कल्याणजी आनंदजी. नासीरखान हा वास्तविक सध्या घरी बसून असणारा, आणि हमेशा बीमार असणारा प्राणी. कोण्या एके काळी हा बऱ्यापैकी कलाकारही होता. पुढे तब्बेत बिघडली. काही वर्षांनी युसुफ बरोबर गंगा जमना मध्ये काम केले. त्यालाही आता कित्येक वर्षे झाली. आणि आता स्वारी सेटवर दिग्दर्शक म्हणून उभी राहणार आहे. अगदी 'जिद्दी'ने. आपण तूर्तास 'जिद्द' पडद्यावर येण्याची प्रतीक्षा करण्याखेरीज काय करू शकतो ? ■



हेमाजींचे मार्केट सध्या तेज आहे. म्हणून तर फेरोजसाहेबांचे निम्मे-अधिक यश निश्चित...

# नवीन चित्र धर्मात्मा

एखादा चांगला नट निर्माता बनला, किंवा दुसऱ्या कोणा निर्मात्याने, अथवा भाईबंदाने तयार केलेले चित्रपट पेश करू लागला की नट म्हणून या प्राण्याची परिस्थिती चिंताजनक झाली असा एक अडाखा आहे. राजेंद्रकुमार– हे या अडाख्याचे पहिले उदाहरण तर फेरोजखान हे दुसरे. स्पर्धा वाढली, वय वाढले, कामे कमी झाली– या धोरणी माणसाने मोर्चा दिग्दर्शनाकडे, व निर्मितीकडे वळवला. मार्केटमध्ये बऱ्यापैकी नाव असल्याने– आणि बंधूराज संजय यांची बऱ्यापैकी चलती असल्याने पैशाचा तसा प्रश्न आला नाही. अस्सल हिन्दी चित्रपटामध्ये जो मामला लागतो तो सर्व ठासून भरून या साहेबांनी–अपराध नावाचे चित्र दिले. एकंदर हिन्दी सेटअपमध्ये चित्र खरोखरच ठीक होते. त्यात त्या वेळी एकदम टॉप वर असलेली मुमताझ चित्राची नायिका. या पठयाने तिला छान Exploit केले. तिच्या पुण्याईवर चार पैसे पदरी आले. टिकून रहायचे असेल, तर हा निर्मितीचा धंदा छान असा विचार केला. वर्ष सहा महिने म्हणे पेपरवर्क करण्यात खर्ची घातले. आणि आता चित्र सुरू केले. चित्रवार्तेच्या गेल्याच अंकामध्ये– गीत ध्वनी मुद्रणाचे छायाचित्र होते. तर या अंकात सेटवरचे. फेरोजची काम करण्याची गती मात्र वाखाणण्यासारखी आहे. शिवाय– नायीकेची निवडही तो मोठ्या चोखंदळपणे करतो. सेटवर असलेल्या त्याच्या धर्मात्माची नायीका आहे हेमा मालिनी. या बाईचे मार्केट सध्या असे तेज आहे, की चित्रपटाचे निम्मे यश येथेच निश्चित झाले आहे. आता अर्धीमुर्धी कामगिरी अनुभवी फेरोज जरूर पार पाडील.

■ ■



आर. के. च्या
निर्मात्याचे
हे रौप्यमहोत्सवी
हास्य



शांतारामबापूंच्या
राजकमलनंतर
रौप्यमहोत्सव
साजरा करण्याचा मान
राज कपूरच्या
चित्रसंस्थेला मिळाला




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

माणूस

शनिवार । १५ सप्टेंबर १९७३ । ५० पैसे

# यशवंतराव मोहिते दिंडोरीला निदर्शनांसाठी येतील का ?

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

१५ सप्टेंबर १९७३

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : सोळावा



## सप्रेम नमस्कार

◻ ऑगस्ट २५ चा माणूस अंक. सप्रेम नमस्कार सदर वाचू लागलो. तिसऱ्या परिच्छेदावर श्री. तु. र. दळवी हे नाव वाचले. दळवी यांचे विषयी काहीतरी गौरवपर वृत्त असणार म्हणून अतिशय आनंद वाटला. तसाच पुढे वाचीत राहिलो अन् काय...कल्याण नजीक हाजीमलंग येथे ता. २५-६-७३ रोजी डायझोन प्राशन करून आत्महत्त्या. सामाजीक व्यथेतून आत्महत्त्या हे वृत्त वाचून तर मनाला अतीव धक्का बसला. अतीव धक्का या साठी म्हणतो कारण स्वतंत्र गोमंतकाच्या पहिल्या निवडणुका झाल्या त्यावेळी स्वयंसेवक प्रचारक म्हणून कै. दळवी व माझी डिचोली परिसरासाठी नेमणूक करण्यात आली होती. कै. दळवी व माझा हा पहिलाच परिचय. त्यानंतर आम्ही एक-मेकांना कधी भेटलोच नाही. मधून मधून तु. र. दळवी वर्तमान पत्रातून वाचायला मिळायचे, येवढाच आमच्या परिचयाला उजळा.

कै. दळवी यांनी सामाजीक कार्याच्या ध्यासाने आपली चांगली नोकरी सोडून


माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

ग्रामीण भागात, आपल्या कर्मभूमित सार्वजनिक कार्य करावयाचे ठरविले, परंतु समाजातील विरोधामुळे त्यांना आपले इच्छित ध्येय साध्य करता आले नाही किंवा त्यासाठी कार्य करण्यासाठी प्रोत्साहन किंवा संधी मिळाली नाही. कार्यकर्ता – पुढारी कितीही प्रामाणिक, सालस, कर्तृत्ववान, ध्येय वेडा / जरी असला तरी त्यालाही विरोधाला तोंड द्यावे लागतेच. विरोधकांकडून विरोध होणार हे ठरलेलेच असते. परंतु जेव्हा स्वकीयांकडून– आपल्याच राजकीय साथींकडून विधायक कार्यासाठी विरोध व्हावा ही दैव दुर्विलासाचीच कथा म्हणावी लागेल.

माझे मित्र दळवी यांच्यासारखे असंख्य कार्यकर्ते आजही ग्रामीण भागात जाती-धर्माने शापीत होवून खडतर – प्रसंगातून कार्य करीत आहेत. दळवी यांचा मृत्यू म्हणजे समाजवादी पक्षाला तो एक शापच म्हणावा लागेल. अर्थात यासाठी फक्त् समाजवादी पक्षालाच दोष द्यावा हा उद्देश नाही. सर्वच पक्षात हे अशा स्वरुपाचे चित्र पहावयास मिळते. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरीत झालेल्या ध्येयवेडया कार्यकर्त्याला वेळो-वेळी मार्गदर्शन करणे, त्याच्या सुख-दुःखात सहभागी होता आले नाही तरी साधीशी सहानुभूती दाखविली तरी त्यास फार मोठा आधार मिळत असतो. कुठल्याही पक्षातील कार्यकर्ता असोतो उपेक्षित रहाता कामा नये याची सदैव काळजी घेता आली पाहिजे.

शंकर श्री. काळे



अनिल क्षीरसागर
आणि
इंजिनियरिंगचे
उच्च शिक्षण
घेऊन हॉलंडहून परतलेले
त्यांचे मित्र
विजय घाटे
यांच्या

# संध्याकाळच्या गप्पा

'हॉलंडमधील शिक्षणसंस्थात 'जनरेशन गॅप' ज्याला म्हणता येईल ती क्वचितच जाणवते. कारण तिथं शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये मित्रत्वाचं नातं असतं, शिवाय बोलण्यात 'अनेक वचनाचा' फारच कमी वापर असल्यामुळे आवश्यक तेवढी जवळीकही निर्माण होते...' सहज गप्पा करताना विजयने सांगितलेली वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट. त्यामुळे वाटले की हॉलंडमधील विद्यार्थीजीवन, तरुण वर्ग आणि समाज यावरच बोलावे, आणि अनुषंगाने मित्रांना काही सांगता आले तर सांगावे !

१९७१ साली पुणे विद्यापीठाच्या बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स व टेले कम्युनिकेशन) ह्या परीक्षेत विजय वासुदेव घाटे प्रथम वर्गात सर्वप्रथम आला. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी. डोळ्यासमोर उच्चशिक्षणाची महत्त्वाकांक्षा अर्थातच होती. रिझल्ट जाहीर झाल्यादिवशीच त्याला 'फिलीप्स इंटरनॅशनल इन्स्टिटयूट' मध्ये पदव्युत्तर अभ्यासासाठी स्कॉलरशिप मिळाल्याची तार मिळाली आणि त्यानुसार हॉलंडमध्ये उच्च शिक्षणाची १॥ वर्ष सोयही झाली.

'हॉलंडमधील वास्तव्यामुळे विचारात काही बदल जाणवतो काय ?'

विजय किंचित हसला. 'निश्चितच. आपल्या एकूण व्यक्तिमत्त्वाच्या कक्षाच बदलतात, रुंदावतात...'

'थोडं स्पष्ट बोल ना...' मध्येच थांबवून माझा प्रश्न.

'...तर रुंदावतात म्हणजे ज्याला आपण 'जग-जग' म्हणत असतो, त्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. विमानातून प्रवास करताना पृथ्वीचा अफाट पसारा विलक्षण बेचैन करतो. झालंच तर खुद्द हॉलंडमधील तांत्रिक ज्ञान, त्या आधारे केलेली प्रगती आणि ती प्रगती करणारी माणसं, यांचा अभ्यास करायला मिळाला, आणि आपण ज्याचा - ज्याचा अभिमान बाळगत होतो तो तकलादू वाटू लागला...'

...दुसरं म्हणजे युरोपमधील समाजाबद्दल आपल्या काही अपेक्षा आणि कल्पना असतात, त्या सगळ्याच बरोबर नाहीत हे कळतं...तसेच फारसा विचार न करता आपण काही जीवनमूल्ये केवळ सवयीचे गुलाम म्हणून स्वीकारत असतो. त्याकडे थोड्याशा

त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहण्याची संधी मिळते. उदा. तेथे 'सेक्स'चा जीवनमूल्याशी किंवा चारित्र्याशी संबंध विशेष लावला जात नाही, तर वैचारिक भ्रष्टता ही जीवन मूल्याचा, चारित्र्याचा एक भाग विशेष करून गृहीत असतो. तेव्हा भारतीय समाजाविषयी चर्चा करताना आपल्या सर्वच गोष्टी आपल्याला वाटतात तेवढ्या Obvious किंवा Logical ही नसतात याची जाणीव होते. विशेषत्वाने मला जाणीव झाली की बौद्धिकदृष्ट्या आपण आपल्याला उगाचच कमी समजतो. खरं तर आपण न्यूनगंड बाजूला केले तर आपणही इतर देशांना Compet करू शकतो....'

'मग तरीही 'तरुण पिढी बिघडली. बेजबाबदार आहे' इत्यादी भंकस तिकडेही होत असणारच....'

'अशी भंकस तिकडे नसते. याचं मुख्य कारण म्हणजे 'कौटुंबिक संबंध किंवा नाती' ज्याला आपण म्हणतो ती नाहीतच. मुलगा-मुलगी साधारणतः १६ व्या किंवा १७ व्या वर्षी स्वतंत्र होतात. सर्वच दृष्टींनी. त्यामुळे अशी भंकस करायला आई-बापांच्या पिढीला संधीच मिळत नाही....'

'Lucky fellows !'

'आणि महत्त्वाचं म्हणजे हॉलंडमध्ये ज्ञानाला अधिक आदर देतात, वय किंवा हुद्दा हे गौण समजले जातात. शिवाय एकूण विद्यार्थी हा फार कमी वयात सज्ञान आणि जबाबदार बनतो. जबाबदाऱ्या टाकल्या की लवकर 'स्वतंत्र' होतो हेच खरे. आपल्यासारखा 'कौतुक' हा प्रकार नाही. स्वतः निर्णय घेण्याची शक्ती कमी वयात येणं हे फार महत्त्वाचं आहे. त्यामुळे हॉलंडचा विद्यार्थी नोकरी करून शिक्षण करण्याच्या प्रवृत्तीचा आहे. आर्थिक दृष्टीने स्वावलंबी व स्वतंत्र झाल्यामुळे आणि संस्कारांचे फाजील स्तोम नसल्यामुळे १०–११ वी तला विद्यार्थीही आत्मविश्वासाने जगात कुठेही फिरू शकतो...'

'नोकरी करून शिकणारा विद्यार्थी कोणते शिक्षण घेऊ शकतो? की नुसतं आर्टस्–कॉमर्स?'

'केवळ तेवढंच नाही, इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स वा इतर कोणत्याही ब्रँचचं शिक्षण नोकरी करून घेता येते. मुख्य म्हणजे तिथं शिक्षण व व्यवहार यांची सांगड घातलेली आहे. त्यामुळे जो ज्या व्यवसायात असेल किंवा जाईल त्यामध्ये त्याला शिक्षणाचे फार चांगले फायदे मिळतात...शिवाय'–

'नोकरी करून शिकणाऱ्या विद्यार्थ्याला सवलती मिळतात काय? म्हणजे ऑफिस व शिक्षण यांची वेळ जमणं, परीक्षेसाठी सुलभतेनं रजा मिळणे वगैरे...' मध्येच माझा जिव्हाळ्याचा व तळमळीचा प्रश्न.

'हो–अरे हॉलंडमध्ये 'मानसशास्त्र, समाजशास्त्र ही केवळ पुस्तकातील शास्त्रं नाहीत, रोजच्या जीवनात त्याचा अधिकाधिक वापर कसा होईल याचा विचार सर्वत्र सतत होत असतो. त्यामुळे तशा सोयी व सवलती तिकडे पुष्कळ आहेत. बहुतेक ठिकाणी कामाची वेळ,

रजा मिळणं वगैरे प्रश्न निर्माण होत नाहीत, पण जिथं निर्माण होतात तिथं फारशी काचकुच, चिकीत्सा होत नाही. सर्व प्रश्न सहजतेने सोडवले जातात. याचं आणखी एक कारण म्हणजे 'विद्यार्थी ही राष्ट्रीय संपत्ती आहे' असा सरकारचा व समाजाचा दृष्टीकोन. त्यामुळेच विचार आचार यातील सुसूत्रता हा आश्चर्यकारक पण सुखद असा अनुभव सतत जाणवत होता. आणखी एक सुखद अनुभव म्हणजे पात्रतेप्रमाणे नोकरी न मिळाल्यास 'बेकार भत्ता' मिळतो...'

'म्हणजे बेस्टच की! पण तिकडे शिक्षण पद्धती कशी आहे?'

'माध्यमिक शिक्षण आपल्यासारखेच. मुदतीबाबत १० वर्षे. त्यानंतर डिग्री कोर्स एकूण पाच वर्षांचा. त्यानंतर 'डॉक्टरेट' करता येते. हॉलंडमधील परीक्षा पद्धतीचं वैशिष्टय म्हणजे 'फर्स्ट क्लास, सेकंड क्लास! अशा श्रेणी नाहीत. आता मी outstanding career मध्ये पास झालो. म्हणजे आपल्याकडचे फर्स्ट क्लास डिस्टींक्शन."

'कोणत्या विषयात?'

'बरं झालं विचारलंस ते! माझ्या दीड वर्षाच्या अभ्यासक्रमात 'Digital communication' या विषयाचा १ वर्ष अभ्यास केला आणि ६ महिने microwave integrated cricuits विषयीचे लॅबोटरीमध्ये संशोधन केले. तुझ्या दृष्टीने महत्त्वाचं म्हणजे वार्षिक परीक्षा आपल्या इतक्या कडक व बंधनकारक नसतात. अभ्यासाचा आत्मविश्वास आला की ठराविक मुदतीनंतर आपण कधीही परीक्षा देऊ शकतो. आर्थिक स्वावलंबन असल्यामुळे शिक्षण ही फार खर्चिक बाब त्यांना वाटत नाही.'

'हे उत्तमच! नाहीतर आपण. अभ्यास झालेला नसला तरी दडपणाखाली परीक्षा द्यायची आणि नापास झाल्यावर नामुष्की पत्करायची!... पण साधारण कुठल्या ब्रँचला गर्दी असते? आपल्यासारखी आर्टस्-कॉमर्स कॉलेजेस फुल्ल असतात का?'

'तसं काही सांगता येत नाही! पण शालेय शिक्षणानंतर इंजिनिअरींगकडेही प्रवेश मिळत असल्यामुळे तिकडे खूप गर्दी असते. नंतर मात्र, साधारण १ वर्षानंतर 'ड्रॉप' घेण्याची प्रवृत्ती वाढू लागते. याला मुख्य कारण म्हणजे चिकाटी कमी पडते. तिथं ५ वर्षाच्या कोर्समध्ये १ वर्ष प्रत्यक्ष कामाचं प्रॅक्टिकल असतं. कुठल्याही गोष्टीची कमतरता नसल्यामुळे सुखासीनतेकडे साहजिकच कल वाढतो, आणि चिकाटी कमी पडते! पण तरीसुद्धा भरपूर इंजिनियर्स बाहेर पडतात. इतके की सध्या आपल्याकडे इंजिनियर्सची जी अवस्था झालीय तशीच अवस्था हॉलंडमधील इंजिनियर्सची झालीय्. म्हणजे नोकऱ्या मिळणं कठीण होऊन बसलंय्, एक प्रकारची 'स्टॅग्नंट पोझिशन' निर्माण झालीय्...'

'—कारण स्त्री-वर्ग का? सगळीकडेच जायला लागल्यात त्या!...'

'कारण स्त्रीवर्ग नाही—आपल्याकडे

जितक्या संख्येने इंजिनिअरींगला जातात तेवढीच संख्या तिकडेही आहे, आणि–'

'–ते असो! सहशिक्षणाचा प्रयोग तिकडे कसा काय?' माझा प्रश्न.

'तुझ्या प्रश्नाचा रोख माझ्या लक्षात आला. हॉलंडमध्ये सहशिक्षण हा प्रयोग नाही–शालेय शिक्षणापासूनच मुला-मुलींचे एकत्र वर्ग असतात. त्यामुळे तिकडच्या संस्थातून एक प्रकारचा मोकळेपणा असतो. हॉलंडमधील पोरी नुसता 'पिळूपणा' करीत नाहीत किंवा केवळ 'फिरकी' घेत नाहीत...म्हणजे त्या 'सेक्स'बाबत 'फ्री' असतात... इतक्या की आपण जसं चहा-कॉफी घेऊन येतो, तसं ते 'सेक्स' अनुभवतात! 'सेक्स'बाबत आपल्याइतका 'पचका' त्यांच्याकडे नाही। याचं मुख्य कारण म्हणजे शालेय वयापासून त्यांना सेक्सचं शास्त्रीय शिक्षण मिळतं. त्यामुळे स्वाभाविक अशी जबाबदारी प्रत्येकाला कळू लागते. शिवाय आयुष्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी आवश्यक तेवढीच गंभीर आहे...! आता सेक्सबाबत एक मजा म्हणून सांगतो! हॉलंडमध्ये 'ब्ल्यू मुवीज्' नेहमीच्या थिएटर्सना दाखविल्या जातात. आणि बहुतेक सर्वांना सर्व ब्ल्यू मुवीज् पाहता येतात. फार थोड्या 'ब्ल्यू' १८ वर्षावरील लोकांसाठी असतात. गर्दी इतकी असते की एकेक 'ब्ल्यू' सहा-सहा महिने दाखवली जाते! आणि कहर म्हणजे म्हाताऱ्या लोकांचीच गर्दी अधिक असते!'

'वंडरच! दुसऱ्याच्या भानगडी पाहण्याची मानवी प्रवृत्तीची कमालच आहे! पण 'ब्ल्यू'चं साधारण स्वरूप कसं असतं?'

'...तो एक अनुभवाचा भाग आहे! पण मी जी एक मुवी पाह्यली त्यात स्त्री-पुरुषातले लैंगिक संबंध अगदी पशुपातळीवरचे होते! वासना आणि भावना यांचा संबंधच मानला जात नाही! एकदा सेक्सवर चर्चा करताना 'माणूस व पशू यात फरक कोणता?...' या माझ्या प्रश्नाला 'फरक कशाला हवाय्!' असा प्रतिप्रश्न विचारला गेला–त्याचे उत्तर मात्र मला अजून मिळाले नाही!... पण असं असूनही एका गोष्टीसाठी मात्र मानलं पाह्यजे. हॉलंडमधील विद्यार्थी संध्याकाळी–सुट्टीच्या दिवशी 'वासुगिरी' करीत रस्त्यातून भटकताना दिसणार नाही–तर तो मैदानात दिसेल. फुटबॉल, हॉकी, स्केटिंग, सायकलींग इ. खेळताना. स्पोर्टस्‌कडेसुद्धा आयुष्यातला जास्त वेळ देत असल्यामुळे मला वाटतं वृत्तीनं ते 'स्पोर्टीवली' असतात!'

'येस्–डेफिनेटली. बरं–आता एक गंभीर प्रश्न. हॉलंडचा विद्यार्थी सामाजिक व राजकीय दृष्ट्या किती जागरूक आहे?'

'तसा सर्वसाधारण विचार केला तर तुला गृहीत असलेली सामाजिक–राजकीय जागरूकता विद्यार्थ्यांतच काय, पण एकूण जनतेतच फारच कमी आहे. सधनता असल्यामुळे तीव्रतेने जाणवावेत असे प्रॉब्लेम्स् नाहीत. तरीसुद्धा हॉलंडमध्ये छोटे-मोठे असे ५० राजकीय पक्ष

आहेत. पण तसा राजकारणात कोणाला फारसा रस नाही आणि राजकारणाला तशी ' आयडियालॉजी ' नाही. ज्याला ' निवडणुक जत्रा ' म्हणता येईल तसं वातावरण नाही, प्रचार, निवडणुका—अगदी शांतपणे, इतका की नेहमीच्या व्यवहारातलाच एक भाग म्हणून. मला वाटतं, यांत्रिकीकरणामुळे सर्वच गोष्टी बसल्या जागेवरून होतात. त्यामुळे ' निवडणूक धमाल ' नाही आणि दुसरं म्हणजे त्यांच्या रक्तात ' राजकारण 'च एकूण कमी आहे ! "

' आता अगदी शेवटचा प्रश्न : तुला भारतात परत यावसं वाटलं ? अगदी मनापासून ?'

' येस ऽऽ मला भारतात परत यावसं वाटलं—अगदी मनापासून ! माझ्या ज्ञानाचा—हॉलंडमध्ये घेतलेल्या तांत्रिक ज्ञानाचा—इथे काहीतरी उपयोग व्हावा आणि दुसरं म्हणजे असे थोडे थोडे परदेशी जाऊन शिक्षण घेऊन आलो तरच आपणही काही प्रगती करू शकू. नाहीतर आपण जसे जुन्या पिढीच्या नावाने ओरडायला मोकळे असतो, तसे आपल्या मागून येणाऱ्या पिढ्याही ओरडतील. आपल्याकडे बुद्धी आहे, पण प्रगत ज्ञान उपयोगात आणण्याची संधी कमी आहे. आपण थोडे-थोडे असे शिकून आलो तर संधीही उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळेच आपण इलेक्ट्रॉनिक्स-मध्ये प्रगती करू शकू. शिवाय आपल्या-कडे आता टी.व्ही. आलाय्, टी.व्ही.साठी तर आपल्याला जास्तीत जास्त तंत्रज्ञांची आवश्यकता आहे, तंत्रज्ञांवरच टी.व्ही.ची यशस्विता अवलंबून आहे. मात्र जपान, युनायटेड स्टेटस् इ. मोस्ट ॲडव्हान्सड् देशात इलेक्ट्रॉनिक्स शिक्षणासाठी जायची संधी आली तर मी अधिक तयारीने व उत्साहाने जाईन. इलेक्ट्रॉनिक्समधील ज्ञान हे सतत प्रगत होत जातंय्... त्याच्याशी स्पर्धा फार अवघड आहे तरी-सुद्धा ते एक आव्हान आहे..."

"—तुझा आऊटलूक फार चांगला आहे...२॥—३ तास गप्पा झाल्यामुळे बरीच नवीन माहिती मिळाली आणि संध्याकाळ फार चांगली गेली. फॉरेनला जाऊन आलेल्याशी बोलणं म्हणजे काही नवीन कळणं असतं—त्यामुळे मी अशी संधी सोडीत नाही ! चांगला चित्रपट पाहताना जशी involment असते तसे मी गप्पा करताना एका निराळ्या ' विश्वात ' जातो...असो...चलतो मी ...अच्छा..."

' थांब, थोडा वेळ—एक पाच मिनिटं !'

नंतर चहा-पाणी !

' बरंय्—चलतो आता—अच्छाऽऽ... "

' अच्छाऽऽ... '

काही वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियन लोकां-साठी आकाशवाणीवर भाषण करताना इंग्लंडची राणी एलिझाबेथ ' गप्पा या, मनाला ताजेतवाने करणाऱ्या टॉनिक-सारख्या असतात... ' असे म्हटल्याचे वाचनात आले होते...त्याचे सुखद स्मरण मनात समाधानाच्या तारा छेडून गेले !

● ● ●

# दिंडोरी वार्ता

## युरिया आला कसा गेला कुठे?

रघुवीर, मुळे नासिक

गणेश चतुर्थी! विघ्नहर्त्या गजाननाच्या आगमनाचा दिवस. सार्वजनिक वाचनालयाच्या परशुराम सायखेडकर नाटयगृहाचे भव्य प्रेक्षागार. जिल्ह्यातल्या 'सहकारी' कार्यकर्त्यांचा मेळावा. अध्यक्ष सहकार मंत्री ना. यशवंतरावजी मोहिते. व्यासपीठावर जिल्ह्याची मान्यवर मंडळी. 'भाषणे अन्यत्र सहकार मेळाव्यात होतात त्याच साच्याची. मात्र ना. मोहिते यांचा अपवाद. आपल्या भाषणात त्यांनी सहकारी संस्थातील भ्रष्टाचाराबद्दल चिंता व्यक्त केली आणि सांगितले: या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी जनतेने भ्रष्टाचारी सहकारी संस्था व तिचे त्याच 'नेचर' चे संचालक यांच्यापुढे निदर्शने करावीत, त्यांना 'घेराव' घालून त्यांच्या अपराधाचे माप त्यांच्या पदरी घालावे, निदर्शनाचा झेंडा खुद्द मी (म्हणजे ना. यशवंतराव मोहिते) खांद्यावर घेईन व सर्वात पुढे (बिनीचा सैनिक) असेन.

'मेळावाच तो. या वाक्यांच्या फेकीवर टाळ्यांचा कडकडाट न झाल्यास नवल! पण एकूण मला फार बरे वाटले. कारण सहकारी संस्थांमधील भ्रष्टाचाराविषयी विविध ठिकाणी लेख लिहून मी खटले ओढवून घेतले आहेत. नामदार महाशयांनी आपल्याला नैतिक पाठिंबाच दिल्याचा (आ) भास झाला.

दुसरे असे की पंडित जवाहरलालजी नेहरू एकदा म्हणाले होते की साठेबाज, काळाबाजार वाल्यांना फाशी द्यायला पाहिजेत. राष्ट्रपती गिरी यांनी सांगितले की सत्तेचा दुरुपयोग करणारे लोकप्रतिनिधी आणि समाजकंटक व्यापारी यांना खड्यासारखे बाजूला फेकले पाहिजेत. पंतप्रधानांनी संदेश दिला भ्रष्टाचारी, काळाबाजारवाले यांना जीवन जगणेच असह्य करून टाका. त्या पंथातलाच ना. यशवंतराव मोहिते यांचा हा आताचा संदेश असल्याचे मला बिलकूल वाटले नाही. कारण कै. नेहरूंनी साठेबाजांना फाशी द्यावे अशी (फक्त) इच्छा प्रदर्शित केली होती. राष्ट्रपती गिरींनी सर्वसामान्य 'जनतेला' आवाहन केले होते. (अशा लोकप्रतिनिधींना आमचा पक्ष तिकिटे देणार नाही असे सांगितले नव्हते.) इंदिराजींनी देखील स्वतःच्या हाती असलेल्या 'मिसा' (Maintenance of Internal Security Act) वा आय. पी. सी. ने न भागणारे, काळ्या बाजारवाल्यांच्या बंदोबस्ताचे काम 'जनते'वर सोपवले होते. पण ना. मोहिते यांची मात्र 'श्वेत पत्रिका'च होती. ते स्वतःच भ्रष्टाचारविरोधी

आघाडीत सामील होणार आहेत. त्यामुळे फार बरे वाटले. असो. श्रीगणेश चतुर्थीच्या दिवशी त्यांच्या रूपाने नाशकात सुखकर्ता, दुखहर्ताच अवतरला आणि मध्यंतरी सोडून दिलेला 'भ्रष्टाचार शोध' कार्यक्रम पुनः हाती घेतला. तो वाचकांपुढे ठेवीत आहोत. निदर्शने आयोजित करण्याचा विचार आहे. ना. मोहिते केव्हा तारीख देताहेत बघु या!!

दिंडोरी! तालुक्याचे ठिकाण. नासिक पासून फक्त १६ मैल मार्गावर, गुजरातकडे जाणाऱ्या राजमार्गावर. आदिवासी तालुका म्हणून लोकसख्येमुळे राजदरबारी नोंद. येथून निवडून गेलेले लोकप्रतिनिधी देखील आदिवासी. तथापी भाताचे आगर. कडधान्याचे कोठार आणि भाजीपाल्याची बागायतही चांगली. तालुका सहकारी सस्थात शिखर संस्था म्हणून काम करणारा न्यू दिंडोरी तालुका सहकारी खरेदी विक्री संघ इथेच आहे. या संघातील गैरव्यवहाराच्या इतक्या बातम्या माझ्याकडे आल्या होत्या, की त्या प्रसिद्धीस देण्याचा मोह कुणाही वार्ताहरास व्हावा. पण परमेश्वराप्रमाणे सहकारी संस्थातील भ्रष्टाचारही सर्वत्र व्यापून राहिल्याने त्यात नाविन्य ते काय? म्हणून त्या मागे ठेवल्या. तथापी कऱ्हाडपासून वऱ्हाडपर्यंत 'युरिया' प्रकरणी जे गैरव्यवहार झाले त्याची वृत्ते प्रकाशीत होवू लागली. तेव्हा बडया बडया सहकारी संस्थांच्या पंक्तीला जावून युरिया हडप करणाऱ्या या संस्थेचे कामकाज पहावे म्हणून दिंडोशीला गेलो.

'युरिया' प्रकरणाच्या आधी ह्या संघाच्या (गैर) कारभाराची परंपरा किती जुनी आहे याचे एक-दोन किस्से ऐकवतो म्हणजे पुढची शिकार 'त्यांच्या' दृष्टीने किती मामुली होती ते कळेल.

महाराष्ट्र राज्य मार्केटिंग कोऑपरेटिव्ह संघाने या न्यू दिंडोरी संघावर भातखरेदीची जबाबदारी टाकली होती. त्या दरम्यान अनेक कारणास्तव जिल्हा सहकारी बँकेने या संघाला आर्थिक साह्य देण्याचे नाकारले होते. सहकारी संस्थेत पैसे नाहीत मग अधिकार व पदे कशासाठी? एक शक्कल निघाली आणि ती यशस्वीही झाली.

महाराष्ट्र संघाने भात खरेदीची जबाबदारी टाकली होतीच मग पन्नास हजार रुपयांचे भात खरेदी करण्यांत आल्याचे खोटे रेकॉर्ड तयार करण्यात आले. आणि नासिक जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत दिंडोरी संघाकडून रुपये पन्नास हजाराची हुंडी महाराष्ट्र संघाकडे पाठवून देण्यात आली. काहीही न करता हुंडी वटवून आल्याने अनायासे संघाच्या शिलकी पन्नास हजाराचे दाम पडले. पुढे महाराष्ट्र संघाच्या उघडकीस ही गोष्ट आली की दिंडोरी संघाने आपल्याला रामकुंडी हिसका दाखवला. त्यांनी जाम पत्रव्यवहार केला पण दाद द्यायला आम्ही काय लेचेपेचे आहोत? महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटिव्ह संघाला पोलिसात धाव घ्यावी लागण्याची शक्यता आहे.

या संघात नर रक्ताची चटक लागलेल्या जातीचे काही प्राणी आहेत. थोड्या थोड्या रकमा उचलणे व त्यासाठी खोटे रेकॉर्ड तयार करणे हा तर दिंडोरी संघात हातचा मळ झाला होता. (पर्यायाने संघ दिवाळखोरीत निघण्याच्या बेतात आहे. जिल्हा बँकेने 'प्रशासक' नेमला याचा दुसरा अर्थ कोणता?) संघातील 'एका' जबाबदार गृहस्थाला रुपये पंधराशेची नितांत गरज होती. पैसे संघातून उचलायचे तर खरे पण तेही कायदेशीररीत्या. लखमापूरचे सखाराम सावळेराम देवकर यांच्याकडून संघाने दीड हजार रुपयांचा गूळ खरेदी केल्याचे दाखवण्यात आले. आणि तो गूळ त्याच दिवशी उधारीत पिंपळगाव बसवंतचे एक व्यापारी भाऊराव काळू वाघ यांना रुपये तेराशेला विकल्याचे कागदोपत्री नमूद करण्यात आले. बराच काळ गेल्यावर श्री. वाघ यांना बाकी पाठविण्याची स्मरणपत्रे गेली तेव्हा ते दिंडोरीला आले व मी गूळ खरेदीच केला नाही, माझ्याकडे कसली बाकी मागणारी पत्रे पाठविता असा जाब त्यांनी विचारला. तेव्हा उघडकीस आले, की लखमापूरचे देवकर यांनी संघाला गूळ विकलेला नव्हता व तो पिंपळगावचे वाघ यांना उधारीत विकलाही नव्हता. 'एका' जबाबदार व्यक्तीने अशा रीतीने १५०० रुपये उचलले. ते सहा महिने वापरले. बिन व्याजी. आणि रेकॉर्ड आधारे दोनशे रुपये बक्षिसी (या चौर्यचातुर्याबद्दल) घेऊन तेराशेच भरले! आहे की नाही अक्कल?

आता युरियाकडे वळू. युरियाअभावी राज्यात शेतकरी किती हवालदिल झाला आहे याची सर्वांना कल्पना आहे. रुपये ४९ ची गोण ८० ते ९० असा काळ्याबाजारात भाव चालू आहे. असे असताना, शिक्याचे तुटल्यावर सहकारी बोक्यांचे न फावेल तरच नवल!

वस्तुत: शेतकऱ्यापर्यंत युरिया वाजवी भावात न पोचविण्यास सरकारच पूर्णपणे जबाबदार आहे. २॥ कोटींची सहकारक्षेत्रात झालेली अफरातफर आणि हजारो लहान-मोठ्या सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे संशयित चारित्र्य हे लक्षात घेऊन तरी सरकारने वागावे की नाही? पण सहकारी क्षेत्रावरील अंधश्रद्धा आणि कार्यकर्त्यांवरचा विश्वास व नियमबाज सरकारी अधिकारी या तीन गोष्टी प्रामुख्याने युरियाचा काळा बाजार होऊ देण्यास जबाबदार आहेत. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या मार्फत शेतकऱ्यांना युरिया रास्त भावात व वेळेवर पोचला असता. पण झाले काय? वेअर हाऊसेसना (जिथे युरियाचा प्रचंड साठा ठेवण्यात आला होता) आणि जिल्हा परिषद व सहकारी संस्थांना सरकारने एक पत्र दिले होते. विशिष्ट मुदतीत जिल्हा परिषदेने जर युरिया रोख रक्कम (चलनाने) भरून उचलला नाही तर कोणत्याही सहकारी संस्थेला भरणा झाल्यास देण्यात यावा. हा नियम इतका 'घसराळू' आहे की त्यावर अधिक भाष्य कशाला?

या नियमाचा डोकेबाजांनी राज्यात सर्वत्र जो दुरुपयोग करून घेतला तसाच प्रकार न्यू दिंडोरी सहकारी खरेदी-विक्री संघात घडला. संघाच्या वणी शाखेला या नियमांची जाण व युरियाची वाण माहीत होती. २२–६–७३ ला संघाच्या वणी शाखेत ३ हजार, ३ शे ५३ रुपये अवघी शिल्लक होती. पण त्याच दिवशी वेअर हाऊसच्या नावे ४८ हजार ५ शे रुपयांचा भरणा स्टेट बँक ट्रेझरीत झाला. ज्या संघाच्या व्यवहारामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुद्धा पैसे देत नाही, त्या संघाच्या शाखेला 'एक रकमी एव्हढी रक्कम देण्यामागे निश्चितपणे 'एक' सूत्रधार आहे. असो. वेअरहाऊसला ४८,५०० चे चलन दाखवून ५० टन म्हणजे १ हजार गोणी युरिया वणीला ट्रकने आणला गेला. आता चपळाई कशी बघा, त्याच दिवशी २५ हजार, ५ शे रुपयांचा युरिया म्हणजे ५२० गोण्यांची विक्रीही करण्यात आली. अशा प्रकारे ४२ जणांच्या नावावर १ हजार गोणी युरियाचे वाटप झाले. ज्यांनी अनामत रक्कम दिली त्यांना जवळ जवळ ४ टन माल देण्यात आला. पावत्या ४९ रुपये ७५ पैसे प्रमाणे फाडण्यात आल्या.

या व्यवहाराची वाच्यता होण्यास वेळ लागला नाही. संचालक मंडळाने एक चौकशी समिती नेमली. त्यात सर्वश्री संपतराव शंकरराव पाटील, पुंजा भाऊ आव्हाड व पी. पी. घुमरे या संचालकांचा समावेश होता. एकूण चौघा शेतकऱ्यांनी आपण संघाला पैसेही दिले नाहीत व युरियाही खरेदी केलेला नाही असे सांगितले. त्या शेतकऱ्यांची नावे अशी १: कृष्णगावचे कारभारी नथू पाटील १॥ टन. २: वणीचे लक्ष्मण विठोबा घस्ते १॥ टन. ३: दिंडोरीचे अण्णासाहेब देशमुख २ टन. ४: लखनापूरचे सखाराम सावळेराम देवकर १॥ टन.

या सर्व पुराव्यावरून चौकशी समितीने एक अहवाल तयार केला व दिंडोरी पोलिस स्टेशनात फिर्यादही नोंदविण्यात आली.

आता येथपर्यंत सारे ठीक झाले. गावात हिंडलो तेव्हा 'सारेच लोक चोर आहेत, डबक्यात राहून दुसरे घाणेरडे म्हणण्याचा कोणालाच अधिकार नाही.' असे प्रामाणिक मत एकाने व्यक्त केले. एक कार्यकर्ता म्हणाला, ज्यांच्यावर दोषारोप ठेवला आहे त्यांचा राजीनामा आधी संचालक मंडळाने मंजूर केलाच कसा? व तो निर्णय फिरवला कसा? प्रोसिडिंग मंजूरचे नामंजूरचे होऊ शकते काय? इतका कालावधी लोटला तरी संबंधिताला सस्पेंड करण्यात आलेले नाही!

एका जबाबदार कार्यकर्त्याने सांगितले की, संघाच्या युरियाची चौकशी हवीच पण ४१ पोती साखर गायब कशी झाली, ५० हजारांची खोटी हुंडी कुणी वटविली, वारंवार खोटे रेकॉर्ड तयार करून पैसे कुणी वापरले. याची सर्व चौकशी व्हावी. 'कोणीच स्वच्छ नाही आहे. मग एखाद्यालाच फाशी देणे हे कृतघ्नपणाचेच लक्षण नव्हे काय?

● ● ●

रवींद्र पिंगे

शतपावली

# कवीची सुखद भेट

पाखरं चोचीतून बी-बियाणं आणतात. माळावर टाकतात. तिथे हळूहळू हिरवळ फुलते. पानंफुलं लुकलुकू लागतात. पाहून बरं वाटतं. कुसुमाग्रजांबद्दल असाच अनुभव होता. त्यांची डोळेभेट घडलेली नव्हती. कुठेतरी घडचात त्यांच्या कवितेच्या शेजारच्या चिचोळ्या सफेत पट्टीत त्यांचं एक रेखाचित्र पाहिलेलं होतं. ते दर्शन मोठं सुखद होतं. चित्राशेजारच्या कवितेच्या ओळी अधिक सुखद होत्या. त्यांची एक कविता वाचली की दुसरी, तिसरी, चौथी वाचावी असा घोषा लागायचा. प्रत्येक कविता आपापल्यापरीने गुणी नि गोंडस असे. त्या नक्षत्रलख्ख कवितेनेच त्या दिवसांना तृप्ती दिली. कविचरित्राची नसती उठाठेव मग का सुचणार? श्रद्धाळू माणसं पंचाग बाळगतात तशी कविच्या कवितासंग्रहाची प्रत मी जवळ बाळगली होती. केव्हाही पाच मिनिटं मिळाली तर कुठल्याही पानावरून पुढे-मागे वाचायला सुरुवात करून आम्ही ताजेतवाने व्हायचो, तो काळच तसा होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचं एक तप कुसुमाग्रजांच्याच कवितेचं होतं. मर्ढेकर, पु. शि. रेगे, इंदिरा संत, बोरकर यांचा तो काळ. कुसुमाग्रजांच्या साथीने तो सुफलित झाला. कुसुमाग्रजांच्या कवितेने ज्याच्या काळजाला कुरवाळलं नव्हतं असा तरुण वाचक तेव्हा नव्हताच. खरं खरं सांगतो, आम्ही नव्या कविता जुळवायचो त्या कुसुमाग्रजांच्याच कार्बन कॉप्या असायच्या. आपल्या मरणाने त्या आस्ते आस्ते मरायच्या पण तरीही मरगळणं आम्हाला माहित नव्हतं कारण आमच्या कॉप्या तयार होण्याच्या आत कुसुमाग्रजांची नवी ओजस्वी रचना मनावर आल्हादकारक शिपण करून जाई. आमच्या शंभर अपयशांना पुरून उरणारी ती जयवंती कविता असे. कुसुमाग्रजो कवितेचो एक मोठी चमत्कारीक मजा आमच्यासारख्या भुरट्या कवींनी परत परत अनुभविली. त्यांची

नवी रचना वाचली की वाटे आपण-सुद्धा अशी कविता अगदी सहज करू शकू; आणि थालीपीठ करतात तशी आम्ही कांदा-लसूण वगैरे फर्मास माल-मसाला घालून केलेली कविता तेलातून बाहेर काढली रे काढली की खात्री होई, कविता लिहाव्यात तर कुसुमाग्रजांनीच आणि तरीही आम्ही मथ्थडपणे त्यांच्या मापावर कविता बेतीतच राहिलो. ह्याचा दोष त्या उत्साहवर्धक काळाकडे, आपल्या आशाळभूत वाढाळू वयाकडे आणि तितकाच 'तुम्हाला माझ्यामागून आलंच पाहिजे' असं भले निक्षून निःशब्द आमंत्रण देणाऱ्या कुसुमाग्रजी पालखीकडेच जातो.

तर, अशी ती यात्रेत फडफडणाऱ्या पताकेसारखी कुसुमाग्रजांची उंच कविता होती. आम्ही तिच्यावर भाळलो होतो. तिच्यात आम्ही इतके गुंतलो की कवि-चरित्राचा पंचनामा करण्याचं कारणच उरलं नाही. पण मित्र पाखरांसारखे असतात. ते दहा दिशातून उगवतात आणि चोचीतून बी-बियाणं अगत्याने आणून तुमच्या मनाच्या माळावर टाकून पसार होतात. कुसुमाग्रजांबद्दल अनेक सांगोवांगीच्या गोष्टी मित्रमंडळाकडून कळल्या. त्यांना म्हणे जबरदस्त निद्रा-नाशाची बाधा आहे. ते दिवसा डाराडूर झोपतात नि क्षितिजावर तारे लुक-लुकायला लागले की एकटेच फिरायला बाहेर पडतात, ते थेट पहाटतारा उगवे-पर्यंत. त्यांना आत्मविश्वास आहे, पण आत्मप्रौढी नाही. ते प्रतिष्ठितांना धूप घालीत नाहीत पण समाजवादी कार्य-कर्त्यांचा आणि मास्तरमंडळींचा त्यांना फार लळा आहे; आपण उठून कुणाचा उंबरठा ओलांडणार नाहीत पण समाज-वादी पक्षाच्या कचेरीत मात्र गप्पा मारायला पाणी सखलाकडे धावावे तसे येतात. आकाशवाणीची करारपत्रं ती फोडण्याचा त्रास न घेताच कचऱ्यांच्या टोपलीत टाकतात. त्यांच्या हातात कटोरा नसतो; कविसंमेलनाच्या कट्ट्या-वर दाद मागत फिरत नाहीत; वगैरे वगैरे- ही झाली चित्राची एक लख्ख बाजू. मग दुसऱ्या बाजूने वेगळ्या जातीचे किस्से जमा होऊ लागले. अरे, ही सगळी बुवाबाजी आहे. रे. डॉ. भालेराव, वा. ल. कुलकर्णी, बाळासाहेब काळे, माधव मनोहर, एकजात सगळे नाशिकवाले. त्यांनी नाशिकवाल्या शिरवाडकरांचं स्तोम माजवलंय–तसा कवि नक्कीच चांगला–पण उदो उदो पद्धतशीरपणे चाललाय. नि कोण म्हणतो ते लोकात मिसळत नाहीत म्हणून? नाशकातल्या मोजून प्रत्येक सभेचे ते अध्यक्ष असतात; डिट्टो काणेकर झाल्यात. शिवाय तुला एक ठाऊक आहे काय की ते मराठी सातवी-साठी गाईडस लिहितात, वगैरे वगैरे.

ह्या उलटसुलट आख्याइकांची गुंतवळ मी खिडकीतून बाहेर झुगारून दिली आणि कवीचा संग्रह उघडून स्वच्छ प्रकाशात वाचू लागलो. वाचता वाचता आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या. एखादुसरी कविता सुकून गेलेल्या द्राक्षाच्या मळ्यासारखी पाचोळेवजा, रुक्ष, कोरडीही वाटली.

नाही असे नाही. पण बेरजेत एकंदर सोहळा आनंदाचाच भरला. कुसुमाग्रजी कवितेने तृप्तीचं तीर्थ दिलं तेवढं पुरे झालं. बरेच दिवस पुरलं.

ओंजळीत त्या तृप्तीची फुलं घेऊन मी कवीच्या समोर बसलो आहे.

वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवी कुसुमाग्रज. साठी ओलांडून दोन वर्षं झाली असावीत. प्रत्यक्ष दर्शनात हे अजिबात पटत नाही. पंचावन छप्पनचे वाटतात. मध्यम उंची. निमगोरी तजेलदार कांती. शरीर गुबगुबीत. पोट सुटलेलं. डोळ्यावर सुबक चष्मा. चर्या सोशिक, स्नेहशील, नजरेतला भाव खूपसा वत्सल. आवाज ऑर्गनसारखा खालच्या पट्टीतला, किंचित घोगरा. आदल्या रात्रीच्या जागरणाने डोळ्यां-सभोवारचा भाग किंचित सुजलेला. केसांची झुलपं. भांग अगदी व्यवस्थित पाडलेला. सफेत धुतका वेष. साधा लेंगा, सदरा. ह्या शांत माणूस काळजी नावाचा गळेबंद कोट काल कुठे तरी विसरून आला असावा असं पहिल्या रामरामात वाटलं.

नाशकातली दुपार. श्रावणातली. ऊन आहे–आहे, नाही–नाही. हवेत गारवा आहे. शिवाजी कॉलनी घळी-सारखी शांत आहे. पिचपिच्या पावसाने गंगेचा जुना परिसर चिकचिकीत केला आहे. जावं तिथे चिखल. पण कवी रहातात तो भाग सुभग, अलिप्त आणि सुखवस्तु आहे. झाडी भरपूर आहे. गड-बड गोंधळ औषधालासुद्धा नाही. अशा सावलीतला एक पुणेरी चणीचा बंगला. त्याच्या दर्शनी गाळ्यात कवींची वस्ती आहे.

ज्या दारावर नावाची पाटी नाही ते घर शिरवाडकरांचं असणार हे उघडच होतं. दारही थोडंसं उघडं होतं.

बैठकीची स्वच्छ, अद्यावत टाप-टीपीची, प्रकाशमान खोली. कपाटात पुस्तकांची रेलचेल. भिंतीवर दोन तीन सुंदर चित्रं. त्यातलं एक उडण्यासाठी पंख विस्तारणाऱ्या गरुडाचं. ते प्रतिक वाटलं. उदबत्त्यांची सुगंधी वलयं. सिग-रेटस्‌ची पाकिटं. हस्तस्पर्श न झालेली सकाळची ताजी वर्तमानपत्रं निमूटपणी एकमेकांवर माना टाकून पेंगलेली. बाहेर जगात काय धक्काबुक्की असेल ती असो, ह्या आवारात तरी काळाची पावलं फारच संथ लयीत पडत असावीत.

कवी घुमे नाहीत. बोलके आहेत हे नशीब.

मी ह्या विलक्षण शांत आणि सावलीच्या वातावरणाने आल्या आल्याच भारून गेलो आहे. मुंबईच्या गोंगाटगर्दीचं भूत माझ्या मानगूटीवर आहे. इतक्या शांत पण अद्यावत वाता-वरणात रहाणाऱ्या कवीरायांचा मी पोटभर हेवा केला. म्हटलं, 'तुम्ही इतक्या सुंदर वातावरणात रहाता म्हणजे लकीच आहात बुवा. हे रानही नाही नि ही पेठही नाही. आम्ही मुंबईत हैराण झालोय बघा."

'खरं आहे बुवा. कसे काय लोक मुंबईत रहातात? रस्त्यातून धड चालतासुद्धा येत नाही माणसाला तिथे

माणसाचा अपमान चाललाय. मी मुंबईत मुळात कमीच येतो. पण आलो की केव्हा मुंबई सोडतोसं होतं. खरं म्हणजे मी मुंबईत राहिलेलोही होतो. पण ती तेव्हाची मुंबई फारच वेगळी होती हो. रांगा तेव्हा नव्हत्याच. कुठेही जागा मिळे. गाडीत वगैरे व्यवस्थित जागा मिळायची. ट्रॅमने एका आण्यात मनसोक्त फिरता यायचं. सर्वत्र झाडीही होती. स्वस्ताईही होती. मी तेव्हा दादरला हिंदू कॉलनीत रहायचो. एक छोटीशी खोली होती.

तीस पस्तीस वर्षांमागे कवींची मुंबईत वस्ती होती–जेव्हा मुंबई हे आजच्यासारखं राक्षसनगर नव्हतं; एक भराभराटीचं गाव होतं. कवी तेव्हा झाडी असलेल्या मुंबईनामक शांत गावात निव्वळ भाकरतुकड्यासाठीच नव्हे तर साहित्य, वृत्तपत्रं आणि चित्रपट ह्या तीन घोड्यांवर पाय ठेऊन तलवार मारायला आला होता. त्याची बरीच होरपळ झाली. चांगली तंगडतोड झाली. वाचा : 'विरामचिन्हे.' लेखक– वि. वा. शिरवाडकर. आणि मुंबईतच प्रभाकर पाध्ये, वा. रा. ढवळे वगैरे मायाळू माणसंही भेटली–ज्यांच्यामुळे कवीला धीर आला. पण काव्यरसिकाच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट ती नाही. मुंबईत तंगडतोड झाली नसती तर ती इतरत्रही झालीच असती नि मुंबईकर मायाळू माणसांहून सवाई मायाळू माणसं अन्यत्रही भेटली नसतीच अस नाही, पत्रिकेतच तसा जबरदस्त योग असता तर. महत्त्वाची बाब : ह्या धक्काबुक्कीत आणि कुरवाळण्याच्या काळात कवीचा हात लिहिता राहिला होता. नदीने वहातं रहावं, रोपाने फुलत रहावं, कवीने लिहितं रहावं. तेच त्याचं अवतारकृत्य.

सध्याचा आखीव, बाजारपेठी वृत्तपत्रव्यवसाय आणि स्वातंत्र्यपूर्व काळातला अर्धहौशी, अर्धधंदेवाईक आणि एकूण बेहिशोबी पण वाङ्मयीन् धाटणीचा वृत्तपत्रव्यवसाय, ह्याबद्दल बोलणं झालं. कवि म्हणाले, 'रांगणेकर, काणेकर ह्यांच्या 'चित्रा' वगैरे साप्ताहिकांवर आम्ही लुब्ध होतो. तोच खरा पत्रव्यवसाय असं वाटायचं. पण नंतर नानासाहेब परुळेकरांनी अस्सल व्यावसायिक पत्रव्यवसाय ही काय चीज आहे त्याचा ठसठशीत श्रीकार घालून दाखवला. त्यांना वाङ्मय वगैरे नको होतं. त्यांना बातमी हवी होती नि ती सोप्या भाषेत न नटवता सामान्य वाचकांसाठी मांडणारी मंडळी हवी होती. खरोखरच, नानासाहेब परुळेकर हाच खरा क्रांतीकारक पत्रकार. त्यांची सुरुवातीला कोण टिंगल झाली! पण हळूहळू सर्वांनाच त्यांचा कित्ता गिरवावा लागला. वाङ्मय आणि वृत्तपत्रव्यवसाय ह्यांचा तसा काहीच संबंध नाही. हे सर्वात अगोदर नानासाहेबांनी जाणलं नि आम्हाला तसं स्वच्छ शब्दात बजावलं. मी तर त्यांच्यावर सुरुवातीला रागावलोच होतो. त्यांचे शब्द आता आठवतात.'

हेवा वाटावा असं कुसुमाग्रजांजवळ खूप आहे. ते सगळ्यात आहेत; मात्र,

कशातही गुंतलेले नाहीत. आखाड्यात उतरत नाहीत. उतरलेच, तर आखाड्याचं रूप मैफलीत करून टाकतात. मागे एकदा त्यांना कॅ. लिमयांच्या गौरव सभेत बोलताना ऐकलं होतं. ते इतकं बांधेसूद, गोमटं आणि अवसानरहीत बोलले की इतर वक्ते चिडीचूप झाले नि त्यांच्या वाणीविलासाने आमची खूप तब्बेत लागली. आणखी काय हवं? संसाराच्या अतिशय आटोपशीर आकारामुळे असेल, किंवा मनाच्या मूळ ठेवणीमुळेही असेल, त्यांना हव्यास असलेला दिसत नाही. हव्यास नाही म्हणून आग्रह नाही; आग्रह नाही म्हणून पवित्रा नाही; पवित्रा नाही म्हणून कृत्रिमता नाही; कृत्रिमता नाही म्हणून कविता आहे आणि कविता आहे म्हणून सर्वांचे सलाम आहेत, असा हा चक्रताल संभवतो.

'मला वाटतं तुमचं एक धोरणं पक्कं आहे. तुम्ही कशात गुंतून पडत नाहीत. ज्यात आपल्याला इंटरेस्ट नाही ते करायचं नाही असा तुमचा निर्धार असावा.'

'असं नाही; पण एकदा जिकडे पाठ फिरवली तिकडे पुन्हा वळायचं नाही हे नक्की केलं.'

'तुम्ही एम. ए. वगैरे उरकलं असतंत, तर प्रोफेसर वगैरे सहज होऊन गेला असतात.'

'नाही. मला शिकवण्यात कधीच इंटरेस्ट नव्हता.'

कवितेबद्दल फारसं बोलणं झालं नाही. तशी गरजच पडली नाही. फक्त एवढं म्हणाले, 'माझ्या 'पहाडातील देवता' ह्या कवितेत व्यक्त झालेला अनुभव माझ्या बायकोला आलेला होता.' नाशिकबद्दल आणि नाशिककराबद्दल खूप खेळीमेळीचं सांगून झालं. वर्टी, निकुम्ब, वि. मा. दि. पटवर्धन, माधव मनोहर, वा. ल. कुलकर्णी वगैरे खास नाशिककरांचा हवाला दिला. वा. रा. ढवळ्यांबद्दल त्यांना उमाळा फार, म्हणाले, 'ढवळ्यांना वाङ्मयाबद्दल इतका विलक्षण जिव्हाळा आहे की त्या भरात त्यांचं स्वतःचं लेखनच थांबलं! त्यांनी वाङ्मयाच्या प्रेमापोटी खूप काही केलं आहे, त्याग केला आहे. खात्यातल्या बढत्या नाकारल्या आहेत.'

दुपार. निरव. निश्चल आणि गार.

निरोपाचे नमस्कार.

'थांबा. अनायासे ड्रायव्हर आलेला आहे. तो तुम्हाला गाडीने पोहोचवेल.'

'म्हणजे? तुमची मोटार आहे? कवी मोटार बाळगू शकतो?'

'कवीची नव्हे, नाटककाराची मोटार म्हणा आणि तीही एकाच नाटकावर.'

कवी काय, नाटककार काय, ललित गद्यलेखक काय, त्या सर्व एकाच फुलाच्या पाकळ्या आहेत. कुसुमाग्रज इथून तिथून एकच आहेत. कुसुमाग्रजही फक्त एकच आहेत.

साहित्यबाह्य लटपटीत भुरके न मारणाऱ्या कवीच्या मोटारीत बसणं हा वेगळा अनुभव आहे. म्हणजे मोटारीत बसणं इथून तिथून सगळं सारखंच असतं; जातिवंत कवीच्या मोटारीत बसताना मान जरा ताठ असते, एवढंच.

● ● ●

# मुक्काम शहादे

अशोक मनोहर

३० जुलैचा रविवार होता. शहादे तालुक्यातील खेड्या खेड्यातून गोर गरीब जनता शहाद्याकडे गटागटाने सरकत होती. त्यात लहान मुलापासून तो म्हाताऱ्यांपर्यंत, पुरुष आणि बाया, आदिवासी, हरिजन, कोळी साऱ्या जमातीचे लोक होते. आज त्यांच्यात जाती, लिंग, वयोमान ह्याचा भेद उरला नव्हता. त्या साऱ्याकडे एक गोष्ट अवश्य होती ती म्हणजे भूक! कित्येकांच्या अंगावर धड कपडेसुद्धा नव्हते. अशी ती उघडी बोडकी सारी माणसे होती तरी कोण? त्यांना काय हवे होते? ही सारी जनता कष्टकरी होती. कोणी शेतात मजुरी करणारे कोणी जंगलातून मोळी आणून विकणारे, कोणी दुष्काळी कामावर खड्डे खणणारे, खडी फोडणारे होते.

त्याच दिवशी त्याच सुमारास तळोदे तालुक्यातील सारे कष्टकरीही असेच गटागटाने शहाद्याकडे सरकत होते. आज एवढे होते तरी काय? ह्या दोन्ही तालुक्यातील लोक कोणत्या एका आणि एकाच निश्चयाने असे निघाले होते? आज त्यांनी ठरविले होते की बस् आता फार झाले! आता आम्ही सहन करू शकत नाही. माणसाला पंधरा दिवसाला १ किलो धान्य? बाहेर धान्याचे भाव ६ रु. ते १० रु.! मजुरी २॥ रु., ३ रु. रोज! आम्ही जगायचे कसे? ह्या बाहेरच्या नरकवासापेक्षा आम्ही तुरुंगवास परवडला असे मानतो! आज अखेरचा दिवस. आज आमची पंधरवड्याला १२ किलो धान्य ही मागणी मान्य करा नाहीतर आम्हाला अटक करा! साधासीधा मामला! बाहेर पडलो तेच मुळी पंधरा दिवस जेलमध्ये काढायचे ह्या हेतूने. घराची दारे लावण्याचा प्रश्नच नव्हता कारण आत होते काय? भांडी कुंडी तर सारी गहाण ठेवून झालेली. चोराची भीतीतर नव्हतीच. येऊन जाऊन कच्च्या बच्च्याचा प्रश्न होता! तो तर नेहमीचाच. ती काय नेहमीच भूक भूक म्हणून ओरडतात त्यांना एवढेही समजत नाही की ती कोणाची पोरे आहेत. सगळे पुढारी सांगतात शाळेत जात जा, तर ही नादान कार्टी म्हणतात खायला नाही तर शिकू कुठून!

असा हा दीड दीड हजाराचा जमाव दोन तालुक्याच्या गावी अटक मोर्चाला निघाला होता. आता हा समाज अनेक वर्षे असा भूका मरत आला होता त्याने कधी त्याविरुद्ध ब्रही काढला नव्हता. जे लोक वाघाला घाबरत नाहीत इतके जेलला भीत होते ते एकदम आज असे उठले कसे? त्याचे कारण उघडे आहे,

आता ते संघटित झाले होते. आपल्याला जगण्याचा अधिकार असू शकतो हे त्यांना समजले होते. अटक मोर्चाचा हा निर्णय घेण्यापूर्वी कार्यकर्त्यांनी संपूर्ण विचार केला होता. ह्या पूर्वीचे सारे मार्ग संपले होते. मामलेदारापासून कलेक्टरपर्यंत अर्जापासून ते भेटी घेण्यापर्यंत सारे केले होते. परिस्थितीचे गांभीर्य सांगून झालेले होते. शहरात राहून टेलिव्हिजन, रेडिओवरच्या बातम्या ऐकून कार्यकर्त्यांना उपदेश करणे सोपे असते. परंतु कार्यकर्त्यांना गावोगाव हिंडताना ह्या लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे अवघड असते. त्यांना स्पष्ट दिसत असते की गावात बड्यांच्याकडे धान्याचे साठे आहेत आणि लोक उपाशी आहेत. अशा परिस्थितीत लुटालूट होण्याची शक्यता आहे. तेव्हा त्यांच्यापुढे ह्या असंतोषाला योग्य वळण लावण्यासाठी सरकारची दारे ठोठावण्याशिवाय दुसरा मार्गच नसतो. ३० तारखेला अशा तऱ्हेने शहाद्याला टेक भिलाटीत १५०० व तळोद्याला सिनेमा थिएटरजवळ १५०० लोक सकाळी दहा वाजता जमा झालेले आहेत. साऱ्यांच्या डोळ्यात वेगळीच चमक दिसत आहे.

बरोबर १२ वाजता ठरल्याप्रमाणे शहाद्याच्या टेक भिलाटीतून शांतपणे नेहमीच्या शिस्तीला साजेसा असा मोर्चा शहाद्याच्या तहसीलदार कचेरीवर निघाला होता. सर्वात पुढे ५०० च्या आसपास बाया व मागून चारच्या रांगेत पुरुष! 'आम्हाला खायला द्या नाही जर अटकेत टाका' अशा घोषणांच्या गर्जनेत हा सारा भूका कष्टकरी पुढे सरकत होता.

अगदी अशीच परिस्थिती तळोद्याला होती. तेथेही मोर्चा निघाला. आजच्या मोर्चाला वेगळीच शिस्त होती आणि ही शिस्त राखण्याचे सारे काम गावोगावची तरुण मुलेच करीत होती. एवढा प्रचंड मोर्चा असूनही दोन्ही ठिकाणी एकही गैरप्रकार होणे शक्यच नव्हते. कारण तो मोर्चा गुंडांचा नव्हता. खऱ्या अर्थाने श्रमिकांचा होता. कष्ट करून खाऊ बघणाऱ्यांचा होता. काळ्या बाजारावर इमारती उभारून पांढरे कपडे घालणाऱ्यांचा नव्हता!

दोन्ही ठिकाणी १४४ कलम पुकारलेले होते. मोर्चाने कलम तोडले, तहसीलदार कचेरीसमोर सभा घेण्यासाठी लोक जमा झाले. सभेत भाषणे सुरू झाली आणि येथूनच पुढे खरे नाट्यमय प्रसंग घडावयाला सुरवात झाली. त्याचा अर्थ लक्षात येण्यापूर्वी थोडया मागील घटना पाहणे आवश्यक आहे.

शहाद्याचे B & C डिपार्टमेंट! खडी सेंटरवरच्या मस्टरमध्ये अनेक घोळ आढळलेले! ३० मजुरांनी ६ दिवस खडी फोडूनही त्यांची हजेरीच नाही. त्यामुळे काम करूनही पगारच नाही! उरलेल्या २५० लोकांचा पंधरा दिवसात पगार नाही! सारे मजूर B & C च्या कचेरीवर आले. पगारासाठी अडून बसले. तेथल्या इंजिनियरांनी हात वर केले. ह्या ३० मजुरांना मी पगार देत नाही. म्हणजे चूक ३००–३०० रुपये पगार मोजून घेणाऱ्या

अधिकाऱ्यांची आणि शिक्षा ६ तास खडी फोडून २॥ रु. कमावणाऱ्या मजुरांना! मजूर ऐकणे शक्यच नव्हते. पगार झाल्याशिवाय हालणे शक्यच नव्हते. कार्यकर्त्यांची आणि अधिकाऱ्यांची शाब्दिक चकमक झडली. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना बोलावले! तिकडून सर्कल इन्स्पेक्टर साकटकर आणि डि. वाय्. एस. पी. शेख आले. कार्यकर्त्यांनी परिस्थिती समजावून सांगितली. दोघेही म्हणाले बरोबर आहे पगार त्यांना मिळालाच पाहिजे! नंतर शेख साहेब आत गेले. आत त्यांचे काय बोलणे झाले कोणास ठाऊक! बाहेर आल्यावर शेखसाहेबांनी पवित्रा बदलला, ते म्हणू लागले 'त्या ३० जणांचा पगार होणे अवघड आहे. त्यांच्याही काही अडचणी आहेत', एकदम न्यायबुद्धी पालटली, गोष्ट मोठी सूचक आहे!

त्यानंतरचा प्रसंग! श्रमिक संघटनेच्या कार्यकर्त्यांना फौजदार मोरे यांनी काही माहिती मागण्यासाठी बोलावले होते. म्हणून ते पोलीस स्टेशनमध्ये गेले. तेथे तेच ते डी. वाय्. एस. पी. शेख बसले होते. फौजदार मोरे उभे होते. दुसऱ्या बाजूला जि. परिषदेचे एक मेंबर, कलसाडी गावचे एक सधन शेतकरी प्रल्हादभाई चौधरी बसले होते. संपूर्ण खुर्चीलाच पांढरे शुभ्र वस्त्र गुंडाळल्यासारखे दिसत होते! आम्ही जाताच शेख म्हणाले, 'विचारा त्यांनाच त्यांचा कार्यक्रम शांततेने पार पडला का नाही ते? प्रल्हादभाई गडबडले. त्यांनी विषय बदलून बोलायला सुरवात केली. पण शेखसाहेबांच्या बोलण्यावरून लक्षांत आले, काहीतरी चुगली चालली होती. मग मी सांगू लागलो. 'हे पहा शेख, आमच्यांवर आरोप करण्यापूर्वी विचार करा. आमचे असे मत आहे की आम्ही आहोत म्हणून ह्या दोन तालुक्यात एकदाही लुटालूट झाली नाही. एवढे मोर्चे काढूनही एकदाही गैरप्रकार झाला नाही. आमच्या शब्दाबाहेर हा श्रमिक जात नाही.'

शेखसाहेब उत्तरले, 'ते काही सांगू नक. शेवटी All these Adivasis are Ignorant fools!' एवढे बोलून काही कळायच्या आत एक खाकी ड्रेस आणि एक खादी ड्रेस डुलत डुलत हसत हसत निघून गेला!

तिसरा प्रसंग २९ जुलैच्या संध्याकाळचा! शहाद्यामधील सुभाष लॉजच्या गच्चीवर सर्कल इन्स्पेक्टर साकटकर उभे होते. हा एक कर्तव्यदक्ष समजुतदार पोलिस आधिकारी! खालून रस्त्यावरून कार्यकर्ते चालले होते. त्यांनी मला हाक मारली, मी व सुहास जिन्याने वर गेलो. त्यांच्याशी बोलणे मोठ्या खेळीमेळीने झाले. त्यांनी सांगितले, 'आम्ही दोन्ही ठिकाणी जास्तीत जास्त लोकांना अटक करणार आहोत. तुम्ही तुमच्या नेहमीच्या शांततेने सगळे घ्या!'

शहाद्याच्या बंदोबस्तासाठी शेख आले होते तर तळोद्याला साकटकर गेले होते. सभा सुरू झाली. शेखनी काढलेले अक्षम्य व अपमानकारक उद्गार विसरणे कार्यकर्त्यांना शक्यच नव्हते. त्याचवेळी त्याला दाबणे शक्य होते पण तेव्हा तर

काही करावयाच्या आत ते निघून गेले होते. जनतेच्या करातून पगार खाऊन आरामात रहाणाऱ्या ह्या जबाबदार(?) पोलीस अधिकाऱ्याने लोकांचा अपमान करणे योग्य नव्हते. कार्यकर्त्यांनी जाहीर सभेत नेहमीच्याच पद्धतीने ह्या घटनेचा धिक्कार केला. झाले, एका गर्विष्ठ अधिकाऱ्याला ते सहन होणे शक्यच नव्हते. स्वतःची चूक लक्षात आणून देणाऱ्याचे म्हणणे ऐकून घेण्याची ह्या पोलिस अधिकाऱ्याला सवय कशी असणार ? ब्रिटिशांच्या जमान्यात स्वातंत्र्य सैनिकांना शिव्या देणारे हे अधिकारी एका रात्रीत भारतीय जनतेचे रक्षक झाले असले तरी वृत्ती बदलली नव्हती. ह्याचा सूड म्हणून त्या शेखनी पुढे ह्या भुकेल्या जनतेचा पिच्छा पुरवण्याचा विडाच उचलला.

सभा संपल्यावर त्याने साऱ्या कार्यकर्त्यांना भराभर अटक केली. ज्यांनी मोर्चात भागही घेतला नाही अशांना हॉटेलातून पकडून आणले. त्यात चक्क एका रिपोर्टरलाही पकडले ! आम्ही सांगितले, ' हे पहा शेख तो रिपोर्टर आहे. त्याला तुम्ही अटक करण्याचे कारण नाही. ' शेखसाहेब आणखीन चिडले, ' तुम्ही मला शिकवू नका. आता मी माझ्या मर्जीप्रमाणे वागेन. तुम्ही माझ्या ताब्यात आहात. मी सांगतो ते ऐकले पाहिजे. मला काय अधिकार आहेत तुम्हाला माहीत आहे काय ?' एकूण रंग काही ठीक नव्हता. शेख डिवचलेल्या सापासारखा चवताळला होता. मग त्यांनी डी. एस. पी. ना फोन केला. फोनवर सगळे शांततेने चालले असल्याचे सांगण्यात आले. नंतर आम्ही कार्यकर्त्यांनी विनंती केली, आम्हाला आमच्या लोकांच्यात बसू द्या. तीही शेखनी नाकारली. बाहेर सगळ्यांच्या याद्या करण्याचे काम चालले होते. आम्ही आत अडकलेले होतो. थोड्या वेळाने आम्हाला बाहेर काढले. आमच्या बरोबर २० बाया व २० तरुण मुले ह्यांना गाडीत घातले व कोर्टात हजर केले. तेथे जाताना आम्हाला सांगितले, आम्ही ४० च्या बॅचनी लोकांना कोर्टात हजर करतो. मग २ तास आम्हा ४६ जणांना कोर्टातच डांबून ठेवले. बायांना १० दिवस व पुरुषांना १५ दिवस शिक्षा ठोठावण्यात आली होती. मग रात्री ७ वाजता आम्हाला परस्पर बाहेरूनच धुळ्याच्या जेलमध्ये नेले. इकडे मागे राहिलेल्या लोकांशी आमचा संबंध येऊ दिला नाही. शेख साहेबाने आपला सूड उगविण्यास सुरुवात केली होती. मग रात्री त्याने आमच्या मागे राहिलेल्या कार्यकर्त्यासमोर कबूल केले की मी सर्वांची जेवणाची व्यवस्था करतो. एवढे सगळे झाल्यावर त्या निर्लज्ज अधिकाऱ्यांनी जाताना फौजदाराला सांगितले फक्त ७०० लोकांना जेवायला द्या ! उरलेल्या ५०० लोकांची ह्या नादान शेखला काय पर्वा ? बोलून चालून त्याच्या मते हे सारे Ignorant fools !

एवढ्यावर त्याचे समाधान झाले नाही. म्हणूनच तो तसाच रातोरात तळोद्याला गेला. तिकडे साकटकर परि-

स्थिती अत्यंत व्यवस्थितपणे हाताळीत होते. कार्यकर्त्यांचे नेहमीप्रमाणेच त्यांना सहकार्य होते. पण शेख म्हणजे त्यांच्या वरचा साहेब. तो तळोद्याला उतरताच आरडा ओरडा करू लागला. उगीचच दोन-चार गरीब बिचाऱ्या पोलिसांच्या अंगावर डाफरला ! मग त्याने तेथल्या कार्यकर्त्यांच्याकडे मोर्चा वळवला. कार्यकर्त्यांशी अत्यंत दंडेलीच्या भाषेत बोलायला सुरुवात केली–

शेख : तुम्ही स्वतःला काय समजता ? मी तुम्हाला वाटेल ते करू शकतो. तुम्ही माझ्या अटकेत आहात. तुमचे लाड चालू देणार नाही. आताच्या आता गाडीत बसा.

कार्यकर्ता : हे बघा, उगाचच दादागिरी करू नका. आम्ही सारे शांततेने घेत आहोत. त्यात बिघाड आणू नका. आमचे म्हणणे एवढेच आहे, की तुम्ही साऱ्यांना अटक केली पाहिजे.

शेख पोलीस अधिकाऱ्यांना म्हणाला, 'आत्ताच्या आत्ता ह्यांना बेड्या ठोकून गाडीत घाला. या लोकांची तुम्ही एवढी काय पर्वा करता ? ऐकत नसले तर लाठीमार करा. गोळीबार करा.'

तेथले पोलीस अधिकारीही बावरले असतील. कारण सारे कसे शांततेने चालले होते. लोक ऐकत नाहीत अशी काहीच परिस्थिती नव्हती. मग कार्यकर्त्यांना गुपचूप बाहेर काढले व परस्पर नंदुरबारच्या लॉक अपमध्ये नेऊन टाकले. इकडे लोक अस्वस्थ झाले त्यांना त्यांचे कार्यकर्ते दिसत नव्हते. इतक्यात शेखने २०–२५ बायांना बाहेर जायला सांगितल. रात्रीची वेळ होती बाया १०–१२ मैलांवरून आलेल्या होत्या. त्यांना तो परत पाठवू लागला. मग इतर बायांनी त्याला खूप घेतला, 'ह्या बायांना इतक्या रात्री तू पाठवतोस. त्यांचे काही बरे-वाईट झाले तर तू जबाबदार आहेस का ?' मग त्याचा चमचा L. I. B. चा नोकर पुढे आला व तो बायांना दम देऊ लागला. 'आमच्या साहेबांना तुम्ही वाटेल तसे बोलू नका.' बाया काय त्याला बोलू देणार काय ? त्या म्हणाल्या, 'साहेब असला तर त्याच्या घरचा. आम्हाला काय म्हणून त्याने दमदाटी करावी ?' एवढे झाल्यावर तो निघून गेला. मग पुन्हा तेच जेवणाचे नाटक झाले. दुसरे दिवशी सकाळी मग काही लोकांना व बायांना एस. टी. त बसवले व शहाद्याला कोर्टात उभे करण्यासाठी घेऊन आले. शहाद्याच्या जवळ येताच फक्त ३२ जणांना वेगळे काढले व उरलेल्यांच्या गाड्या परत पाठवल्या. त्यात बऱ्याचशा बाया होत्या. त्यांना वाटेवरच सोडून देण्यात आले. त्या बिचाऱ्या तेथूनच चिखल तुडवीत घरी गेल्या. शेखला त्याची काय पर्वा ? त्याच्या मते ते सगळे Ignorant fools !

एवढे सगळे लिहिण्याचे कारण हेच की ऊठसूट चळवळीच्या कार्यकर्त्यांवर चिथावणी देण्याचे, शांतताभंग करण्याचे नादान आरोप करणाऱ्यांनी आणि त्यांच्यावर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांना उपदेश करणाऱ्यांनी वरील घटनेत कोणाकडून शांतता भंग व विश्वासघात झाला ह्याचा विचार सद्सद्विवेकबुद्धी जागी ठेवून करणे आवश्यक आहे. ● ●

# सोनेरी साहस

**गो. ल. लिमये**

या घटनेस पंचवीस वर्षे होऊन गेली. जुलै २८, सन १९४८ च्या रात्री स्कॉटलंडयार्डच्या गुप्तचरांनी दाखविलेले चातुर्य व धैर्य कौतुकास्पदच नव्हे तर एक आदर्श म्हणून आजही मानावे लागेल. एखादा गुन्हा घडल्यावर पोलिसांनी तपास करून गुन्हेगारास पकडल्याचे आपण नेहमी वाचतो, परंतु गुन्हा घडत असतानाच जिवावर उदार झालेल्या गुन्हेगाराच्या साहसाला धैर्याने तोंड देऊन गुन्हा होऊ न देणारा प्रसंग जास्त प्रशंसनीय म्हणावा लागेल.

लंडनमधील वाटरलू स्टेशनजवळच्या एका छोटया हॉटेलमध्ये गुन्हेगारांचे एक टोळके जमले होते. त्यांचा प्रमुख म्हणाला, 'आपण आता सोन्याच्या लगडी हस्तगत करणार आहोत.' एका साहाय्यकाने विचारले, 'किती किमतीच्या' प्रमुख मि. बिगने तोंडात धरलेला चिरूट बाजूस केला व राख झाडून संथपणाने 'एक कोटीचे' असे उत्तर दिले. मि. बिगचे उत्तर ऐकून आजूबाजूस बसलेले त्याचे सहाय्यक अवाक होऊन पाहू लागले. एवढया किमतीचे सोने आपले होणार या कल्पनेनेच सर्वांची मने थरारली. त्यांच्या प्रमुखाने याबाबतची खास बातमी मिळविली होती. लंडन येथील हीथरोच्या विमानतळावर एक कोट रुपयांचे सोने येणार होते. नक्की तारीख कळली नव्हती. परंतु हे सोने आपल्या हाती लागणार असे विश्वासाने मि. बिग सांगत होता. त्यांचे सर्व सहकारी या मोठ्या घबाडाच्या आशेने भारावले गेले. एक कोटी रुपये किमतीचे सोने हाती लागणार ही गोष्ट एखाद्या कपोलकल्पित रहस्यमय कथेतही खरी वाटली नसती.

आपला प्रमुख खोटया वल्गना करणार नाही याची त्याच्या सहकाऱ्यांना खात्री होती. बहुतेकांनी तत्पूर्वी त्याच्याबरोबर मोठमोठ्या गुन्ह्यात भाग घेतला होता व प्रत्येक गुन्ह्यात त्यांना यश मिळाले होते. आपल्या आवतीभोवती



बसलेल्या सहकाऱ्यांना मि. बिगने लंडन हवाई अड्डयावर सुरक्षित ठेवण्यात येणारा सोन्याचा साठा कसा हस्तगत करणार हे सांगितले तेव्हा प्रत्येकजण आपली खुर्ची पुढे ओढून घेऊन कान टवकारून ऐकत होता व या अभूतपूर्व दरोडयात आपणास कोणता भाग घ्यावा लागेल याबद्दल विचार करीत होता.

मि. बिग म्हणाला, 'जुळले तर हे सर्व सोने आपण सहजगत्या हस्तगत करू शकू. परंतु हे घडवून आणणे मात्र तितकेसे सोपे नाही. त्यात अनेक अड-चणी आहेत. एक कोटी सोन्याची लूट एखाद्या मूर्खाचेच धाष्टर्य होय. परंतु हे कामसुद्धा योग्य प्रयत्नाने व एकजुटीने साध्य होऊ शकेल. ह्यासाठी काही गोष्टी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.'

बिगने यापूर्वी अनेक मोठे गुन्हे आपल्या साथीदारांच्या मदतीने नव्या-नव्या क्लृप्त्या लढवून केले होते व लंडन पोलिसांनी त्याच्यापुढे हात टेकले होते. त्याच्या नव्या तंत्रासमोर स्कॉटलंडयार्डचे सुपरिटेंडेंट मि. बिल चापमन यांचेही काही चालेना. बिगमुळे चापमन व त्यांच्या सहकाऱ्यांना मुळीच उसंत मिळत नव्हती. ते बिगच्या मागावर होते.

१९४८ साली मिडलसेक्समधील हीथरो विमानतळावर नवीन सुधारणा करण्यासाठी तीन कोटी पौंड खर्च करण्यात आले होते; काही सुधारणा अजून अपुऱ्या राहिल्या होत्या. ऑफिस इमारती, गुदामे, किमती माल ठेवण्याची तळघरे अजून बांधावयाची होती. त्यामुळे विमानतळावर उतरविण्यात येणारा माल कच्च्या इमारतीमधूनच ठेवण्यात येत असे. जुन्या इमारती पाडण्यात येत होत्या. नव्यांची तयारी चालू होती. जिकडे तिकडे पत्र्याच्या शेडस् उभ्या केल्या होत्या व विमानतळाच्या या भागास लष्करी छावणीचे रूप आले होते. जिकडे तिकडे कामाची गडबड चालू होती. यामुळे आपल्या नियोजित सोन्याच्या लुटीच्या योजनेला ही एक सुवर्णसंधीच मिळाली असल्याचे बिगचा एक साथीदार मि. आल्फ रूमे याने बोलून दाखविले. मि. आल्फ बिगचा एक जुना व विश्वासू साथीदार होता. इतर साथीदारांबरोबर तो आपल्या प्रमुखाचा शब्द वेदवाक्य म्हणून मानीत असे. त्यामुळे बिगच्या विरुद्ध आवाज उठविण्याचे कुणीही धाडस करीत नसे. बिगने आपल्या सहकाऱ्यांना लंडन विमानतळाचा सुरक्षा अधिकारी मि. डोनाल्ड फिश यांचेबद्दल माहिती सांगितली. मि. फिश स्कॉटलंड यार्डचा एक निवृत्त पोलीस इन्स्पेक्टर होता. लंडनमध्ये विमानद्वारा येणाऱ्या व तेथून बाहेर जाणाऱ्या सोन्याच्या सुरक्षिततेच्या बाबतीत फिश जबाबदार होता. त्याचे सहाय्यक विमानतळावर चोवीस तास डोळ्यात तेल घालून जागरुकतेने पाहणी करीत. सोन्याबरोबर होणाऱ्या इतर मौल्यवान मालाच्या वाहतुकीबद्दलही ते लक्ष पुरवीत.

मि. बिगने विमानतळावरील सुरक्षा दलाच्या पोलिसांच्या हालचालीबद्दलची माहिती गोळा केली होती. कित्येक आठवडे त्याने विमानतळाच्या परिसरात दुर्बिणीच्या साहाय्याने आत चालणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक हालचालींचे निरीक्षण करण्यात घालविले होते. विमानाने होणाऱ्या सर्व वाहतुकीसंबंधी वेळ, कामगार, अधिकारीवर्ग, प्रवासी, मालाची चढउतार करणारे खलाशी किंवा हमाल, वाहतुकीची साधने, माल ठेवण्याची जागा अशा प्रत्येक गोष्टीबद्दल बिगने माहिती मिळविली होती. सुरक्षा अधिकारी घेत असलेल्या सर्व खबरदाऱ्या व योजना त्याने अवगत करून घेतल्या होत्या. त्यातल्या त्यात सोन्याची आवक किंवा जावक होतेवेळी कस्टमच्या तपासणीपासून सोन्याचा साठा सुरक्षित ठेवण्यात किंवा बाहेर पाठविण्यात येईपर्यंत घेण्यात

येणाऱ्या प्रत्येक पावलाबद्दल, गुदाम किंवा कोठाराबद्दलची माहिती त्याने जमविली होती. कोठारावर नेमण्यात आलेल्या सुरक्षा सैनिकांची, त्यांच्या कामाच्या वेळा, विश्रांतीच्या वेळा, त्यांना पाठविण्यात येणाऱ्या खाण्यापिण्यासंबंधीची व्यवस्था, तसेच हीथरो विमानतळावर वाहतुक करणाऱ्या सरकारी व खाजगी माल मोटारी व इतर वाहनांचे नंबर ह्याचीही माहिती बिगने मिळविली होती. विमानतळाच्या हद्दीत रात्रीच्या वेळी चालणाऱ्या प्रत्येक व्यवहारासंबंधी त्याने बिनचूक माहिती मिळविली होती. कारण त्याने आखलेल्या योजनेत या गोष्टींना फार महत्त्व होते.

विमानतळावर रात्रीच्यावेळी अल्पोपहार घेऊन फिरणाऱ्या, एका पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनाने त्याचे लक्ष वेधून घेतले होते. या वाहनातून विमानतळाच्या हद्दीत निरनिराळ्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना व सुरक्षादलाच्या रक्षकांना चहा-कॉफी वगैरे पुरविण्यात येत असे. या वाहनाच्या हालचालीच्या वेळा व मार्ग बिगने टिपून घेतल्या होत्या. अनेक रात्री जागून त्या गाडीच्या हालचालीचे निरीक्षण त्याने केले होते. सदर गाडीच्या हालचालीत व वेळात नियमितपणा त्याला दिसून आला. त्यात फारच थोडे फेरफार आढळून आले. त्या वाहनाच्या हालचालीसंबंधी एका गोष्टीचे त्याला फार महत्त्व वाटले. चहा-कॉफी पुरविणारे कॅन्टीनचे पथक रोज मध्यरात्री नियमितपणे गुदामावर पहारा करणाऱ्या रक्षकांना एका मोठ्या किटलीतून गरम चहा पुरवीत असे. ह्या चहाच्या किटलीचा आपल्या योजनेत उपयोग करून घेता येईल हे त्याने ओळखले व याबाबत त्याने योजलेली आपली कल्पना आपल्या सहकाऱ्यांना समजावून सांगितली. किटलीतून नेण्यात येणाऱ्या चहात मादक पदार्थ मिसळविल्यास आपले गुदाम लुटण्याचे काम कसे सहजसाध्य होईल याचाही त्याने उहापोह केला.

विमानतळावरील तळघरात ठेवण्यात येणारा अपेक्षित सोन्याचा साठा तेथून कसा हस्तगत करता येईल याबद्दल विचार सुरू झाला. हा प्रश्न महत्त्वाचा तसाच बिकट होता. सोने नक्की केव्हा येणार याची माहिती मिळविण्याचे झाल्यास सुरक्षा दलातील एखाद्या इसमास लालूच दाखवून किंवा धाकदपटशा दाखवून वश करून घेणे जरूर होते. अशा रीतीने बिगने यापूर्वी अनेक जणांना वश करून घेतले होते. बातमीदाराला प्रथम भरपूर चारणे, त्यानंतर त्याला उघडकीस आणण्याची दहशत घालून त्याचे तोंड बंद करणे किंवा त्याच्या घरच्या आप्तइष्टांनाही गोवणे अशा दुष्ट योजना बिगला किंवा त्याच्या सहकाऱ्यांना अवैध नव्हत्या.

ही कामगिरी बिगने आपल्या सहकाऱ्यांवर न सोपविता स्वतःच करण्याचे ठरविले. त्याचे सहकारी उत्तम लुटारू, मोटारगाड्या पळविणारे होते पण आताचे काम महत्वाचे होते. विमानतळावरील वहातुकीची ने-आण

करणाऱ्यापैकी ज्याचा पूर्वेइतिहास संशयास्पद आहे, असा एकादा कामगार शोधून काढण्याचे त्याने ठरविले. दोन-तीन महिन्याच्या प्रयत्नानंतर त्याला अशा माणसाची माहिती मिळाली. आता अशा इसमाची व त्याच्या पूर्वेतिहासाची संपूर्ण माहिती असलेल्या एकाद्या तिऱ्हाईत इसमाचाही त्याने माग काढला. अर्थात यासाठी त्याला आपली थैली सैल करावी लागली.

एका रात्री विमानतळावरील वहातुक खात्यातील एक कामगार हॉटेलमध्ये गेला असता त्याच्या पाठीवर मागून कोणीतरी थाप मारली. त्याने चमकून मागे पाहिले तो त्याच्या मागे त्याच्या जुन्या ओळखीचा एक मित्र त्याच्याकडे हसतमुखाने पहात उभा होता. या मित्राबरोबर दुसरा एक गंभीर चेहऱ्याचा इसमही उभा होता. या इसमाची नजर फार तीक्ष्ण होती. मित्राने कामगाराला बसावयास सांगितले व पूर्वीच्या मैत्रीची आठवण देऊन पेये मागवली. तिघेही काही वेळ बोलत बसले. बोलता बोलता मित्राने कामगारास विमानतळावरील वहातुकीसंबंधी काही माहिती विचारण्यास सुरुवात केली. कामगार त्याच्याकडे आश्चर्याने पहात 'कसली बातमी' असे उद्गारला. त्याच्या मित्राजवळ बसलेल्या गंभीर चेहऱ्याच्या इसमाने लगेच कोणती माहिती पाहिजे ते सांगितले. कामगाराचा चेहरा चिंताग्रस्त बनला. 'मी ही माहिती दिली तर माझ्या नोकरीचे काय होईल' असे त्याने हलक्या आवाजात विचारले. गंभीर चेहऱ्याच्या इसमाने कामगाराच्या कानाजवळ तोंड नेऊन 'तू माहिती नाही दिलीस किंवा याबद्दल कोणाकडे अवाक्षर काढलेस तर काय होणार ते मला नक्की माहित आहे. येत्या नाताळच्या सणात तुला हॉस्पिटलमध्येच पडून रहावे लागेल हे मात्र विसरू नकोस.'

हॉटेलमधील भेटीनंतर बिचाऱ्या त्या कामगाराला विमानतळावरून होणाऱ्या मौल्यवान वस्तूंच्या वहातुकीबद्दलची माहिती बिगला वरचेवर पुरविणे भाग पडले. हा कामगार आतापर्यंत आनंदी खेळकर वृत्तीचा होता. परंतु बिगच्या जाळ्यात सापडल्यावर मात्र त्याचा चेहरा पडलेला दिसे. नेहमी तो काहीतरी काळजी करीत असल्याचे त्याच्या सहकाऱ्यांना आढळून आले. ही गोष्ट दिवसेंदिवस इतकी स्पष्ट होऊ लागली की ती सुरक्षादलाच्या नजरेतून निसटू शकली नाही व डॉन फिशला ह्यासंबंधी कळविण्यात आले.

मि. डॉन फिशने याबाबत चौकशी करण्याचे ठरविले व संबंधित कामगारांच्या हालचालीवर नजर ठेवण्याच्या सूचना दिल्या.

एका रक्षकाने सदर कामगार व पोलिसांच्या माहितीतील एक गुन्हेगार यांच्या एका हॉटेलमध्ये गाठीभेटी होत असल्याचे कळविले. आपले नेहमीचे, शहरातील लांबचे ठिकाण सोडून हा गुन्हेगार विमानतळाजवळील हॉटेलमध्ये का येत असतो हे समजू शकले नाही. मि. फिशने आपल्या लोकाना

कामगाराच्या हालचालीवरील नजर चालू ठेवण्यास सांगितले. आता कामगार संबंधित गुन्हेगाराला वरचेवर भेटू लागला. तेव्हा फिशने ही माहिती स्कॉटलंडयार्डला कळविण्याचे ठरविले. सुपरिंटेण्डेन्ट बिल चापमनने फिशची व एका स्थानिक पोलिस इन्स्पेक्टरची गाठ घालून दिली व त्याच्या मदतीला यार्डचे इन्स्पेक्टर ली यांनाही दिले.

मि. फिशची व पोलीस अधिकाऱ्यांची खलबते चालू झाली. कामगाराला भेटणाऱ्या बदमाष इसमाची माहिती काढण्याचे ठरले. इकडे बिगच्या टोळीच्या कारवाया व पोलिसांची चौकशी जोरात सुरू झाली. पोलिसाना कामगाराला भेटणाऱ्या बदमाषाचा पत्ता मिळाला. हा बदमाष बिगच्या टोळीतला होता. तो बिगची वरचेवर गाठ घेत असल्याचे कळले. आतापर्यंत पोलिसाना बिगचा व इतर बदमाषाचा संबंध जोडण्यात यश मिळाले नव्हते. बिगच्या हालचालींवर आता पाळत ठेवण्यात आली. तो एका मध्यमवर्गीय सुस्थितीत रहाणाऱ्या वस्तीमध्ये एका टुमदार बंगलीत रहात होता.

रोज सकाळी नियमितपणे ऑफिसला जाणाऱ्या मंडळींबरोबर तो लंडन शहराकडे जाई. लंडन शहरात होणाऱ्या चोऱ्या दरोड्यांची आखणी करून लूटमार करणारा एखादा इसम आपल्या वस्तीत रहात असावा असा संशय त्याच्या वस्तीत रहाणाऱ्या कोणाच्या ध्यानीमनींही येणे शक्य नव्हते. बिगच्या नावाचा निर्देश मात्र वर्तमानपत्रामधून नेहमी होत असे व लंडन शहरातील वाढत्या गुन्हेगारीसंबंधी पार्लमेंटमध्येही प्रश्न विचारण्यात आले होते.

बिग वास्तव्य करीत असलेल्या बंगल्याजवळ दुसऱ्या एका बंगल्यात पोलिसांनी एक खोली भाड्याने घेतली. सदर खोलीत एक स्त्री-पोलीस राहू लागली व खोलीच्या खिडकीतून बिगच्या हालचालींवर नजर ठेऊ लागली. बिग ऑफिसच्या वेळा अचूक पाळीत असे. संध्याकाळी तो अगदी वेळेवर घरी परत येई. एकदा सुपरिंटेन्डेंट चापमन चेष्टेने म्हणाला, 'बदमाष माणसेही आपल्या कामात इतके काटेकोरपणे नियम पाळतात हे पोलिसांनी लक्षात ठेवले पाहिजे.' बिग यामुळेच पोलिसांना भारी झाला होता.

बिगच्या हालचालीवर नजर ठेवणारी स्त्री पोलीस आता बिगचा सतत पाठलाग करू लागली. यानंतर घडलेल्या घटना हेरकथेतील काल्पनिक प्रसंगांपेक्षाही चित्तथरारक व विलक्षण अशा घडल्या. स्त्री-पोलिसला बिगचा पाठलाग करण्यासाठी रेल्वेनेही प्रवास करावा लागे. आपले काम किती अवघड व धोक्याचे आहे ह्याचा तिला अनेकदा अनुभव आला. बिग नेहमी जागरूक असे. पाहाणारास तो समोर पाहत आहे असे वाटे परंतु त्यावेळी त्याची नजर चौफेर भिरभिरत असे. त्याला वेळोवेळी निरनिराळ्या भूमिका धारण कराव्या लागत व याची तो सदैव जाणीव ठेवीत असे. तासन तास रेल्वेने प्रवास केल्यावर लगेच तो बस




ताजी, कुरकुरीत व
रुचीला आगळीच -
वा! ही तर
साठे माल्ट एक्स
बिस्किटेच!

ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेच या बिस्किटात आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली
माल्ट एक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!

SBC
साठे
बिस्किटे

आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!

heros'-SBC-49C MAR

पकडीत असे. मध्येच उतरून कारने किंवा टॅक्सीने तो एखाद्या लहानशा हॉटेलसमोर उतरत असे. हॉटेलात शिरताना त्याचे अंगावर ऑफिसमध्ये जाणाऱ्या अधिकाऱ्याचे कपडे असत. थोडया वेळाने तो टोपीशिवाय एखादा जुना रेनकोट अंगावर चढवून बाहेर पडे. त्याला शहरात अनेक निरनिराळ्या थरातल्या व्यक्ती भेटत असत. या सर्वांचे चेहरे व कपडयांचे वैशिष्टच स्त्री-पोलिसला ध्यानात ठेवावे लागे. ही माहिती रोज स्कॉटलंडयार्डला ती पुरवीत असे. स्कॉटलंडयार्डच्या ऑफिसमध्ये या माहितीच्या आधाराने रात्रभर-संशोधन चाले. मि. चापमन व मि. ली यांच्या समोर आता बिगच्या पुढील हालचालीसंबंधी एक सुस्पष्ट चित्र उभे राहिले. बिगने आपल्या अवतीभोवती एक भली मोठी चांडाळ चौकडी जमविली होती.

मि. बिल चापमन तोंडातून सिगारचा धूर बाहेर सोडीत म्हणाला, 'बेटे विमानतळावर हल्ला करण्याच्या तयारीत दिसत आहेत. तेथील गोडाऊन मध्ये मौल्यवान वस्तू जमण्याची वाट पाहत असावेत. या वस्तू तेथे असल्या म्हणजे आपणाला प्रथम समजेल. तेव्हा त्यानी आम्हास चकित करण्यापूर्वी आपणच त्याना चकित करणे सहज शक्य आहे.'

यानंतर चापमनच्या सल्ल्याने विमानतळावर कामावर असलेल्या सर्व सुरक्षा सैनिकाना बदलण्यात आले व त्यांच्या जागी फ्लाईंग स्कॉडच्या लोकांना नेमण्यात आले. आता बिगच्या टोळीच्या हालचाली जोरात चालल्याचे नजरेस आले. याचवेळी मि. डॉन फिशने चापमनला महत्वाची माहिती पुरविली. जुलै २८ ला विमान मार्गे सोन्याचा एक मोठा साठा हीथरो विमानतळावर उतरविण्यात येणार होता. त्याच्या लागोपाठ तेवढाच सोन्याचा दुसरा साठाही येणार होता. ह्या सर्व सोन्याची किंमत एक कोट पौंड होती. चापमनने फिशला विचारले, 'दुसरा साठा लागोपाठ न येईल याची तजवीज करता येईल का?' फिश म्हणाला, 'प्रयत्न करून पहातो पण जमणे जरा कठीणच दिसते.'

फिशच्या प्रयत्नाने २८ जुलै रोजी सोन्याचा एकच साठा विमानतळावर उतरविण्यात आला. दुसरा साठा लगेच येऊ न देण्याची व्यवस्था झाली होती. त्यामुळे त्या रात्री विमानतळाच्या मौल्यवान वस्तू ठेवण्यात येणाऱ्या तळघरात बिगने अपेक्षित केलेल्या एक कोटी पौंड किंमतीच्या सोन्याऐवजी पन्नास लाख पौंडाचे सोने होते. आपणाला मिळणाऱ्या प्राप्तीत मुळातच अर्ध्याने घट झालेली पाहून बिग नाराज झाला असावा. त्याला त्याच्यावर येणाऱ्या पुढील संकटाची कल्पना नव्हती.

मि. चापमनने आपल्या सहकाऱ्यांची व डोनाल्ड फिशची तातडीची बैठक घेतली व पुढील योजना आखली. जुलै २८ च्या रात्री विमानतळाच्या गुदामात तळघराजवळ नऊ पोलीस अधिकाऱ्यांनी दबा धरून बसण्याचे ठरले.

बिगच्या लोकांचे लक्ष कॅन्टीनच्या पथकाच्या हालचालीवर असलेले पाहून व ती मंडळी चहाच्या किटलीवर लक्ष केंद्रित करीत असल्याचे दिसल्याने बदमाशांच्या पुढील योजनेची कल्पना पोलिसांना आली होती. गुदामातील मौल्यवान वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या तीन रक्षकांना आता बदलण्यात येऊन त्यांचे जागी तीन गुप्त पोलिसांना नेमण्यात आले. त्यांना त्या रात्री मिळणारा चहा न पिण्याबद्दल सूचना देण्यात आल्या. तसेच तो चहा पुढील तपासासाठी उपयोगी पडावा म्हणून बाजूस काढून ठेवण्यास सांगितले.

विमानतळावर फिशने या नाटकात घेण्याचा भाग शेवटचा होता. तोपर्यंत त्याने कोणतीही हालचाल करावयाची नव्हती. ठरलेल्या वेळेस त्याने विमानतळावरून स्कॉटलंड यार्डच्या माहिती केंद्रास फोन करावयाचा होता. या फोनमुळे केंद्राच्या फोनच्या लायनीच्या तबकडीवर लाल दिवा लागण्याची व्यवस्था केली होती व तात्काळ लंडन विमानतळाच्या जवळ आसपास लपून बसलेल्या फ्लाईंग स्क्वॉडच्या मोटार पथकाने विमानतळाचे बाहेर पडण्याचे सर्व मार्ग रोखून ठेवावयाचे होते. जणू एखाद्या लढाईची तयारीच चालू असावी त्याप्रमाणे पोलिसांनी आपली योजना आखली होती. या योजनेचे नाव 'ऑपरेशन नोरा' म्हणून ठेवले होते. फ्लाईंग स्क्वॉडच्या एका अधिकाऱ्याच्या पत्नीचे नाव नोरा होते व २८ जुलै हा तिचा वाढदिवस होता.

बिगनेही आतापर्यंत आपली सर्व योजना पूर्ण केली होती. त्याने एक मोठी लॉरी तयार केली होती. या गाडीत आतील बाजूने बसण्यास ऐसपैस जागा होती. गाडीला जादा शक्तीचे इंजिन बसविले होते. गाडीच्या नंबरप्लेटी ताबडतोब बदलण्यास अडचण पडू नये अशी 'व्यवस्था केली होती. जेव्हा बिगची लॉरी हीथरो विमानतळाकडे निघाली तेव्हा गाडीत एक डझन डाकू बसले होते. ही माहिती पोलिसांना मिळाली नव्हती. यामुळे जेव्हा प्रत्यक्ष लढा सुरू झाला तेव्हा डाकूंची बाजू पोलिसांपेक्षा मनुष्यबळात भारी असल्याचे आढळून आले. डाकूंनी आपल्याजवळ लोखंडी सळयां, शिशाच्या गोळयांनी भरलेले हातमोजे, पहारी, दरवाजे तोडण्याची हत्यारे, लोखंड कापण्याच्या मोठ्या कातऱ्या ठेवल्या होत्या. त्यांच्या अंदाजाप्रमाणे लुटीचे काम विनासंकट पार पडल्यास वीस पंचवीस मिनिटात आटोपण्यासारखे होते. एवढ्या वेळातच टोळीतील एकाने तळघरातील रक्षकांना पाजण्यात आलेल्या चहाचा पुरावा नष्ट करावयाचा होता. आपण तळघरात विनासायास कसा प्रवेश मिळविला याची माहिती पोलिसांना लागू नये याबद्दल बिगने ही योजना आखली होती. यावेळी उपयोगात आणलेल्या युक्तीचा उपयोग दुसरे वेळी पुन्हा करता यावा अशीही त्याची इच्छा असावी. म्हणून त्याने आपल्या एका सहाय्यकाजवळ मादक पदार्थ मिश्रित न केलेला चांगला

चहा व भरपूर पाण्याचा साठा दिला होता. या सहकाऱ्याने रक्षकांच्या कपात मादक पदार्थ मिश्रित चहा ओतल्यावर सदर किटली स्वच्छ पाण्याने धुऊन त्याने बरोबर आणलेला चहा ओतावयाचा होता. चहा पिऊन गुंगीत पडलेल्या रक्षकाजवळील चहाचे कपही धुऊन त्यात चांगला चहा घालून ते कप धुवावयाचे होते.

जुलै २८ ची ती रात्र. हवेत फार उष्मा जाणवत होता. हीथरोच्या विमानतळावरील गुदामाच्या तळघरात पहाऱ्यावर असलेले रक्षक मध्यरात्रीच्या चहाची वाट आतुरतेने पहात होते. सर्वजण घामाने निथळून गेले होते. सुरुवातीस पोलिसांच्या व बिगच्या योजना ठरल्याप्रमाणे पार पडल्या. चहाचे वाटप करणाऱ्या कॅन्टीनच्या माणसास ठराविक वेळेवर बिगचा माणूस भेटला. त्याने बरोबर आणलेला मादक पदार्थ किटलीतील गरम चहात मिसळून टाकला व चहा गुदामातील रक्षकांना देण्यासाठी कॅन्टीनचा माणूस रवाना झाला.

बिग शिस्तीचा भोक्ता असल्याने त्याने आखलेली प्रत्येक गोष्ट वेळेवर होत होती. चहा पाठविण्यात आल्यावर गुदामातील रक्षक मादक द्रव्य मिसळलेला चहा पिऊन गुंगी येऊन पडण्यासाठी योग्य तो वेळ देण्यात आला होता व त्यानंतर बिगच्या साथीदारांनी आपली मोटारलॉरी संथपणाने गुदामाकडे आणली. लगेच लॉरीत बसलेल्या डाकूंनी भराभर बाहेर उड्या टाकल्या व ते सर्वजण पहाऱ्यावर असलेले रक्षक असलेल्या तळघरात घुसले. त्यांना सर्व रक्षक गाढ झोपेत असल्याचे आढळले. तोंडावर मुखवटे चढविलेल्या डाकूंना मनात आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या. रक्षकांनी गुंगी येऊन पडल्याचे सोंग उत्तमपणे वठविले होते. कुतूहलाने त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या कोणी उघडून पाहिल्या असत्या तर त्याला चांगलाच धक्का बसला असता. रक्षकाच्या डोळ्यांतील बुब्बुळे मोठी झालेली त्यांना दिसली नसती. गडबडीत व फाजील विश्वासामुळे कुणाही डाकूस हे सुचले नाही. बिगनेही इकडे लक्ष न देता पुढील काम सुरू करण्यास आपल्या सहकाऱ्यांना सूचना दिल्या.

डाकूंनी आता आपल्या मुख्य कामाकडे दृष्टी वळविली. सोन्याचा साठा असलेल्या तळघराकडे ते वळले. तळघराच्या दरवाजाच्या कुलूपाजवळील फटीत त्यांनी एक लोखंडी पाचर ठोकली. बिगची मंडळी लाकडाच्या किंवा लोखंडी वस्तू वाकविण्यात विशेष वाकबदार होती. त्यांच्या हाताने आता तळघराचे दरवाजे खिळखिळे झाले. लाकूड व लोखंड वाकले. कुलूप ढिले होऊन बाजूस पडले. गुन्हेगारांनी तळघराचे दोन्ही दरवाजे आतल्या बाजूस आत अंधारात ढकलले व ते आत घुसले. तोंडावर चढविलेल्या मुखवट्याच्या डोळ्यांच्या बारीक झडपातून काळोखात तिजोरीचा ते शोध घेऊ लागले. त्यांच्यातील एकाने किल्ल्यांचा भला मोठा जुडगा बाहेर काढला व तिजोरीचे

कुलूप उघडण्याचे डाकूंचे प्रयत्न सुरू झाले. तेवढ्यात अंधारातून सर्वांग थरारून सोडणारे खालील शब्द डाकूंच्या कानांवर पडले.

'थांबा! आम्ही फ्लाइंग स्क्वाडचे गुप्त पोलीस आहोत.' तो एकच सेकंद पण त्याने डाकूंना आश्चर्याचा धक्का दिला. याच घटकेस मि. डोनाल्ड फिशने आपला टेलिफोन उचलला आणि लगेच स्कॉटलंड यार्डच्या चौकशी कचेरीतील टेलिफोनच्या तक्त्यावरील लाल दिवा पेटला व फ्लाईंग स्क्वाडच्या फिरत्या मोटारींना संदेश मिळाला. पोलिसांच्या मोटारी विमानतळाच्या दिशेने मदतीसाठी धावू लागल्या.

त्याच वेळी तिकडे गुदामाच्या तळघरात सोन्याचा साठा अलगद उचलून नेण्याच्या जिद्दीने योजलेले प्रयत्न निष्फळ झालेले पाहून संतप्त व निराश झालेल्या डाकूंनी बॉब लीच्या गुप्तचर पथकास तोंड देण्याची तयारी केली. तळघरात अडकलेल्या गुन्हेगारांना आता आपली सर्व शक्ती पणाला लावून पोलिसांच्या तावडीतून सुटका करून घ्यायची होती. पोलीस व डाकू यांच्यात जोरात धुमश्चक्री सुरू झाली. संख्येने गुन्हेगार जास्त होते व त्यांच्याजवळ जीवघेण्या लोखंडी सळया, शिशाच्या गोळ्यांनी भरलेले हातमोजे, लोखंडी कातऱ्या, हातोडे अशी आयुधे होती. बिचाऱ्या पोलिसांजवळ मात्र नुसते दंडुके होते. गुन्हेगारांनी प्रथम पोलिसांना जमिनीवर लोळविले. त्यानंतर मात्र पोलिसांनी आपल्या दंडुक्यांनी गुन्हेगारांबरोबर चांगला सामना दिला. बिग नैराश्याच्या भीतीने आपल्या अनुयायांना जोराने डाफरून उत्तेजित करीत होता व सारखे 'त्यांना खतम करा, चेचून टाका' असे ओरडत होता. गुन्हेगार आपल्या प्रमुखाचा आदेश अक्षरशः पाळीत होते. चीफ इन्स्पेक्टर लीच्या डोक्यावर सळयांचे अनेक घाव


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

पडले पण त्यातूनही तो वाचला. दुसऱ्या एका पोलिसाचे तोंड कातरीने चेंदामेंदा करण्यात आले. एका पोलिसाचे नाकच तुटले. दुसरा एक पोलीस लढत देत असताना जमिनीवर पडला तेव्हा त्याचा उजवा हात गुन्हेगारांनी तोडला. इतके झाले तरी पोलिसांनी हार न खाता बाहेरून मदत येईपर्यंत धैर्याने व नेटाने डाकूंना तोंड दिले. संख्येने व शक्ति-सामर्थ्याने भारी असलेल्या डाकूंनी अखेरीस पोलिसांचे कडे तोडले व ते एका बाजूने गुदामाच्या बाहेर निसटले. तितक्यात पोलिसांच्या गाड्या येऊन ठेपल्या. गाड्यांचे दरवाजे उघडून पोलिसांनी बाहेर उड्या टाकल्या व ते पळणाऱ्या गुन्हेगारांवर तुटून पडले.

काही मिनिटाच्या आतच हीथरो विमानतळावरील लढाई संपुष्टात आली. सरशी होत असताना जिद्दीने लढत देणारे बदमाश, बाजू अंगलट आल्यावर शस्त्रे टाकून शरण आले. त्या सर्वांना चतुर्भुज करून मोटारीतून रवाना करण्यात आले. अशा रीतीने ब्रिटनमधील एका भयंकर गुन्हेगार टोळीचा पराभव करण्यात पोलिसांना यश मिळाले. पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वात आलेल्या फ्लाईंग स्क्वाडने आपल्या निर्मितीनंतरची पहिली व उल्लेखनीय अशी गुन्हेगारांविरुद्धची मोहीम यशस्वी करून दाखविली होती.

पोलिसांनी पकडलेल्या सर्व बदमाशां-वर १९४८ अखेर ओरडबेली येथे खटला सुरू झाला. सर्वांना निरनिराळ्या मुदतीच्या एकूण एकाहत्तर वर्षांच्या शिक्षा फर्माविण्यात आल्या. न्याया-धिशांनी फ्लाईंग स्क्वाडच्या पथकाच्या शौर्याचे व प्रसंगावधानाचे कौतुक केले.

तुरुंगाच्या दारात शिरलेल्या या कैद्यांपैकी बहुतेकजण सुटकेनंतर गुन्हे करण्यास परत उद्युक्त झाले नाहीत. काही तुरुंगातच मेले. थोडे सुटकेनंतर परागंदा झाले. त्यांच्यापैकी एक डाकू आल्फरूमे पुष्कळ वर्षांनंतर तुरुंगातून सुटून बाहेर पडला. तेव्हा त्याला सर्व जगच बदललेले दिसले. नैराश्याच्या भरात रस्त्याने जाणाऱ्या दोघा इसमांना त्याने कुऱ्हाडीने मारले व पळून जाण्याचा त्याने प्रयत्न केला. जेव्हा आपण पुन: पकडले जाणार असे त्याला दिसले तेव्हा त्याने जवळ बाळग-लेली एक विषाची पुडी तोंडात टाकली व पोलीस येऊन पोहोचेपर्यंत तो गत-प्राण झाला. दुष्कृत्याने बरबटलेल्या दुर्दैवी जीवनाचा शेवट अन्य कशा रीतीने होणार?

● ● ●

(आधारित)

---


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

गणकयंत्रांचा आद्य जनक

# चार्लस् बॅबेज

माझे आयुष्य म्हणजे अपयशांची एक मालिकाच आहे

नंदकुमार रेगे

गणकयंत्रामुळे बेकारी माजेल हा युक्तिवाद आता इतिहास जमा झाला आहे. गणकयंत्र आपल्या यशस्वी जीवनाचे एक महत्वाचे अंग होऊन बसले आहे. गणकयंत्रांची निर्मिती जरी निरनिराळ्या कंपन्या करीत असल्या-तरी त्याचे मूलतत्व एकच आहे. हे मूलतत्व शोधून काढणारा पहिला शास्त्रज्ञ आजच्या पिढीस जवळ जवळ अज्ञातच राहिला आहे. हा शास्त्रज्ञ म्हणजे चार्लस् बॅबेज हा होय! खरे म्हणजे बॅबेज हा अत्यंत तल्लख बुद्धीचा आणि हरहुन्नरी माणूस त्याने आपल्या कल्पनेनुसार गणकयंत्र बनविलेही. परंतु ते पूर्णत्वास नेणे त्याला शक्य झाले नाही. म्हणून कदाचित शास्त्रज्ञाच्या यादीत त्याचे नाव सापडत नसेल. परंतु आपला शोध १०० टक्के पूर्ण करणे त्याला शक्य झाले नाही म्हणून त्याची उपेक्षा करणे हे कृतघ्नपणाचे ठरणार आहे. त्याने कोणत्या प्रकारचे गणकयंत्र तयार केले ते पहाण्यापूर्वी त्याचा जीवन वृत्तांत समजून घेणे इष्ट ठरेल.

चार्लस् बॅबेज हा एका धनाढ्य बँकरचा मुलगा. त्यामुळे ऐश्वर्य त्याच्या पायाशी लोळण घेत होते. तशात तो बुद्धीने अत्यंत तल्लख. स्वभावाने दयाळू, आर्जवी, दानशूर, विनोदी, कष्टाळू आणि चौकस बुद्धीचा. गणित हा तर त्याचा हातखंडा विषय. असा हा माणूस वास्तविक समाधानी, आनंदी असा-वयास हवा. तसा तो दिसतही असे. परंतु मनातून मात्र स्वारी सदा खिन्नच असावयाची 'माझ्या आयुष्यात एकही दिवस कधी सुखाचा आला नाही. माझे आयुष्य म्हणजे अपयशाची एक मालि-काच होय' असे त्याने आपल्या आत्म-चरित्रात लिहून ठेवले आहे.

चार्लस्चा जन्म १७९२ मध्ये डिव्हॉन शायरमध्ये झाला. त्याचे काही काळ लंडनलाही वास्तव्य झाले. त्याचा सर्वात आवडता विषय म्हणजे गणित. या



**चार्लस बॅबेज**

विषयावरील मिळेल ते पुस्तक त्याने वाचून काढले. त्यातल्या त्यात बीज गणिताने तर त्याला जणू वेडच लावले. केंब्रिजमध्ये शिक्षण घेत असतांना बीजगणितासंबंधाने काही शंका त्याने शिक्षकांना विचारल्या. परंतु त्या निरसन करून घेण्याइतक्या महत्वाच्या नाहीत असे त्याला उत्तर मिळाले. तेव्हा शिक्षकापेक्षा आपल्यालाच या विषयाचे अधिक ज्ञान आहे अशी त्याची खात्री पटली.

ट्रिनिटी कॉलेजमध्ये शिक्षण घेत असता आपले दोन सहाध्यायी (सर) जॉन हर्षेल आणि जॉर्ज पिकॉक आपल्याला वरचा क्रमांक मिळू देणार नाहीत ह्या विचाराने त्याने ट्रिनिटी कॉलेज सोडले आणि तो पीटर हाऊस कॉलेजमध्ये दाखल झाला. येथूनच तो १८१४ मध्ये एम. ए. झाला.

त्यानंतरची दहा वर्षे त्याने गणिताचा आणि विज्ञानशास्त्राचा अभ्यास करण्यात घालविली. या दोन्ही विषयावर त्याने बरेच लिखाणही केले.

एखादी गोष्ट करावयाची असे त्याच्या मनाने घेतले म्हणजे त्या गोष्टीचा पिच्छा पुरवावयाचा असा त्याचा खाक्या होता. आपण एखादे गणकयंत्र बनवावे असे त्याच्या मनात आले त्यावेळी तो अवघा वीस वर्षांचा होता. कल्पना सुचण्याचा अवकाश त्याने त्या कल्पनेवर आपले लक्ष केंद्रीत करण्यास सुरुवात केली. ही गोष्ट १८१२ सालची.

तो जेव्हा इटलीत होता तेव्हा त्याला, केंब्रिज युनिव्हर्सिटीत आपली गणितासाठी लुकासियन प्रोफेसर म्हणून

नेमणूक झाल्याची वार्ता कळली. ब्रिटिश पार्लमेंटचा सभासद असलेल्या हेन्री लुकास याने हे अध्यासन निर्माण केले होते. म्हणून ते त्याच्या नावाने ओळखले जात होते. आपण हा बहुमान स्वीकारावा किंवा नाही याबद्दल त्याची दोलायमान स्थिती झाली होती. परंतु काही वर्षांसाठी तरी तू ही जागा स्वीकारच अशी त्याच्या स्नेहयांनी त्याला गळ घातली व ती त्याने मान्य केली. ' आपल्या देशाने दिलेला हा फार मोठा बहुमान असे पुढे त्याने आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे.

## बॅबेजचे गणकयंत्र

बॅबेजच्या संकल्पित गणकयंत्राला विशिष्ठ प्रकारच्या चात्यांवर दाते असलेली चाके हवी होती. परंतु अशी चाके बनविण्यासाठी लागणारी साधनसामुग्री त्यावेळी उपलब्ध नव्हती तेव्हा बॅबेजने ती साधनसामुग्री बनविण्यासच सुरुवात केली. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी म्हणतात ती ही.

या संकल्पित यंत्रावर सहा दशकांपर्यंत आकड्याची मांडणी आणि हिशेब करण्याची सोय होणार होती. परंतु हे यंत्र जसजसे आकार घेऊ लागले तसतशा अनपेक्षित अडचणी त्याचे समोर दत्त म्हणून उभ्या राहू लागल्या. परंतु एकेका अडचणीवर तो मात करू लागला तसतशा त्याच्या डोक्यात नवनवीन कल्पना येऊ लागल्या. सुरुवातीला ज्या यंत्रावर तो सहा-दशकापर्यंतचे गणित करता येते का ते पहाणार होता त्याच यंत्रावर तो २० दशकापर्यंतचे गणित करून पहाणार होता. ह्या उपक्रमात तो गुंतला असतानाच त्याचा निर्माते आणि यंत्रसामुग्री ह्यांचे अर्थशास्त्र हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ फार नावाजला जातो. परंतु अनेक प्रयत्न करूनही त्याचे गणकयंत्र पूर्ण होऊ शकले नाही ही सर्वात मोठी शोकांतिका होय ! या यंत्राचे अवशेष लंडनम्युझियममध्ये पहावयास मिळतात.

## इतर शोध

गणकयंत्राची यशस्वी निर्मिती करण्यास तो अयशस्वी ठरला तरी त्याने काही महत्त्वाचे शोध लावले. लंडनची ग्रेट वेस्टर्न रेल्वे बांधली जात असता दोन रूळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सात फुटांचे अंतर असले पाहिजे ही त्याची सूचना ह्या रेल्वेची बांधणी करणाऱ्या ब्रुनेल याने स्वीकारली.

रहदारीमुळे इमारती कशा कंप पावतात ते दर्शविणारे यंत्रही त्याने शोधून काढले होते. त्याने आपल्या घरात एक विशिष्ठ कोन साधून आरसा अशा रीतीने ठेवला की, त्यावर रात्रीच्या वेळी पडलेला चांदण्याचा प्रकाश, चंद्राचा प्रकाश एवढेच नव्हे तर मेणबत्तीचा प्रकाश अशा रीतीने परावर्तीत व्हावा की, त्याच्या होणाऱ्या कंपनाने घराची हालचाल दृगोच्चर व्हावी.

बॅबेजची उद्योगप्रियता आणि बुद्धीमत्ता पाहिल्यावर गणकयंत्र बनविण्याच्या कामी तो अयशस्वी का व्हावा हे समजणे कठीण आहे. पण त्यानेच आपल्या आत्मचरित्रात ' आपले आयुष्य म्हणजे अपयशाची एक मालिकाच आहे ' असे म्हटलेले नाही काय ? ● ● ●

कामगार जगत

# मुंबापुरी–नरकपुरी !

मध्य मुंबईतल्या किरकिरणाऱ्या चाळीतला कामगार असो की, उपनगरातनं बकालपणे पसरलेल्या झोपडपट्टीत राहणारा कामगार असो–यंदाच्या पावसानं त्याला जाम झोडपून काढलं आहे यात शंकाच नाही ! मुंबई हे भारतातलं म्हणे पहिल्या दर्जाचं शहर. ह्या शहरातल्या दक्षिण भागातनं हिंडायला लागलं की ह्या शहराविषयीच्या अपेक्षा उंचावतात. काळा घोडा, विद्यापीठ, चर्चगेट, मरीन लाईन्स–आपण कुठल्याशा उच्च दर्जाच्या शहरात आल्याचा समज कायम राहतो. नंतर हळूहळू मध्य मुंबईत किंवा उत्तरेकडे सरकू लागल्यावर ह्या समजाला तडे जाऊ लागतात. गिरणगावातल्या चाळीतनं किंवा मानखुर्द, वांद्र्याच्या झोपडपट्टीतनं कुणाकडे जाऊन आल्यावर तर पहिलं मत पार बदलतं. ज्या वातावरणात इथलं कामगार जगत् आज जोपासलं जातं ते पाहिलं म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य मिळून पाव शतक लोटलं आहे असं म्हणायचीसुद्धा लाज वाटते. ज्या नरकातनं वाट तुडवीत कामगारांच्या वस्तीस्थानापर्यंत पोचावं लागतं ते पाहिलं म्हणजे सार्वजनिक आरोग्याच्या 'सॅनिटेशन'च्या गप्पा निरर्थक वाटू लागतात. पाऊल पाऊल चिखलातनं, तुंबलेल्या गटारांची, संडासांतली घाण मस्तकात भिनवून घेत, अशा झोपडपट्ट्यांतनं, चाळीतनं हिंडण्याचं निमंत्रण आमच्या मंत्र्यांना दिलं पाहिजे. समाजवादाची निरर्थक टकळी चालू ठेवणाऱ्या मंत्र्यांनीही अशी निमंत्रणं स्वीकारली पाहिजेत, त्याशिवाय त्यांच्या डोळ्यावर आलेली समाजवादाची पुस्तकी झापड निखळून पडणारच नाही !

आजच्या भडकत्या महागाईनं त्यांची स्थिती आणखीनच बिघडवून टाकली आहे. ठिकठिकाणी चाळ कमिट्या, झोपडपट्टी संघ आज अस्तित्वात आहेत. चाळदुरुस्तीच्या, झोपडपट्ट्यांचं पक्क्या राहत्या घरात रूपांतर करण्याच्या योजनाही आज त्यांच्याजवळ आहेत. त्या त्यांनी मान्यही करून घेतल्या आहेत. पण पैशाअभावी त्या आज पडून आहेत. भडकत्या महागाईनं अशा कामांसाठी सदस्यांकडून मिळणाऱ्या वर्गणीचा ओघही खोळंबला आहे. महाराष्ट्र शासनानं जुन्या चाळींच्या दुरुस्तीसाठी एक यंत्रणा सुरू केली आहे. त्या यंत्रणेचा कारभार कसा चालतो, त्यातनं रहिवाशी कामगारांना त्रासच कसा होतो ह्यासाठी वेगळ्या लेखाचाच प्रपंच करावा लागेल. मात्र एक गोष्ट नक्की, की ह्या यंत्रणेद्वारे मुंबईतल्या शेकडो किरकिरणाऱ्या चाळींचे कुठलेही प्रश्न सोडवलेले नाहीत. झोपडपट्ट्या

सुधारण्यासाठी शासनानं आतापर्यंत अनेक यंत्रणा राबवल्या. पण झोपडपट्ट्यांचे प्रश्न आजही तसेच आहेत. वेगवेगळ्या कंपन्यांचे मालक-चालक आणि कामगार संघटना तर कामगारांच्या ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत उदासीनच दिसतात. जणू त्यांचा ह्या प्रश्नाशी काही संबंधच नाही ! नाही म्हणायला, कलव्याच्या नॅशनल मशिनरी (N. M. M.) मध्ये कामगार सभेनं ह्याबाबत एक उल्लेखनीय पाऊल उचललं आहे. आर. जें. चा भलाभक्कम आर्थिक पाठिंबा असणाऱ्या ह्या संघटनेनं तिथल्या कामगारांसाठी वस्तीस्थाने उपलब्ध करून द्यायची योजना कार्यान्वित केली आहे. ह्या उपक्रमाची स्वतंत्र ओळख मी नंतर करून देणार आहेच ! त्याचप्रमाणे मुंबईत भाडेकरू संघांच्या आडून कम्युनिस्टांनीही ह्या प्रश्नाला तोंड फोडलेलं आहे. पण प्रयत्न अपुरे आहेत. आवाज असायला हवा तेवढा बुलंद नाही !

परवा एका कंपनीच्या फॅक्टरी मॅनेजरांशी बोलण्याचा प्रसंग आला. त्यांच्या कंपनीत कम्युनिस्टांची युनियन आहे आणि ती तोडायचा विडा मॅनेजमेंटनी उचलला आहे. ते म्हणतात, 'लाखो रुपये खर्च झाले तरी हरकत नाही. पण ही युनियन तोडायचीच ! कम्युनिझमला आमचा विरोध आहे !'

मी त्यांना सहजी प्रश्न केला, 'अशा दामदंडादी उपायांनी कम्युनिस्ट चळवळ चिरडली जाऊ शकेल का? जोपर्यंत तुम्ही तथाकथित कम्युनिस्ट विरोधक कामगारांच्या, खालच्या थरातल्या समाजाच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहात नाही, त्यांच्या किमान गरजा भागविण्याचा प्रयत्न करीत नाही, तोपर्यंत ह्या दामदंडादी उपायांनी कम्युनिझम चिरडला जाण्याऐवजी त्याला खतपाणीच मिळेल असं नाही वाटत तुम्हाला ? गरिबीनं गांजलेला, राहायला धड जागा नसलेला, महागाईनं नाडलेला, प्रत्येक न्याय्य मागणीदेखील लढल्याशिवाय मिळू शकत नसलेला असंतुष्ट कामगार, तुमच्या कम्युनिस्ट विरोधी लढ्यात सहभागी होईल अशी अपेक्षा तरी तुम्ही कशी बाळगता ?'

अर्थात उत्तर मिळालं नाहीच. कामगारांचे मूलभूत प्रश्न जर कारखानदारांनी सोडवले तर मला वाटतं, लढे निम्म्यानं कमी होतील. उत्पादन वाढेल. पण त्यासाठी पैसा खर्च न करता त्यांचे लढेच वाटेल त्या उपायांनी चिरडून टाकायसाठी पैसा उधळणाऱ्या तथाकथित कम्युनिस्ट विरोधकांना हे सांगण्यात काय हंशील ?

माणूस प्रतिनिधी

हिंदी चित्रपट

---

# जुगनू

---

सुभाष नाईक

'सुखी लुटेरा,' 'हरीकेन' किंवा 'हंटरवाली' अशा जुन्या स्टंट चित्रपटांची सुधारून वाढवलेली आवृत्ती म्हणजे प्रमोद चक्रवर्तीचा 'जुगनू.' आधुनिक काळात तंत्र आणि निर्मितीक्षमतेत ज्या सुधारणा झाल्या आहेत त्याशिवाय, या चित्रपटात काही वेगळे लक्षणीय पहायला मिळाले नाही.

हिंदी चित्रपटांचा प्रेक्षक बुद्धीशून्य असतो अशी पटकथालेखक सचिन भौमिक यांची ठाम समजूत दिसते. प्रेक्षकांना चकित करण्यासाठी बुद्धी आणि तर्क यांची तारेवरची कसरत करायची ही भौमिक यांची जुनीच शैली. गुलशन नंदा यांच्या फॉर्म्युला कथेवरून भौमिक यांनी बेतलेली पटकथा. आपल्या आईच्या शीलरक्षणासाठी लहानपणीच एका व्यक्तीचा खून करून पळालेला हा मुलगा मोठेपणी 'जुगनू' नावाने मोठमोठ्या चोऱ्या करतो, दरोडे घालतो. या सगळ्या जोखमीच्या कामात महमूद त्याला मदत करतो. जुगनू हा आधुनिक रॉबिनहूड आहे. श्रीमंतांना लुटून मिळालेली संपत्ती गरिबांना वाटून देणारा. 'गरिबी हटाओ'ची ही योजना गमतीची आहे.

दिवसाउजेडी 'जुगनू' समाजातील एक प्रतिष्ठित नागरिक आणि कोट्याधीश आहे. (काहीही काम न करता!) जुगनूचे आय. जी. ची भाची हेमामालिनीशी प्रेम जमते. एक खलनायक आहे प्रेम चोप्रा. जो एका देशद्रोही टोळीचा सभासद आहे. कथानकाचा

समतोल साधण्याकरिता जुगनूला देश-द्रोह्यांचा शत्रू बनवून त्यांचे भांडे फोडण्यास लावणे आवश्यक होते. नायक नायिकेचे प्रेम साध्यासरळ पद्धतीने चालू राहिले तर त्यात कसली मजा? त्यात विघ्ने' आलीच पाहिजेत. तर हेमामालिनी ही त्याची मुलगी आहे–ज्याचा धर्मेन्द्रने लहानपणी खून केला होता.

अखेरीस जुगनू देशद्रोह्यांच्या जाळ्यात सापडतो. आता नायिकेचे 'फिअरलेस नादिया' वाले रूप प्रगट होते. ती हेलिकॉप्टरमधून युद्धरचना करते. जुगनूला शत्रूच्या हातून सोडवते आणि शत्रूचा नाश करते. आणि हे सगळे झाल्यानंतर फोटो काढण्यासाठी पोलीस येतात. (इतर चित्रपटांप्रमाणेच)

अशा या कथेच्या बरेवाईटपणाविषयी लिहिणे निरर्थकच. परंतु पटकथालेखकाला प्रसंग चांगल्यारितीने गुंफून इंटरेस्ट कायम ठेवता आला असता. 'नया जमाना'चे दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती पुन्हा आपल्या जुन्या चित्रपटांच्या स्तरावर आले आहेत. त्यांनी काही प्रसंगांच्या चित्रीकरणामध्ये असामान्य कौशल्य दाखवले आहे यात शंका नाही. चित्रगृहात बालप्रेक्षकांच्या टाळ्या मिळतील परंतु चित्रनिर्मात्याच्या रूपाने त्यांची प्रतिष्ठा वाढणार नाही. प्रोसेसिंग आणि प्रिन्टिंग यामध्ये एकरूपता नाही. काही जागी सेटसदेखील कुचकामी ठरलेत. कॅमेरामन व्ही. के. मूर्ती यांची कामगिरी काही अंशीच चांगली आहे. संवादलेखक एहसान रिझवींनी मात्र निराशा केली आहे. बर्मनदांनी संगीत चांगले दिले आहे. 'जब बागोमें जुगून चमके' हे गीत लोकप्रिय होऊ शकेल.

धर्मेंद्र 'जुगनू'च्या भूमिकेत आहे–गंभीर दृश्यांशिवाय इतर ठिकाणी त्याने काम ठीक केले आहे. हेमामालिनी आकर्षक दिसते. धर्मेन्द्रबरोबर काम करताना ती विशेष खुलते असे दिसते. ती खूपच मोकळेपणाने वावरते. शिवाय तिने एक सुंदर नृत्यही केले आहे. तसा तिला विशेष वाव नाही. तरीही पठाणाच्या रूपात धर्मेन्द्रची नक्कल करण्यात तिने कमाल केली आहे. प्राणसारख्या नटाला इथे वावच नाही. प्रेम चोप्रा आणि मनमोहन अभिनय केव्हा शिकणार कुणास ठाऊक! छोटयाशा भूमिकेत राजमेहरा चांगला चमकला.

□

---


**पुरंदरच्या बुरुजावरून**

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य : चार रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**

# अभिमान

यश हृषिदांचे
तसेच जया-अभिताभचे

सुरेल संगीत, उत्तम अभिनय आणि नेटक्या दिग्दर्शनाने सजलेला 'अभिमान' हा एक सुरस चित्रपट... अभिरुचीसंपन्न चित्ररसिकांना निश्चितच आवडेल असा आहे.

संगीतामुळे एकत्र आलेली दोन मने. दोघेही गायक...नायक सुबीरकुमार (अभिताभ) एक लोकप्रिय आणि फॅब्युलस गायक...लोक त्याच्या आवाजावर लट्टू आहेत–आणि तीही लोकांकरिता पॉप्युलर चालींची गाणी गात असतो. सारी सुखं पायाशी लोळण घेताहेत. गडगंज पैसा मिळतो आहे. रात्री-अपरात्री चाहत्या स्त्रियांचे फोन येतात. आणि व्यवहार सगळा सांभाळतो आहे जिवाभावाचा मित्र चंदू (असरानी) असे सगळे असूनही सुबीरकुमारला एकाकीपण अस्वस्थ करते. निद्रानाश जडतो. दिवसेंदिवस लोकप्रियतेप्रमाणेच वाढती बचैनी. एके दिवशी त्याच्या मावशीच्या गावातील लोक कार्यक्रम ठरवण्यासाठी येतात. आणि जिने लहानाचे मोठे केले त्या दुर्गामावशीला खूश करण्यासाठी सुबीर त्या गावी येतो. तिथे त्या गावात हिंडत असतानाच एका सुरेल आवाजाने तो मंत्रमुग्ध होतो. त्या गोड आवाजावर आणि त्या गोड गळयाच्या मुलीवर तो निहायत खूश होतो. ती गोड गळयाची मुलगी म्हणजे उमा (जया भादुरी) सुशील सुस्वभावी तरुणी.

अशी ही संगीताने भारलेली दोन तरुण मने एकत्र येतात. कसलीही विघ्ने न येता त्यांचे मधुर मीलन घडते. सुबीर उमाला घेऊन शहरात परततो आणि त्यांचा दृष्ट लागण्यासारखा सुखी संसार सुरू होतो. सुबीरच्या आग्रहाखातर उमादेखील चित्रपटांसाठी गाऊ लागते. आणि सुबीरपेक्षाही अधिक लोकप्रियता मिळविते. शास्त्रीय संगीताचा अभ्यास आणि गोड गळा यामुळे चित्रनिर्माते आणि रसिकही सुबीरपेक्षा उमाकडे अधिक आकर्षित होतात. वरचढ झालेली उमा, तिचे यश, तिची लोकप्रियता पाहून सुबीरचा अहंकार दुखावतो. त्याचा वृथा अभिमान फणा वर काढतो. आणि त्या दोघांमध्ये दुरावा निर्माण होतो. उमाला काहीच कळू शकत नाही. आपला काही अपराध नसताना सुबीर असा का वागतो याचे कोडे तिला उलगडत नाही. शेवटी चकमक झडून ती आपल्या माहेरी-गावी येते. गर्भवती उमा. ती एका कोवळ्या अर्भकाला जन्म तर देते. पण उमलण्याआधीच नियती ही कळी खुडून घेते. उमा नर्व्हस-ब्रेकडाऊन. कालांतराने सुबीरची चूक त्याच्या ध्यानी येते. आणि अखेरीस पुष्कळ प्रयत्नानंतर संगीतामुळेच त्यांचे पुर्नमिलन. अशी ही साधीच कथा पण ती हाताळली आहे अत्यंत कौशल्याने. हळुवारपणे, कितीतरी सूचक, नाजूक प्रसंग गुंफून कथा फुलवली आहे. परंतु इतर हिंदी चित्र-

पटांप्रमाणे यात फापटपसारा नाही. नेमकेच आणि अत्यंत प्रभावीपणे मांडलेले हे कथानक. हृषिदांनी आपल्या तरल प्रतिभेने, अभिताभ-जया यांनी आपल्या अभिनयकौशल्याने आणि श्रेष्ठ संगीतकार सचिनदेव बर्मन यांनी सुरेल स्वरसाजाने त्यात जीव ओतला आहे.

प्रथमार्धात सुबीरची लोकप्रियता – त्याची पडलेली धुंदी, एकटेपणाची बेचैन करणारी जाणीव अभिताभने चांगली व्यक्त केली आहे. नायिकेच्या गोड गळयावर लुब्ध होऊन तो लगेच लग्न करून टाकतो. इथे इतर हिंदी चित्रपटांप्रमाणे नायक-नायिकेला जंगलातून, शेतांमधून, गाणी गात, नाचत हुंदडत हिंडवलेले नाही. लग्नानंतरचे प्रेमप्रसंग तर मोठ्या खुबीने दाखवले आहेत. अत्यंत संयमित आणि सूचक अभिनयाने हे प्रसंग खुलले आहेत. उतावळेपणा किंवा धसमुसळेपणा यापेक्षा चेहऱ्यावरील नाजूक भावछटा आणि हस्तपल्लवी यातूनच या प्रसंगांची खुमारी विशेषत्वाने मनाला स्पर्शून जाते.

अहंकार दुखावल्यानंतर, वृथा अभिमानाने जळणारा सुबीर आपल्या शहरी, मैत्रिणीच्या चित्राच्या (म्हणजे बिंदूच्यां) घरी मद्यपान करीत बसतो. मद्याच्या चषकात मनोव्यथा बुडवण्याचा – बेचैनी बुझवण्याचा त्याचा हा दुबळा प्रयत्न. इथे अभिताभने यत्किंचितही अतिरेकीपणा केलेला नाही. इतर चित्रपटांप्रमाणे बिंदूचे आणि नायकाचे प्रेमचाळे दाखवलेले नाहीत तर उलट बिंदू अधिक समंजस आणि सहृदयी दाखवली आहे. बिंदूला एक वेगळी आणि चांगली भूमिका मिळाली. ती तिने ठीक वठवली. कुठेही भूमिकेचा तोल जाऊ न देता.

अभिताभने आपल्या अभिनयकौशल्याने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की तो वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका चांगल्या वठवू शकतो. जया भादुरी ही तर अशी अभिनेत्री आहे की तिला अभिनय करावाच लागत नाही. एखाद्या कटाक्षातून, एखाद्याच हास्यलकेरीतून. एखाद्याच वाक्याच्या फेकीतून ती कितीतरी सांगून जाते. सुबीरच्या प्रेमाला दुरावल्यानंतरची विकल मनोव्यस्था तर तिने फारच चांगली व्यक्त केली.

विशेष उल्लेख करायला हवा तो असरानीचा. त्याने सुबीरच्या मित्र कम् सेक्रेटरीची भूमिका विलक्षण चांगल्या रीतीने साकार केली. त्याचा चटपटीतपणा – संवादातील आणि हालचालीतीलही लक्षणीय. अभिताभला सांभाळून घेणारा-मैत्रीच्या अधिकारानं, प्रेमानं, स्वेच्छेनं त्याचे व्यवहार चाणाक्षपणे सांभाळणारा आणि त्याच्याकडे येणाऱ्या चित्रनिर्मात्यांना कुशलपणे हाताळणारा हा चंदू – ही व्यक्तिरेखा असरानीने सजीव केली.

या शिवाय दुर्गा खोटे, डेव्हीड, ए. के. हनगल यांनीही आपापल्या भूमिका ठीक वठवल्या. तसे पाहिले तर 'अभिमान'ची कथा फारशी नवीन नाही. यापूर्वी 'हारजीत' (पहाडी

संन्याल आणि काननदेवी) आणि 'स्ट्रीट सिंगर' (सैगल आणि काननदेवी) या चित्रपटातूनही हा कथाविषय येऊन गेला आहे. तरीदेखील 'अभिमान'चे वैशिष्टय म्हणजे हृषिकेश मुखर्जी यांनी ही कथा मोठ्या कौशल्याने हाताळली आहे, फुलवली आहे. अभिरुचीसंपन्न तरीही लोकप्रिय चित्रपटांचे दिग्दर्शक म्हणून त्यांची ख्याती आहेच.

या चित्रपटाचे आणखी एक खास वैशिष्टय म्हणजे यातील पार्श्वसंगीत आणि मधूर गाणी. 'मीत ना मिला रे मनका' 'तेरी बिंदिया रे हाय हाय तेरी बिंदिया' 'नदिया किनारे' 'पिया बिना.' ही आणि यासारखी सुरेल गाणी आधीच लोकप्रिय झाली आहेत. गायक गायिकेच्या या नाटयपूर्ण आणि संगीत मय कहाणीला साजेसे भावमधूर संगीत बर्मनदांनी दिले आहे. गीतकार मजरूह यांची गीते अर्थपूर्ण आहेत. 'तेरे मेरे मिलनकी ये रैना' या गीतातील मधूर भावस्वप्न मोहविणारे. राजेंद्रसिंग बेदी यांचे संवाद चटकदार आहेत. विशेषत: चंदूचे संवाद फक्कड. जयवंत पाठारे यांचे रंगीत छायाचित्रण सुखद आणि समाधानकारक वाटले. गावाकडील वातावरण सुरम्य चित्रित केले आहे. चित्रपटाच्या इतर तांत्रिक बाजू ध्वनिसंकलन, संकलन इ. प्रथम दर्जाच्या आहेत.

हृषिदांचा हा 'अभिमान' हिंदी चित्रसृष्टीला अभिमान वाटावा असाच आहे खरा.

● ● ●

## बासू भट्टाचार्यांचा अविष्कार पूर्ण

'अनुभव'च्या उज्वल यशानंतर बासू भट्टाचार्यांनी आपला 'अविष्कार' हा नवा चित्रपट पुरा करीत आणला आहे. बासूंचे हे पहिलेच रंगीत चित्र. कथाविषयाच्या दृष्टीने 'अविष्कार' चाकोरीबाहेरचा ठरेल खासच. राजेश खन्ना, शर्मिला टागोर ही चित्रसृष्टीतील लोकप्रिय जोडी त्यांच्या या चित्रपटात पतिपत्नीची भूमिका वठवीत आहे. विशेष म्हणजे राजेश, शर्मिला यांच्या चेहऱ्याला रंगरंगोटी न करताच (मेकप न करता) त्यांची एक आगळीच प्रतिमा चित्ररसिकांसमोर मांडली गेली आहे. नीना जोहर आणि महेश शर्मा या सहाय्यक कलावंतांची या चित्रपटातील कामे खळबळजनक ठरतील असे बोलले जाते. 'अविष्कार'ची पटकथा स्वत: बासूंची असून संगीताचा साज चढविला आहे 'अनुभव' फेम कनु रॉय यांनी. ◻

सटर फटर

# गणा – गणपुले हिकमतबाज डोकं !

सु. ल. सोमण

गणा गणपुले ही आमच्या गावातली—चुकलो, उपनगरांतली ! – एक नामी वल्ली. नाना क्लृप्त्यांनी ह्याचं डोकं नेहमी भरलेलं असतं. चेहऱ्याने नीटनेटका, माफक झुलपं वाढवलेला, साफ दाढी आणि थोडयाशा नेटक्या कपडयात आमचा गणा सहजी समोरच्या माणसावर छाप पाडून जातो. आणि त्याच्या बोलण्यांत गुंगलेला स्वत:ला टोपी बसल्याशिवाय त्याच्या कचाटयातून बाहेर पडूच शकत नाही. एवढी ख्याती असली तरी, गणाला माणसं टाळीत मात्र नाहीत. उलट आळीत, चाळीत, नगरांत तो सर्वांना हवाहवासा वाटतो. त्याचा स्वभाव उमदा आहे. नगरातल्या गणेशोत्सवाची कार्यक्रमपत्रिका गण्याशिवाय निघूच शकत नाही. एक वर्ष गणा गणपतीच्या दिवसात कोकणात निघून गेला होता. त्या वर्षी कार्यक्रम – पत्रिकेला जाहिराती मिळवता मिळवता आमच्या नाकी नऊ आले. गणा असला की, जाहिरातीना तोटा नसतो. हीच गोष्ट कार्यक्रमांच्या बाबतीत. गणाच्या खटपटी लटपटी अफाट. कुठनं कसा जाऊन धडकतो कुणास ठाऊक, परंतु अत्यंत खर्चिक, लोकप्रिय कार्यक्रमदेखील गणा गणपुले, कुठल्याशा नावाखाली अगदी मामुली दरात आणून देतो !

मधे आमच्या उपनगरातल्या एका हौसिंग सोसायटीला पैसे कमी पडत होते. सभासद मंडळी (नेहमीप्रमाणेच! ) वाढीव पैसे भरीत भरीत टेकीला आली होती. शेवटी मंडळी आली गण्याकडे. गणानं डोकं लढवलं. ' जन जागृती मंडळ ' नावानं एक संस्था आकस्मिकपणे गावात उभी राहिली. गावातल्या आमदारांच्या उपस्थितींत मोठया गाजावाजांत ह्या संस्थेच्या सभा होऊ लागल्या. वर्गणी, देणग्या ह्यांतून थोडा पैसा राहू लागला. थोडयाच दिवसांत दूर छत्तिसगडांतल्या कुठल्यातरी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी प्रचंड नाटय-महोत्सव आमच्या उपनगरांत सुरू झाला. त्या निमित्त जाहिरातींनी तुडुंब भरलेली जन जागृती मंडळाची स्मरणिकाही प्रसिद्ध झाली. को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीचं अपुरं बांधकाम धडाक्यांत पूर्ण झालं. सोसायटीचे सभासद अर्थात गणाच्या ह्या प्रयोगात सामील होतेच. आज गणानं, आपल्या जन जागृती मंडळासह ह्याच सोसायटीतल्या एका ब्लॉकमध्ये मुक्काम ठोकला आहे !

ह्या सोसायटीच्या आणि त्या बरोबरच इतर पंधरा वीस इमारती थोडयाशा, मूळ वस्तीपासून अलग आहेत. हमरस्त्यापासून पाच सात

मिनिटांची पाऊलवाट तुडवीत जावं लागत असे ह्या इमारतीपर्यंत पोचायला. वाहनेही थेट पर्यंत जात नाहीत, उन्हाळ्या हिवाळ्यांत नाही, पण पावसाळ्यांत इथल्या रहिवाशांचे हाल अतोनात होतात. म्युनिसिपालटींतल्या चकरा रस्ता मिळवण्यासाठी इथल्या रहिवाशांनी केल्या होत्या. आमदार महाशयांना पत्र लिहून झालं होतं. वृत्तपत्रांकडे धाव घेऊन झाली होती. कशाचाही फायदा झाला नव्हता. आणि शेवटी तोडगा काढायसाठी प्रकरण गणाकडे आलं होतं. मुनशीपालटींत पैसा दाबून रस्ता मिळवायचं गणानं उडवून लावलं आणि त्या ऐवजी गावातला सार्वजनिक गणेशोत्सव जन जागृती मंडळाच्या सहकार्यानं ह्या सोसायटीच्या आवारांत साजरा करायचं ठरवलं. त्यात कार्यक्रम योजला अभिरूप लोकसभेचा ! -प्रसिद्ध आमदार, खासदार, महापौर, साहित्यिक, पुढारी ह्या साऱ्यांना झाडून आमंत्रणं गेली होती. नगरविकास मंत्र्यांना प्रमुख पाहुणे म्हणून आवर्जून आमंत्रण गेलं होतं. आणि ह्या निमंत्रणांच्या प्रती, नगरपालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांनाही पाठवायला गणा विसरला नाही. परिणाम अपेक्षित तोच झाला. अभिरूप लोकसभेच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी, दिवस-रात्र खपून हमरस्त्यापासून इमारतीपर्यंत पक्की सडक नगरपालिकेनं तयार केली. (दोन वर्षापासूनचे तिथल्या रहिवाशांचे विनंती अर्ज मात्र फायलीतूनच पडून होते ! ) दुसऱ्या दिवशी मंत्रीमहाशयांच्या मोटारी थेट सोसायटी पर्यंत जाऊन थडकू शकल्या हे सांगायला नकोच ! अभिरूप लोकसभेच्या कार्यक्रमासाठी गण्यानं नाममात्र तिकीट लावून, ह्या कार्यक्रम उभा करण्यासाठी आलेला खर्चही भरून काढला, हे देखील इथे नमूद केलंच पाहिजे !

तर असा हा आमचा गणा गणपुले. हिकमती, लटपटी. नाथमाधवांच्या रायक्लबच्या सभासदांची आठवण करून देणारा. त्याच्या हिकमती डोक्यानं आमच्या उपनगरवासियांची बरीच लहानमोठी कामे करून दिलेली. त्यामुळेच अशा प्रत्येक प्रसंगी गण्यानं स्वतःची थोडी बहुत तुंबडी भरून घेतलेली असली तरी त्याकडे गावकऱ्यांनी कानाडोळाच केला. गण्याची चेष्टा मस्करी म्हणूनच इतरांनी खपवून घेतली. त्याच्या चेष्टा मस्करीतही त्यानं एक नियम कटाक्षानं पाळला होता. गावातल्या किंवा कुठल्याही पोरी त्यानं आपल्या चेष्टा मस्करीतून साफ वगळल्या होत्या. आता कुणी गोविंदा कुचेष्टेनं म्हणतोही की, पूर्वाश्रमी त्यानं पोरीच्या बाबतीत फटका खाल्ल्याने तो त्या वाटेला फिरकत नाही. असल्या कुचेष्टेला गण्या दाद अजिबात देत नाही आणि त्यामुळे त्याच्या नेहमीच्या कार्यक्रमातही खंड कधी पडत नाही। पण अशा ह्या गण्यावर परवा एक संकट गुदरलं. काही केल्या त्याचं डोकं त्या संकटावर मात करायला चालेना. त्याचं असं झालं—

पदरी थोडे पैसे जमा झाल्यावर गणा गणपुलेनी साबण बनवायला सुरुवात केली. कपडे धुण्याची साबण पावडर. 'क्लीनवेल' नावाखाली त्यानं त्या पावडरची तुफान जाहिरात चालवली. मोफत सँपलसची खैरात केली. पण एवढं होऊनही तीनशे-साडेतीनशे किलोवर काही साबणाचा खप, वर्ष होऊन गेलं तरी जाईना. आता वीस पंचवीस हजार रुपये गुंतवूनही महिना जेमतेम दोनशे रुपयेसुद्धा सुटत नाही. म्हटल्यावर कोण हवालदिल होणार नाही? आमचा गणाही तसाच हवालदिल झाला. जाहिराती व फ्री-सँपलसवर होणारा खर्च देखील भरून निघत नव्हता. नफा मिळणं दूरच! कुणी म्हणे साबणाला फेसच नाही. कुणी म्हणे कपडे धुतल्यावर निळे डागच कपड्यावर राहतात. तर दुसरा कुणी म्हणे कपडे धुतांना हातांची आगीआग होते! गण्याला काहीच उलगडत नव्हतं. त्यानं आपला साबण टेस्ट करवून घेतला होता. त्यात सोड्याचा अंश नसल्याचं सर्टिफिकेट मिळवलं होतं. सर्फ, मॅजिक स्वे वगैरे मार्केटात चालू असलेल्या साबणापेक्षा वरचढ असल्याची सर्टिफिकेटस् त्यानं साबणाच्या पुड्यांना जोडली होती. किंमत अगदी कमी ठेवली होती. तरीही गणा गणपुलेच्या 'क्लीनवेल'ला मार्केट मिळत नव्हतं. 'कुठे स्वे, डेट, सर्फ, मॅजिक—गण्याच्या साबणाला त्याची कुठली सर येणार?' ही आमच्या गावातलीच प्रतिक्रिया. इतरत्रची गोष्टच सोडा.

खचलेला, निराश झालेला गण्या साफ कोलमडल्यासारखा वाटायला लागला होता. त्याच्या हिकमती डोक्याचं खोकं झाल्यासारखं वाटत होतं. दाढीची फारशी काळजी त्यानं घ्यायचं सोडलं होतं. असा हा दाढी वाढलेला, खचलेला, हातात साबणाच्या पुड्यांची पिशवी घेऊन हिंडत असलेला गणा एकदा हिंडत हिंडत कोटात आला. (कोटात म्हणजे फोर्टात हं, नाही तर व्हायचा गैरसमज!) रिगल समोर त्याला तुफान गर्दी उसळलेली दिसली. मरगळलेल्या उत्सुकतेनं (?) त्यानं त्या गर्दीत आपलं डोकं घुसवलं. तुकतुकीत डोक्याचे गोरे गोमटे, लुंगी-कुडता लपेटलेले पाच सहा तरुण आणि पाचवारी जेमतेम लपेटलेल्या, तांबडं कुंकू धारण केलेल्या तीन चार गोऱ्यापान, नाजूक युवती 'हरेकृष्ण'च्या तालात रस्त्यातून नाचत चालल्या होत्या. हातात तंबोरे खांद्यावर झोळ्या नि छातीवर लटकत असलेली कृष्ण तसवीर! त्यांच्या भोवती तुफान गर्दी उसळली होती. गणाच्या मनात सहज विचार आला. 'आमचे साधू असेच हिंडतात. त्यांना कोण असा भाव देतो? हा साऱ्या गोऱ्या कातडीचा प्रभाव. स्वातंत्र्यानंतर २६ वर्षांनीही टिकून राहिलेला.' 'आणि ह्या विचाराबरोबरच गणाच्या डोक्यात लख्कन ट्यूब पेटली. त्या अमेरिकन संतमहंतांना तिथेच सोडून गण्या झपाटल्यासारखा धावला!

झटपट दाढी वगैरे उरकून गणानं आपला मोर्चा मरीन लाईन्सकडे वळवला. कधीतरी ओळख झालेलं रॉन

हेंड्रिक्स आणि मरिआ हे अमेरिकन दांपत्य तिथे रहात होतं. गणा तिकड गेला. त्याच्या नशिबानं दांपत्य घरी होतं. तिथे त्याच काय बोलणं झालं कुणास ठाऊक पण दुसऱ्या दिवशी मुंबईतल्या सर्व वृत्तपत्रांतून ठळक जाहिराती आल्या. 'Clean Well goes over the seas–Clean Well now sales in U. S. A.' जाहिराती-बरोबर हेंड्रीक्स दांपत्याचे फोटो होते. त्यांच्या सहीची प्रशस्तीपत्रं होती.

आणि ह्या जाहिरातीचा जादूची कांडी फिरवावी तसा उपयोग गणाला झाला. 'क्लीनवेल' अगदी कुलाब्यातल्या पॉश दुकानातून देखील मिरवू लागला. मागणीप्रमाणे पुरवठा करता करता गणाच्या नाकीनऊ आले. प्रयोगशाळांच्या प्रशस्तीपत्रांनी, मोठ्या जाहिरातींनी जे गणाला साधलं नव्हतं ते सहजी सिद्ध होऊन गेलं होतं, केवळ हेंड्रीक्स दांपत्याच्या प्रशस्तीपत्रामुळे !

आज गणा गणपुलेकडे आबादी आबाद आहे ! त्याचं खोका बनलेलं डोकं पुन्हा हिकमतीबाज बनलं आहे ! !

● ● ●

---

## बॉबी ड्रेस

राजकपूरच्या 'बॉबी' मध्ये डिंपल ज्या प्रकारचा पोषाख करील तसाच पोषाख तयार करण्याचा संकल्प तयार कपडे करणाऱ्या एका मोठ्या फर्मने सोडला आहे. या नव्या वेषाचे नाव अर्थातच 'बॉबी ड्रेस' असेल. हा चित्रपट पाहणाऱ्या लाखो चित्ररसिकांकडून या पोषाखाचे तडाखेबंद स्वागत होईल अशी आशा फर्मच्या चालकांना वाटते.

एकेकाळी हिंदी रुपेरी पडद्यावर गाजून गेलेली बेगम पारा ही नटी 'जिद' नावाचा चित्रपट निर्माण करीत आहे. तिचे पती नाझीर खान दिग्दर्शित करीत असलेल्या या चित्रपटात सायराबानू आणि संजय यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

---

# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649


दुसऱ्या महायुद्धाचा काळ....

चोरापोरांपासून थोरामोठ्यांपर्यंत
साऱ्यांनाच या काळात
आपले सुखी समाधानी, चाकोरीचे
आयुष्य झुगारून देऊन असामान्य
कर्तव्ये पार पाडावी लागली.

# पेट्रोल पंपावरील वेडा

ही अशीच एका सामान्याची कथा

**माणूस**

## चित्र वार्ता पुस्तक

१५ सप्टेंबर अंकात

एक रुपया